

# दादांची ज्ञान गोष्ठी

# दादांची ज्ञान गोष्ठी

(आप्तवाणी-१)

मराठी अनुवाद :

**वासुदेव दत्तात्रय वैद्य**

पुनः संस्कारित

प्रकाशक :

**होलिस्टिक सायन्स रीसर्च सेन्टर**

कामरेज, सूरत

२०१७

# दादांची वाणी

(आप्तवाणी-१)

# Dadanchi Vani

Marathi Translation by
Vasudev Dattatray Vaidya
from Aptavani-1 Gujarati Version

ISBN 978-81-908626-9-1

मराठी अनुवाद :
वासुदेव दत्तात्रय वैद्य

प्रथम संस्करण : 1980

द्वितीय संस्करण : 2017

कींमत : रु. 250/-

: संपादन :
डॉ. बालाजी गणोरकर ✶ डॉ. सुनन्दा शास्त्री ✶ एल. डी. पटेल

: अक्षरांकन :
कु. अल्पा भरूचवाला ✶ कु. सोहिणी शाह

: ग्राफिक्स :
हरीश शाह ✶ प्रदीप पटेल

: प्रकाशक :
**वसंत यु. पटेल**
प्रेसीडेन्ट
वीतराग विज्ञान चेरिटेबल रीसर्च फाउन्डेशन
होलिस्टिक सायन्स रीसर्च सेन्टर
महाविदेह तीर्थ धाम के पास, कामरेज चार रस्ता, सूरत ३९४१८५
www.holisticscience.org ✶ hsrcsurat@gmail.com

: ग्राफिक्स :
क्रिष्ना ग्राफिक्स, अहमदाबाद-१३. मो. ९८९८६५९९०२

## Publisher's Note

The Holistic Science propounded by Soul Incarnate Shri A. M. Patel popularly known as Dada Bhagawan is becoming more and more popular. His sayings were compiled basically by his followers and published by Jai Sadchidanand Sangh, Mumbai and later on Jai Sadchidanand Sangh, Ahmedabad in the title of Aptavani 1 to 9.

The First translation of Aptavani 1 (Gujarati) was done by Pt. Vasudev Dattatray Vaidya was published by Mumbai's Jai Sadchidanand Sangh in 1980. This publication's more than two thousand copies were distributed among the seekers free of cost. It became very popular in Maharashtrian people and was out of stock since a long. The re-editing of the said book was suggested by Shri Kanudadaji to HSRC's Team and the Team is successful to produce the work in this format.

During the editing the matter was compared with Gujarati Version and corrected wherever required by Dr. Balaji Ganorkar and Mr. L. D. Patel. Typographical errors have been corrected by Dr. Ganorkar and Dr. Sunanda Shastri. Our two office assistants Km. Alpa Bharuchwala and Km. Sohini Shah who were not knowing Marathi but while the data processing they also learnt Marathi very well. I am thankful to Mr. Harish Shah and Mr. Pradeep Patel for Designing the book in present shape. We hope this book will be welcomed by readers and they will send their feedback.

With best wishes on the occasion of new year to all!

**(Vasant U. Patel)**
President
Vitrag Vignan Charitable Research Foundation

# प्रस्तावना

(मूळ आवृत्ति मधून)

कारणसर्वज्ञ ज्ञानीपुरुष श्री. ''दादाभगवान'' ह्यांच्या प्रगट सरस्वती स्वरुप वाणींच संकलन करुन आप्तवाणी गुजराथी महाग्रंथाचा मराठी भाषेतून अनुवाद केला आहे.

पूर्वी अनेक महान संतपुरुष होऊन गेले. त्यांनी संसाराचा त्याग करुन सर्वस्व सोडले व तपश्चर्या करण्याकरिता ते जंगलात एकांत वासात निघून गेले. त्यांना आत्मज्ञान प्राप्त करण्याकरिता अतिशय कष्ट सोसावे लागले व कित्येक कोटी जन्म खर्च करावे लागले. **श्री दादाभगवान** ह्यांना १९५८ साली हे विज्ञान आपोआप प्रगट झाले. त्यानी एक तासात ब्रह्मांडामध्ये फिरुन हे जग कोण चालवितो, कसे तयार झाले वगैरे सर्व प्रत्यक्ष पाहिले.

हे अक्रमविज्ञान ह्या कलियुगातील एक अजब तऱ्हेचे आश्चर्य आहे. असे प्रगट ज्ञानीपुरुष दहा लाख वर्षानी एकदाच प्रगट होतात. ज्याला कीर्ति, मान, लक्ष्मी व विषय किंवा शिष्यांचा लोभ नाही त्यालाच हे अक्रमविज्ञान प्राप्त होते. शास्त्रज्ञानाने कसलाही निवाडा होत नाही परंतु अनुभव ज्ञानाने सर्व तऱ्हेचा खुलासा होतो.

ज्ञानीपुरुष हे मूर्तिमान् मोक्ष स्वरुप च असतात. स्वतः तरून जाऊन दुसऱ्यांस तारु शकतात, संपूर्ण निस्पक्षपाती असतात. त्यांची वाणी मधूर असून सर्व धर्मास पटणारी असते. त्यांचा देहावर थोडासुद्धा मालकी हक्क नसतो. त्यांची वाणी टेपरेकॉर्ड असते व त्यावाणीवर त्यांचा जरासुद्धा हक्क नसतो. श्री 'दादा' स्वतः संपूर्ण अकर्ता पदामध्ये निमित्त भावानेच असतात. हे विज्ञान अत्यंत जलद क्रियाकारी आहे. ते आत्मार्थाची अंतर बाह्य शुद्धि करते व त्यामुळे शुद्धात्म्याकडे संपूर्ण लक्ष असते. हे ज्ञान क्रमिक मार्गातील जप, तप, ध्यान, धारणा वगैरे क्रियाकांडापेक्षा त्वरित गतिने मोक्षमार्गा कडे घेउन जातो. अशा अक्रमज्ञानाच्या भव्यमार्गाचे श्री ''दादा भगवान'' हे वीतराग विज्ञानी आहेत. संसारात राहूनसुद्धा संपूर्ण वीतरागी दशा असणे हे ह्या कलियुगातील एक अकरावे आश्चर्य आहे.

हे आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर प्रत्येकजण बसल्याजागीच मोक्ष अनुभवितो. ज्यानी आत्मज्ञान घेतले आहे त्याना कोणी शिव्या दिल्या की तुम्हीं गाढव आहात अथवा त्यांचे कितीही नुकसान झाले तरी त्या गोष्टीचा त्याच्यावर काहीचं परिणाम नाही व ते आपल्या समाधीतच असतात.

हा अनुवाद पूर्ण झाल्यानंतर त्यामध्ये ज्या काही योग्य सुधारणा करुन दिल्या त्याबद्दल मी त्यांचा व कर्मचारी बंधुंचा अत्यंत आभारी आहे. बॉम्बे प्रोसेस स्टुडिओचे

मालक श्री मोहनराव कामत ह्यांनी त्यांच्या उमा प्रिंटर्स फर्ग्युसन रोड, परेल ह्या प्रेस मधून मुखपृष्ठ विनामूल्य छापून दिले. तसेच बोम्बे सर्वोदय प्रेस, मोगल लेन माहिम ह्याचे मालक श्री भाऊ देसाई ह्यानी श्रींचा फोटो विनामूल्य छापून दिला त्याबद्दल मी त्या उभयतांचा अत्यंत आभारी आहे. तसेच ह्या कार्यात ज्यांनी-ज्यांनी मला थोडी फार मदत केली त्या सर्वांचा मी सप्रेम आभारी आहे.

माझी मातृभाषा गुजराथी नसल्याकारणाने, ह्या ग्रंथाचा अनुवाद करताना तसेच छपाईमध्ये ज्या काही थोड्याफार चुका झाल्या असतील त्या वाचकांनी सुधारुन ध्यांव्या व त्याबद्दल आपण मला क्षमा कराल ही मी नम्र विनंती करतो.

हा ग्रंथ वाचल्यांतर आपण ज्ञानीपुरुषाचे दर्शन घेऊन त्यांचेकडून आत्मज्ञान प्राप्त करुन घ्याल व आपल्या ह्या अमूल्य मानवदेहाचे सार्थक करुन मोक्ष प्राप्त करुन ते मोक्षसुख प्रत्यक्ष अनुभवाल हीच आपणा सर्वास नम्र विनंती करतो.

श्री दादाना अनंत कोटी नमस्कार करून आप्तवाणी हा मराठी ग्रंथ त्यांच्या सुचरणी अर्पण करून सर्व जगाचे कल्याण होवो अशी भावनापूर्वक प्रार्थना करतो.

जय सच्चिदानंद.

दिनांक: २१ नोव्हेंबर १९८० **वासुदेव दत्तात्रय वैद्य**

# श्री अम्बालाल मूळजीभाई पटेल

## ( दादा भगवान )

(१९०८ - १९८८) चे

# जीवन चरित्र

कारणसर्वज्ञ ज्ञानीपुरुष श्री दादा भगवान ह्यांचे मूळ नाव श्री अंबालाल मूळजीभाई पटेल ह्यांच्या मातोश्री परमपूज्य सौभाग्यवती जवेरबा व पूज्य पिताश्री मूळजीभाई पटेल. हे भादरण जिल्हा खेडा (गुजरात) येथे राहात असत. श्रींचा जन्म त्यांच्या आजोळी (मामाचे घरी) तरसाली गांवी (वडोदरा जवळ) कार्तिक शुक्ल १४ विक्रम संवत १९६५ दिनांक ८ नोव्हेंबरा १९०८ रोजी झाला.

त्यांचे पिताजी भादरण येथे शेतकरी होते. मातोश्री सौ. जवेरबा ह्यांना साक्षात जगदंबा मातेच्या संस्काराने जीवन वांहिले. जेव्हां श्री शाळेत जात तेव्हां ते नेहमी मुलांना मारत असत. ते शाळेतून आल्यावर त्यांच्या मातोश्री त्याना नेहमी उपदेश करीत असतं की, बाळ तु शाळेतून मार खाऊन ये, परंतु मार देऊन घरीं येऊ नकोस. कारण की तुला स्वतःला मार खाल्यावर जर जखम झाली तर तिला मलमपट्टी लाऊन ती बरी करता येईल, परंतु ज्यांला तू मार दिला असेल त्याचा आत्मा खूपच दुखावला जाईल तर मग त्याचे काय? ते लोकांची मस्करी सुद्धा करीत असत.

कुलधर्माप्रमाणे त्यांचा मातोश्रीने वैष्णव संप्रदायानुसार त्यांना गुरु-उपदेश देवविला व गुरुने त्यांच्या गळ्यात माळ बांधली. त्यानंतर काही काळाने त्यांच्या गळ्यातील ती माळ तुटली. तेव्हां मातोश्रीने त्यांना सांगितले की तु आता परत दुसरी माळ घालुन घे, नाही तर लोक तुला गुरु-शिवाय आहेस असे म्हणतील. तेव्हां त्यानी उत्तर दिले की "गुरु" असा पाहिजे की तो स्वतः मला प्रकाश देईल. परंतु जो गुरु स्वतःच अंधारात आहे तो मला मुळीच उपयोगी नाही.

वयाच्या बाराव्या वर्षी वर्गात लघुत्तम साधारण विभाज्य शिकत असताना शिक्षकाने त्याना विचांरले की "ह्या सर्व रकमेत अशी कोणती रक्कम आहे की जी लहानात लहान अविभाज्यरूपी राहील". तेव्हा बाळ ज्ञानीने (श्री दादांनी) उभे राहून उत्तर दिले की 'साहेब ह्या तुमच्या व्याख्येवरुन तर भी भगवान शोधून काढला'. हे जीवमात्र रक्कमच आहे. त्या रकमेमध्ये लहानाता लहान आणि अविभाज्य रुपी राहिलेला जर कोणी असेल तर तो स्वतः भगवानच आहे.

वयाच्या तेराव्या वर्षी त्यांच्या गावात एक संतपुरुष आले होते. त्यांचेकडे श्री दररोज दर्शनास जात असत व खूप भावपूर्वक त्यांची नियमाने सेवा करीत होते. एक दिवशी त्यांना साधुने सांगितले की "जा बेटा, तुला भगवान मोक्षास नेईल." तेव्हां श्रीने त्याला जबाब दिला की 'जर भगवान मला मोक्षास नेईल तर तो जेव्हां उठ म्हणेल त्या वेळेस मला त्या जागेवरुन उठावे लागेल व जेव्हां तो बस म्हणेल तेव्हां मला बसले पाहिजे, असला मोक्ष मला नको. मोक्षामध्ये मला बसविल्यावर त्याच्या (परमेश्वराचा) जर एखादा ओळखीचा मनुष्य आला व मला त्याने तेथून उठविले व त्यास तेथे (मोक्षाच्या जागेवर) बसविले तर ते काय कामाचे? मोक्ष आणि वरिष्ठ हे दोन्ही विरोधाभास (विरुद्ध) आहे. माझ्यावर कोणीही वरिष्ठपण नसावा व कोणीही माझ्या खाली पण नसावा.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले. लग्नाच्यावेळी मंडपात सप्तपदीच्या वेळी होमाभोवती फेऱ्या मारीत असताना त्यांच्या डोक्यावरील पागोटे आपोआप सरकले गेले, तेव्हां श्रींच्या मनात एकाएकी विचार आला की ह्यावेळी आपले लग्न होत आहे परंतु कधीतरी आपल्यापैकी एकास नक्की विधुर व्हावे लागेल ना? भयंकर आनंदाच्या व मोहाच्या समयी किती उत्कृष्ट वैराग्य!

एक दिवस इंग्रजीचा तास चांलू असताना त्यांनी शिक्षकास सांगितले की "साहेब एक भाषा शिकण्याकरिता मी पंधरा वर्षे फुकट घालविली तर त्या पंधरा वर्षाच्या अवधीत मी भगवान शोधून काढला असता!"

वयाच्या अठराव्या वर्षी श्रीनी मेट्रीकच्या वर्गात प्रवेश केलां. त्यावेळी त्यांच्या पिता व वडिल बंधुंची इच्छा होती की त्याना उच्च शिक्षणाकरिता परदेशास पाठवावयाचे व तिकडून परत आल्यावर कलेक्टरची नोकरी द्यायाची. ही गोष्ट श्रीना समजल्यावर त्यानी विचार केला की जर आपण मेट्रिक पास झालो तर आपणास परदेशात उच्च शिक्षण घेऊन सुबेदारी पत्करावयास लागेल व जन्मभर दुसऱ्याची गुलामगिरी करावी लागेल, त्यापेक्षा आपण एखादे पानपट्टीचे दुकान काढू, परंतु आपल्या शिरावर कोणीही वरिष्ठ नको. म्हणून त्यांनी अभ्यासाचा वेळ भजी वगैरे खाऊन भटकण्यात फुकट घालविला, की जेणे करुन अभ्यास कमी करावयास मिळेल.

मेट्रीक नापास झाल्यावर त्यानी त्यांचे मित्र श्री कांतीभाई आपाभाई पटेल ह्यांचेबरोबर भागिदारीमध्ये कंत्राटदाराचा धंदा सुरु केला. विसाव्या वर्षी त्यांना पुत्ररत्न झाले तेव्हां त्यानी सर्वाना पेढे वाटले. नंतर दोन वर्षानी आपल्या सर्व मित्रवर्गाला हॉटेलमध्ये अल्पाहार दिला. तेव्हां मित्र त्याना विचारु लागले की आज कोणत्या कारणास्तव हा अल्पाहार देत आहात ? तेव्हां श्रीनी उत्तर दिले की निसर्गाचा पाहुणा आमचे घरी आला होता त्याच्या

मुक्कामावर परत गेला. नंतर परत त्याना दोन वर्षानी कन्यारत्न झाले तेव्हां त्यानी सर्वाना बर्फी वाटली व ती कन्या (निसर्गाचा पाहुणा) परत तिच्या दुसऱ्या मुक्कामावर गेली तेव्हां सर्व जणाना पेढे वाटले व त्यां निसर्गाच्या पाहुण्यास निरोप दिला.

श्रींचे सर्व जीवन परोपकारातच खर्च झाले व त्यानी मित्रांना बजावले की ''माझे काम कधीही करु नका, तुम्हाला जर माझी जरुर पडली तर भी तुमच्या मदतीकरिता अर्ध्या रात्री येईन'' त्यांनी आपल्या जीवनात लाखो रुपये कमाविले व तो सर्व मिलकत परोपकाराकरिता खर्च केली. त्यांनी आपल्या धद्यांची कधीही सोदाबाजी केली नाही. स्वत:चे सुख बाजूला ठेऊन दुसऱ्याच्या अडचणी दूर केल्या. असे संस्कार लहानपणापासूनच केल्या कारणाने त्यांच्यात कारुण्याचे बीज रोपले गेले व त्यामुळे हे अजब ज्ञान प्रगट झाले.

कंत्राटदारांच्या धंद्यामध्ये त्यानी भागिदारास स्पष्ट सांगितले की, इतर सर्व कंत्राटदार सीमेंट व लोखंड कमी वापरुन त्याची चोरी करतात तसे आपण करावयाचे नाही, कारण सीमेंट हे घराचे रक्त आहे व लोखंडी सळ्या ही हाडे आहेत. जर रक्त आणि हाडे काढून घेतली तर त्यात काय राहील? आपण भुके मरु परंतु अनीतिने वागणार नाही. ते जीवनपर्यंत त्याप्रमाणे नीतितत्वाला धरुन राहीले होते.

आत्मज्ञान प्राप्त होण्यापूर्वी त्यांच्या मध्ये लोभ आणि कपट ह्यांचे परमाणु बिलकुल नव्हते, परंतु मान नावाचा रोग त्यांच्यामध्ये अति प्रमाणात होता. एखाद्याने त्याना जर अंबालालभाई ह्या नावाऐवजी सहज अहो अंबालाल म्हटले तरी आतमध्ये क्रोध व्हावयाचा व त्या माणसाबद्दल कित्येक दिवस त्याच्यावरील राग जात नसे व तो राग ते आतल्याआत साठवून ठेवीत असत. त्यावेळी त्यांना ज्ञान प्राप्त झाले नसल्या कारणाने त्यांची बुद्धि एवढी जबरदस्त वाढली होती की ते बुद्धिचा सर्वात उच्च सल्ला फुकट देत असत व त्याकरिता मोठमोठे शेठजी गाड्या घेऊन त्यांच्या घरी येत असत. ही परोपकार बुद्धि दिवसेदिवस वाढतच गेली आणि शेवट करुणेमध्ये रूपांतर झाले. तसाच, अहंकार इतक्या भयंकर प्रमाणात वाढत गेलां की त्यांना रात्री झोपसुद्धा येत नव्हती. एक दिवस त्यांनी तो अहंकार गुंडाळला व आपल्या उशाखाली ठेवला आणि दुसरे दिवशी सकाळी ते अहंकाराचे गाठोडे विश्वामित्री नदीमध्ये सोडुन दिले. त्या दिवसापासून त्यांचा अहंकार पूर्ण निघुन गेला.

परमतत्वाच्या प्राप्तिकरिता श्रींनी वयाच्या विसाव्या वर्षापासून वैष्णव धर्माचे, स्वामीनारायण धर्माचे, जैनधर्माचे, कबीरजी व संत पुरुषांच्या ग्रंथांचे भरपूर अध्ययन केले व नंतर वयाच्या तेवीसाव्या वर्षी त्यांच्या धंधातील भागीदार श्री कांतिभाईनी त्याना श्रीमत् राजचंद्र ह्यांचा ग्रंथ वाचावयास दिला. तो वाचल्यावर त्यानी सांगितले की ''आतापर्यंत

मी पुष्कळ पुस्तके वाचली परंतु ती मला बिलकुल पसंत पडली नाहीत व माझी तृप्ती झाली नाही श्रीमत् राजचंद्राचा ग्रंथ मला आवडला. परंतु प्रगट स्वरुपात त्यांचे मला दर्शन न झाल्याकारणाने माझी तृप्ती झाली नाही तरीसुद्धा त्यामध्ये तल्लीनता राहिली आणि हे संपूर्ण आत्मज्ञान प्रकाशाच्या उपलब्धिचा दिवस उगवला.

सन १९५८ साली जुलै महिन्यात श्री एक दिवस कंत्राटदाराच्या धंद्या करिता एका गांवाहून दुसऱ्या गांवी गाडीने जाण्याकरिता सुरत स्टेशनच्या तीन नंबर प्लेटफॉर्मवर सायंकाळी ५-३० वाजता एका बाकड्यावर विराजमान झाले होते. ते सोनगडहून वडोदरा येथे परत जाण्याकरिता गाडीची वाट पहात बसले होते. सूर्यास्ताच्या अगोदर त्यानी फराळ करुन घेतला आणि तेथेच त्याना ब्रह्मांडाचे संपूर्ण दर्शन ज्ञानामध्ये झळकले. एक तास त्याच स्थितिमध्ये राहून स्वतः कोण आहे? हे जग काय आहे? कशा रीतीने चालत आहे? भगवान कोण आहे? काय करतो? कोठे रहातो? वगैरे ब्रह्मांडाचे सर्व दृश्य त्यांना स्पष्ट दर्शनात आले. त्यानंतर हीच आत्मस्थिति सतत राहू लागली.

हे ज्ञान होण्यापूर्वी श्री अज्ञानी व अहंकारी होते. ते त्यानंतर निरहंकारी झाले. त्यावेळी सिद्धगतिमध्ये असल्यामुळे त्यांनी जे अपार सुख अनुभविले ते वर्णन करण्यापलिकडील होते. ही आत्मस्थिति त्यानी चार वर्षे गुप्त ठेवली. नंतर १९६२ साली त्यांच्या कुटुंबातील एक नातु श्री चंद्रकांतभाई ह्यांनी हा मोक्षाचा ज्ञान दरवाजा श्रींना विनंती करुन सर्वांकरीता उघडविला व त्याचा आतापर्यंत हजारो जणांनी फायदा घेतला आहे. हे आत्मज्ञान श्रीं कडून फक्त एक तासामध्ये घेऊन एकंदर हजारो महात्मे संसार, धंदा करुन देह मुक्तिसुखाचा कायमचा लाभ घेत आहेत.

त्यांच्या धर्मपत्नी सौभाग्यवती हिराबा साक्षात अन्नपूर्णा देवी रूपानी ह्या सर्व मोक्षार्थीकरिता जगत्माता रूपाने आपले सर्वस्व अर्पण करीत आहेत. त्यांचे कायमचे वास्तव्य वडोदरा येथे मामाच्या पोळात (गल्लीत) आहे. त्यांचे कायमचे वास्तव्य वडोदरा येथे मामाच्या पोळात (गल्लीत) सहाव्या घरामध्ये आहे.

श्री. कंत्राटादाराचा धंदा त्यांचे भागीदार श्री. कनुभाई पटेल ह्यांचे बरोबर वीतरागभावाने सांताक्रुझ (मुंबई) येथे करतात. वडाला (मुंबई), वडोदरा, अहमदाबाद, सौराष्ट्र, गुजराथ, औरंगाबाद वगैरे सर्वठिकाणी श्रीज्ञानगंगेचे उदक, ज्ञानपिपासु जनां करिता त्यांचेबरोबर सत्संग करतात व ज्ञानदान देतात. त्याकरिता स्वखर्चाने सर्व गांवोगांवी प्रवास करतात.

जय सच्चिदानंद.

दिनांक २१ नोव्हेंबर १९८० **वासुदेव दत्तात्रय वैद्य**

# अनुक्रमणिका


| क्रम | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ०१. | धर्मस्वरुप | ०१ |
| ०२. | जगत् सर्जन | ०३ |
| ०३. | जग हे गूढ 'पजल' आहे | ०४ |
| ०४. | व्यवस्थित शक्ति | ०५ |
| ०५. | परमेश्वर-वरिष्ठ आणि मोक्ष | ०७ |
| ०६. | सापेक्ष (Relative) धर्म - सत् (Real) धर्म | ०८ |
| ०७. | क्रमिक मोक्ष मार्ग - अक्रम मोक्ष मार्ग | ०९ |
| ०८. | संसारिक संबंध | ११ |
| ०९. | सुख आणि दुःख | १२ |
| १०. | प्रारब्ध पुरुषार्थाचे विरुद्ध असणे अवलंबून राहणे | १३ |
| ११. | अविरोधाभास-अवलंबन | १५ |
| १२. | आत्मा-अनात्मा | १६ |
| १३. | दिव्यचक्षूमधून मोक्ष | १७ |
| १४. | पुनर्जन्म | १८ |
| १५. | मन-वचन-काया परिणामकारक (effective) | १९ |
| १६. | आधि-व्याधि-उपाधि | २१ |
| १७. | जग आणि ब्रह्म | २१ |
| १८. | मन-वचन-काया यांची उपाधि | २२ |
| १९. | आगम आणि निगम | २३ |
| २०. | पूरण आणि गलन | २४ |
| २१. | संसार विघ्ने दूर करण्या साठी तीन मंत्र | २५ |

| | | |
|---|---|---|
| २२. | चिंता आणि अहंकार | २६ |
| २३. | प्राप्त झाले आहे ते भोगून घे | २९ |
| २४. | ध्यान आणि अपध्यान | २९ |
| २५. | गतिफळ-ध्यान आणि हेतु | ३२ |
| २६. | बुद्धि वापरण्याची मर्यादा | ३३ |
| २७. | अविरोध वाणी-प्रमाण | ३४ |
| २८. | ज्ञानी आणि धर्माचे स्वरुप | ३४ |
| २९. | निर्दोष दृष्टी | ३६ |
| ३०. | कैफ आणि मोक्ष | ३७ |
| ३१. | मोक्षच आग्रह करण्यासारखा आहे | ३८ |
| ३२. | मनुष्याचे निराश्रितपणा | ४१ |
| ३३. | नैसर्गिक तंत्र संचालन व भौतिक विज्ञान | ४२ |
| ३४. | भौतिक विकास- आध्यात्मिक विकास | ४३ |
| ३५. | प्राकृत साहजिकता | ४४ |
| ३६. | साधक दशा | ४५ |
| ३७. | पुण्य आणि पाप | ४६ |
| ३८. | सर्जन आणि विसर्जन | ४९ |
| ३९. | पुरुष आणि प्रकृति | ४९ |
| ४०. | त्रिगुणात्मक प्रकृति | ५० |
| ४१. | आत्मा सगुण आणि निर्गुण आहे | ५२ |
| ४२. | प्राकृत पूजा- पुरुष पूजा | ५२ |
| ४३. | प्रकृति धर्म- पुरुष धर्म | ५३ |
| ४४. | प्राकृत-बगीचा | ५४ |
| ४५. | वैराग्याचे प्रकार | ५४ |

| | | |
|---|---|---|
| ४६. | मनुष्यपणाचा विकास | ५७ |
| ४७. | माया आणि मुक्ति | ५७ |
| ४८. | मळ-विक्षेप-अज्ञान : राग-द्वेष-अज्ञान | ५९ |
| ४९. | वाणीचे विज्ञान | ६० |
| ५०. | मौन-परमार्थ मौन | ६२ |
| ५१. | अंत:करण | ६३ |
| ५२. | मन कसे आहे? विचार काय आहे? | ६४ |
| ५३. | कार्य करण्याची प्रेरणा मनातून होते | ६६ |
| ५४. | ज्ञाता ज्ञेयाचा संबंध | ६७ |
| ५५. | मनावर स्वार होऊन बसा | ६८ |
| ५६. | लक्ष्मी कोठे रहाते? | ७० |
| ५७. | मनाचा संकोच-विकास | ७१ |
| ५८. | मनाचा वक्र परिणाम | ७२ |
| ५९. | मनाचा स्वभाव | ७२ |
| ६०. | मनाच्या ग्रंथी कशा विरघळतील | ७४ |
| ६१. | मन भौतिक आहे | ७५ |
| ६२. | मनाचे प्रकार | ७६ |
| ६३. | मन-आत्म्याचा ज्ञेय-ज्ञाता संबंध | ७७ |
| ६४. | बुद्धि प्रकाश-ज्ञान प्रकाश | ७७ |
| ६५. | बुद्धिचे प्रकार | ७८ |
| ६६. | बुद्धिचा हेतु | ७९ |
| ६७. | गणपति-बुद्धिचा अधिष्ठाता देव | ८० |
| ६८. | बुद्धिजन्य अनुभव तसाच ज्ञानाजन्य अनुभव | ८१ |
| ६९. | मतभेद कशामुळे? | ८३ |

| | | |
|---|---|---|
| ७०. | सरळ व्यापार करा | ८६ |
| ७१. | लक्ष्मीजी  कोणत्या कारणाने कमी होते? | ८७ |
| ७२. | बुद्धि क्रिया आणि ज्ञान-क्रिया | ८८ |
| ७३. | बुद्धिभेद तेथे मतभेद | ८९ |
| ७४. | अवधानाची शक्ति | ९१ |
| ७५. | अंत:करणाचे तिसरे अंग-चित्त | ९२ |
| ७६. | ज्ञानीच फक्त शुद्ध आत्मा देऊ शकतो | ९४ |
| ७७. | चित्तप्रसन्नता | ९६ |
| ७८. | अहंकार | ९७ |
| ७९. | त्याग कशाचा करावयाचा? | ९८ |
| ८०. | भोगणारा कोण आहे? | ९९ |
| ८१. | अहंकाराचा रस खेचून घ्या | १०० |
| ८२. | हसतमुखाने विष प्या | १०१ |
| ८३. | अदृश्य तप म्हणजे काय? | १०३ |
| ८४. | मान अपमानाचे खाते | १०४ |
| ८५. | अहंकाराचे विष | १०५ |
| ८६. | अहंकाराचे प्रभाव | १०६ |
| ८७. | अंत:करणाचे संचलन | १०७ |
| ८८. | अनिवार्य  अथवा स्वैच्छिक | ११० |
| ८९. | जगाचे अधिष्ठान | ११२ |
| ९०. | निश्चेतन-चेतन | ११७ |
| ९१. | मनुष्यदेह मोक्षाचा अधिकारी | ११९ |
| ९२. | इच्छा | १२० |
| ९३. | भाव म्हणजे काय? | १२२ |

| | | |
|---|---|---|
| ९४. | सज्जनता-दुर्जनता | १२३ |
| ९५. | देहाचे तीन प्रकार | १२५ |
| ९६. | देहाध्यास केव्हां सुटतो? | १२८ |
| ९७. | देहाच्या तीन अवस्था | १२८ |
| ९८. | मनुष्य देहाचे प्रयोजन | १३१ |
| ९९. | आचार-विचार आणि उच्चार | १३१ |
| १००. | उद्वेग (संताप) | १३३ |
| १०१. | निद्रा (झोप) | १३६ |
| १०२. | स्वप्न | १३७ |
| १०३. | भय | १४० |
| १०४. | हित-अहिताची जाणीव | १४१ |
| १०५. | आयुष्यातील अनुकूलता | १४२ |
| १०६. | खटके (संघर्ष) | १४३ |
| १०७. | काटकसर (Economy) | १४४ |
| १०८. | विषय | १४५ |
| १०९. | प्रेम आणि आसक्ति | १५२ |
| ११०. | नैसर्गिक कायदा- 'भोगवतो त्यांची चूक' | १५४ |
| १११. | निजदोष दर्शन | १५७ |
| ११२. | चुका | १६१ |
| ११३. | वाकडे वागणे-स्वच्छंदता | १६५ |
| ११४. | मताग्रह | १६९ |
| ११५. | दृष्टिराग | १७० |
| ११६. | वैरभाव | १७१ |
| ११७. | संसारसागराच्या लहरी | १७१ |

| | | |
|---|---|---|
| ११८. | क्लेश | १७४ |
| ११९. | खरे सुख-दु:ख काय आहे | १७७ |
| १२०. | दोषदृष्टी | १७८ |
| १२१. | स्मृति (आठवण) | १७९ |
| १२२. | गैरसोयीत सोय | १८० |
| १२३. | भर आणि निर्जरा (charge-discharge) | १८२ |
| १२४. | आवड आणि नावड (likes and dislikes) | १८४ |
| १२५. | मोहाचे स्वरुप | १८७ |
| १२६. | क्रोध | १९० |
| १२७. | लोभ | १९१ |
| १२८. | कपट | १९३ |
| १२९. | क्रोध, मान, माया, लोभ ह्यांचे खाद्य | १९३ |
| १३०. | गृहखाते-परराष्ट्र खाते (Home Department-Foreign Department) | १९४ |
| १३१. | संयोग | १९५ |
| १३२. | प्राकृत संयोग | २०१ |
| १३३. | योग-एकाग्रता | २०३ |
| १३४. | सहज समाधि | २०४ |
| १३५. | ध्याता-ध्येय-ध्यान | २०६ |
| १३६. | गुरुकिल्ली | २०८ |
| १३७. | अक्रमज्ञान-क्रमिकज्ञान | २०९ |
| १३८. | चारगति-भटकंती कशामुळे? | २१० |
| १३९. | प्रज्ञा. | २१२ |

## ( १ )
## धर्म-स्वरुप

'धर्म' म्हणजे काय ?

जी वस्तु स्वत:च्या गुणधर्मात प्रगट होते त्यास 'धर्म' म्हणतात. धर्म म्हणजे वस्तुचा स्वभाव आणि त्यालाच त्याचा धर्म म्हणतात.

उदाहरणार्थ: सोन्यास सोने केव्हां म्हणतात? जेव्हां त्याचे गुणधर्म सोन्याचे दिसतात. तेव्हां त्यास सोने म्हणतात. ही द्राक्षे जर कडू लागली तर तुम्ही काय म्हणाल? द्राक्षाचे गुणधर्म त्याच्यांत नाहीत. पितळेला जर सोन्याचे पॉलिश केले तर ते हुबेहुब सोने आहे असेच दिसेल. परंतु जर आपण ते सोनाराकडे नेले व त्यास कस लावून (Test) बघितले तर, आपणास दिसून असे येते की, त्यांत सोन्याचे गुणधर्म नाहीत, म्हणून ते सोने नव्हे.

तुमच्या पुढे दोन प्रकारचे दोन आंबे ठेवले आहेत. त्यातील एका आंब्यास आंब्याचा सुगंध येतो, थोड्या दिवसांनी तो वाळुन जाईल, सुरकुत्या पडतील आणि काहीं दिवसांनी ते फळ सडलेलें दिसेल. परंतु दुसरा आंबा दिसण्यात तसाच पण लाकडाचा, त्याच्यामध्ये सर्वच असणार, परंतु वास येणार नाही, दोन्हीही (दिसावयाला) आंबेच आहेत, पण लाकडी आंबा हा नावालांच आंबा आहे त्यांत खऱ्या आंब्याचे (स्वभाव) गुणधर्म नाहीत. परंतु खरा आंबा त्याचा स्वभावात आहे. गुणधर्मात आहे. त्याप्रमाणे वस्तु जेव्हां तिच्या स्वभावात असते, गुणधर्मात असते तेव्हांच ती वस्तु म्हटली जाते.

अनात्म्याला-पुद्‌गलाला 'मी' म्हणून ओळखले जाते. ती वस्तु नाहीं परधर्म आहे. हा स्वधर्म नाही. आत्म्याला आत्मा ओळखण्यातच आत्म्याचे दर्शन आहे आणि हाच धर्म, स्वधर्म आणि आत्मधर्म आहे.

(टीप:- प्रगट ज्ञानी पुरुष श्री ''दादा भगवान'' व एक चंदुलाल नावाचा जिज्ञासू यांच्यातील परिसंवाद)

दादा: तुम्ही कोण आहात?

चंदुभाई: मी चंदुलाल आहे.

दादा: तुमचे नांव काय?

चंदुभाई: माझे नाव चंदुलाल आहे.

दादा:- मी चंदुलाल आणि माझे नाव चंदुलाल ह्यांत काही विरोधाभास दिसून येतो का? नामी आणि नाम हे दोन एक कसे असतील? नाव हे व्यवहाराकरिता दिले जाते. जेव्हा मूल जन्मास येते तेव्हां त्याचे नाव ठेवले जाते व ते म्युनिसिपालिटीच्या (नगरपालिकेच्या) नोंदणी (Register) पत्रकात नोंदले जाते व मनुष्य जेंव्हां मरतो तेव्हां ते नाव नगरपालिकेच्या नोंदणी (Register) पत्रकांतून त्याच दिवशी कमी केले जाते.

दादा: हा हात कोणाचा आहे? हे पाय कोणाचे आहेत?

चंदुलाल: माझे आहेत.

दादा: हे तर शरीराचे सुटे भाग आहेत. ह्यांत तुझे काय आहे ? तुझ्या आंत मन आहे ते कोणाचे आहे?

चंदुलाल: माझे आहे.

दादा: ही वाणी कोणाची आहे ?

चंदुलाल: माझी आहे.

दादा: हे शरीर कोणाचे आहे ?

चंदुलाल: माझे आहे.

दादा: माझे आहे असे म्हणता क्षणीच ह्याचा मालक दुसरा कोणीतरी आहे असे तुझ्या ध्यानांत येते किंवा नाहीं?

चंदुलाल: येते.

दादा: हो, तर मग तुम्ही स्वत: कोण? ह्याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?

चंदुलाल: नाही.

दादा: हे घड्याळ दुकानांतून विकत घेतले, हे तुम्ही बरोबर तपासून आणले की हे चांगल्या स्थितींत आहे किंवा नाही? हे कापड खरेदी केले, ते सुद्धा नीट तपासून आणले? बायको घरी आणली, तीं जाणीवपूर्वक आणली ना?

चंदुलाल: हो दादा.

दादा: तर मग फक्त (Self) स्वत:ची आत्म्याची जाणीव झाली नाही? ह्या सर्व वस्तु विनाशी (असत्) (temporary) आहेत किंवा अविनाशी (सत्)

(permanent) आहेत ? ह्या सर्व वस्तुशी आपला तात्पुरता संबंध आहे. All these are temporary adjustments. ह्यांत स्वत: अविनाशी (Permanent) सत् आणि बाकी वस्तु विनाशी (असत) (Temporary) याचा गुणाकार केला तर त्याचे उत्तर काय येईल? अरे, तू खोटा, तुझे उदाहरणच चुकीचे व उत्तर खरे कसे काय येणार? तू स्वत:ची (Realisation) ओळख करून घेतली नाहीस ती लहान चूक आहे का मोठी?

चंदुलाल: खरेच, दादा ही फारच मोठी चूक म्हंटली पाहिजे. घोडचूक (Blunder).

## ( २ )
## जगत् सर्जन

दादा: हे जग कोणी उत्पन्न केले असेल?

चंदुलाल: ............ (स्तब्ध रहातो).

दादा: तुझ्या कल्पनेप्रमाणे तुला जे वाटते ते सांग. येथे आपण कोणास पास नापास करावयास बसलो आहोत?

चंदुलाल: परमेश्वराने तयार केले असेल.

दादा: ईश्वराची किती मुले अविवाहीत राहिली होती, तर त्याला हा सर्व खटाटोप करावयास लागला? त्याचे लग्न झाले असेल का अविवाहित असेल? त्याचा पत्ता काय?

दादा: मोक्ष असू शकेल किंवा नाही?

चंदुलाल: अर्थात, मोक्ष तर असणारच.

दादा: जर परमेश्वर जग निर्माण करणारा असेल आणि मोक्ष असेल तर हे संपूर्ण विरूद्ध आहे.

चंदुलाल: दादा, हे विरूद्ध आहे.

दादा: जर भगवान श्रेष्ठ असेल आणि तो जर मोक्षाला नेणारा असेल, तर तो ज्या वेळेस सांगेल की येथून ऊठ तर तुम्हाला उठावे लागेल. मग यास मोक्ष कसे म्हणता येईल? मोक्ष म्हणजे संपूर्ण स्वतंत्र. आपला कोणीही वरिष्ठ नाही, आणि कोणी सुद्धा कनिष्ठ नाही.

## ( ३ )
## जग हे गूढ 'पज़ल' आहे

क्रिश्चन लोक म्हणतात की हे जग उत्पन्न करणारा परमेश्वर आहे. God is Creator of this world. मुसलमान पण, अल्लानें बनविले असे म्हणतात आणि हिंदू लोकसुद्धा हे जग परमेश्वराने उत्पन्न केले असे म्हणतात, परंतु ते त्यांच्या दृष्टिकोणा प्रमाणे खरे आहे. पण सत्य नाही. जर तुला वस्तुस्थिती (Fact) जाणून घ्यावयाची इच्छा असेल तर मी तुला समजावून सांगतो. पूर्ण सत्य ३६० डिग्रीचा स्वीकार हेच खरे ज्ञान होय. आम्हास सर्व ३६० डिग्रीचे ज्ञान झाले आहे. म्हणून आम्ही ज्ञानी आहोत, त्याचे कारण की आम्ही (दादा भगवान) मध्यभागांत बसलो आहोत आणि म्हणून आम्ही सत्य वस्तुस्थिती (fact) दाखवू शकतो. सत्य वस्तुस्थिती अशी आहे की ईश्वरानें किंवा कोणीही हे जग निर्माण केले नाहीं. God is not at all creator of this world. मग हे कसे निर्माण केले गेले? जग हे स्वतःच एक गूढ म्हणावे लागत आहे. The world is the puzzle itself. पेचांत (puzzlesome) पडल्यामुळे गूढ (puzzle) म्हणावे लागत आहे. जग हे आपण होऊनच तयार झाले आहे. आणि असे आम्ही ज्ञानचक्षूंनी पाहिले आहे. ह्या जगांतील असा एक पण परमाणु नाही की मी ज्यामध्ये फिरलो नाही. जगांत राहून व त्याच्या बाहेर राहून हे मी सांगत आहे.

हे गूढ जो सोडवेल त्यास परमेश्वरपदाची पदवी मिळते आणि जो हे सोडवू शकत नाही तो ह्या कोड्यातच विलीन (dissolve) झालेला आहे. आम्ही हे puzzle सोडवून बसलो आहोत. ही दोन्ही निराळी दिसतात. ज्यास हे निराळे दिसत नाही तो स्वतःच ह्या गूढात विलीन झालेला आहे.

उत्पन्न करणारा Creator कधीच नव्हता, नाही व कधीही होणार नाही. उत्पन्न करणारा Creator ह्याचा अर्थ काय आहे माहित आहे का? Creator उत्पन्न करणारा ह्याचा अर्थ कुंभार होतो. मग त्यास मेहनत करावी लागणार. परमेश्वराला कामगार समजलात काय? ह्या अमदाबादचे शेठ लोक बिन मेहनती शिवाय चार-चार गिरण्यांचे मालक स्वतःला म्हणतात, व त्यापासून मिळणाऱ्या संपत्तीचा उपभोग घेतात, तर मग परमेश्वरसुद्धा महेनत करणारा असेल काय? महेनत करणारा म्हणजे मजूर. परमेश्वर तसा नाहीं जर परमेश्वर त्या सगळ्यांना घडविण्यास लागला तर सर्वांचे चेहरे एकसारखे झाले असते. ज्याप्रमाणे एखाद्या साच्यांतून काढावीत त्या-प्रमाणे झाले असते. परंतु तसे नाहीं. जर परमेश्वरास निष्पक्षपाती म्हटले, तर मग एक जन्मास आल्यापासून फुटपाथवर रहातो, तर दुसरा बंगल्यात रहातो ते कां?

तर असे का घडते, त्याचे मी एका वाक्यांत उत्तर देतो. तू ते विस्तार पूर्वक समजावून घे. हे जग वैज्ञानिक परिस्थितीजन्य पुराव्याप्रमाणे (Scientific circumstantial evidence) चालत आहे. चालवणारा कोणी वरती उगाच रिकामा नाही. याला आम्ही व्यवस्थित शक्ति म्हणतो. ती सर्वांना व्यवस्थितच ठेवते. तुम्ही सकाळी उठता कां तुम्हास उठवले जाते?

चंदुलाल**:** मी तर स्वत:च उठतो ना.

दादा**:** काही वेळेला असे होत नाही का, की झोपण्याची इच्छा असून सुद्धा झोप येत नाही? जर सकाळी चार वाजता उठावयाचे असले तर रात्री घड्याळांत चारचा गजर कां लावावा लागतो? झोपताना नक्की ठरवले असेल की पहाटे उठावयाचे तर तसेच व्हायला पाहिजे. तसे होते का?

## ( ४ )
## व्यवस्थित शक्ति

ह्याचेच नांव विरुद्ध जाणणे. स्वत**:** कांही करीत नाही व असा आरोप करतो कीं मी केले. ह्यास सिद्धांत कसे म्हणणार? तर मग तुम्हास सकाळी कोण उठवते? ''व्यवस्थित'' नावाची शक्ति तुम्हास उठविते. हे सूर्य, चंद्र, तारे सर्वच ''व्यवस्थित'' नियमाच्या आधाराने चालतात. ह्या सर्व गिरण्यांतून धुराचे लोटच्या लोट बाहेर निघत असतात आणि ''व्यवस्थित'' शक्ति त्यास स्वच्छ करून परत ''व्यवस्थित'' करते. असे जर झाले नसते तर अमदावादचे लोक कधीच गुदमरून गेले असते. हा पाऊस पडतो तर मग त्याच्याकरिता कोणी पाणी तयार करण्यास वर जातो का? हे तर सहजरीत्या होते. दोन हायड्रोजन (2.H) आणि एक ऑक्सीजन (1.O) ह्याचे परमाणू होतात आणि इतर काही घडामोडी होतात. जसे हवा वगैरे त्यांत मिसळून गेली म्हणजे मग त्याचे पाणी तयार होते आणि ते पावसाच्या रुपाने पडते. हे वैज्ञानिक काय म्हणतात, कीं मी पाणी तयार करणारा आहे. अरे भल्या माणसा, जर तुला दोन हायड्रोजनच्या (2.H) परमाणू बदली जर एक हायड्रोजनचा (l.O) परमाणु दिला तर मग तो मूर्ख म्हणतो, नाही, हे असे कसे तयार होणार? मूर्खा तूच ह्यातील एक (evidence) घटक आहेस. तू कोण, कर्ता, Maker? ह्या जगांत (Maker) कर्ता कोणीही नाही, कोणी कर्ता नाहीच, निमित्त आहे. परमेश्वर सुद्धा कर्ता नाहीं. जर कर्ता असेल तर उपभोग घेणारा झालाच पाहिजे. परमेश्वर तर ज्ञाता, दृष्टा, परमानंदी आहे. तो स्वत:च्या महान सुखात व आनंदात राहत असतो.

दादा**:** परमेश्वर कोठे रहात असेल? त्याचा पत्ता काय? जर कधी काळी एखादे

पत्र वगैरे लिहावयाचे असेल तर कोणत्या गल्लीत, कोणत्या पेठेत पत्र लिहाल?

चंदुलाल: हे तर माहित नाही. परंतु सर्व असे म्हणतात की तो वरती राहतो.

दादा: सर्वजण असे सांगतात, तू पण तेच कबूल करतोस? आपण त्याचा तपास करावयास नको का? मी तुला परमेश्वराचा खरा पत्ता देऊ? God is in every creature, whether visible or invisible. परमेश्वर हा प्रत्येक दृश्य आणि अदृश्य प्राणीमात्रात आहे. तुझ्या व माझ्यामध्ये, दुर्बिणीमध्ये न दिसणारे असे अनंत जीव आहेत. त्यांच्यांत सुद्धा परमेश्वराचे वास्तव्य आहे. ह्या सर्वामध्ये तो शक्तिरुपाने राहिलेला आहे. आणि आमच्यामध्ये व्यक्त स्वरूपात राहिलेला आहे. संपूर्ण तऱ्हेने प्रकाशमान झाला आहे तो परमात्मा प्रगट झाला आहे. हा जो तुम्हास दिसत आहे. तो अंबालाल मूळजीभाई पटेल, भादरण गांवचा, पाटीदार ज्ञातीचा आणि कंत्राटदाराचा (Contractor) धंदा करणारा आहे, परंतु आत जो प्रगट झाला आहे ते तर एक अजब आश्चर्य आहे! आणि त्यालाच "दादा भगवान" म्हणतात. परंतु तुम्हास ते कसे समजणार? हे जे शरीर आहे ते एक बाहेरचे आवरण (Packing) आहे. आंत बसलेला आहे तो परमेश्वर आहे. हे तुमचे चंदुलालचे बाहेरचे आवरण आहे. आंतमध्ये परमेश्वर बसलेला आहे. हे जे गाढव आहे ते गाढवाचे बाहेरचे आवरण (Packing) आहे. आणि आत परमेश्वर बसलेला आहे. परंतु ह्या कमनशिबी माणसांना समजत नाही म्हणून जर समोर गाढवाची भेट झाली तर त्या गाढवास शिव्या देतात. त्याची परमेश्वर आंत नोंदणी करतो. अरे वा, मला गाढव म्हणता? जा तर मग एक जन्म तुलासुद्धा गाढवाचा मिळेल. हे बाहेरचे पैकिंग कशाचेही असो. सागाचे असो, आंब्याचे असो. हे व्यापारी पैकिंग बघतात किंवा आतला माल बघतात?

चंदुलाल: आतील माल बघतात.

दादा: हो आपल्याला बाहेरच्या आवरणाशी काय करावयाचे? आपले काम बाहेरच्या आवरणाच्या आत असलेल्या वस्तुशी आहे ना? काही पैकिंग सडलेले असेल, तुटलेले असेल परंतु आंतील माल चोख आहे ना?

आम्ही ह्या अंबालाल मूळजीभाई बरोबर एक क्षण सुद्धा तन्मयता केली नाही. जेव्हा आम्हास ज्ञान प्राप्त झाले तेव्हा पासून हा देह माझा पहिला सोबती This is my first neighbour. मी त्याच्याशी शेजाऱ्या प्रमाणे रहातो.

## ( ५ )
## परमेश्वर-वरिष्ठ आणि मोक्ष

वयाच्या तेराव्या वर्षी माझ्या मनांत विचार आला, की आपल्यापेक्षा कोणीही वरिष्ठ असू नये. आपल्यावर परमेश्वर सुद्धा वरिष्ठ म्हणून असू नये. ते मला पसंत नव्हते. माझ्यांतील विशेष (Develop) वाढ झालेले गुण मी जन्मास येताना बरोबर आणले आणि पुष्कळ जन्मांच्या इच्छा, ह्या अवतारांत जन्मास येऊन फळास आल्या. जर आपणापेक्षा परमेश्वर वरिष्ठ असेल आणि तो जर मोक्षापर्यंत घेऊन जाणारा असेल तर तो आपण जेथे बसलेले असु त्या बसल्या ठिकाणावरून उठवेल आणि आपणास उठणे भाग पडेल. हे मला पसंत नाही. तर मग ह्याला मोक्ष कसे म्हणता येणार? मोक्ष म्हणजे ''मुक्तभाव'' वरिष्ठ कनिष्ठ कोणीही नाहीं.

येथे जिवंतपणीच मोक्ष सुख अनुभवावयाचे आहे. एकपण काळजी किंवा उपाधि रहाणार नाही. Income Tax भरण्याचा कागद आला तरी त्या ठिकाणी समाधी अटल राहील आणि तोच मोक्ष. वरच्या मोक्षाच्या गोष्ठी नंतर करु. पहिल्यांदा येथेच मुक्ती मिळेल.

माझे जेव्हा वयाच्या सोळाव्या वर्षी लग्न झाले तेव्हा लग्न विधी चालू असतानाच, डोक्यावरील फेटा आपोआप सरकला. माझ्या मनात विचार आला की आमच्या दोघांपैकी एकाचा मृत्यु नक्की आहे ! अरे मूर्खा, अनेक जन्म घेऊन सुद्धा तू हेच शिकलास आणि त्याचेवर त्याचे आवरण, पुन्हा तेच शिक्षण आणि असाच हा क्रम? अज्ञान शिकण्याकरिता कॉलेज काढलेली नाहीत. आपोआप अज्ञान हाजर होते. ज्ञानासाठी शिक्षण घेतले पाहिजे. मला आवरणे कमी होती म्हणून वयाच्या तेराव्या वर्षी भान झाले. शाळेमध्ये मास्तर लघुत्तम शिकवीत असताना त्यानी मुलांना असा प्रश्न केला की, अशी रक्कम शोधून काढा की जी लहानात लहान असून ती सर्व रकमेस अविभाज्य रुपी राहिली असेल. त्यावर मी त्यांना तावडतोब उत्तर दिले की, परमेश्वर अविभाज्य. ह्या उदाहरणावरून मला ईश्वर नेमकाच सापडला. ह्या चराचर सृष्टीमध्ये दृश्य आणि या सर्व रकमा च आहेत. अदृश्य रुपाने असणारी प्रत्येक ही सर्व उदाहरणेच आहेत ना? कारण प्रत्येकांत तीच ईश्वरी शक्ति भरून राहिली आहे. म्हणून ईश्वर अविभाज्य आहे.

मी ज्यावेळी बोलतो त्यावेळीच त्या बोलण्याने तुमचे आवरण तुटते आणि त्याच क्षणाला आतमध्ये प्रकाश पडतो आणि त्यामुळेच आपल्याला मी जे सांगतो ते समजते. एरव्ही माझा एक पण शब्द समजण्याची तुमच्यात शक्ति नाही आणि बुद्धि

कार्यच करणार नाही. हे सर्व बुद्धिवान लोक आहेत, ते त्यांच्या सर्वांच्या चुकीच्या श्रद्धां (Wrong Belief) आहेत. आम्ही बुद्धिशिवाय आहोत. आमच्यामध्ये बुद्धिचा लवलेश सुद्धा नाही. बुद्धि म्हणजे काय? ज्ञान म्हणजे काय? ह्या जगामध्ये अनंत विषय जो जाणतो, पण मी कोण आहे हे जो जाणतो तेच खरे ज्ञान किंवा आत्मज्ञान. जे दुसरे काही बुद्धिने जाणले त्याचा मेल्यावर काय उपयोग आहे? *अहंकारी ज्ञान म्हणजे बुद्धि आणि निरहंकारी ज्ञान ते ज्ञान.* स्वरूपाचे ज्ञान तेच खरे ज्ञान.

मतभेद मिटविण्याकरिता कोणता मार्ग? आयुष्य कोणत्या तऱ्हेने जगावयाचे? कोट्यावधि रुपये असले तरी सुद्धा मतभेद होतो. आणि मतभेदामुळे अनंत प्रकारची दु:खे उत्पन्न होतात.

## ( ६ )
## सापेक्ष ( Relative ) धर्म - सत् ( Real ) धर्म

वर्तुळाच्या ३६० डिग्री असतात. क्रिश्चन लोक ११० डिग्रीवर, मुसलमान १२० डिग्रीवर, पारशी १४० डिग्रीवर आणि हिंदू २२० डिग्रीवर असतात ते सर्व आपापल्या दृष्टीकोणातून (view point) बघतात. म्हणून सर्वजण स्वत: पाहिलेले खरे आहे असे म्हणतात. १२० डिग्रीवर असलेल्याला मी ८० डिग्रीवर आणले आणि मग त्याला विचारले की खरे कोण आहे? सर्वजण स्वत:च्या दृष्टीकोणावर (view point) स्थिर झालेले असतात. ३६० डिग्री संपूर्ण करून आम्ही केंद्र स्थानी बसलेले पूर्ण पुरुष आहोत. ज्ञानी पुरुष केंद्रस्थानी असल्याकारणाने ते वस्तुचे यथार्थ ज्ञान देऊ शकतात. हे अस्तित्वांत असलेल सर्व धर्म खरे आहेत. परंतु ते सापेक्ष (Relative) धर्म प्रचलित आहे ते. विशिष्ठ दृष्टि- (view point) कोणातील धर्म आहेत. परंतु वस्तुस्थिति (Fact) जाणून घ्यावयाची असेल तर त्याला केंद्रातच (Centre) यावे लागेल. केंद्रातच सत्य (Real) धर्म आणि आत्मधर्म असतो जो केंद्रामध्ये बसलेला असतो तो सर्वांचे दृष्टिकोण बघू शकतो. म्हणून त्याचा कोणत्याही धर्माशी मतभेद होत नाही, म्हणूनच आम्ही म्हणतो की आम्ही जैनांचे महावीर आहोत, वैष्णवांचे श्रीकृष्ण आहोत, स्वामीनारायणाचे सहजानंद आहोत, क्रिश्चनांचे ख्रिस्त आहोत. पारशांचे झरथोस्त आहोत. मुसलमानांचे खुदा आहोत. ज्याला जे पाहिजे असेल त्याने ते घेऊन जावे, आम्ही संगमेश्वर भगवान आहोत. तू तुझे ध्येय साध्य करून घे. एका तासात मी तुम्हास भगवानपद देतो असा मी आहे. परंतु तुझी तयारी पाहिजे. मी तुला एका तासात केवलज्ञान देऊ शकतो, ते तुला पचु शकणार नाही. आम्हालाच ह्या कलियुगामुळे चार डिग्री पचवणे जमले नाही, परंतु आम्ही तुम्हास संपूर्ण केवलज्ञान देतो.

हे रताळे जर चुलीत भाजत टाकले तर किती बाजूनी भाजले जाते? चारी बाजूनी भाजले जाते, त्याप्रमाणे हे सर्वजग भाजून निघाले आहे. अरे आम्ही पेट्रोलच्या अग्नीमध्ये सर्व जळून राहिलो आहोत असे आम्हास ज्ञानात दिसत आहे! म्हणून ह्या लोकांचे कल्याण कसे होईल त्याकडेच आम्हाला बघावयाचे आहे आणि त्यासाठीच आमचा अवतार झालेला आहे. ह्या अर्ध्या जगाचे कल्याण आमचे हातून होईल आणि बाकी अर्ध्या जगाचे कल्याण ह्या आमच्या अनुयायांच्या हातून होईल. आम्ही त्याचा कर्ता नाही परंतु निमित्तमात्र कारण आहोत.

हे जर्मन लोक Absolutism (पूर्णतावादा)चा शोध करीत आहेत. ते येथील (भारतांतील) शास्त्रेंच्या शास्त्रे घेऊन गेले आहेत. आणि त्यानुसार शोध करीत आहेत. पण अरे ते असे मिळणे शक्य नाही. आज आम्ही स्वत:च प्रत्यक्ष Absolutism (पूर्णतावादात) आहोत. सर्व जग Theory of Relativity (सापेक्षतावादा) मध्ये आहे आणि आमचे महात्मे Theory of Reality मध्ये आहेत आणि आम्ही स्वत: केवळ Theory of Absolutism पूर्णतावादाच्या सिद्धांतामध्ये आहोत असे नाही परंतु आम्ही Theorem (प्रमेया) मध्ये पण आहोत. आम्ही जेव्हा जर्मनीला जाऊ तेव्हां सांगू की तुम्हाला जे पाहिजे ते घेऊन जा. हे आम्ही स्वत:च आलो आहोत.

This is the cash bank in the world. ही जगांतील रोकडीचा व्यवहार करणारी बँक आहे. एक तासातच तुला तुझ्या हातात रोकडच देऊन टाकतो. (Real) सत् ची जाणीव करून देतो. बाकी सर्व ठिकाणी उधारी आहे. हप्ते भरत रहा. अरे, तू अनंत अवतारापासून हप्तेच भरत आला आहेत. आणि अद्याप त्याचा उलगडा का होत नाही? त्याचे कारण रोकडे कोणत्याच अवतारांत मिळाले नाही.

## ( ७ )
## क्रमिक मोक्ष मार्ग-अक्रम मोक्ष मार्ग

मोक्ष मिळण्याकरिता दोन मार्ग आहेत. एक कष्टप्रद मार्ग आहे. तो हळु हळु पायऱ्या चढून वर जाण्याचा मार्ग आहे. जर सत्संग मिळाला, तर पाचशे पायऱ्या चढून जाता येते आणि जर कुसंग मिळाला तर, चार हजार पायऱ्या उतरून खाली येतो. हा फारच कष्टदायक मार्ग आहे. तप, त्याग, जप करताना पायऱ्या चढाव्या लागतात तरीपण भरवसा नाहीं की मनुष्य खाली केव्हा पडेल! आणि दुसरा अक्रम मार्ग त्यास लिफ्ट मार्ग म्हणतात. त्यामार्गात पायऱ्या चढावयास लागत नाहीत. सरळ लिफ्टमध्ये बसून बायका, मुलेबाळ ह्यांच्याबरोबर राहुन मुलामुलींची लग्ने करून देऊन परत मोक्ष मार्गावर जाता येते, हे सर्व करताना तुमचा मोक्ष हा नक्कीच आहे अशा प्रकारच्या अक्रम

मार्गाला अपवाद मार्ग म्हणतात. तो प्रत्येक दहा लाख वर्षानी प्रगट होतो. भरत राजास एकट्यास हे ज्ञान मिळाले होते. ऋषभदेव दादाभगवानांनी त्यांच्या शंभर पुत्रांपैकी एका मुलास म्हणजे भरतासच हे ज्ञान दिले. त्यांच्या शंभर पुत्रांपैकी ९८ जणानी दीक्षा घेतली होती. बाहुबलिजी व भरत बाकी राहिले होते. त्या दोघांच्यावर राज्य सोपवले होते. नंतर बाहुबलिजीना वैराग्य उत्पन्न झाले. व त्यांनी पण दीक्षा घेतली, म्हणून भरतावर राज्यकारभाराचा बोजा पडला. त्यांत भरतास किती राण्या होत्या माहित आहे का?

तेराशे राण्या होत्या. म्हणून तो कंटाळून गेला. हल्ली तर एकच बायको असताना मनुष्य कंटाळून जातो ना? भरत राजाला तर फारच उपाधि होत्या तो राणी गृहात गेला तर पन्नासजणीचे चेहरे हसतमुख, तर पाचशे राण्यांचे दुर्मुखलेले पहाण्याची पाळी यावयाची. शिवाय राज्यांतील कटकटी, दुसऱ्यावर स्वारी करण्याची कटकट. खरोखरच तो कंटाळून गेला होता. तो भगवान् ऋषभदेवां कडे गेला व सांगू लागला, ''भगवान मला राज्य नको. दुसऱ्या कोणावर सोपवा आणि मला दीक्षा द्या. मला पण मोक्षासच जावयाचे आहे.'' तेव्हा भगवानने (ऋषभदेवानी) सांगितले की तू हे राज्य चालविण्याचे निमित्त आहेस आणि जर राज्यकारभार चालविला नाहीस तर राज्यामध्ये मारामारी, झगडे व अंदाधुंदी पसरेल.जा, आम्ही तुला असे ज्ञान देतो की राज्य करण्यास अडचण येणार नाही. तेराशे राण्या सुद्धा नडणार नाहीत आणि लढाया सुद्धा आड येणार नाहीत, आणि तसेच ज्ञान ऋषभदेव दादा भगवानांनी भरतास दिले. तेच हे अक्रम ज्ञान आम्ही तुम्हास एकच तासात देत आहोत. अरे भरत राजास ज्ञान विसरु नये म्हणून चोविस तास नोकर ठेवणे भाग पडले आणि आळी पाळीने दर पंधरा मिनिटाने तो नोकर घंटा वाजवून बोलत असे की ''भरत सावधान! सावधान! सावधान!'' परंतु ह्या काळांत तुम्हालाच दिडशे रुपये पगार, तर तुम्ही नोकर कसे ठेवणार? आणि म्हणून आम्ही आतच अशी व्यवस्था करून ठेवतो की तो (अंतरसाक्षी) दर क्षणाला बोलत रहातो ''सावधान-सावधान-सावधान''!

हे आश्चर्यकारक ज्ञान कोठल्याच काळात ऐकण्यात किंवा पहाण्यांत आलेले नाही. हे तर ह्या काळांतील अकरावे आश्चर्य आहे !

सामान्य समज (Common sense) म्हणजे काय? त्याची व्याख्या काय? Common sense means everywhere applicable theoretically as well as practically. सामान्य समज म्हणजे ज्याचा सर्व ठिकाणी उपयोग करता येतो अशी सैद्धांतिक दृष्ट्या उपयोगात येईल ती सामान्य समज Common sense ही फार किमतीची वस्तु आहे. जेव्हा तिची जरूर लागेल तेव्हांच वापरावयाची असते. आमच्यामध्ये शंभरटक्के सामान्य समज (Common sense) आहे. तुमच्यामध्ये सामान्य समज

(Common sense) एक टक्का सुद्धा नाही. जर दोरा गूंतला असेल तर दोरा तुटल्याशिवाय किंवा तोडल्या - शिवाय ती गाठ सोडवणे ह्याला सामान्य समज (Common sense) असे म्हणतात. तुम्ही काय, तर एक गाठ सोडविण्यास जाल व पाच नवीन उत्पन्न कराल. तर मग तुम्हाला Common sense समजेचे मार्क कशा रीतिने देता येतील? मोठे-मोठे विद्वान म्हणविणाऱ्यांमध्ये विद्वत्ता असते परंतु सामान्य समज (Common sense) नसते. आमच्यामध्ये बुद्धि नावाला सुद्धा नाही. आम्ही बुद्धिशून्य आहोत. आमच्यामध्ये बुद्धि संपूर्ण प्रकाशमान झालेली आहे. परंतु आमच्या ज्ञानप्रकाशाच्या पुढे एका कोपऱ्यामध्ये बसलेली आहे. ह्या किनाऱ्याला अबुधपद प्राप्त झाले आहे. तर समोरच्या किनाऱ्यास सर्वज्ञपद हारतुरा घेऊन नियमाप्रमाणे समोर उभेच आहे. आम्ही अबुद्ध आहोत परंतु सर्वज्ञ आहोत.

## ( ८ )
## संसारिक संबंध

दादा:- हे तुमचे वडील, आई, बायको ह्यांचे बरोबर जो संबंध आहे हा खरा खुरा (Real) संबंध आहे असे तुम्हाला वाटते का?

चंदुलाल:- होय तर !

दादा:- तर मग वडील मरुन गेले तर नियमाप्रमाणे तुम्हास मरूनच गेले पाहिजे, असे ह्या मुंबईत कितीजण वडील गेल्यानंतर मरून गेले? बघ मी तुला समजावून सांगतो. आई, बाप, भाऊ, बहिण, बायको, मुले ह्या सर्वाबरोबर संबंध आहे खरा, परंतु तो सत्य (Real) नाही. मात्र तो सापेक्ष (Relative) संबंध आहे. सत्य (Real) असेल तर कोणाच्याही वडीलांबरोबर संबंध तुटणार (Fracture) नाही. परंतु जर वडिलांना सांगितले की तुम्हास अक्कल नाही तर मग सर्व संपले! वडील ताबडतोब म्हणतील की "बघ मला तू, सर्व आयुष्यात, तुझे तोंड दाखवू नकोस. मी तुझा बाप नाही व तू माझा मुलगा नाहीस" तसेच तुमच्या स्वत:च्या बायकोला घटस्फोट (divorce) घेण्याच्या प्रसंग येतो का नाही? त्याचाप्रमाणे हे जग आहे. All these are temporary adjustments. ह्या सर्व तातपुरत्या व्यवस्था आहेत. अरे हा देहपण तुझा नातलग नाही बरे! हाच तुला फसवून जाईल. जर आपण असे नक्की ठरविले, की आज अमुक वेळ सामायिक करावयाचे तर मग अरे वेड्या, डोके तरी दुखण्यास सुरवात होईल, नाही तर पोटांत कळ येईल आणि योजलेले काम करू देणार नाही. स्वत: कायम (Permenant) व बाकी सर्वच तात्पुरते (Temporary) यांचा मेळ कसा बसायचा? म्हणूनच सर्व जग भ्रांतिमध्ये सापडलेले आहे. ह्या संबंधाच्या आधाराने वागले

पाहिजे. सत्य असत्याच्या मागे हट्ट धरू नये, ताणल्याने तर तुटते. समोरच्यांनी संबंध तोडले तर ज्या संबंधाची आपणाला जरूर असेल तो साधुन घेऊन तो संबंध टिकणार. कारण हे सर्व संबंध सापेक्ष (Relative) आहेत. उदाहरणार्थ : बायको म्हणते की आज पौर्णिमा आहे. तुम्ही म्हणता की आज अमावस्या आहे. तर मग दोघांची घासाघीस चालु राहील. आणि सर्व रात्र फुकट जाईल. व सकाळी ती (बायको) चहाचा कप रागाने आपटून पुढे ठेवते कारण ती आतल्या आत रागाने जळफळत असते. ह्यापेक्षा आपण असे समजले पाहिजे की तिने ताणून धरले तर ते तटून जाईल. म्हणून आपण हळुच पंचांग बघावे आणि मग सांगावे हो, तुझेच बरोबर आहे, आज पौर्णिमाच आहे. अशा रितीने थोडेसे नाटक करून तिचे खरे करून दिले नाही तर मग काय होते माहित आहे कां? जर दोरी पुष्कळ ताणून धरली असेल व मग एकदम सोडून दिली तर ती (बायको) पडूनच जाईल, म्हणून दोरी समोरचे माणूस पडणार नाही अशा तऱ्हेने हळूहळू सैल सोडावी, नाही तर पडण्याचा दोष लागेल.

## ( ९ )
## सुख आणि दु:ख

जगांतील सर्व लोक: सुखच शोधत आहेत. परंतु सुख म्हणजे काय त्याची व्याख्याच नक्की करीत नाहीत. ''सुख असे असावयास पाहिजे की त्यानंतर दु:ख कधीच येणार नाही.'' ह्या जगांत असे एकपण सुख असेल ते शोधून काढ. शाश्वत सुख तर स्वत:मध्ये आहे. स्वत: अपार सुखाचे घर आहे तरीपण लोक नाशवंत वस्तुमध्ये सुख शोधण्यास निघाले आहेत. ह्या संसारी लोकांचे सुख कसे असते ते माहित आहे का? थंडीचे दिवस, गच्चीवर पाहुण्यांची व्यवस्था केली आणि खूप कडाक्याची थंडीची सुरवात, त्यांत तोकडे पांघरुण आणि पाहुणा खूपच उंच. तो तोंड झाकण्यासाठी प्रयत्न करतो तरीपण पाय उघडेच रहातात आणि पाय झाकले तर डोके उघडे रहाते. हे वेड्या, त्याप्रमाणेच संबंध रात्र ह्या कुशीवरून त्या कुशीवर काढण्यासारखेच ह्या संसारातील सुख आहे. खरोखर पहाता ह्या जगामध्ये दु:ख अशी वस्तुच नाही. दु:ख ही अवस्तु आहे. कल्पनेने उभी केलेली आहे. जिलबी खाण्यांत दु:ख आहे, अशी कल्पना केली तर त्यामध्ये दु:ख होईल. आणि सुख होईल अशी जर कल्पना केली तर सुखच लागेल म्हणून हे यथार्थ नाही. ज्याला आपण सुख म्हटले तर त्याचा सर्वांनीच स्वीकार केला पाहिजे ते त्रिकालाबाधित सत्य (Universal Truth) असावयास पाहिजे. परंतु ज्यात तु सुख मानतोस त्यातच दुसऱ्याला अपार दु:ख लागते. ह्या प्रमाणे हे जग आहे.

## ( १० )
## प्रारब्ध पुरुषार्थाचे विरुद्ध अवलंबुन रहाणे

लोक प्रारब्धांस पुरुषार्थ असे म्हणतात. वेड्या दळलेले परत परत दळताना त्याच्यातून पुष्कळसे हवेत उडून जाते. कित्येक लोक प्रारब्ध श्रेष्ठ म्हणतात तर कित्येक पुरुषार्थ श्रेष्ठ म्हणतात. हे मजबूत आधार नाहीत. हे मजूर सकाळपासून संध्याकाळपर्यंत कापडगिरणी मध्ये खूप मेहनत करतात त्यांना काय मिळते ? फक्त भाकर व चटणी मिळते का आणखी काही? आणि प्रारब्धवादी हात जोडून बसुन राहिले तर?

अरे वेड्या! लाख रूपये कमाविले तर म्हणतो मी मिळविले आणि जर नुकसान झाले तर परमेश्वर जबाबदार. माझे ग्रह राशी खराब होत्या, या भागिदाराने मला फसविले असे म्हणतो आणि वर बोलतोस मी काय करू? अरे वेड्या तु जिवंत आहेस की मेलेला आहेस? चांगले केले तेव्हां सांगत होतास की मी केले, आणि आता सांगतोस की परमेश्वराने केले. अशा रीतीने सांगून स्वत:ची फजिती कां करून घेतोस? आणि वरचे ग्रह काहीच करीत नाहीत. तुझे ग्रहच तुला नडतात. तुझ्या आंतच ९ ग्रह आहेत तेच तुला नडतात. हट्टाग्रह, दुराग्रह, सत्याग्रह, आग्रह वगैरे-वगैरे. आम्ही निराग्रही आहोत. जेथे आग्रह असतो तेथे विग्रह होतो. आमच्यामध्ये आग्रहच नाही तर विग्रह कोठून होणार? हे तर क्रमाच्या नियमाने आल्यावर यशस्वी होते. आणि अकल्पित आले तर ईश्वरावर दोषारोपण करतो. क्रम आणि अक्रम ह्या दोन संबंधांना लोक पुरुषार्थ म्हणतात. जेव्हां स्वत: पुरुषार्थ करतो तेव्हा नुकसान कधीच होत नाही. पुरुषार्थ हेच त्याचे नाव आहे ज्याच्यामध्ये निष्फळता येत नाही. ह्याला तर विरूद्ध म्हणतात. तू स्वत:च पुरुष झाला नाहीस तर मूर्खा! पुरुषार्थ कसा करणार? पुरुष कोण्याचे नाव? खरा पुरुषार्थ तो आहे, की जो पुरुषार्थ व स्वपराक्रम मिळून असतो. मूर्खा ही तर प्रकृती जशी नाचते त्याप्रमाणे नाचतोस आणि म्हणतोस की मी नाचलो!

श्रीकृष्ण भगवान ह्यांनी काय सांगिले आहे? ''उद्धव जर अबला असेल तर काय साधन करणार?'' जैन लोकांच्यात सर्वात मोठ्यात मोठे आचार्य गुरु आनंदघनजी महाराज सुद्धा स्वत:ला अबला म्हणतात. कारण पुरुष कोणाला म्हणायचे? ज्याने क्रोध, मान, माया, लोभ, ह्यांना जिंकले आहे त्यालाच पुरुष म्हणतात. ह्याचे उलट तर क्रोध, मान, माया, लोभ, ह्यांनीच उलट ज्यांना जिंकले त्यां अबलाच म्हणायचे ना?

मी पुरुष झालो आहे. पुरुषार्थ आणि स्वपराक्रम ह्यांच्यासहित आहे. ज्योतिष आणि पुरुषार्थ हे दोन्ही विरुद्ध आहेत. ज्योतिष हे खरे आहे. ज्यास पुरुषार्थ मानतात ती भ्रांति आहे. जेव्हां तोटा होतो तेव्हां ज्योतिषाकडे कशाकसाठी जातोस? पुरुषार्थ कर

ना! हा पुरुषार्थ तर पुढील जन्मासाठी बी पेरतो.

ह्या अलेंबिकच्या कारखान्यामध्ये कितीतरी मजूर काम करतात, तेव्हां निरनिराळी औषधे तयार होतात आणि शिवाय हा एकच कारखाना आणि ह्या देहात अनेक कारखाने आहेत. लाख अलेंबिकच्या कारखान्यांचा समूह आहे. हा तर आपोआप चालतो. मूर्खा रात्री एक पांघरूण घेऊन झोपलास आतमध्ये शरीरात किती पाचक रस तयार झाला, किती पित्त तयार झाले त्याचा तू कधी तपास केला आहेस काय? अरे ह्या सर्व गोष्ठी बद्दल तु किती सावध (alert) आहेस त्याची तुला किती जाणीव आहे? परंतु सकाळी आपोआप सर्व क्रिया होतात. त्याची लघवी, शौच तयार होऊन ते बाहेर पडते आणि बाकीची तत्वे रक्तांत मिसळतात. अरे हे तु चालविण्यास गेला होतास का? अरे हे आतील सर्व आपोआप चालते, तर बाहेरचे का चालणार नाही? तू करतोस असे कां म्हणतोस? हे तर आपोआप चालणारच. रात्री झोपेमध्ये शरीर सहज असते. अरे हे स्वत:च असह्य झाले आहे. लोक म्हणतात की मी स्वत:च श्वास घेतो मी खरा श्वास घेतो, दीर्घ श्वास घेतो, हळु श्वास घेतो. परंतु अरे रात्री कोण श्वासोश्वास घेतो. रात्री जो श्वासोश्वास चालतो तो सामान्य (Normal) असतो. त्यामुळेच सर्वाचे उत्तम तऱ्हेने पचन होते.

मनुष्य मात्र भोवऱ्या सारखा आहे. मी ज्ञानी आहे, पण हा देह भोवरा आहे. हा भोवरा आहे तो श्वासानेच चालतो. भोवऱ्याला लावलेली दोरी जशी भोवऱ्याला फिरविते तद्वतच श्वास आत जाऊन देहास गति येते. तो फिरता फिरता गोलांटी उडी खातो तेव्हा आपणास असे वाटते की थांबला. आणि मग थांबून परत फिरावयास लागतो असे हे सर्व आहे.

कडुलिंबाचे प्रत्येक पान आणि प्रत्येक डहाळी कडू असते. यात कडुलिंबाचा काय पुरुषार्थ? हे तर जे बी मध्ये आहे ते प्रगट होते. त्याप्रमाणे मनुष्य स्वत:च प्राकृत स्वभावाप्रमाणे वागतो आणि मात्र ''मी केले'' ह्याचा गर्व करतो, त्यांत त्याने काय केले?

ह्या जगात लोक जे, पुरुषार्थ म्हणून बोलतात ती भ्रांतिची भाषा आहे, सापेक्ष (Relative) भाषा आहे. उदय कर्माने होत आहे. ज्याला ''मी केले'' असे म्हणतात. त्याचे नाव अहंकार आहे. सत्य भाषेचा (Real) पुरुषार्थ यथार्थ पुरुषार्थ आहे. ह्या पुरुषार्थातच पुरुष तयार होतो. आणि हा, पुरुष स्वरुपाचे ज्ञान झाल्यावरच होतो. त्यावेळेस ''मी केले'' ही भावनाच नाहीशी होते. त्यालाच संपूर्ण अकर्तापद म्हणतात. सापेक्षामध्ये (Relative) जे जे काही आहे ते सर्व निसर्ग आहे. आणि खरा (Real) स्वत: पुरुष आहे. खरा (Real) पुरुषार्थ कोणास म्हणतात? आपला हात कोणी सुरीने

कापत असताना, आपण स्वतः ज्ञाता, दृष्टा पदांत रहाणे ह्याला पुरुषार्थ म्हणतात. ज्ञान क्रिया आणि दर्शन क्रिया ह्या आत्म्याचाच क्रिया आहेत. बाकी सर्व ठिकाणी आत्मा निष्क्रिय आहे. आत्म्याच्या दुसऱ्या कोणत्याही क्रिया होत नाहीत आणि आत्मा ज्ञान दर्शनात राहतो त्यालाच पुरुषार्थ म्हणायचा.

कबीरजीच्या बायकोस मूल होणार होते त्याच्या अगोदर दुधाच्या कुंड्या (स्तन) भरून गेल्या होत्या आणि जेव्हां मूल जन्मास आले तेव्हा स्तनास धार सुटली. ते पाहून कबीरजी म्हणाले :-

''प्रारब्ध पहिले बना, पीछे बना शरीर,

कबीर अचंबा ये है मन नहीं बांधे धीर''.

## ( ११ )
## अविरोधाभास-अवलंबन

भाग्यात असेल ते होईल असे म्हणून स्वस्थ बसून रहाणें योग्य नाही. जर नुसतेच भाग्यावर अवलंबून राहिले तर तो मनुष्य निष्क्रिय बनेल. ह्या अवलंबून रहाण्यामुळे मन सरळ रहातच नाहीं. आणि जर तुझे प्रारब्धावर अवलंबून राहणे खरे असेल तर तुला थोडीसुद्धा चिंता करावयास नको. परंतु चिंतेचा तर कारखानाच आहे म्हणून ते अवलंबून रहाणे पांगळेपणाचे आहे. सत्य (Fact) नाही. वैज्ञानिक नाही. म्हणूनच सगळे लोक मार खातात. असे चुकीचे अवलंबन लोकाना दिले आहे म्हणूनच तर हिंदुस्थानची अवदशा झाली आहे. ह्यांची प्रगतिच बंद पडली आहे. आम्ही कोट्यावधी अवतारांचे संशोधन करून जगाला जे बरोबर (Exact) आहे तेच सांगतो की प्रारब्ध आणि पुरुषार्थ ही दोन्ही पांगळी अवलंबने आहेत. आणि व्यवस्थित हेच खरे अवलंबन आहे. Fact सत्य आहे व वैज्ञानिक आहे. ''व्यवस्थित'' म्हणजे काय? Scientific circumstantial evidence वैज्ञानिक परिस्थितिजन्य पुराव्याने मात्र जे जे होत आहे ते ''व्यवस्थित'' आहे. ''व्यवस्थित'' हे सर्व अवस्थेत संपूर्ण समाधानकारी ज्ञान आहे ह्याचे मी तुम्हास साधारण उदाहरण देतो. हा काचेचा प्याला आहे. तो तुमच्या हातातून पडावयाला लागला तर मग तुम्ही तो इकडून तिकडून हालवून शेवटपर्यंत वाचवण्याचा प्रयत्न करता, तरीसुद्धा तो पडला आणि फुटला तर तो कोणी फोडला? प्याला फुटावा अशी तुमची मुळीच इच्छा नव्हती. उलट तुम्ही शेवटपर्यंत त्यास वाचविण्याचा प्रयत्न केलात. आता काय प्याल्याला फुटण्याची इच्छा होती? नाहीं. त्याला तसे वाटणे शक्य नाही. दुसरा कोणी फोडणारा हजर नाही तर मग तो कोणी

फोडला? ''व्यवस्थितनी'' तो फोडला. ''व्यवस्थित'' हे बरोबर (Exact) नियमाने चालते. तेथे कुचक्या माणसाचे राज्य नाही. जर ''व्यवस्थितच्या'' नियमात काचेचा प्याला फुटावयाचा नसेल तर मग हे काचेचे कारखाने कसे चालणार? हे तर ''व्यवस्थित''. तुमचे कारखाने सुद्धा चालावयाचे आहेत. आणि हजारो मजुरांची घरे पण चालवावयाची आहेत. काचेचा प्याला फुटल्याशिवाय रहाणार नाही. त्या वेळेस उनाड लोक उगाच बडबड करतात आणि निश्चिंत बसत नाहीत. चार पाहुण्यांच्या देखत नोकराच्या हातून फुटला असता तर मनात उद्वेग झाला असता आणि नोकरास शिक्षा देण्यासाठी पाहुण्यांची जाण्याची वाट पहात राहिला असता आणि खरोखरच तो मूर्ख असे वागेल सुद्धा आणि जर त्यास कळले की हा प्याला नोकरानी फोडला नसून. ''व्यस्थित'' शक्तिने फोडला आहे. तर मग काय होईल? संपूर्ण समाधान होइल किंवा नाही? खरे पाहिले असता नोकर बिचारा निमित्त आहे. त्याच्यावर हे शेठलोक नुसते तुटून पडतात. निमित्ताला कधीही वाईट म्हणू नये. अरे मूर्खा निमित्ताला वाईट म्हणून तू स्वतःचे भयंकर अहित करीत आहेस. मूळ कारण शोधून काढ? तर तुला ते समजेल.

मी लहानपणापासून जर मस्करी करणाऱ्या स्वभावाचा होतो. लोकांच्या पुष्कळच मस्कऱ्या आणि टिंगलपणा करित असे. एक शेठजी त्यांच्या कुत्र्याच्या पिल्लाला खेळवीत असत. तेव्हां मी हळूच नकळत मागून जाऊन पिल्लाची शेपटी जोराने दाबायचा. पिल्लाने स्वतःच्या तोंडासमोर शेठजीना पाहिले की त्यांचा चावा घेई. शेठजी एकदम जोर जोराने ओरडायचे. ह्याचे नाव निमित्ताला चावणे.

## ( १२ )

## आत्मा–अनात्मा

दादाः– ह्या तुझ्या शरीरांत आत्मा आहे हे तर खरे ना?

चंदुलालः– होय महाराज.

दादाः– तर मग तो कोणत्या स्वरूपांत असेल? मिश्रण की संमिश्र? हा आत्मा आणि अनात्मा मिश्राच्या स्वरूपांत असेल कीं संमिश्राच्या स्वरुपात?

चंदुलालः– compound - (संमिश्र).

दादा :– जर compound (संमिश्र) असेल तर तिसरा नविनच गुणधर्म असलेला पदार्थ निर्माण होईल आणि आत्मा व अनात्मा ह्यांचे स्वतःचे गुणधर्म नाहिसे झाले तर त्यांचे मूळ स्वभावांत येणेच बंद होऊन जाईल व कधीही मुक्त होणार नाही.

मी तुला समजावून सांगतो. हा जो आत्मा आहे तो मिश्रण (mixture) स्वरूपातहि राहिला आहे आणि आत्मा व अनात्मा दोन्ही आपापले गुणधर्म धरून राहिले आहेत व ते सुटे पडतील अशा स्थितीत आहेत. सोन्यामध्ये तांबे, पितळ, चांदी सर्व धातुचे मिश्रण झाले तर कोणी वैज्ञानिक त्याचे गुणधर्म पाहून वेगवेगळे करू शकणार किंवा नांही? अगदी ताबडतोबच सुटे पाडु शकेल. त्याचप्रमाणे आत्मा व अनात्मा ह्याचे गुणधर्म जो पूर्ण (complete) जाणतो आणि जे अनंत सिद्ध पुरुष आणि ज्ञानी आहेत ते नक्कीच आत्मा व अनात्मा याला सुटे पाडू शकतील. आम्ही ह्या जगाचे प्रथम श्रेणीचे वैज्ञानिक आहोत. मी आत्मा आणि अनात्मा ह्यांचे परमाणू वेगळे करून तुमच्या हातात एका तासातच शुद्ध आत्मा देतो. ज्ञानी माणसाच्या प्रगटवाणी शिवाय बाहेर जो आत्मा आत्मा असे म्हणतात तो मिश्रण झालेला आत्मा आहे. शब्दब्रह्म पण निर्भेळ नाहीच.

दादा:- हे सर्व जे धर्म पाळतात, ते अनात्म्याचे धर्म पाळतात. ते सापेक्ष धर्म आहेत. हे निर्भेळ आत्म्याचे नाहीत. जर आत्म्याचा एकही गुणधर्म जाणला नाही तर आत्मधर्म पाळू शकणार? हे तर तुम्हाला ज्ञानी पुरुष जोपर्यंत सापेक्ष सिद्धांतातून सत्यामध्ये आणत नाही तोपर्यंत तुम्ही सत्यधर्म पाळू शकत नाही. हे आमचे महात्मे तुमच्या आत असलेल्या परमेश्वराला पाहू शकतात, दर्शन करू शकतात. कारण आम्ही त्याना दिव्यचक्षु दिले आहेत. हे तुमचे जे चक्षु आहेत ते चर्मचक्षु आहेत आणि त्यांच्या सहाय्याने सर्व नाशिवंत वस्तु दिसतात. अविनाशी परमेश्वर तर दिव्यचक्षुनेच दिसतो.

## ( १३ )
## दिव्य चक्षूमधून मोक्ष

श्रीकृष्ण भगवानांनी महाभारताच्या युद्धाच्या वेळी अर्जुनास दिव्यचक्षु दिले होते. परंतु त्याचे वैराग्य टाळण्यासाठी पांचच मिनिटे दिली होती. नंतर त्याने ते परत घेतले. आम्ही तुम्हास कायमचे दिव्यचक्षु देतो. त्यानंतर तुम्ही जिकडे बघाल तिकडे तुम्हास परमेश्वर दिसेल. माझ्यात दिसेल, दुसऱ्यात दिसेल, झाडांत दिसेल आणि गाढवात सुद्धा दिसेल. प्रत्येक प्राण्यांत परमेश्वर दिसेल. आत्म्यासारखेच सर्व प्राणिमात्र सर्वत्र दिसतील. मग काही चिंता आहे का?

जैनांचे मोठ्यांतले मोठे आचार्य गुरु आनंदघनजी महाराज ३०१ वर्षापूर्वी काय सांगून गेले? ''ह्या काळांत दिव्यचक्षूची माणसापासून फारकत झाली आहे.'' म्हणून सर्वांनी दरवाजे बंद केले. हे तर नैसर्गिक रीतीने खूब आश्चर्यकारक ज्ञानप्राप्ती झाली आहे. ही आम्हास निसर्गाची देणगी आहे म्हणून आम्ही एका तासांत दिव्यचक्षु देऊ शकतो.

भगवान काय म्हणतात? मोक्षमार्ग अतिशय अतिशय शंभरपटीने दुर्लभ आहे. परंतु जर ज्ञानीपुरुष मिळाले तर खिचडी तयार करण्यापेक्षाही तो सोपा आहे.

ही आमची गोष्ट तर तुमचा आत्माच कबुल करेल. कारण तुमच्यांत मीच बसलेले आहे. तुम्ही जर विरोध केला नाही तर! आमच्यात आणि तुमच्यात काहीच भेद रहाणार नाही. हे सर्व लोक ''श्रद्धा ठेवा श्रद्धा ठेवा'' असे सांगतात पण श्रद्धा ठेवता येत नाही त्याचे काय? व्याख्यान किंवा प्रवचनांतून खाली उतरला की धोतर झटकून टाकतोस आणि मूर्खा परत विचार करतो की आज वांगी फारच स्वस्त झाली आहेत! आमच्याजवळ श्रद्धा ठेवण्याची जरूर नाही. जर तुमच्यामध्ये आत्मा आहे आणि तुझा जर विरोध नसेल तर तुझी नक्की श्रद्धा बसलीच पाहिजे. कारण ही तर ज्ञानी पुरुषाची सरळ ज्ञानवाणी आहे. ती तुझ्यावरची सर्व आवरणे तोडून टाकून सरळ तुमच्या आत्मामध्ये जाऊन ही गोष्ट तुझ्या लक्षात आलीच पाहिजे.

श्रद्धापूर्वक केलेली गोष्ट आणि बुद्धिपूर्वक केलेल्या गोष्टीत फरक आहे. जर बुद्धिपूर्वक गोष्ट असेल तरच समोरचा मनुष्य कबुल करील.

## ( १४ )
## पुनर्जन्म

आम्ही औरंगाबादहून विमानाने येत होतो. तेव्हां वाटेत एक फ्रेंच microbiologist भेटला. तो आम्हास विचारु लागला की, ''तुम्ही हिन्दू लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवता का? आम्ही लोक पुनर्जन्मावर विश्वास ठेवत नाही तर तुम्ही मला पुनर्जन्माविषयी समजावून सांगा. तुम्ही म्हणाल तितके दिवस हिंदूस्थानांत राहण्यास मी तयार आहे''.

आम्ही विचारले एवढावेळ तू राहू शकशील काय?

फ्रें च वैज्ञानिक:- पांच वर्षे, दहा वर्षापर्यंत रहावयास मी तयार आहे. मी सांगितले नाही नाही, इतका वेळ रहाण्यास आम्हास वेळ नाही. तेव्हा तो म्हणाला. हे काम सहा महिन्यात होईल कां? आम्ही सांगितले अरे आम्हास कोठे फुरसत आहे? आम्हास पुष्कळ काम आहे. सर्व जगाचे कल्याण करावयाचे आहे. त्याचे आम्ही निमित्त आहोत. असे कर, ह्या सांताक्रुझ विमान तळावर आपण एक तासानंतर उतरु. तितक्या अवधीत तू पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारा होशील. आम्ही त्यास विमानामध्येच वैज्ञानिक रीतिने समजावून सांगितले आणि खरोखर त्याला ते समजले आणि आम्ही जेव्हां सांताक्रुझ विमानतळावर उतरलो तेव्हां सच्चिदानंद, सच्चिदानंद असे तो बोलु लागला. अरे तो त्याच्या बायकोस सुद्धा विसरून गेला, त्याने आमचा फोटो काढून तो बरोबर घेऊन गेला.

## ( १५ )
## मन-वचन-काया Effective ( परिणामकारक )

हे मन, वचन आणि शरीर (effective) असरकारक आहेत का? बिनअसरकारक (in-effective) आहेत? जन्मापासूनच असरकारक (effective) आहेत. गर्भाशयांत सुद्धा असरकारक (effective) असतात. आता असरकारक (effective) कशी? सकाळीच जर कोणी तुम्हाला अक्कल नाही असे बोलले तर त्या रात्री तुमची झोप उडून जाईल. म्हणजेच असर (effect) सुरू झाला असे म्हटले पाहिजे ते का? कारण मन असरकारक (effective) आहे. ह्याचेच उदाहरण, कोणाला एक शिवी देऊन बघा म्हणजे प्रत्ययास येईल आणि तिसरा हा देह असरकारक (effective) आहे. थंडी मधे थंडी लागते. उन्हाळ्यात गरम होते. ते जन्मापासून असर कारक (effective) आहे. नुकत्याच जन्मास आलेल्या मुलाचा थंडीमध्ये पांघरलेला कपडा जर दुर झाला तर ते रडायला लागते. उलट पांघरुण घातले तर ते रडण्याचे थांबून गप्प बसते. तोंडात जर गोड वस्तु घातली तर चाटू लागते व कडू भरविले तर ते तोंड फिरवते. सर्वच असरकारक (effective) आहे. त्याचे मी स्वतः पाहिलेले उदाहरण देतो.

ही गोष्ट पन्नास वर्षा पूर्वीची आहे. आमच्या भादरण गांवात एका बाईस आठ महिन्याचा गर्भ राहिला होता. रस्त्यातून जाताना तिला गाईने शिंग मारले आणि त्याची जखम गर्भाशयाला झाली. आतील बालकाचे लहान बोट थोडेसे बाहेर आले. कित्येक डॉक्टरनां बोलविले. त्यावेळी मिशनरी डॉक्टर्स होते. सर्व एकत्र जमा झाले कित्येक उपाय केले. परंतु काहीच इलाज चालेना. डॉक्टर लोकांना मोठा प्रश्न पडला. बाईची स्थिती फारच गंभीर झाली. त्या दरम्यान गावांतील एका ७० ते ८० वर्षाच्या वयस्कर बाईस ही बातमी कळली. त्या काठी टेकत येऊन पोहोचल्या. त्या बाईने सर्वास सांगितले ''तुम्ही सर्वजण आता गप्प बसा आणि परमेश्वराचे नाव घेत काय होत आहे ते पहात रहा.'' त्या बाईने ताबडतोब एक सुई घेतली आणि तिचे जरासे टोक तापवुन काढले आणि बाहेर निघालेल्या बोटाला जराशी टाचणी टेकल्यावर बोट आत गेले! आतील बालकावर त्याचा असर झाला. तेव्हां ताबडतोब त्याने बोट आत खेचून घेतले. असर (effect) आहे म्हणून कारण (causes) असलीच पाहिजेत. कारणे (causes) आहेत म्हणून असर (effect) आहे, असे चक्र चालूच रहाते.

कारणाशिवाय कार्य असू शकत नाही. आणि जेव्हां कार्य असेल तेव्हा त्याच्या पाठीमागे कारण असलेच पाहिजे. पूर्व जन्माच्या कारणामुळेच हल्लीचा देह प्राप्त झाला आहे. जन्मास येताना स्थूल आणि सूक्ष्म अशी दोन शरीरे असतात. प्रीती व द्वेषानी

नवीन कारणे उत्पन्न होतात आणि पुढच्या जन्माचे कारण तयार होते. मरेपर्यंत नवीन कारणशरीर तयार होत असते आणि जेव्हां देह सुटतो तेव्हां, आत्मा कारणशरीर व सूक्ष्मशरीर घेऊन निघून जातो. आणि स्थूल शरीर येथेच पडून रहाते. हे कारण शरीर, त्याच क्षणी त्याचे पुढील ठिकाण नक्की करते व त्या प्रमाणे जन्म घेते.

पुनर्जन्म नसता तर परमेश्वरानी घडविलेले सर्वच सारखे दिसले असते. एकाच साच्यातून तयार झालेले दिसले असते. प्रत्यक्षात वेगळेच दिसते एक मोठा, एक लहान, एक उंच, तर एक गोरा, तर एक काळा, एक गरिब तर एक श्रीमंत. पूर्वजन्माच्या आधारेच हे सर्व फरक आहेत. म्हणजे मागच्या कारणामुळेच हे स्थूल आणि सूक्ष्म शरीराचे असर-परिणाम (effects) आहेत. प्रत्येकाची कारणे (causes) वेगळी म्हणून असर-परिणाम (effects) पण वेगळे. पुनर्जन्म आहे म्हणूनच हे सर्व वेगवेगळे दिसते. हे इंग्रज लोक lucky (भाग्यवान) आणि unlucky (अभागी) असे शब्द बोलतात ते काय आहे? हे मुसलमान लोक तकदीर आणि तदबीर हे काय सुचविते? ह्या सर्वांची भाषा पूर्ण आहे परंतु मान्यता (belief) अपूर्ण आहे. पुनर्जन्म आहे म्हणूनच असे शब्द बाहेर पडतात.

ज्याप्रमाणे कारणे (causes) त्या प्रमाणेच असर (effect) हा नियम आहे. चांगल्याची असर चांगली होते. परंतु जोपर्यंत ''मी चंदुभाई आहे'' असा तुमचा विश्वास (belief) आहे. (तुम्ही मानता) आणि शिवाय ज्ञानांत सुद्धा ''मी चंदुभाई आहे'' असे वाटते, तोपर्यंत कारणे (causes) नाहीशी होणार नाहीत. हे जेव्हां ज्ञानी पुरुष हलवून जागेकरून स्वरूपाचे भान करवितो तेव्हां कारणे (causes) थांबतात. आम्ही कारणरूपी शरीराचा नाश करतो. नंतर ह्या चंदुलालचे जेवढे आता असर (effects) राहिले त्या परिणामांचा (effects) चंदुलालने निकाल करवयाचा. मात्र ह्याचा निकाल करताना राग आणि द्वेष उत्पन्न झाले नाहीत-तर ठीकच आणि झालेच तर नवीन कारण शरीर तयार करण्यास ते कारणीभूत होतील. जे असर (effects) परिणाम बदलण्याची कोणात शक्ति नाही, ते सनातन सत्य आहे आणि हे नामांकित वैज्ञानिकांना सुद्धा कबूल करणे भाग पडेल.

हा कलियुगातील दूषम काळ आहे, ह्या दूषमकाळांतील ह्या आश्चर्यकाळाचे आम्ही आश्चर्यज्ञानी आहोत आणि असे आम्हास स्वतः बोलण्याची पाळी आली आहे. हा वर्तमान काळाचा आश्चर्यकाळ आहे. कारण कीं हिऱ्याला स्वतःची ओळख देण्याकरिता मी हिरा आहे, मी हिरा आहे असे बोलावे लागते, असा दूषम काळ आहे.

सर्व जग त्रिविध तापानी आग लागल्यामुळे भडकून गेले आहे! तीन ताप कोणते? आधि, व्याधि आणि उपाधि.

## ( १६ )
## आधि व्याधि-उपाधि

पोटांत दुखते त्याचे नाव व्याधि, भूक लागते त्याचे नांव व्याधि आणि डोळे दुखतास त्याचेपण नाव व्याधि. शारीरिक दु:खाला व्याधि म्हणतात. मानसिक दु:खास आधी म्हणतात. सबंध दिवस चिंता करित रहाणे त्याचे नाव आधि. आणि बाहेरून जे येते त्यास उपाधि म्हणतात. आता आपण येथे बसलो आहोत आणि बाहेरून कोणी दगड मारला तर ती उपाधि. कोणी आपणास बोलवावयास आले तो उपाधि. उपाधि बाहेरून येते. आतून येत नाही.

सर्व जग मग ते मोठे साधु असोत किंवा संन्यासी असोत तरी सुद्धा ते त्रिविध तापांनी पेटलेले आहे. आम्ही ज्यांना ज्ञान दिले आहे ते निरंतर समाधीमध्येच असतात म्हणजे शुद्धात्मा पदांत रहातात आणि निरंतर स्वरूपातच रहतात आणि दरएक अवस्थेमध्ये समाधिस्थ असतात. कारण की ते फक्त बघतात आणि जाणतात.

हे कोणासारखे आहे माहित आहे का? पारक्याच्या  घरांत तुम्ही जर घुसलात तर मनांत निरंतर भीतिच राहील. आता कोणी ओरडेल का आणि कोणी बाहेर हाकलून देईल काय? तुमच्या स्वत:च्या घरांत असे कधी होते का? आहे का कोणाची धास्ती? स्वत:च घराचे मालक म्हणून शांतताच असणार? हा चंदुलाल. ते तुमचे घर खचितच नाही. तुम्ही स्वत: क्षेत्रज्ञ पुरुष आहात आणि भ्रांतिने दुसऱ्याच्या क्षेत्रांत त्याचा आकार घेऊन राहिलेले आहांत. दुसऱ्याचे स्वामी होऊन बसलात आणि परत दुसऱ्याचा भोक्ता झाले आहात. म्हणूनच निरंतर चिंता, उपाधि, आकुळता आणि व्याकुळता ह्या रहाणारच. ही स्थिती म्हणजे पाण्यांतून बाहेर काढून टाकलेल्या माशासारखी. हे श्रीमंत लोक मच्छरदाणी चौफेर बांधून डनलॉपच्या गाद्यावर झोपतात. ह्याच्या अगोदर ढेकणाला पण सद्‌गति दिलेली असते. एवढ करुन सुद्धा त्याना झोप लागत नाही. कारण की स्वत:च्या शंभर रत्तलच्या वजनाचे शरीर ह्या कुशीवरून त्या कुशीवर फिरवण्यांतच सर्व रात्र जाते. आणि मधुनच काहीना काहीतरी चिंता असते. काय करतील बिच्चारे? वाचण्याने किंवा क्रिया करण्याने थोडेच ज्ञान प्राप्त होते?

## ( १७ )
## जग आणि ब्रह्म

दादा:- हे जग खरे आहे का भ्रांति (Illusion) आहे?

चंदुलाल:- भ्रांति (Illusion).

दादा:- नाही तसे नाही, बघ मी तुला Illusion म्हणजे काय ते समजावून सांगतो. Illusion किंवा भ्रांति म्हणजे पाण्यांत उभे राहून धोतर उंच धरले म्हणजे धोतर भिजणार नाहीं. सर्व बाजूने आग लागलेली दिसणार. परंतु भाजणार नाहीं. ह्याला भ्रांति म्हणावयाची. कित्येक म्हणतात कीं ''ब्रह्म हे सत्य आहे आणि जग हे मिथ्या आहे.'' जर मिथ्या आहे ना? तर मग अग्नित हात घालून बघ, मग मिथ्या आहे हे ताबडतोब माहीत पडेल. आणि जर मिथ्या असेल तर चंदुलालमध्ये अक्कल नाही असे जर कोणी सांगितले की त्याची झळ चंदुलालला लागता कामा नये. मिथ्या कोणास म्हणतात? भिंतीवर विटेचा तुकडा मारला तर लाल रंग पडून एक लहानसा खड्डा पडतोच परंतु चंदुलाल रात्री दोन वाजता उठून ज्यां सकाळी शिव्या दिल्या त्याचा तो विचार करित बसतो. तर मग जगत् मिथ्या कसे काय? आम्ही काय म्हणतो कीं जग हे सापेक्ष (Relative) सत्य आहे आणि ब्रह्म हे खरे (Real) सत्य आहे. ही आमची त्रिकाल सत्यवाणी आहे. ह्या जगाचे सापेक्ष (Relative) सत्य केव्हा असत्य होईल हे सांगता येत नांही. All these are temporary adjustments- ह्या सगळ्या तात्कालिक व्यवस्था आहेत. आणि ब्रह्म हे खरे (Real) सत्य आहे कायम (permanent)चे आहे आणि शाश्वत आहे!

## ( १८ )
## मन - वचन - काया यांची उपाधि

मनुष्यमात्रास मन-वचन आणि शरीर ह्या तिन्ही वस्तु चिटकलेल्या आहेत म्हणून तो असे बोलतो, की मी चंदुलाल आहे. हिचा नवरा आहे. ह्याचा बाप आहे. अरे मूर्खा तु कायमचा कलेकटर आहेस काय? तर मग म्हणतो, नाही मी सेवा निवृत्त होणार आहे ना! तर मग हा सेवानिवृत्त होण्याचा चवथा रोग. हे दारूडे लोक गटारामध्ये लोळून काय बोलतात? मी सयाजीराव गायकवाड आहे, मी राजा आहे, मी महाराजा आहे, तेव्हां आपणास समजते कीं हा प्राणी बोलत नाही. दारुचा अम्मल बोलत आहे! म्हणून मन, वचन काया ह्या तिघांची भुतावळ चिटकली आहे तसा त्यांचा अम्मल बोलत आहे की 'मी चंदुलाल आहे, कलेक्टर आहे' आणि त्याच्या जोरावर तो नाचतो.

मी तुम्हाला एक घडलेली गोष्ट सांगतो ती नीट ऐका. एक काशी नावाची बाई शेजारी राहणाऱ्या बायकां बरोबर काम आटपून दुपारची गप्पा मारीत असे. अचानक डोळे फिरवून घुमायला लागली. त्यामुळे सर्व घाबरून गेले. त्यातील एकीने सांगितले की हिच्यात तर भूत शिरले आहे, मांत्रिकाला बोलवा. मग तिचा नवरा ताबडतोब एका मांत्रिकाला घेऊन आला. मांत्रिक आल्याबरोबर कळले की हिला तर भूताने झपाटले

आहे. तेव्हा तो तिला सटासट चाबकाचे फटके मारू लागला. बाई तर एकदम ओरडू लागली. तेव्हा त्या मांत्रिकाने विचारले की तू कोण आहेस? तेव्हा काशीने उत्तर दिले "I am Chanchal, I am Chanchal", मांत्रिक उमजला. त्याने विचारले '' तू का आली आहेस? मग ती काशी म्हणाली, ''ह्या काशीने माझ्या नवऱ्यास फसविले आहे''. अरे, ह्या काशीला इंग्रजीच्या ABC येत नाहीं आणि ही वेगाने इंग्रजी भाषेत कशा तऱ्हेने बोलते कीं I am Chanchal, I am Chanchal. मग तपास केला तेव्हां कळले कीं, चंचल इंग्रजी शिकलेली होती, ती इंग्रजी मध्ये सुंदर बोलत होती. त्यानंतर मांत्रिकाने तिला मारून समजाविले आणि तिच्या सर्व इच्छा कबूल करून त्या त्या वस्तु आणून एका वडाच्या झाडाच्या बुंध्यात ठेवल्या. मांत्रिकाने काशीची चंचलच्या भूतांतून सुटका केली.

अशी ही भूतावळ आहे. चंचल तर निघून गेली. परंतु काशीच्या पाठीवर उठलेले बळ मात्र तिला दु:ख देत होते.

मन-वचन-काया ही तिन्ही भुते तुम्हाला चिकटुन राहिलेली आहेत. आणि त्याचे आम्ही मांत्रिक आहोत. त्या तिन्ही भूतापासून सोडविण्याची शक्ति आमच्यामध्ये आहे. ह्या जन्मांतले असर (effect) परिणाम तसेच रहातील कारण हे वळ बुजण्यास वेळ लागणारच. परंतु ह्या भूतापासून आपली कायमची मुक्ती होईल.

मन-वचन आणि काया ही चिकटलेली भुते आहेत हे जर तुझ्या ध्यानात आले तर ४५ पैकी २५ आगम तुला कळले असे मी म्हणेन. घर, दार, बायका, मुले किंवा कपडा सोडण्याची जरूर नाही. हे जे तीन चिकटलेले आहेत त्यांचीच हकालपट्टी करावयाची आहे.

## ( १९ )
## आगम आणि निगम

गुरुच्या कृपेशिवाय आगम वाचू शकत नाही. आगमची माहिती ज्ञानीला असतेच. स्वत: आगम, त्याला आगमची गम कशी कळणार? आम्हाला तर आगम आणि निगम सुगमच आहेत.

खऱ्या (real) 'मी'ला शोधून काढ. नुसते मी मी काय करतोस? ही बकरी सुद्धा बँ, बँ, करते आणि तू सुद्धा मी आहे, मी आहे, असे करतोस आणि ते कशासाठी करतोस? तर ह्या देहाला ही तर सर्व भर (पूरण) आणि झीज (गलन) आहे. चढ उतार हा संसाराचा स्वभाव आहे. सगळेच पैसे गोळा करण्याच्या पाठीमागे लागले आहेत.

परंतु ते पैसे सुद्धा भर आणि झीज आहेत. बँकेच्या हिशोबात दोन भाग असतात. एक जमा (credit) व दुसरा खर्च किंवा उधार (debit). नुसतेच जमा (credit) का होत नाही? नियमा प्रमाणें ज्याची भर होते त्याची होणारच. तुम्ही खाता ती भर आणि संडासाला जाता ती झीज आहे. पाणी पिणें ही भर आहे आणि लघुशंकेस जाणें ही झीज आहे. तसेच मनांत विचार येतात आणि जातात ती सुद्धा भर आणि झीज आहेत.

भोजनालय, शौचालय झीज आणि भर आणि शुद्धात्मा ह्या शिवाय ज्ञानी पुरुषास ह्या जगात काहीच दिसत नाही. भोजनालय म्हणजे भोगण्याची वापरण्याची वस्तु, शौचालय म्हणजे सोडून देण्याची वस्तु. भर, झीज, आणि शुद्धात्मा ह्याशिवाय जगांत काहीच नाही.

## ( २० )
## पूरण आणि गलन

मनुष्य खूप खा खा खातो आणि मग लठ्ठ होतो. खाल्लेले आहे त्याची जर झीज झाली नाही तर वायु चढतो. तसेच पैशाचे होणार आहे. त्याची कोणालाही शुद्ध नाही. असा कोणी मनुष्य शोधून काढ कीं त्याची झीज झालीच नाही. महिसागरसुद्धा नर्मदा नदीस सांगतो कीं माझ्या आंत खूप पाणी येते आणि जाते. पण उन्हाळा आला कि सर्व सुकते. मी सर्व डॉक्टरांना विचारले कीं ही, नखे वाढतात ती कशामुळे वाढतात? ते वाटेल ते सांगू लागले. कॅलशियममुळे, परंतु तसे नाही, खरे पाहिले तर ती झीज आहे. खाण्यामध्ये विशिष्ट प्रकारचा साठा होत असतो. त्यामुळे हाडे वाढत असतात. ते नखाच्या द्वारे बाहेर जाते. ते निरुपयोगी होते त्याची नियमाने झीज होणारच. त्याप्रमाणे ह्या शरीरातच परमाणूंची भर आणि झीज होत रहाते. मनुष्य दहा वर्षाचा असताना त्याच्यामध्ये जे परमाणू होते, त्यातील पंचविसाव्या वर्षी एकहि परमाणु नसतो. जुन्याची झीज आणि नव्याची भर होते. भर, झीज, भर, झीज असे चक्र चालुच असते.

अरे ह्या पापाची भर करतोस परंतु त्यांची झीज होईल तेव्हां तुझ्या लक्षात येईल व तू अतिशय घाबरशील आणि तुला विस्तवावर बसल्यासारखे वाटेल. जेव्हां पुण्याची भर करशील आणि त्याची पुन्हा झीज होईल तेव्हां कळेल की कशी मजा येते. म्हणूनच ज्याची भर कराल ते विचार करून करा की झीज होताना त्याचा काय परिणाम होतो? भर करताना नेहमी लक्षात ठेवा. पाप करताना, कोणास लुबाडून पैसा एकत्र करताना नेहमी लक्षात ठेवां की ह्याची केव्हांतरी झीज होणारच. हे बँकेत ठेवलेले पैसे सुद्धा केव्हां तरी जाणार. त्याची सुद्धा झीज होणार आणि एकत्र करताना जे पाप केले, रौद्रध्यान केले त्या सर्वाची जेव्हा झीज होईल तेव्हा तुझी काय दशा होईल? लक्ष्मीला कोणीही

अडवू शकत नाही. ही तर भगवानची सौभाग्यवती आहे. तिलाही तू अडवितोस. लग्नानंतर बायको पहिल्याच वेळी घरी आली आणि तिला जर माहेरी जाऊ दिले नाही तर तिची बिचारीची काय दशा होईल? हल्ली लोकानी लक्ष्मीचे तसेच केले आहे. म्हणून लक्ष्मी सुद्धा कंटाळली आहे. आम्हाला तर जेव्हा जेव्हा लक्ष्मी वडोदरा स्टेशनावर भेटते तेव्हां तेव्हां हात जोडून तिला आम्ही सांगतो की आमचे घर, मामाच्या गल्लीत सहावे आहे. जेव्हां यावयाचे असेल तेव्हां या, व जावयाचे असेल तेव्हां जा. ती (लक्ष्मीची) आता मला सांगते कीं, मी ह्या पैसेवाल्या लोकांना खूपच कंटाळून गेले आहे. म्हणूनच आता मी महात्म्यांचेकडे जाऊन रहाणार आहे. त्याचे कारण असे कीं मी जेव्हां महात्म्यांचे कडे जाते तेव्हां ते माझे फुलहारांनी स्वागत करतात. व परत जातेवेळी सुद्धा मला ते फुलहारांनी निरोप देतात. जे जे लोक मला अडवतात त्यांच्या घरी मी आता कधीही जाणार नाही आणि जे जे माझा तिरस्कार करतात त्यांच्याकडे मी तर कधीही जाणार नाही. रुपये तर येतात आणि जातात. दहा वर्षांनी नंतर ती लक्ष्मी रहाणार नाही, असा फेरफार होतोच.

पुण्य आणि पाप म्हणजे काय? कोणी बाहेरून आपल्या घरांत आला आणि त्याला आपण बसावयास सांगितले तर त्याच्या चेहऱ्यावर कसे भाव उत्पन्न होतात? आणि जर त्यास गाढव म्हंटले तर त्याच्या चेहऱ्यावर कसे भाव उमटतात? जग हे आकुळता आणि व्याकुळता ह्यामध्ये सापडलेले आहे. मग तो त्यागी असो किंवा संसारी असो. कोणत्याही प्राण्यास शांतपणा नसतोच. एकदम स्वरूपाचे जेव्हां भान होते तेव्हां शांतता निर्माण होते. क्रमिक मार्गामध्ये शांती प्राप्त करण्यासाठी सबंध समुद्र पार केला आणि दुसऱ्या किनाऱ्यावर गेला कीं शांतता प्राप्त होते. ही केवढीतरी मेहनत करावी लागते आणि ह्या अक्रम मार्गामध्ये आम्ही तुमच्या डोक्यावर हात ठेवला की तुमच्यामध्ये कायमची शांतता निर्माण होते.

## ( २१ )
## संसारातील विघ्ने दूर करण्याकरिता ''तीन मंत्र''

मंत्राचा खरा अर्थ काय? मंत्र म्हणजे ज्याच्यापासून मनास शांती मिळते तो. परमेश्वराची भक्ती करताना संसारात अडचणी येऊ नयेत म्हणून परमेश्वराने तीन मंत्र दिलेले आहेत. (१) नवकार मंत्र (२) ॐ नमो भगवते वासुदेवाय (३) ॐ नमः शिवाय – त्यात सुद्धा अहंकारी लोकांनी नवे नवे संप्रदाय तयार केले आणि मंत्र सुद्धा वाटून घेतले. परमेश्वराने असे सांगितले होते कीं तुमच्या सोयीप्रमाणे देवळे वेगवेगळी करा, परंतु मंत्र मात्र एकत्रच ठेवा. ते, मंत्रच ह्या लोकांनी वाटून टाकले. अरे ह्या लोकांची

तर येथपर्यंत मजल पोहोचली कीं एकादशीची सुद्धा वाटणी केली. शंकराची निराळी आणि वैष्णवाची निराळी. तर मग परमेश्वर कशा रीतीने खुष रहाणार? जेथे कलह आणि मतभेद असतो तेथे परमेश्वर रहात नाहीं. आम्ही दिलेल्या ह्या तीन मंत्रात अजब शक्ति आहे! तुम्ही म्हणाल तेव्हां पाऊस पडेल आणि सर्व देव खुष राहतील आणि कोणतीही संकटे येणार नाहीत. फाशीची शिक्षा अगदी सौम्य प्रमाणात वाटेल.

हे आमचे दिलेले तीन मंत्र सकाळी पाच वेळां आमचा चेहरा आपल्या समोर आणून जर बोललात तर कधीसुद्धा तुम्ही बुडणार नाहीत. आणि हळुहळु मोक्ष पण मिळेल त्याची आम्ही जबाबदारी घेतो.

आम्ही तर असे सांगतो कीं सबंध जगाचे दुःख आम्हास प्राप्त होवो, तुमच्यामध्ये जर शक्ति असेल तर तुमची सर्व दुःखे आमच्या पायाशी अर्पण करा. मग पहा. आणि जर दुःख आले तर आम्हाला सांगा. परंतु ह्या काळांत आम्हास असे लोक भेटले आहेत कीं ते दुःख देऊन टाकण्यास तयार नाहीत. त्यांच्या शिलकीमध्ये थोडेसे दुःख रहावे अशी त्यांची इच्छा असते. परंतु मूर्खाला असे समजत नाही की तो स्वतः अनंत सुखाचा ठेवा आहे आणि जर सर्व दुःख मला अर्पण केले तर बाकी रहाणारे अपार सुखच राहील. परंतु कोणालाही दुःख सुद्धा अर्पण करता येत नाही.

मनुष्य मृग रुपामध्ये वावरत आहे असे कोठेतरी लिहिलेले आहे. भीतीनेच मृग शब्दाचा वापर केला आहे. येथे गाढव शब्दच वापरायला पाहिजे होता. मूर्खा ३२ मार्कानी गाढव होतो आणि ३३ मार्कानी मनुष्य होतो. तो एक मार्क शरीरात वापरला गेला आहे. तर मग बाकी काय राहिले? गुण तर गाढवाचेच आहेत ना? फोटो मनुष्याचा निघेल परंतु आतापर्यंत जर पाशवी गुण असतील तर तो पशूच आहे. आम्ही तर स्वच्छपणे सांगतो कारण आपणाकडून आम्हास कशाचीही अपेक्षा नाही. तुमचे हित कशात आहे. ते आम्हास पहावयाचे आहे. तुझ्यावर आमची अपार करुणा आहे, म्हणूनच आम्ही एवढे स्पष्ट बोलत आहोत. ह्या जगाला उघडे नागडे (स्पष्ट) सांगणारे आम्ही एकटेच आहोत.

## ( २२ )
## चिंता आणि अहंकार

भगवान श्रीकृष्ण म्हणतातः ''जीवा तू का चिंता करतोस? कृष्णाला जे करावयाचे असेल ते करो.''

मग ते दुष्ट लोक काय म्हणतात माहीत आहे? कृष्णास आपणास जे

सांगावयाचे असेल ते सांगू द्या. परंतु हा संसार असाच चालवावयाचा तर चिंता केल्याशिवाय थोडाच चालणार? लोकांनी तर काळजी करण्याचे कारखाने शोधून काढले आहेत! त्या कारखान्यांतील मालही विकला जात नाही आणि कसा काय विकला जाणार? जिकडे विकावयास जाईल तेथे चिंतेचा कारखाना तर असतोच की? चिंतामुक्त माणूस जगांत शोधून काढ.

एक बाजूस ''श्रीकृष्ण मी तुला शरण आलो आहे'' ह्याचा जप चालला आहे आणि दुसऱ्या बाजूस ''हे कृष्णा तू मला शरण ये'' असे सांगतो. जर कृष्णाला शरण गेला तर चिंता कसली? महावीर भगवान सुद्धा चिंता करू नका असे सांगतात आहे. चिंते चे फळ तिर्यंच (झाडाच्या) गति मध्ये जन्म घेणे असे आहे. चिंता हा तर मोठ्यांतील मोठा अहंकार आहे. ''मीच सर्व चालवितो'' असे सांगणाऱ्याला सुद्धा चिंता असतेच.

खरा परमेश्वराचा भक्त तो, की जो चिंता उत्पन्न झाली तर परमेश्वरास सुद्धा विचारतो. तुम्ही नाही म्हणत असताना मला चिंता का उत्पन्न होते? जो परमेश्वराशी भांडत नाही, तो खरा भक्त नाही. जर काही अडचण आली तर, तुमच्या आत बसलेल्या परमेश्वरालाच दोष द्या आणि त्याच्याशी भांडण उकरून काढा. जो परमेश्वरास दररोज दम भरेल तो परमेश्वराचा खरा प्रेमी आहे. आज तर ह्या परमेश्वराचा खरा भक्त सापडणे फार कठिण आहे. सगळेच लोक स्वतःच्याच मार्गाने चालले आहेत.

'मी करतो, मी करतो' असे करतो म्हणून चिंता उत्पन्न होते. पहा भक्त नरसी मेहता काय म्हणतातः– ''मी करतो, मी करतो'', हेच अज्ञान, ज्याप्रमाणे गाड्याखाली चालणारा कुत्रा म्हणतो की ही गाडी तर मीच ओढत आहे. सृष्टीचे व्यवहार स्वतःच चालत असतात ते एखादाच योगी जाणतो''.

नरसी मेहताचे हे वर्णन वाचून सर्व योगी अहंकारी झाले! हे तर आत्मयोगी आणि आत्मयोगेश्वरा बद्दल म्हंटले आहे. आत्मयोगेश्वर तर हजारो लाखो वर्षांत एक निर्माण होतो तो एकटाच सर्व ब्रह्मांडात आणि ब्रह्मांडाच्या बाहेर राहून परमाणू आणि परमाणूमध्ये फिरून व पाहून बोलतो. त्याला एकट्यास माहित असते की हे जग कोणी तयार केले, कसे तयार केले, आणि कसे चालत आहे. ''आम्ही ह्या काळांतील आत्मयोगेश्वर आहोत.'' तर तुला माझ्यापासून जेवढा फायदा करून घ्यावयाचा असेल तेवढा करून घे. तुझ्या सर्व चिंता मी एका तासात दूर करतो आणि हमी देतो की जर तुला एक पण चिंता उत्पन्न झाली तर तू माझ्या विरुद्ध कोर्टात दावा दाखल कर. अशा आम्ही दहा हजार महात्म्यांची चिंता दूर केलेली आहे. मूर्खा माग, मागशील ते

देण्यास तयार आहोत. परंतु जरा विचार करून माग. असे मागून घे कीं ते तुझ्याकडे कायमचे राहील. मागताना कायमचे सुख मागून घे.

परदेशाची कमाई परदेशांतच रहाते. ह्या मोटारी, बंगले, गिरण्या, बायका, मुले सर्व, येथे सोडून जावे लागेल. ह्या शेवटच्या स्टेशनावर तर कोणाच्याच बापाचे काहीही चालणार नाही. परंतु पुण्य व पाप बरोबर न्यायला लागेल. दुसऱ्या सोप्या भाषेत तुला समजावून सांगतो की येथे जे जे गुन्हे केले त्याची कलमे तुझ्या बरोबर येतील. गुन्ह्याची कमाई येथेच राहील, आणि मग केस चालेल. कलमाच्या हिशोबाने नवा देह प्राप्त करून नवीन कमाई करून, देणे चुकते करावे लागेल. म्हणून आता पासूनच वाकडे पाऊल टाकू नकोस. स्वदेशात तर पुष्कळच सुख आहे. परंतु तू स्वदेश कोठे पाहिलास?

हे लोक डोक्यावरचे केस आपले आहेत असे समजून रोज डोक्यावर कंगव्याने फिरवाफिरव करतात. न्हाव्याने ते केस कापून टाकले नंतर फिरव कीं?

चिंता हाच अहंकार आहे. ह्या लहान बाळास काळजी का वाटत नाही? कारण की त्यास पक्के माहित असते कीं तो स्वत: चालवीत नाही. कोण चालवतो त्याची सुद्धा त्याला चिंता नाही. शेजाऱ्याकडे बघूनच चिंता उत्पन्न होते. आपल्या शेजारच्या घरी गाडी आहे आणि आपल्या घरात नाही. फक्त जगण्यासाठी माणसाला काय पाहिजे? तू एकदा नक्की करून घे कीं मला इतक्या इतक्या वस्तुंची जरूरी आहे. उदाहरणार्थ: घरी पुरते खाण्या पिण्याचे पाहिजे, रहाण्यास घर, घर चालविण्याकरिता थोडी लक्ष्मी. तेवढे तुला मिळूनच जाईल. परंतु शेजारच्या माणसाकडे बँकेमध्ये दहा हजार रुपये पाहून आमचे पोटांत नेहमी दुखते. अशा प्रकारे ही सगळी दु:खे उत्पन्न झाली आहेत. आम्ही दु:खाला नेहमी आमंत्रण देत असतो. एकदा एक जमिनदार मला भेटावयास आला. तो मला विचारू लागला की जीवन जगण्यासाठी काय काय पाहिजे? माझ्या घरी हजार बिघे जमीन आहे, दोन मोटरी आहेत, आणि बँकेत शिल्लक पण चांगली आहे. तर मग मी किती ठेवावे. मी सांगितले मित्रा बघ, प्रत्येकाला आवश्यकता किती असली पाहिजे त्याची आठवण त्याच्या जन्माच्या वेळेस किती संपत्ती होती त्यावरून येते आणि त्याचेवरून सर्व आयुष्याचे धोरण तू नक्की ठरव. तोच खरा नियम आहे. हे तर सर्व जास्त (excess) होत आहे. आणि जास्त (excess) म्हणजे विष आणि विष जर खाल्ले तर तुझा मृत्यु अटळ आहे.

## ( २३ )
## प्राप्त झाले आहे ते भोगून घे.

श्रीकृष्ण भगवानांनी काय सांगितले? प्राप्त वस्तु भोगव आणि अप्राप्त वस्तुची चिंता करू नकोस. मी अहमदाबादमध्ये एका शेठजीच्या घरी गेलो. शेठाणीने उत्तम जेवण आणि उत्तम तुपाचा शिरा केला. नंतर मी आणि शेठजी जेवावयास बसलो. शेठाणीने शेठजीला सांगितले कीं "आज तरी तुम्ही नीट जेवा". मी विचारले "असे का म्हणता?" तेव्हां शेठाणी सांगू लागली "हे तर येथे जेवत असतात परंतु ह्यांचे लक्ष मिलमध्ये गेलेले असते. हे कधीही नीट जेवत नाहीत". असे काय? अरे हे जेवणाचे ताट प्राप्त झाले आहे ते निश्चिंतपणे जेव. ह्या वेळेस गिरणीची चिंता कशाला? भूतकाळ आणि भविष्यकाळ अप्राप्त आहेत. वर्तमान प्राप्त आहे. त्याचा सुखाने उपभोग घे. अरे हे हल्लीचे लोक चार वर्षाच्या मुलीचे लग्न कसे होणार त्याची चिंता आतापासून करतात! ही चिंता करीत असताना तो बाप मरण शय्येवर असतो. त्यावेळी ती बिचारी मुलगीच शेवटी येऊन सांगू लागते कीं, "बाबा तुम्ही शांतपणाने जा. माझी चिंता करू नका." तेव्हां तो मूर्ख तिची अक्कल काढतो आणि मनात असे समजतो की ती लहान असल्याकारणाने तिला कमी अक्कल आहे. जणुकाय सर्व जगाची अक्कल ह्याच्यापाशीच आहे. बाजारात स्वत:स विकावयास गेला तर त्याची चार आणे सुद्धा किंमत येणार नाही.

प्रतिष्ठित आत्मा ज्याप्रमाणे इच्छा करतो त्याचप्रमाणे ताबडतोब फळ मिळते. एक एक अवस्थेमध्ये एक एक जन्माचे बंधन होते तसे हे जग आहे.

## ( २४ )
## ध्यान आणि अपध्यान

परमेश्वरानी सांगितले आहे की जीव मात्र चार ध्यानातच राहत असतो. रौद्र्ध्यान, आर्तध्यान, धर्मध्यान, आणि शुक्लध्यान.

**ध्यान-अपध्यान:-** वरील दिलेल्या एकाहि ध्यानांत नसणे म्हणजे अपध्यान. पूर्वी लोकांमध्ये अपध्यान होते. परंतु आता तर भगवान महावीरांच्या गादीवर असलेल्या साधुंना पण अपध्यान असते. ह्या लोकांना आता नाही परंतु मी गेल्यानंतर माझी वाक्ये हादरून टाकतील. दुर्ध्यानापेक्षा अपध्यान खालच्या पातळीचे आहे. अपध्यानाचा जन्म ह्या काळातच झाला आहे. ज्या ध्यानाचा समावेश रौद्र, आर्त आणि धर्म ध्यानामध्ये होत नाही. त्याचे नाव अपध्यान.

शुक्लध्यान तर ह्या काळात मुळीच नाही असे शास्त्र सांगते. सुटण्याकरिता

जर ध्यान पद्धतशीर केले नाही तर ते अपध्यानामध्ये गेले. सामायिक केल्यावर मनात 'मी केले' आणि म्हणतो पण कीं 'मी केले' ते करताना दुसरीकडे लक्ष गेले तर हे खरे सामायिक ठरत नाही.

**रौद्रध्यान:**– रौद्रध्यान म्हणजे काय? हे व्यापारी एक मीटर कापडाला बीस रुपये किंमत सांगतात, जर कोणी विचारले ते कोणते कापड? तर मग तो जवाब देतो की टेरेलिन. ग्राहकास त्याचा भाव (किंमत) बीस रुपये मीटर म्हणून सांगतात आणि कापड मोजताना काय करतो? इकडे तिकडे जराशी खेचतो. ही ग्राहकाला लुबाडण्याची कसरत आहे. ह्याचे नाव रौद्रध्यान. व्यापारी जेव्हा मोजमापामध्ये फरक करून ग्राहकास फसवितो त्याला रौद्रध्यान म्हणतात. भेळसेळ करणे म्हणजे रौद्रध्यान करणे. स्वत:च्या सुखाकरिता दुसऱ्याचे थोडेसे सुख लुबाडून घेणे म्हणजे काढून घेण्याचा विचार करतो ते रौद्रध्यान. कायदा काय म्हणतो? तू तुझ्या धंधात पहिल्यापासून पंधरा टक्के किंवा बीस टक्के जास्त घेऊन धंदा करावा. त्याच्याशिवाय तू कपडा खेचतोस व कमी देतोस तो गुन्हा आहे. खऱ्या जैनांना तर रौद्रध्यान असताच कामा नये. ज्याप्रमाणे अपघात (accident) क्वचितच होतो, त्याप्रमाणे कधितरी रौद्रध्यान असले तर हरकत नाही. क्र ोध करणे, शिव्या देणे, दु:ख देणे ह्यासर्वास रौद्रध्यान म्हणतात. केवळी भगवानांनी जैन लोकास रौद्रध्यान फारच काटकसरीने वापरण्याची आज्ञा दिली आहे. आज तर जैन लोकांना रौद्रध्यानाशिवाय दुसरे ध्यानच येणार नाही. आचार्य, गुरू स्वत:पेक्षा कमी अक्कल असलेल्या शिष्यांवर रागावत असतात. ते सुद्धा रौद्रध्यान आहे. मनामध्ये चिडणे ते सुद्धा रौद्रध्यान. आजच्या काळांत शिव्या दिल्याशिवाय गोष्ट होऊ शकत नांही. रौद्रध्यानचे फळ काय? नर्कगति.

**आर्तध्यान** म्हणजे स्वत:च्या आत्म्याला दु:ख देणारे ध्यान. बाहेरच्या कोणत्याही प्राणिमात्रास त्रास न देणे, परंतु आपल्याबद्दल विचार करीत रहाणे, चिंता करीत रहाणे त्यास आर्तध्यान म्हणतात. ते सगळे चांगले आहे. दुसऱ्याला जरा सुद्धा त्रास होत नाही. क्रोध, मान, माया, लोभ आर्तध्यानात नसतो. परंतु ह्या काळांत आर्तध्यान नाहीच. ह्या काळांत मुख्य करून रौद्रध्यानच आहे. सत्ययुगांत पाच टक्के रौद्रध्यान होते. दहा वर्षाच्या मुलीचे लग्न करावयाचे आहे, त्याची चिंता करीत रहाणे ते आर्तध्यान. आपणास जो आवडत नाही असा पाहुणा आला व म्हटले हा जर येथून लवकर गेला तर चांगले ते आर्तध्यान. ''आवडणारा मनुष्य'' म्हणजे त्याच्याशी आर्थिक संबंध किंवा विषय संबंध असेल आणि तो आला तर 'जाऊ नये' अशी इच्छा करतो तर हे पण आर्तध्यान. शिष्य उत्तम मिळाला नाही तर त्याच्यावर आतल्याआत मनास लावून घेणे हे सुद्धा आर्तध्यान. आर्तध्यानाचे फळ तिर्यंचगति म्हणजे पशु, पक्षी किंवा झाड.

**धर्मध्यानः**- समग्र दिवसांत चिंता नाही आणि मनांत कोठल्याही प्रकारचा क्लेश नसणे ह्याचे नाव धर्मध्यान. कधीही रौद्रध्यान किंवा आर्तध्यान नसणे व निरंतर शुभचिंतन करणे ह्यास धर्मध्यान म्हणतात. चिंता नाही आणि अभिप्राय न बदलणारी माणसे ही नेहमी धर्मध्यानात असतात. स्वरुपाचे भान नसले तरी भगवंताला त्याची हरकत नाही, परंतु आतून आणि बाहेरून क्लेश रहित असणे हे त्याला आवडते.

हल्लीच्या काळांत धर्मध्यान सापडणे फार कठिण आहे. शेकडा दोन किंवा पाच माणसे असतात. कारण हल्लीच्या त्रिकाळ कळियुगांत तर काळजी व उपाधि एकट्या संसारी वर्गास होते असे नाही. तर साधु, साध्वी, आचार्य ह्या सर्वांना चिंता वाटतच असते. शेवटी अगदी काहीसुद्धा मिळाले नाही तर शिष्याला शिव्या देतात.

**धर्मध्यानाचे फळः**- फक्त धर्मध्यान असले तर त्याचे फळ देवगति आणि धर्मध्यानाच्या बरोबर आर्तध्यान असले तर त्याचे फळ मनुष्यगति.

**शुक्लध्यानः**- शुक्लध्यानाच्या चार पायऱ्या आहेत. आत्म्यास अस्पष्ट ओळखणे तो पहिला पाया. दुसऱ्या पायात आत्म्याला स्पष्ट ओळखणे. आमचे पद ते दुसऱ्या पदाचे शुक्लध्यान. केवळ भगवंताचे पद हा तिसरा पाया. चोथा पाया मोक्ष. स्पष्ट वेदन म्हणजे परमेश्वराला संपूर्णपणे ओळखणे. परंतु सगळेच ज्ञेय चकाकत नाहीत व संपूर्ण केवळज्ञानात सर्वच ज्ञेय प्रकाशतात.

**अस्पष्टवेदन** म्हणजे ह्या खोलीत अंधारामध्ये एका कोपऱ्यांत बर्फ पडला असेल आणि त्याला स्पर्श करून गार वारा लागला म्हणजे बर्फाच्या अस्तित्वाची जाणीव होते. आणि आत्म्याचे स्पष्ट वेदन म्हणजे बर्फाला चिकटून बसले असताना जे होईल तो अनुभव.

आम्ही तुमच्यात, आमच्यात आणि केवळीभगवान ह्यामध्ये विशेष फरक ठेवला नाही. काळाचा कारणाने आम्हाला केवळज्ञान अडकले आहे. ते चार डिग्री पर्यंत पोचले नाही. ३५६ डिग्रीवर अडकले आहे. परंतु आम्ही मात्र तुम्हास संपूर्ण केवळज्ञान देतो.

**शुक्लध्यानाचे फळ मोक्षः** आम्हाला खटपटी वीतराग म्हणतात. संपूर्ण वीतरागी नाही. परंतु खटपटी वीतरागी मात्र आहोत. आम्ही एक बाजू सोडून सगळ्या बाजूनी वीतरागी आहोत. आम्ही खटपटी म्हणून सर्वांना सांगतो या तुम्हाला मोक्ष देतो. मोक्ष देण्याकरिता सर्व काही खटपट करतो.

## ( २५ )
## गतिफल-ध्यान आणि हेतु

भगवान काय म्हणतात? तू काय करतोस ह्याचेकडे आमचे लक्ष नाही. जे करित आहेस त्याचा उदय कर्माप्रमाणेच होत आहे. भगवान फक्त सामायिक करताना व प्रतिक्रमण करताना तुझे लक्ष कोठे आहे ह्याची नोंद घेतो. सामायिक करित असताना लक्ष जर किती झाले त्याच्यावर किंवा तो शिष्यावर चिडत असेल तर त्याला सामायिक म्हणता येत नाही.

भगवान महावीर ह्यांच्यासमोर आचार्यमहाराज बसले होते. त्यांना सगळे ज्ञान दिले होते, मात्र एक व्यवस्थिताचे ज्ञान दिले नव्हते. ते आचार्य सामायिकमध्ये बसलेले होते. तेव्हा दुसऱ्या महात्म्यांनी विचारले कीं "महाराज ह्या आचार्यांना कोणती गति मिळेल? भगवान म्हणाले "आता देवगति मिळेल नंतर थोडा वेळ थांबून कोणी विचारले कीं "महाराज आता ह्या क्षणास ह्या आचार्याना कोणती गति मिळेल"? तेव्हां भगवान म्हणाले "अधोगतिला जातील," त्यानंतर पंधरा मिनीटानी कोणतरी विचारलें कीं "आता कोणत्या गतिला जाणार?" तेव्हां भगवानांनी सांगितले, "आता मोक्षास जाणार आहेत.

भगवान, असे कसे? हे संपूर्ण ध्यानांत आहेत आणि असे कसे? तेव्हां भगवान म्हणाले, "आम्हास जे दिसत आहे ते तुम्हास दिसत नाही. आणि तुम्हास जे दिसते ते आम्हास दिसत नाही". बघा, तो बसला होता. तो सामायिक करण्यामध्ये. परंतु त्याचे लक्ष कोठे आहे ते आम्हींच पाहू शकत होतो. पहिल्या ध्यानामध्ये देवगतिचे चित्र होते. दुसऱ्या वेळेस नर्कगतिचे चित्र होते. नंतर तो सुन्दर चित्रे काढू लागला. आतमध्ये फोटो सुन्दर पडू लागले. ते मोक्षास जाणार त्याप्रमाणे होते. ध्यानावर फळाचा आधार आहे. चित्र काढतो पुद्गल परंतु त्यांत तुम्ही तन्मय झालात म्हणजे सही केली. परंतु तन्मयाकार न होउन जागृतीत राहून जे जे घडते ते पहातो व जाणतो असे जेव्हां होते तो आत्म्यापासून निराळाच होतो.

एक व्यापारी कपडा ताणून विकतो आणि शिवाय खूप खूष होतो कीं, मी धंद्यात कितीतरी कमवितो. परंतु त्यास माहित नसते कीं तो नर्कगतिची तयारी करीत आहे. त्याचे रौद्र ध्यान असते. आता दुसरा व्यापारी तशाच ध्यानाने कपडा ताणून विकतो. परंतु ते करताना मनांत त्यास खूपच पश्चाताप होत असतो कीं, "मी हे खोटे करित आहे. महावीराच्या भक्ताने असे करू नये". तो तिर्यंच (पशु-पक्षी, जीव-जंतु) गतिच तयारी करतो. कर्मे सारखी असतात. परंतु ध्यान निरनिराळे असल्यामुळे गति निरनिराळी होत असते.

ह्या काळांत स्वरूपाचे भान कोणासच नांही. धर्म जर कोणी समजत असते, तरीसुद्धा धर्मज्ञान राहिले असते, किंवा तो धर्मध्यानांत राहू शकला असता. हल्ली हा लौकीक धर्म आहे. त्याचा मूळ पायाच खचलेला आहे. म्हणून जगांतील लोकाना धर्मध्यान सुद्धा नाही. परंतु सर्व जग आर्त आणि रौद्रध्यान मध्ये आहे. जगांतील लोक म्हणतात कीं, शेठजीनी तर पन्नास हजाराचे दान दिले. फार चांगले म्हणावयाचे. परंतु शेठजींच्या मनांत काय असते? ह्या नगरशेठने जर जबरदस्ती केली नसती तर आपणास काहीच देणे भाग पडले नसते. हे तर जबरदस्तीने दान द्यावयास लागले. म्हणून तो रौद्रध्यान करतो. नर्कगतिची तयारी करतो. दुसऱ्या माणसाजवळ पैसा नाही परंतु ध्यान करतो कीं माझ्याकडे केव्हां पैसा येईल आणि मी धर्माकरिता दोन पैसे केव्हां खर्च करीन, तो दान केल्याशिवाय उर्ध्वगतिची तयारी करीत असतो आणि त्या शेठजीने पन्नास हजार रुपये देऊन सुद्धा नर्कगतिची तयारी केली.

## ( २६ )
## बुद्धि वापरण्याची मर्यादा

हे लोक बुद्धि वापरून युक्त्या (tricks) योजून जो पैसा मिळवतात तो तर भयंकर गुन्हा आहे. जितक्या युक्त्या कराल तितकेच ते कठिण रौद्रध्यान. युक्ती म्हणजे ‘‘समोरच्या कमी बुद्धिच्या माणसाकडून आपली जास्त बुद्धि वापरून फायदा करून घेणे’’.

बुद्धि ही तर संसाराची अनुगामी आहे, कधीही मोक्षप्राप्त करू देणार नाही. कृष्ण भगवान ह्यानी सुद्धा बुद्धिला व्यभिचारिणी म्हटली आहे. माणसाला बुद्धि संसारातच अडकवून ठेवते. त्याच्यातून त्याला बाहेरच निघु देत नाही. ‘स्व’चे संपूर्ण अहित करते. जशी बुद्धि वाढत जाते तस तसे दुःख वाढत जाते. दोन वर्षाच्या मुलाची आई जर मेली तर त्यास थोडे तरी दुःख होते काय? आणि बावीस वर्षाच्या मुलाची आई वारली तर त्यास कितीतरी दुःख होते. आपण समजू शकता की, हे कशामुळे? त्याची बुद्धि वाढली म्हणून.

भगवानांनी काय सांगितले कीं संसारात बुद्धि फारच कमी वापरावयाची. किती वापरावयाची त्याची मर्यादा ठरवून दिली आहे. जर मोठ्या दगडाच्या खाली तुझा हात सापडला असेल तर त्यास युक्तीने काढून घे आणि परत सापडणार नाही इतकीच बुद्धि वापर. परंतु लोक पैसा कमविण्याकरिता काळाबाजार करण्यासाठी, बुद्धिचा उपयाग करू लागले आहेत. लोकांना लुबाडण्या करीता बुद्धि वापरू लागले आहेत. इतकेच नाही तर लोक युक्त्या (tricks) करण्यास शिकावयास लागले. युक्ती (tricks)

म्हणजे समोरच्या माणसास समजणार नाही आणि त्यास लुबाडून त्याची संपत्ती काढून घेणे ते. अरे हे तर भयंकर रौद्रध्यान आहे, त्यास सातव्या नरकात सुद्धा जागा मिळणार नाही.

## ( २७ )
## अविरोध वाणी-प्रमाण

स्याद्वाद कोणास म्हणतात? ज्याच्या वाणीने कोणासही विरोध होत नाही तिला स्याद्वाद म्हणतात. विरोध होत आहे हा तर समोरच्या माणसाचा दृष्टीकोण (view point) आहे. कोणाच्याही दृष्टीकोणाला खोटे म्हणू नये. ह्याचेच नांव स्यादव्वाद याला सर्वांचे दृष्टीकोण मान्य असतात. कारण स्वत: सेन्टर मध्ये बसलेले असतात म्हणून आम्ही स्याद्वाद आहोत.

परमेश्वरांनी सांगितले आहे कीं सामायिक प्रतिक्रमण, प्रत्याख्यान ही जी आत्महेतुसाठी कर्मे आहेत ती आमच्या आज्ञेप्रमाणे सरळ रीतीने करा.

तत्वाच्या दृष्टीने बघितले तर दोष कोणाचाच नाही. परिस्थिती अशी आहे म्हणून आम्ही कडक बोलतो. ते समोरच्या माणसावर करुणा असल्यामुळे हे दोष काढून टाकण्याकरिता बोलतो.

## ( २८ )
## ज्ञानी आणि धर्माचे स्वरुप

ह्या जगामध्ये कित्येक लोक असे सांगतात कीं आमचा व्यवहार धर्म आहे. अरे, हे बरोबर नाही. जोपर्यंत निश्चय धर्म प्राप्त झाला नाही, शुद्धात्मा जाणला नाही, व्यवहार धर्म आहे, असे कसे म्हणता येईल? निश्चय धर्म आणि व्यवहार धर्म केव्हां निराळा होतो कि जेव्हां ज्ञानी पुरुष स्वत:च्या अनंत सिद्धी वापरून तुमच्या आत्मा आणि अनात्मा ह्यांच्यामध्ये line of demarcation (भेदरेखा) टाकतो आणि सतत सुटे आणि सुटे ठेवतो तेव्हांच समजते की हे स्वत:चे क्षेत्र आणि हे परक्षेत्र. जोपर्यंत निश्चय धर्म प्राप्त होत नाही तोपर्यंत व्यवहार धर्म बोलण्यांत अर्थ नाही. ज्याला लोक व्यवहार धर्म समजतात तो लौकिक धर्म आहे.

लोक पाळतात तो लौकिक धर्म, लोकोत्तर धर्म नाही, हा धर्म काय काय करतो? हा धर्म एक वाईट काढतो आणि एक चांगली सवय लावतो. लौकिक धर्म तर काय म्हणतो कीं जे अनुकूल असेल ते गुंडाळ आणि प्रतिकुल असेल ते गुंडाळू

नकोस. तो काय शिकवतो कीं चोरी करू नकोस. खोटे बोलु नकोस. जीवनात सुख मिळेल. अनुकूलता प्राप्त होईल असे कर. सर्व जगाने सत्कार्यालाच धर्म मानले आहे. अशुभामधून शुभामध्ये येणे तो लौकिक धर्म. Real- सत् धर्म. अलौकिक धर्माच्या आचरणानेच मोक्ष मिळेल. अलौकिक धर्मांत चांगल्या सवयी आणि वाईट सवयी, अनुकूल आणि प्रतिकूल, खरे आणि खोटे ह्या सर्वांतून सुटला की मोक्ष प्राप्त होतो. 'स्वधर्म' हाच खरा परमेश्वर धर्म आहे. तोच आत्म्याचा धर्म आहे. हाच अलौकिक धर्म.

बाकी देह धर्म म्हणजे सापेक्ष (relative) धर्म. त्यालाच लौकिक धर्म म्हणतात. सत् (Real) धर्मात म्हणजे अलौकिक धर्मात कोठेही पंथ नसतात. वावटे नसतात. त्यामध्ये ग्रहण त्याग नसतो, मतभेद नसतो. अलौकिक धर्म निष्पक्षपाती असतो. पक्षपात केला तर मोक्ष कधीही मिळत नाही. लोकांना मोक्षासच जावयाचे आहे आणि दुसऱ्या धर्मांना हिणवावयाचे आहे. माझे खरे असे म्हंटले तर न बोलता समोरच्याचे खोटे ठरते. दुसऱ्याचे खोटे आहे असे म्हणून मोक्ष कधीही प्राप्त होत नाही. पक्षापक्षी सोडून तू जेव्हां केन्द्रा मध्ये येशील तेव्हाच अभेद, चैतन्यधाम प्राप्त होईल. अनंत अवतारात एकाच पक्षाचे पाय मजबूत केलेस तर अंगावर संसार ओढून घेतलास! अरे मोक्ष मिळवायचा आहे की पक्षांमध्येच पडून रहावयाचे आहे? एका धर्मांत कितीतरी फाटे पडलेले आहेत. जेथे भांडण असते तेथे मोक्ष नसतो आणि भांडणे करून पक्षाला मजबूत केले. तुमचा धर्म म्हणजे घोड्याच्या शर्यतीचे मैदान (Race Course) झाला आहे. शिष्यांच्या चढाओढीत पडलास त्याला पाच शिष्य तर मला अकरा केलेच पाहिजेत. घरी बायको आणि दोन मुले असे तिघे जण होते ते सोडून आता येथे अकरा जण गळ्यात बांधलेस आणि शिवाय समग्र दिवस शिष्यावर रागवतोस व अस्वस्थ होतोस. मग ह्याला मोक्षाचे साधन केले असे कसे म्हणता येईल?

अशी कडक वाणी आम्हा वीतरागांना नसते. परंतु काय करणार? ह्याच्या रोगांना काढून टाकण्यासाठी अजब वीतरागता वापरून बरोबर संपूर्ण करूणारूपी वाणी आंतून बाहेर पडत आहे. ह्यामध्ये त्याचाही दोष नाही. त्यांची इच्छा तर मोक्षास जाण्याची आहे. परंतु अजाणतेपणामुळे, त्याते हातातून उलटेच होत आहे. ह्या गोष्टीला विचित्र काळच जबाबदार आहे. त्यांच्या चक्री वादळात सर्व सापडून गेले आहेत.

आम्हास तर अपार करुणा आहे. आम्हास सर्व निर्दोष दिसतात. कारण आम्ही स्वतः सर्व जगाला निर्दोष दृष्टीने बघत असतो.

( २९ )

## निर्दोष दृष्टी

भगवान महावीर ह्यांच्या समोर आचार्य महाराज बसले होते. तेव्हां त्यांच्यामध्ये थोडासा अभिमान उत्पन्न झाला कि, ''मला पुष्कळ ज्ञान आहे, मी कोणीतरी आहे'' तेव्हां त्यानी भगवानांना विचारले ''भगवान तुमच्यांत आणि आमच्यांत आता किती फरक आहे? अद्याप माझे किती अवतार बाकी राहिले आहेत?'' त्यांना तर आतून असे वाटत होते कि मला तर तीन अवतारांच्या नंतर मोक्ष मिळून जाईल! भगवान तर वीतरागी. परंतु आतून तर महाराजांची गोष्ट समजून गेले. त्यानी सांगितले ''प्रश्न तर चांगला आहे. दोनचार जणांचे पुण्य उदयास आले आहे. तेव्हा त्यांना पण बोलवा. गावचे नगर शेठ, सती, वेश्या, खिसे कापणारे त्यांना पण येथे बोलवा. आणि ते बाहेर गाढव उभे आहे, त्याची पण तुम्हास गोष्ट सांगतो.'' तेव्हां आचार्य महाराजांनी बाकी सर्वांना बोलावून आणले. नंतर भगवानानी खुलासा केला, ''अहो आचार्य महाराज, माझ्यामध्ये, तुमच्यामध्ये ह्या नगरशेठमध्ये. सतीमध्ये, वेश्येमध्ये खिसा कापणाऱ्यां मध्ये आणि त्या गाढवांत जरा सुद्धा फरक नाही''. महाराज बोलले ''भगवान काय, म्हणतां? तुमच्यामध्ये आणि आमच्या मध्ये कांहीच फरक नाही? फरक तर खूपच दिसत आहे ना?''

तेव्हां भगवान म्हणाले, ''बघा तुमच्या दृष्टीमधून तुम्ही पहात आहात. आम्ही हल्लीच्या तीन अवतारांपूर्वी ज्ञानी पुरुषाचे शिष्य झालो होतो. त्यानी आमची दृष्टी निर्दोष करून दिली. त्या दृष्टीचा आम्ही दोन अवतारांत उपयोग केला आणि ह्या अवतारांत आम्ही संपूर्ण निर्दोषी झालो, संपूर्ण निर्दोष दृष्टी केली आणि सर्वांना संपूर्ण निर्दोष असे पाहिले. त्या दृष्टीने आम्ही सांगत आहोत की, तुमच्यांत, आमच्यांत आणि तुमच्या सर्वांत काहीच फरक नाही!'' आचार्य भगवान बोलले ''पण प्रभु! आम्हास तर पुष्कळ फरक वाटत आहे. तुम्ही सतीला आणि वेश्येला, नगर शेठजीला आणि खिसे कापणाऱ्यामध्ये, मला आणि त्या गाढवाला सर्वांना एकच आहात असे कसे म्हणता? आम्हास हे काही समजत नांही. ह्या गोष्टीवर माझा विश्वास नाही''. भगवान म्हणाले, आचार्य महाराज बघा, तुमच्यामध्ये, आमच्यामध्ये, नगरशेठमध्ये, सतीमध्ये, वेश्येमध्ये खिसे कापणाऱ्यांमध्ये आणि त्या गाढवात माल एकाच तऱ्हेचा आहे. सर्वामध्ये १२० काऊंटचे एक तोळा सूत आणि तेच परत न्यू शोराक मिलचे आहे. सर्वामध्ये सारखेच आहे. ह्याच गिरणीचे आणि हेच १२० काउंटचे एकतोळा सूत, फरक मात्र इतकाच आहे की, तुमच्या सर्वांचे सूत गुंतलेले आहे आणि माझी गुंत निघून गेलेली आहे, ह्या सर्वामध्ये, सर्वात कमी अवतार त्या गाढवाचा होईल असे आहे. हे आम्ही आमच्या

ज्ञान चक्षूनी सांगत आहोत. कारण कीं, आचार्य महाराज तुम्ही खूप शास्त्रे वाचलीत. त्याचा मानसिक बोजा उतरण्यास तुम्हाला पुष्कळ अवतार घ्यावे लागतिल आणि ह्या गाढवाची तर पुढल्या अवतारांत ज्ञानी पुरुषा बरोबर भेट होईल आणि त्याला मोक्ष मिळेल!''

## ( ३० )
## कैफ आणि मोक्ष

मानसिक बोजा ही एक नशा आहे. जितकी कमी नशा तितका लवकर मोक्ष. नशा असलेल्या माणसास मोक्ष कधीच मिळत नाही. ''मला काही विशेष ज्ञान आहे''. ही सर्वात मोठी नशा. झोपेत सुद्धा ती रहाते. नशेपासून मुक्त झालात म्हणजे मोक्ष नक्की. नशा असणाऱ्यांस मोक्ष मिळणे शक्यच नाही. ही शास्त्रे वाचली, धारणा केली तो मोक्ष मिळविण्यासाठी केली. परंतु परिणाम मात्र अनंत अवतारांच्या अटकेत सापडलास. ह्या दारुबाज माणसाची नशा नुसते, पाणी शिपडले कीं ताबडतोब उतरते. मात्र शास्त्री पंडित होऊन मला विशेष ज्ञान आहे ही नशा कधीच उतरणार नाही.

चेहऱ्यावर जर एक बाजरीच्या दाण्या एवढी पुळी झाली असली तर तो आरशात शंभरवेळा बघ बघ करतो. त्याचे कारण ''मी चंदुलाल आहे.'' हेच समजून चालत आहे. म्हणून ह्या शरीराला मीच आहे असे मानतो. म्हणुनच आरशामध्ये सारखे लक्ष जाते. परंतु हे शरीर तुमचे नाही. शरीर हे लफडे आहे. कोणी एखादा मुलगा, मुलीस घेऊन फिरत असला तेव्हां बाप म्हणतो, ''अरे हे लफडे केव्हां लागले?'' तेव्हां तो मुलगा म्हणतो हे तुम्ही काय म्हणता? हे काय लफडे आहे? तुम्हाला ह्यात काय समजणार? परंतु काही दिवस गेल्या नंतर त्या मुलीबरोबर जेव्हां मतभेद होतो आणि ती मुलगी जेव्हां दुसऱ्याबरोबर फिरतांना दिसते तेव्हां लक्षांत येते कि हे लफडेच होते. तसेच शरीर हे एक लफडे आहे. जेव्हा देहाचा अनुभव नष्ट होतो त्याचबरोबर लफडेपण नष्ट होते. लफडे म्हटले म्हणजे दगा आलाच.

मन, वचन, वाणी आणि शरीर हे फसविणारे आहे. आणि ह्यातून सुटका करून घेणे अत्यंत अवघड आहे. जेव्हांपासून जाणले की, हे मन, वाणी आणि शरीर फसविणारे आहे तेव्हांपासून मनुष्य त्याच्यापासून सुटण्याचे मार्ग शोधीत रहातो. परंतु मग ह्या लफड्यावर जर प्रेम केले तर जास्तच चिकटत जातो आणि मनुष्य गोत्यांत येतो. मन, वचन, आणि शरीर हे राग द्वेषाच्या आधीन आहेत. आम्ही राग द्वेषापासून त्यांची सुटका करतो, म्हणून लफडे आपोआपच सुटते. त्याच्याशी भांडण करून ते काढावयाचे नाही. वीतरागता आणि अहिंसा ह्यांनीच त्याना बाहेर काढावयाचे आहे.

मन, वचन आणि शरीर हे लफडे आहे असे जेव्हां तो पहातो आणि जाणतो तेव्हा तो स्वतः त्यापासून मुक्त होत जातो.

## ( ३१ )
## मोक्षच आग्रह करण्यासारखा आहे

मोक्षच आग्रह ठेवण्यासारखा आहे बाकी सर्व ठिकाणी निराग्रही असावे. संसार हे विष नाही, परंतु तुझा आग्रह हेच विष आहे. आम्ही स्पष्टच सांगत आहोत की मेहनतीचे सर्व मार्ग हे संसारातील मार्ग आहेत. मोक्षाचीच इच्छा करण्याजोगी आहे. मोक्षाचा विचार जर एकच वेळ आला असेल तर लाख अवतारात तरी ज्ञानी पुरुषाची भेट होईल. आणि तुझा मोक्ष होईल. मोक्ष म्हणजे 'मुक्तभाव', सर्व संसारिक दु:खापासून मुक्ती, मेहनत तर संसाराकरिता असते, मोक्षासाठी नसते. मोक्ष तर स्वत:चा स्वभावच आहे. आत्म्याचा स्वभाव मोक्षस्वरुप आहे. ज्याप्रमाणे पाण्याचा स्वभाव थंड आहे परंतु गरम करण्याकरीता मेहनत करावी लागते. आणि थंड करण्याकरीता पण मेहनत करावी लागते का? करावयास लागत नाही. हे तर आपोआपच त्याच्या स्वभाव धर्माप्रमाणे थंड होत जाते. परंतु ही गोष्ट कशी समजावी? स्वत:चा स्वभावच मोक्ष स्वरूपाचा आहे. ते न समजण्याचे कारण जबरदस्तीची भ्रांति आहे. कोणत्या काळी ती भ्रांति जाणे शक्य नाही. ही तर जेव्हां ज्ञानी पुरुषाची भेट होईल तेव्हां तिचा निकाल लागेल. म्हणून ज्ञानी पुरुषाचा शोध कर, सजीव मूर्तीला शोधून काढ. स्वतः तरून निघाला आहे आणि अनेक जणास तारण्याचे ज्याच्यामध्ये सामर्थ्य आहे अशा तरण, तारण ज्ञानी पुरुषास शोधून काढ. आणि त्याच्या मागे मागे निर्भयपणाने चालत जा. ह्या काळांत आम्ही एकटेच तरण-तारण आहोत. अजब तऱ्हेचा ज्ञानावतार आहे. एका तासांत मोक्ष देऊन टाकू असे आम्ही आहोत. तुला काहीच करावयाचे नाही आणि काही द्यावयाचे सुद्धा नाही. कारण आम्ही कोणत्याही वस्तुचे भिकारी नाहीत. ज्यांचे संपूर्णपणे भिकारीपण नाहीसे झालेले. असते त्याच्यातच परमेश्वर प्रगट होतो. लक्ष्मीचे भिकारी नसतील असे कित्येक साधु मिळतील, विषयाचे भिकारी नसतील तसेही मिळतील. ते मानाचे भिकारी असतील किंवा कीर्तीचे भिकारी असतील, शिष्यांचे भिकारी असतील. कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने भिकारीपण राहिलेलेच असेल. जेथे संपूर्ण अयाचकपण असते तेथेच परमात्मस्वरूप प्रगट होते. आम्ही लक्ष्मीचे. विषयाचे, शिष्याचे, कीर्तीचे किंवा कशाचेही भिकारी नाहीत. कोणत्याही गोष्टीची आम्हाला अपेक्षा नाही. हे तुला आमच्या कडून जे पाहिजे असेल ते घेऊन जा, परंतु असे माग की परत मागण्याची वेळ येणार नाही. जगातील भौतिक सुखे तर आहेत byproducts : अवांतर उत्पादने आहेत आणि आत्मा

प्राप्त करणे ते main production- मुख्य उत्पादन तयार करण्याचा कारखाना सोडून देऊन लोकानी byproduction अवांतर उत्पादनाचे कारखाने काढले आहेत. तर मग मोक्ष कसा मिळेल? मोक्षाचा मार्ग माहित नसल्याने सर्व जगातील लोकांची भटकंती चालू आहे. जर मोक्ष पाहिजे असेल तर शेवटी ज्ञानी पुरुषाकडेच जावे लागेल. खरोखर जर दादर स्टेशनवर जावयाचे असेल तर तो रस्ता माहित असणाऱ्या माणसास विचारल्या शिवाय दादर स्टेशनचा पत्ता लागणार नाही. ही मोक्षाची गल्ली अत्यंत अरुंद आणि वाकडीतिकडी आहे. शिवाय चुकवणारी आहे. जर एकटा फिरावयास गेलास तर त्यांत अडकून पडशील, म्हणून ज्ञानीला शोधून काढ आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालत जा. अरे आम्ही मोक्ष दातांचा परवाना (license) घेऊन आलो आहोत. अगदी शेवटचे कल्याण करण्याची शक्ति आमच्यात आहे. हा तर अक्रम ज्ञानावतार आहे! एका तासांत आम्ही तुला परमेश्वरपद देऊ शकतो असे आहोत. परंतु तुझी संपूर्ण तयारी पाहिजे. आमच्याकडे दोनच वस्तु घेऊन ये. एक ''मी काहीच समजत नाही'' आणि दुसरा ''परमविनय''. मला थोडेफार समजते ही तर नशा आहे आणि जर खरोखर जाणले म्हणजे तर त्यास प्रकाश म्हणावयाचे आणि जेथे प्रकाश असेल तेथे ठेच लागणार नाही. मग येथे तर प्रत्येक ठिकाणी ठेच लागते. त्याला आपणास कळले असे कसे म्हणता येणार? एक पण चिंता कमी झाली का? खरे समजले असते तर एकपण चिंता रहावयास नको. 'मी थोडेसे समजतो.' असे तू समजत असला तर मग मी तुझ्या अर्ध्या घड्यात काय ओतू? तुझा घडा जर रिकामा असेल तर त्याच्यामध्ये अमृत भरून देईन. मग तुला जेथे जावयाचे असेल तेथे जा. मुले, मुली यांची लग्ने वगैरे करून देऊन संसार चालव. परंतु माझ्या आज्ञेप्रमाणे वाग.

ही गोष्ट अपूर्व आहे. पूर्वी कधीही ऐकलेली नाही व वाचलेली नाही अशी आहे. सर्व जगाचे कल्याण करण्याचे आम्ही निमित्त आहोत. कर्ता म्हणून नाही.

हे सर्व जग फक्त पोकळीच आहे. असे आम्ही आमच्या ज्ञान चक्षूनी पाहून सांगत आहोत आणि तू जर हे जग खरे आहे असे समजून चाललास तर ती तुझी चूक आहे. फक्त पोकळी म्हणजे अवकाश; आकाश म्हणजेच अवकाश.

एक वैद्य होता. त्याने आजारी माणसास फार उत्तम औषध दिले. मात्र त्याने मिरचीचे पथ्य सांगितले. कारण की रोग फार मिरच्या खाण्याने उत्पन्न झाला होता. बिचाऱ्या वैद्यांनी खूपच मेहनत केली. उत्तमात उत्तम औषध दिले. हे औषध बदल ते औषध बदल असे केले. परंतु महिना, दोन महिने झाले तरीपण दुखण्यात काहीच फरक पडला नाही. एक दिवस वैद्य अचानक त्या माणसाच्या घरी पोहोचले. तेव्हां त्यानी बघितले कीं तो आजारी मनुष्य जेवायास बसला होता आणि ताटात दोन मोठ्या

मोठ्या हिरव्या मिरच्या होत्या. तेव्हां वैद्य त्यास एकदम रागावला आणि भावातिरेक emotional झाल्यामुळे त्याची तिथल्या तिथे हृदयक्रिया बंद पडली. ह्याच्यांत दोष कोणाचा? अरे आजारी मनुष्य तर विष घेईल परंतु तू का विष प्यायलास? हे सर्व पोलंपोल आहे. कोणत्याही स्टेशनवर चिकटून बसावयाचे नाही. नाही तर फसलास असे समज. हे तर, मिरच्या रोगी खाणार आणि मेंदूचा पारा चढून वैद्याची नस तुटून जाणार! हे तर बघण्यामुळेच विष होते ना ! जर चहामध्ये शेंबुड पडलेला बघितला तर विष चढेल. परंतु जर समजण्यात आले नाही तर तो चव (taste) घेऊन मजेने चहा पिऊन टाकेल. हे तर बघितले तेव्हां त्याला वाटेल की ही तर वाईट गोष्ट. ह्याचेच नांव थापेबाजी. खरी गोष्ट माहीत पडली की भडकतो आणि माहित झाले नाही तर काहीच होत नाही.

एक मनुष्य माझ्याकडे येत असे. त्याला एक मुलगी होती. त्याला मी अगोदरच समजावले होते की हे कलियुग आहे. ह्यामुळे कलियुगाचा परिणाम मुलीवर सुद्धा होईल. म्हणून सावध रहा. ती गोष्ट तो माणूस नाही समजला आणि जेव्हा त्याची मुलगी दुसऱ्या माणसाबरोबर पळून गेली तेव्हां त्या माणसाने माझी आठवण काढली. नंतर तो माझ्याकडे आला आणि सांगू लागला, ''तुम्ही जे मला सांगितले होते ती गोष्ट खरी झाली. जर तुम्ही मला अशी गोष्ट सांगितली नसती तर मला विष प्यावे लागले असते''. हे जग असे थापेबाज आहे. जे होते ते मान्य करून घ्यावे लागते ह्यामुळे काय विष प्यावयाचे? ह्या कारणाकरिता जर तू असे केलेस तर लोक तुझी वेड्यामध्ये गणना करतील. हे तर कपड्याने शरीर झाकून लोक आबरूचे रक्षण करतात आणि म्हणतात कीं आम्ही खानदानी मनुष्य आहोत.

परंतु ज्ञानी पुरुष फार हुशार असतो. पूर्ण कुजण्यापूर्वीच कापून टाकतो. ह्या जगास पूर्णतः (completely) थापेबाज म्हणून पहाणे ही काय अशी तशी गोष्ट आहे?

हे धनगर काय करतात? विशेष प्रकारचा आवाज काढून मेंढ्यांना वाड्यात बांधतात आणि मग एकाही मेंढ्यास पळून जाऊ देत नांहीत. मेंढा समजतो की आपले वाघापासून रक्षण होत आहे. आणि धनगर बोलतो की मी मेंढ्यांचे रक्षण करतो. परंतु धनगर मेंढ्याचा काय-काय उपयोग करतो. हे मेंढ्यांना काय समजणार? रोज दूध काढतो. त्यांचे केस जे थंडीपासून मेंढ्यांचे रक्षण करतात ते कापून घेतो आणि शेवटी घरी पाहुणे आले कीं त्याची भाजी करतो. मटण करतो. ह्याचेच नाव फसवेबाजी.

## ( ३२ )
## मनुष्याचे निराश्रितपणा

ह्या कलियुगांतील सर्वच माणसांना निराश्रित म्हणतात. ह्या जनावर वगैरे सर्वांना आश्रित म्हणतात. माणसांना कोणाचाच आश्रय नाही. कोणाचा आश्रय घेतला असेल तो सुद्धा कधी निघून जाईल समजत नाही. ज्याचा आश्रय घेतला असेल तो स्वत:च निराश्रित असेल तर तुझे कल्याण कसे होणार? आता निराश्रित कसे ते मी तुम्हाला परमेश्वराच्या भाषेत सांगतो.

एक शेठजी, एक महाराज आणि त्यांचा पाळलेला कुत्रा असे तिघा प्रवासास निघेले. तेव्हां रस्त्यामध्ये घनदाट जंगल आले आणि त्यांना चार लुटारू भाले आणि बंदुका घेऊन भेटले. ह्या प्रसंगी ह्या सर्व जणांवर असल्या प्रसंगाचा काय परिणाम झाला असला पाहिजे? शेठजीला वाटले की माझ्याकडे दहा हजार रुपयांची थैली आहे. ती जर चोरांनी लाबवली तर मग माझे कसे होणार? आणि प्राण घेतला तर माझे काय होईल? महाराजाना वाटले, आपणा कडून काहीच घेऊन जाण्यासारखे नाही, फक्त लोटा आहे. तो जर घेतला गेला तर मग पाहु. परंतु जर माझा पायच मोडला तर माझे काय होईल? माझी सेवा कोण करणार? तो कुत्रा तर एकसारखा लुटारुवर भुकत राहील आणि जर लुटारूने त्याला बडविले तर ते क्यँव करीत शेठजीला पडत असलेला मार ते बघत राहील. फक्त कुत्र्यालाच असे वाटणार नाही की माझे कसे होणार? कारण की तो आश्रित आहे. व्यापारी आणि महाराज हे दोघे निराश्रित आहेत कोणीही माझे कसे होईल, असे नुसते मनांत आणले म्हणजे त्याचे नाव निराश्रिताच्या यादीत जाते. भगवान काय म्हणतात? ''जो पर्यंत प्रगट पुरुषाचे दर्शन झाले नाही तो पर्यंत तुम्ही निराश्रित आहात आणि प्रगट पुरुषाचे दर्शन झाले तर तुम्ही आश्रित आहात''.

प्रगट पुरुषाचे दर्शन झाल्यानंतर बाहेरील किंवा आतील कसेही प्रसंग आले तरीपण माझे कसे होईल असे होणार नाही.

जो कोणी आमचा आश्रय घेईल त्याचे अनंत काळाचे निराश्रितपणा दूर होईल. किती भयंकर गंभीर परिस्थिति निर्माण झाली तरी सुद्धा ज्ञानी पुरुषाच्या आश्रयामुळे माझे कसे होईल असे वाटणार नाही. कारण तेथे आम्ही व आमचे ज्ञान दोन्ही हजर होणारच आणि तुमचे सर्व तऱ्हेने रक्षण करणार.

## ( ३३ )
## नैसर्गिक तंत्र संचालन व भौतिक विज्ञान

आज परदेशात सर्वत्र विज्ञानाचा अतिरेक झाला आहे. ह्याच्यामध्ये (normality) सामान्यता आणावयास पाहिजे. प्रत्येक वस्तुमध्ये (normality) सामान्यता पाहिजे तरच तो सुखी होणार ९६ डिग्री हे तापाचे सरासरी पेक्षा जास्त उष्णतामान आहे. ९८ डिग्री हे तापाचे प्रमाणशीर ऊष्णतामान आहे. हे अमेरिका आणि त्यासारखी दुसरी राष्ट्रे सरासरीपेक्षा जास्तच्या संशोधनाचा उच्चांक गाठण्यामध्ये सापडले आहेत आणि भारत देश सरासरी पेक्षा कमीच्या संशोधनाच्या खालच्या पातळीवर आहे. सामान्यता पाहिजे. ह्या पाश्चिमात्य सरासरीपेक्षा जास्तचे संशोधन चालू आहे. आणि एवढे करून सुद्धा त्याना जे पाहिजे ते मिळत नाही. हे काय दाखवित आहे कीं त्यांची वाट चुकली आहे. तिकडचे लोक इतके सरासरी पेक्षा जास्त झाले आहेत, की ६८ मैल व ३ फर्लांगावर जर मोटर पंक्चर झाली तर त्याची बातमी देण्याकरिता त्यांच्याकडे साधने आहेत. शरीरास ज्यांची जरूरी आहे अशी साधने शोधून काढ ! ह्या पुरुषांना रोज दाढी करावी लागते ती दाढीच उगवणार नाही असे काही शोधून काढ देह विषयाधीन आहे. त्या शरीरास ज्याची जरूरी आहे ते त्यास दिले पाहिजे. एकसारखा खूप पाऊस पडला तर काय होईल? सर्व नुकसानच होईल. सरासरीपेक्षा जास्त झाले तर नुकसान होते. लोक तर जरा थोडे उष्णतामान वाढले तर ओरड करु लागतात. माझा एक मित्र एक दिवशी ओरडत होता की खूप गरम होत आहे, खूप गरम होत आहे. मी त्यास सागितले की ह्या उष्णतामानाच्या कंट्रोल स्टेशनावर तुम्हाला कंट्रोलर म्हणून जर ठेवण्यांत आले तर तुम्ही आज किती उष्णतामान ठेवाल, तर तो सांगू लागला – ''इतकेच ठेवणार'' अरे जर तू इतकेच उष्णतामान ठेवलेस तर मग ओरडा–ओरड कशाकरिता करतोस? हे तर नैसर्गिक आहे. जेव्हा जितकी आवश्यकता असते तेव्हा तितकेच आपोआप मिळते. परंतु हे उनाड लोक त्यास शिव्याशाप देऊन मोकळे होतात. एक मनुष्य उत्तम कडक इस्त्रीचे कपडे घालून बाहेर जात होता आणि रस्त्यांत जेव्हा त्यास पावासाने झोडले तेव्हां तो पावसाला शिव्या देऊ लागला. कित्येक लोक म्हणतात की आज मुलीचे लग्न आहे. जर पाऊस न पडला तर उत्तम होईल. आणि तिकडे बिचारा एक खेडवळ शेतात चातकाप्रमाणे पावसाची वाट पहात असतो. असा विरोधाभास जर उत्पन्न झाला तर (nature) निसर्ग सुद्धा कापेल. तुमचा भाव आणि (nature’s adjustment) निसर्गाशी तडजोड ह्याच्या आधाराने हे सर्व तंत्र चालते. म्हणून निसर्गात कोणीही ढवळाढवळ करू नका. आपोआप सर्व मिळेल. ''उद्या सकाळी सूर्य उगवला नाही तर काय होईल?'' असा कोणास विचार येतो काय? आणि आला तरी काय?

हे सगळे बाह्य विज्ञानामध्ये इतके पुढे गेले आहेत सरासरीपेक्षा वर गेले आहेत की लोक ह्या (scientists) शास्त्रज्ञाना कंटाळतील ही सर्व क्रांतिची तयारी होत आहे.

जिकडे तिकडे अतिरेक झाला आहे त्या सर्वामुळे थकवा येतो. जास्त असला तरीसुद्धा थकवा येतो दु:ख आणि सुख हे तर सापेक्ष आहे. कोणी एखादा शेठजी उन्हात फिरत असतांना त्यास वाटेत जरी बाभुळीचे झाड दिसले तरी तो त्याच्या सावली खाली विश्रांती घेण्याकरिता व गार वारा मिळण्याकरिता बसेल आणि जर त्यास तेथे चार तास बसावयास सांगितले तर तो इतकावेळ बसल्यामुळे थकून जाईल म्हणून तो बसण्याचे नाकारील.

हिंदुस्तानामध्ये जर ७.५ फूट ऊँचीचा मनुष्य आला तर तो ऊँच वाटेल. आणि आपण ज्या देशात माणसाची ७ फूट ऊँची आहे अशा ठिकाणी गेलो तर त्या देशांत आपण ठेंगणे म्हणून समजले जाऊ. हे तर सर्व (Relative) सापेक्ष आहे. कोणी एखादा मनुष्य वयाच्या ५५ व्या वर्षापर्यंत शिकतच राहिला तर लोक त्याला काय म्हणतील? अरे तू शिकत राहिलास तर लग्न केव्हां करशील? हे झाले (above Normal) सरासरीपेक्षा जास्त, परंतु दोन वर्षाच्या मुलाचे लग्न केले तर ते (below normal) सरासरीपेक्षा कमी समजले जाते.

**( ३४ )**

## भौतिक (Development) विकास–आध्यात्मिक (Development) विकास

हे पाश्चिमात्य लोक हिंदूस्तानातील लोकाना हड-हड करतात. त्यांना (under developed) अविकसित असे म्हणतात. तेव्हां मला असे म्हणावे लागते कीं तूच (under developed) अविकसित आहेस आणि भौतिकात तू पूर्ण (developed) विकसित आहेस. भौतिकामध्ये तुमचा देश पूर्ण विकसित आहे. परंतु भारत देश भौतिकामध्ये अविकसित आहे आणि आध्यात्मिक मार्गात पूर्ण विकसित आहे. येथील खिसेकापूना मी एक तासांत परमेश्वर पद देईन. बाहेरची सर्वच प्रजा आंतर विज्ञानामध्ये अविकसित आहे. ती मी तुम्हाला समजावून सांगतो. तेथील लोकांचा क्रोध, मान, माया, लोभ सध्या विकसित होत आहेत. परंतु हिंदुस्तानच्या लोकांचा क्रोध, मान, माया, लोभ पूर्ण विकसित झाला आहे. टोकावर जाऊन पोहोचला आहे.

(Foreign) परराष्ट्रामध्ये एखादा साधारण ओळजीचा माणूस असला आणि त्याला तुम्हीं सांगितले की मला येथून ५० मैल दूर जावयाचे आहे, तर तो तुम्हास त्याच्या मोटारीतून घेऊन जाईल आणि परत आणून सोडेल. शिवाय रस्त्यांत होटेलचे

बिल सुद्धा तो देऊन टाकेल. परंतु येथे तुमच्या पुतण्याकडे मोटार मागाल तर तो हिशेब काढेल की पन्नास मैल जाण्याचे आणि पन्नास मैल येण्याचे असे एकंदर १०० मैल होतील. पेट्रोलचा खर्च इतका, तेल पाण्याचा खर्च इतका आणि शिवाय माझी मोटार इतकी झिजेल, अशा तऱ्हेने मनांतल्या मनांत हिशोब करील. तो खोट बोलेल की उद्यां तर माझा साहेब येणार आहे.

तर हे काय आहे? पहिल्या माणसाचा लोभच वाढला नाही आणि ह्याचा लोभ पूर्णपणे (develop) विकसित झाला आहे. सात पेढीपर्यंत वाढ झालेला आहे. आणि मग तिथल्या प्रजेचा लोभ किती वाढलेला असेल? स्वत:पुरताच, विल्यिम आणि 'मेरी' पुरताच. मुलगा अठरा वर्षाचा झाला म्हणजे तू निराळा आणि आम्ही निराळे आणि जर 'मेरी' बरोबर थोडीशी तकरार झाली तर तू निराळी आणि मी निराळा. ताबडतोब (divorce) कार्डीमोड घेणार. परंतु आपल्यामध्ये तर शेवटपर्यंत (develop) विकास झालेला असतो. एक ८० वर्षाची म्हातारी व ८५ वर्षाचा म्हातारा ह्यांच्या मध्ये सर्व आयुष्यभर रोज तकरार व कचकच चालू असे आणि जेव्हां म्हातारा मरून गेला तेव्हा म्हातारीने त्याचे तेरावे व्यवस्थितपणे केले आणि बाजूवर बसून तिच्या पुतण्यास सांगू लागली की ''तुझ्या काकाला हे आवडत होते आणि ते आवडत होते.' अशा तऱ्हेनी आठवण काढून एकसारखी बडबडू लागली. मी सांगितले ''काकी तुम्ही तर रोज भांडत होता ना?'' तेव्हा काकीने सांगितले ''हे तर असेच असते. परंतु तुझ्या काका सारखे गृहस्थ मला परत मिळणार नाहीत. मला तर जन्म आणि जन्म तेच मिळावेत''. इथे ममता तर (top) शिखरापर्यंत पोहोचलेली असते. अल्पा

## ( ३५ )
## प्राकृत साहजिकता

(Foreign) पश्चिमात्य प्रजा साहजिकच म्हटली पाहिजे. साहजिक म्हणजे एखादी न मारणारी गाय असलील तर तिचे शिंग जरी लहान मुलांनी हातानी पकडले तरी सुद्धा ती त्यास मारत नाही. आणि जर एखादी मारकुटी गाय असली आणि जर तिच्या वाटेस सुद्धा गेले नाही, तरी सुद्धा ती मारते. ह्या लोकांचे असे असते. त्यांना जर तुम्हास घेऊन जावयाचे असेल तर ताबडतोब हो म्हणतील आणि जर न्यावयाचे नसले तर नाही म्हणतील. परंतु खोटे बोलणार नाहीत. ते दोन्ही बाजूचे असतात. सरळ असेल त्याच्या बरोबर एकदम सरळ वागतात आणि जर वाकडा असेल तर त्याच्या बरोबर तितकेच वाकडे असतात. भारतांतील लोक तर असहज आहेत. हिंदूस्तानमध्ये साहजिकता होती. परंतु ती सत्ययुगाच्या काळात होती. ती खरोखर आदर्श होती. भारतांत

प्रथम चार वर्ण पाडले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. ह्यातच भारताचा (development) विकास होता. आता तर विकास कळसास पोहोचला आहे. सुथाराचा मुलगा तितकाच तज्ञ. त्या काळात साहजिकता परिपूर्ण होती. ती इतकी ऊँच शिखरावर पोहोंचली कीं, तेथून ती हळू-हळू खाली उतरू लागली. निसर्गाचा नियम असाच आहे. जे चार वर्ग होते त्यांचा लोकांनी दुरुपयोग केला. त्यानी हरिजनांचा तिरस्कार केला. आणि बुद्धिचा इतक्या तीक्ष्ण तऱ्हेने दुरुपयोग केला की ते असहज होत गेले आणि भारताचा सूर्य अस्तास गेला. लोक फार दुराग्रही झाले. सगळ्यात शेवटच्या कोटीचे दुर्गुण म्हणजे लोक राक्षसी आचरणाचे दिसू लागले. अरे कोणी वीस वर्षाची विधवा भेटली तर अपशकून. बिचारीला शांति देण्याच्या एवजी अपशकून झाला असे म्हणतात! अरे विधवा म्हणजे गंगा भागीरथीस्वरूप असे समजले जाते. तिच्यामुळे अपशकून कशा तऱ्हेने होईल? त्यानंतर इंग्रज लोक आले. त्यामुळे त्यांच्या सहजतेचे मिश्रण झाले. त्यामुळे इकडचे लोक जरा शांत झाले.

हा तर सगळा (excess) अतिरेक झाला होता त्याचा परिणाम होता. आता भारताचा सूर्य उगवत आहे. (foreign) परराष्ट्रामध्ये सर्व ठिकाणी संध्याकाळचे पाच वाजले आहेत आणि भारतांत सकाळचे पाच वाजले आहेत. ते (full light) पूर्ण प्रकाश व्हावयाचे आहे. आम्ही १९४२ साल पासून सांगत आहोत कीं २००५ सालामध्ये हिंदुस्तान (world) जगाचे केंद्र झालेल असेल. आता होत आहे. नंतर तर (foreign) परराष्ट्रीय प्रजा येथे शिकावयास येईल की जीवन कसे जगावयाचे? (Normality) सामान्यता कोणास म्हणतात? ते इतके (above normal) अतिरेकी झाले आहेत की त्याना जीवन कसे जगावयाचे ते सुद्धा कळत नाही. भौतिक सुखे इतकी अपार वाढली, तरी पण ते रात्री झोप येण्यासाठी झोपेच्या गोळ्या खाऊन झोपून जातात. अरे त्या गोळ्या नसून विष आहे ! इतका (excess) अतिरेक झाला आहे की झोपणी ही निसर्गाचे बक्षिस आहे ते सुद्धा घालवून बसले. ह्याला जीवन कसे म्हणणार?

अरे चंद्रापर्यंत पोहोचलास परंतु त्यामध्ये तुझा काय फायदा झाला? तुझ्या झोपेच्या गोळ्या खाण्याचे बंद झाले का?

## ( ३६ )

## साधक दशा

साधुची व्याख्या काय? आत्मदशा प्राप्त करतो तो साधु. साधु  तर साधकच असतो. परंतु हल्लीच्या कलियुगांत साधु तर साधक बाधक दशेमध्येच रहातो. हा सामायिक प्रतिक्रमण किंवा ध्यान करतो तेव्हां १०० कमवितो आणि शिष्याबरोबर

भांडण करतो आणि केल्यावर १५० चा तोटा करून घेतो. जेव्हां स्वरूपाच्या भानाची ओळख होते तेव्हाच साधक दशा प्राप्त होते. साधक दशा म्हणजे काय, सिद्ध दशा वाढत जाते, म्हणजे सिद्ध दशा मोक्षास नेते आणि साधकबाधक दशा संसारात ओढते. ह्या मध्ये कोणाचाही दोष नाही. योग्य समज नसल्याने असे होते.

## ( ३७ )
## पुण्य आणि पाप

जगामध्ये आत्मा आणि परमाणु हे दोनच आहेत. कोणास शांती दिली असेल, सुख दिले असेल तर पुण्याचे परमाणु एकत्र होतात. आणि कोणास दु:ख दिले असेल तर पापाचे परमाणु एकत्र होतात. नंतर तेच मनाला डसतात. ''इच्छेनुसार जे होते ते पुण्य आणि इच्छे विरुद्ध होते ते पाप.'' पाप दोन प्रकारचे असते आणि पुण्य दोन प्रकारचे असते.

१. पापानुबंधी पाप :- हल्ली पाप भोगत आहे आणि परत नवी पापे तयार करतो. कोणास दु:ख देतो आणि परत खुश होतो.

२. पुण्यानुबंधी पाप :- पूर्वी केलेल्या पापामुळे आता दु:ख भोगीत आहे. परंतु नीतिने आणि उत्तम संस्कारानी नवीन पुण्याची वाढ होत आहे.

३. पापानुबंधी पुण्य :- पूर्वी केलेल्या पुण्यामुळे आज सुख भोगत आहे. परंतु भयंकर पापाचा अनुबंध बांधत आहे. आता पापानुबंधी पुण्य चालू आहे. एखाद्या शेठजीचा खूप मोठा बंगला असला तरी तो त्या बंगल्यात सुखाने राहू शकत नाही. शेठजी पैशाकरिता पूर्ण दिवस बाहेर असतो. इकडे शेठाणी भर जरीच्या सुन्दर साडीच्या मोहात असते आणि शेठजीची मुलगी मोटार घेऊन फिरावयास निघालेली असते. नोकर एकटाच बंगल्यात असतो. सर्व पुण्यांच्या आधाराने मिळालेले असते. बंगला मिळाला, मोटार मिळाली, फ्रीज मिळाले, असे पुण्य असून सुद्धा पापाचा अनुबंध बांधतो. तशी करणी करतो. लोभांत आणि मोहांत वेळ जातो आणि भोगू सुद्धा शकत नाही. पापानुबंधी पुण्यवाला मनुष्य तर लोकांच्या विषयांची लूटबाजीच करतो.

४. पुण्यानुबंधी पुण्य :- पुण्याचा उपभोग घेतो आणि त्याबरोबर आत्मकल्याणाकरिता प्रयत्न करतो. पुण्याचा उपभोग घेतो आणि नवे पुण्य करतो.

सर्व हठयोगानी केलेली कर्मे हठाग्रही, तप हठाग्रही क्रिया, ह्या मुळे पापानुबंधी पुण्य बांधले जाते. परंतु समजून केलेले तप, क्रिया स्वत:च्या आत्मकल्याणहेतुस्तव केलेली कर्मे ह्यामुळे पुण्यानुबंधी पुण्य बांधले जाते. कधीकाळी ज्ञानी पुरुषाची भेट

झाली तर मोक्षास जातो. पुण्यावाचून लक्ष्मी हातांत येणार नाही.

ह्या जगांत जास्तीत पुण्यशाली कोण? ज्याला सहजा-सहजी विचार येतात आणि नक्की करून वर्षानुवर्षापर्यंत इच्छे शिवाय मेहनत न करता मिळतच जाते तो. दुसऱ्यांस इच्छा होते आणि परत नक्की करून संध्याकाळी सहज रीतीने मिळते तो.

तिसऱ्यांस इच्छा होते, प्रयत्न करतो आणि प्राप्त होते. चौथ्या नंबरास इच्छा होते आणि भयंकर प्रयत्नाने प्राप्त होते. पाचव्यास इच्छा होते आणि भयंकर प्रयत्नाने सुद्धा प्राप्त होत नाही. ह्या मजूरांना भयंकर मेहनत करावी लागते आणि वर शिव्या खाव्या लागतात तरी सुद्धा पैसा मिळत नाही. पैसा मिळाला तरी सुद्धा घरी जाऊन पोटभर खावयास मिळेल ह्याचा पत्ता नसतो. सर्वापेक्षा जास्त प्रयत्न करतो तरी सुद्धा मिळत नाही. कित्येक सांगतात की न समजता जरी पाप झाले तरी त्याचे फळ काहीसुद्धा नसते असे कसे? त्याचे फळ का मिळणार नाही? अरे अजाणपणे (नकळत) अग्निमधे हात घाल म्हणजे समजेल की फळ मिळेल किंवा मिळणार नाही? जाणून बुजुन केलेले पाप आणि अजाणपणे केलेले पाप ही दोन्ही सारखी आहेत. परंतु अजाणपणे केलेल्या पापाचे फळ अजाणपणे आणि समजून केलेल्या पापाचे फळ समजून भोगावे लागते इतकाच फरक. उदाहरणार्थ :- दोन भाऊ आहेत. एक सोळा वर्षाचा आणि दुसरा दोन वर्षाचा. त्यांची आई देवाघरी गेली. त्या पापाचे फळ दोघानाही भोगावे लागते. परंतु मोठ्याला अजाणपणे भोगावे लागते.

पुण्यसुद्धा न कळत होते. उदाहरणार्थ :- तुम्ही रेशनच्या दुकानांत चार तास रांगेत उभे राहुन साखर घरी घेऊन जाता. तेव्हां जर त्या पिशवीला भोक असले तर त्यातून साखर सांडत जाते. त्यामुळे मुंग्याना साखर खावयास मिळते. ती साखर न कळत सांडणे हे न कळत केलेले पुण्य आणि त्याचे फळ न कळत भोगावे लागते.

पुण्य आणि पाप, पाप आणि पुण्य ह्यांचा संबंध जोडल्या मुळेच मनुष्य भटकत असतो. केव्हांही त्याच्यापासून मुक्ति मिळणार नाही. पुष्कळ पुण्य केल्यास फार तर देवगति मिळेल परंतु मोक्ष तर मिळतच नाही. मोक्ष तर ज्ञानी पुरुष भेटला आणि त्याने तुमच्या अनंत जन्माची पापे जाळून भस्मीभूत केली आणि तुमच्या हातात शुद्ध आत्मा दिला तरच मोक्ष मिळतो. तेथपर्यंत तर ८४ लाख योनिमध्ये भटकंती करावी लागते.

आत्म्यावर असे आवरण आहे की एका माणसास अंधार कोठडी मध्ये कोंडून ठेवून त्यास फक्त दोन वेळा खाण्यास दिले आणि ज्या दुःखाचा अनुभव येईल त्या अपार दुःखांचा अनुभव ह्या झाडपान वगैरे पासून पाच इंद्रियापर्यंतच्या जीवास अनुभव

येईल. ह्या पाच इंद्रियवाल्या मनुष्याना इतके दुःख आहे, तर ज्याना कमी इंद्रिये असतात त्याना किती दुःख असेल? पाचा पेक्षा सहावे इंद्रिय असणारा कोणीही नाही. ही झाडपाने आणि जनावरे ही तिर्यंच गति. ती त्याना सक्त मजुरीची शिक्षा आहे. मनुष्यगति ही साधी कैद. ह्या नर्कगति मध्ये तर भयंकर दुःख असते. त्याचे जसेच्या तसेच मी जर वर्णन केले तर ऐकणारा मनुष्य ताबडतोब मरून जाईल. भात उकळला आणि उसळू लागला त्यापेक्षा लाखपट दुःख होते. एका अवतारात पाच पाच वेळा मरणाच्या वेदना भोगतो तरी सुद्धा मरण येत नाही. तेथे देह पाऱ्यासारखा असतो, कारण त्याला वेदना सहन करावयाच्या असतात. म्हणून मरण येत नाही. त्यांच्या शरीराचे भाग आणि भाग तुटले जातात आणि जोडले जातात. वेदना भोगल्या शिवाय सुटकाच नसते. नर्कगती म्हणजे जन्म ठेपेची शिक्षा असते.

देव लोकांना नजरकैद असते परंतु त्याना मोक्ष असत नाही. तुम्ही लग्न समारंभास गेला असताना सर्व विसरता. संपूर्ण मोहांत तन्मयकार होऊन जाता, आईस्क्रीम खाताना तर जीभ खाण्यामध्ये असते. बँड वाजतो तो कानाला प्रिय असतो. डोळे वरराजाच्या आकर्षणात असतात. घ्राणेंद्रिय, अगरबत्ती आणि अत्तराच्या वासामध्ये रमून जाते त्यावेळेस पाची इंद्रिय कामात अडकून पडलेली असतात मन भानगडीमध्ये असते. हे सर्व असताना आत्म्याचे विस्मरण होते तसे देवलोकांत नेहमी असते. हल्लीच्या पेक्षां अधिकपटीने विशेष सुख असते. म्हणून तो भानावरच नसतो. त्यांना आत्मा लक्षात येत नाही. परंतु देवगतिमध्ये आंतल्याआत जळफळणे आणि बेचैन स्थिती आणि ईर्षा असते. देवलोकपण नंतर फक्त सुखास कंटाळून जातात. त्याचे कारण काय? लग्नामध्ये चार दिवस लाडवाचेच जेवण रोज मिळाले की पाचव्या दिवशी खिचडीची आठवण येते तसे आहे ! तर ते लोक सुद्धा अशी इच्छा करतात की केव्हां मनुष्य देह मिळेल आणि भरतक्षेत्रांत संस्कारी कुंटुंबात जन्म होईल आणि ज्ञानी पुरुषाची भेट होईल? ज्ञानी पुरुषाची भेट झाली तरच निकाल लागेल नाही तर चतुर्गतिची भटकंती नक्कीच.

संकल्प विकल्प म्हणजे काय? विकल्प म्हणजे 'मी' आणि संकल्प म्हणजे 'माझे'. ''मी चंदुलाल'' हा विकल्प मोठ्यातला मोठा विकल्प ''ही माझी बायको, हा माझा मुलगा, हा माझा बंगला, ही माझी मोटार'' वगैरे हे सर्व संकल्प.

## ( ३८ )
## सर्जन आणि विसर्जन

स्वतः ब्रह्म आणि रात्री अंगावर चादर ओढून झोपून गेला, आणि निरनिराळ्या तऱ्हेची योजना करतो त्यावेळी ब्रह्मा होऊन सर्जन करतो. निसर्गाच्या हातात विसर्जन, त्याच्या हातात नसते. जेव्हां विसर्जन होत असते तेव्हां तो भ्रांतित असतो आणि आकुळ-व्याकुळ होतो. योजना तयार केली, विचार आला आणि त्यांत तन्मयाकार झाला म्हणजे ते सर्जन आणि प्रत्यक्षांत आले म्हणजे विसर्जन. विसर्जनास कोणाचा बाप सुद्धा बदल करू शकणार नाही. जर विसर्जन स्वतःच्या हातांत असते तर जे आवडणार नाही, ते होऊ देणारच नाही. आवडतेच प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करील. परंतु विसर्जन परसत्तेच्या हातात आहे म्हणूनच व्यवस्थितच्या हातात आहे. तिकडे कोणाचेच चालणार नाही. म्हणून सर्जन करण्याचे काम विचार करून कर. एकदा ब्रह्मा होऊन बसलास मग कधीही ब्रह्मपद मिळणार नाही. जर ज्ञानी पुरुषास भेटलास तर ज्ञानी पुरुष जगत निष्ठेचा लय करून ब्रह्मनिष्ठेत ठेवील. ज्ञानी पुरुष ब्रह्मनिष्ठा उत्पन्न करील आणि सतत तो ब्रह्मपदातच राहील म्हणजे हे नवीन सर्जन थांबेल आणि जे शरीर वगैरे काही घेऊन आलास त्याचे विसर्जन होईल.

मनुष्याचा अवतार सर्जनात्मक आहे. दर एक गतिचे सर्जन ह्या शरीरांतून होते आणि मोक्ष सुद्धा येथूनच प्राप्त होऊ शकेल.

## ( ३९ )
## पुरुष आणि प्रकृति

सर्व जग निसर्गाला समजण्यात फसले आहे. अनादि काळापासून पुरुष प्रकृतिच्या पाठीमागे लागला आहे. परंतु प्रकृति हातांत येण्यासारखी नाही. क्रमिक मार्गामध्ये सबंध प्रकृति ओळखली जाते. तेव्हाच पुरुषाची ओळख पडते. ती पुष्कळ अवतारात सुद्धा ओळखली जाईल असे नाही. परंतु अक्रम मार्गामध्ये ज्ञानी पुरुषाने जर डोक्यावर हात ठेवला तरच स्वतः पुरुष होऊन सर्व प्रकृति समजते आणि दोघेही नेहमी स्वतंत्र राहतात. प्रकृतिच्या भूलभूलाव्यात फसून गेले आहेत. आणि ते तरी काय करणार? प्रकृतिनेच प्रकृतिला ओळखावयास जातात ना? ते केव्हां कळणार? पुरुष होऊन प्रकृतिला ओळखावयाची असते ना? तरच प्रकृतिचा प्रत्येक परमाणु ओळखला जातो. प्रकृती म्हणजे काय? प्रकृति म्हणजे विशेष आणि कृती म्हणजे केलेले. स्वाभाविक केलेली वस्तु नाही. परंतु विभावात जाऊन विशेष केलेली वस्तु ती प्रकृति.

प्रकृति ही तर स्त्री आहे. स्त्रीचे स्वरूप आहे आणि स्वत: पुरुष (self) आहे. श्रीकृष्ण भगवंतानी अर्जुनास सांगितले की, ''तू त्रिगुणात्मकापासून वेगळा हो''. हे त्रिगुण, ह्या प्रकृतिच्या तीन गुणापासून तू मुक्त पुरुष हो. कारण प्रकृतिच्या गुणामध्ये राहिलास तर तू स्त्री आहेस आणि पुरुषाच्या गुणात राहिलास तर तू पुरुष आहेस.

प्रकृति ही भोवऱ्यासारखी आहे. भोवरा म्हणजे काय? त्याला दोरी गुंडाळली म्हणजे सर्जन आणि दोरी सुटते तेव्हां तो फिरतो, ती प्रकृति दोरी गुंडाळली जाते तेव्हां कौशल्यानेच गुंडाळली जाते आणि सुटते तेव्हा कौशल्याने सुटते. लहान मुल खाते ते तोडांत टाकण्या ऐवजी कानांत टाकेल काय? सर्पीण मरून गेली असेल आणि तिची अंडी फुटली असतील आणि पिल्ले बाहेर पडली असतील तर ती पिल्ले सुद्धा ताबडतोब फणा मारण्यास तयार होतात. ह्याच्यामागे काय असते? हा तर प्रकृतिचा नियम आहे. प्रकृतिचे कौशल्य हा अजबपणा आहे. प्रकृति पुढे मागे कोठपर्यंत जाते? तिची सुरवाती पासून जास्तीत जास्त पुढे मागे होण्याची मर्यादा आहे. भोवरा फिरला तो सुद्धा त्याच्या प्रमाणात फिरतो. उदाहरणार्थ विचार इतक्याच प्रमाणांत येतात. मोह होतो तो सुद्धा इतक्याच मर्यादेमध्ये होतो. प्रत्येक प्राण्यास बेंबी हींच मध्य आहे. आणि तेथे आत्मा आटोक्यात नाही. शुद्ध ज्ञान प्रकाश तेथे राहिलेला आहे. जर प्रकृति मर्यादेपेक्षा बाहेर गेली तरी सुद्धा तो प्रकाश आवरला जाईल आणि दगड होऊन जाईल म्हणजेच जड होऊन जाईल पण तसे होतच नाही, मर्यादेत रहाते. हा मोह होत असतो, तर त्याचे आवरण येते. कितीही मोह शेवटच्या कळसास पोहोचला असेल पण जेथे त्याची मर्यादा आली की परत तो उतरतो. हे सर्व नियमानुसारच होते. नियमाच्या बाहेर होत नाही.

## ( ४० )
## त्रिगुणात्मक प्रकृति

सत्व, रज, आणि तम हे तीन गुण आहेत आणि त्यांच्या अनुक्रमे ब्रह्मा, विष्णु आणि महेश ह्या मुख्य देवता आहेत. तम गुणी महादेव भक्ति करतात. सत्त्व गुणी ब्रह्माची भक्ति करतात आणि रजो गुणी विष्णुस भजतात. ज्या गुणास भजतात ते गुण त्यांना प्राप्त होतात. भारतात रजोगुणप्रधान लोको जास्त आहेत. परंतु जग तमोगुणात पडलेले आहे. ह्या तीन गुणांच्या तीन देवता आहेत. त्या जन्मल्या नाहीत. दृष्टांत म्हणून दिला आहे. वेद पण असे सांगतो कीं, ह्या तीन गुणातून मुक्त होऊन तू पुरुष हो.

ही प्रकृति नाचावयास लावते. तेव्हां अक्करमी म्हणतो 'मी नाचतो'. अरे भोवरा फिरतो त्यांमध्ये त्याचा काय पुरुषार्थ? लाख रुपये कमावले तेव्हां सांगतो मी कमावले,

आणि जेव्हां नुकशान होते तेव्हां तू म्हणतोस की, नुकशान का केलेस? तो मनुष्य परमेश्वरावर आरोप करतो. परमेश्वराने नुकसान केले असे म्हणतो. त्या परमेश्वरास बिचाऱ्याला बाप नाही व कोणी त्याची बाजू घेणारा नाही. तेव्हा हे लोक परमेश्वरावर खोटे आरोप करतात.

हे तर प्रकृति बळजबरीने करावयास लावते आणि सांगतो मी करतो. दान करणे, जप, तप, धर्मध्यान, दया, अहिंसा, सत्य हे सर्वच प्राकृत गुण आहेत. चांगल्या सवयी आणि वाईट सवयी हे सुद्धा प्राकृत गुण आहेत. प्राकृत कितीही सुन्दर असले, परंतु ते बुरखा काढून केव्हां फजिती करेल ते सांगता येणार नाही. एक राजा दानशूर आणि धर्मनिष्ठ असेल परंतु जंगलात जर वाट चुकला असेल आणि त्याला चार दिवस खावयास मिळाले नाही तर जंगलामध्ये भिल्लाकडे भीक मागून खाण्यास त्याला लाज वाटेल काय? त्यावेळेस त्याचा दानशूरपणा कोठे गेला? तेथे त्याचे राजेपण कोठे गेले? अरे आतून प्रकृति ओरडत असते. जेव्हा तो प्रकृतिच्या सपाट्यामध्ये येतो तेव्हा राजेपण भिकारी बनते. तर मग दुसऱ्याची ताकदच काय? ही तर प्रकृति दान द्यावयास लावते आणि भीक मागावयास लावते. त्या मध्ये तुझे काय? एक चोर बीस रुपयाची चोरी करतो आणि हॉटेलमध्ये नास्तापाणी करतो, मजा लुटतो आणि जाता जाता वेटरला दहा रुपयाची नोट देतो हे काय? ही तर प्रकृतिची माया आहे. समजण्यासारखे नाही.

कोणी म्हणेल मी आज चार सामायिक केले आणि प्रतिक्रमण केले आणि दोन तास शास्त्रे वाचली. अरे ते सुद्धा प्रकृती करावयास लावते. आणि तू म्हणतोस 'मी केले'. जर तूच सामायिकचा करणारा असशील तर दुसऱ्या दिवशी सुद्धा कर ना. तेव्हा दुसऱ्या दिवशी सांगतोस की आज तर माझेकडून होण्यासारखे नाही. आज पोटात दुखत आहे. आणि डोके जड झाले आहे, म्हणून आज होऊ शकत नाही. असे सांगतोस. आज माझ्याने शक्य होणार नाही आणि काल केले असे म्हणतोत. हा केवढा मोठा विरोधाभास आहे. जर करणारा तूच असतास तर कधीही होणार नाही असे बोलता येणारच नाही, होत नाही ह्याचा अर्थच हा कीं तू करणारा नाही. सर्व जग असे उलट समजल्यामुळे भटकत आहे. त्याग करीत आहे. ती सुद्धा प्रकृति करून घेते. आणि ग्रहण करतो हे सुद्धा प्रकृति करून घेते. प्रकृति जबरदस्तीने पाळावयास लावते उलट म्हणतोस कीं मी ब्रह्मचर्य पाळत आहे. हा केवढा मोठा विरोधाभास!

प्रीती, द्वेष, दया, निर्दयपणा, लोभ, उदारपणा, खरे, खोटे हे सर्व द्वंद्व आहेत. ते प्रकृतिचे गुण आहेत आणि स्वतः द्वंद्वाच्या पलीकडे आहे.

## ( ४१ )
## आत्मा सगुण आणि निर्गुण आहे

कित्येक लोक परमेश्वरास निर्गुण म्हणतात. अरे परमेश्वरास शिव्या काय कारणास्तव देतोस? ह्या वेड्याला पण निर्गुण म्हणतात. तर वेड्याला निर्गुणी का म्हणतात? त्याचा अर्थ आत्म्याला वेडा म्हटलेले अधिक वाईट पण निर्गुण म्हटलेले फारच वाईट म्हणजे आत्मा जड आहे असा भाव होतो.

आत्म्याचे पण गुण आहेत. तर माझ्याजवळ ये. तुला खरे समजावून सांगतो. ''आत्मा प्रकृतीच्या गुणामुळे निर्गुण आहे आणि स्वत:च्या गुणानी भरपूर आहे.'' आत्म्याचे स्वत:चे गुण तर खूपच आहेत. अनंत ज्ञानयुक्त ज्ञानी, अनंत दर्शनयुक्त, अनंत शक्तियुक्त, अनंत सुखाचे घर परमानंदी आहे. त्याला निर्गुण कशा तऱ्हेने म्हणता येईल? ह्याला जर निर्गुण म्हणालास तर कधीही आत्मा प्राप्त होणार नाही. कारण आत्मा त्याच्या गुणापासून काही निराळा नाही. वस्तुमध्ये वस्तुचे गुणधर्म राहिले आहेत. त्या वस्तुला ओळखण्या करीता त्याचे गुणधर्म जाणले (समजले) तर वस्तु ओळखली जाते. उदाहरणार्थ:- सर्व धातुमध्ये सोन्यास ओळखावयाचे असेल तर त्याचे गुणधर्म माहित असतील तर ते ओळखू शकता येईल आणि सोने हे त्याच्या गुणधर्मापासून काही निराळे नसते. फुल आणि सुगंध दोन्ही निराळी असत नाहीत. वासावरून फुलाची माहिती कळते. त्याप्रमाणे आत्म्यास आत्म्याच्या गुणधर्मामुळेच ओळखले जाते. ''आणि हाच आत्मधर्म ओळखावयाचा आहे.'' आत्मधर्म जाणावयाचा आहे. प्रकृतीचे गुणधर्म तर अनंत अवतार घेऊन, जाणण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा पत्ता लागत नाही. हे तर सापेक्ष (relative) धर्म आहेत. लौकिक धर्म आहेत. सर्व प्रकृतीचे धर्म आहेत. शरीराचे धर्म आहेत. अलौकिक धर्म तोच आत्मधर्म आहे, म्हणजे खरा (real) धर्म आहे.

ह्या शरीरास आंघोळ घालतात. खावयास घालतात, उपवास करावयास लावतात. हे सर्व प्राकृतधर्म आहेत. प्राकृतधर्माचा पत्ता, ठिकाणा असत नाही. कारण तो स्वत:च्या सत्तेच्या बाहेरचा धर्म आहे. हे तर जुलाबाच्या औषधशिवाय शौचास होते आणि जुलाब बंद होण्याकरिता औषध घेतले नाही तरी सुद्धा बंद होते तसे प्रकृतीचे काम आहे.

## ( ४२ )
## प्राकृत पूजा - पुरुष पूजा

ही सर्व भक्ति चालू आहे ती प्रकृतिच्या गुणांची चालली आहे. प्रकृतिचे गुण म्हणजे ज्याचे कायमचे अस्तित्व नाही असे काल्पनिक गुण प्रकृतिचे गुण हे वात, पित्त

आणि कफ यांचे स्वाधीन आहेत. स्वतःचे (आत्म्याचे) गुण स्वावलंबी आहेत. प्रकृतिचे परावलंबी आहेत. हे तर जेव्हा वात होतो तेव्हा लक्षात येते. जगात सर्वच ठिकाणी प्रकृतिची पूजा चालू आहे. पुरुषांची कोठेही दिसत नाही. प्रकृतिच्या पूजेचे फळ संसार आहे. आणि पुरुषाच्या पूजेचे फळ मोक्ष आहे.

आपण स्वतः पुरुष म्हणून शुद्धात्मा. म्हणून स्ववश आहोत आणि प्रकृतिमुळे परवश आहोत. प्रकृती आणि जगाच्या नियमाच्या हिशोबाने हे सर्व चालले आहे. ह्यामध्ये परमेश्वर हात घालतच नाही. प्रकृतिच्या बरोबर पुरुष होऊन मग काहीच घेणे, देणे रहातच नाही जे झाले ती प्रकृति. तिच्यावर प्रेम आणि द्वेष करीत नाही तो शुद्धात्मा. मारामारी करताना सुद्धा राग आणि द्वेष होत नाही असे आमचे अजब तऱ्हेचे ज्ञान आहे.

## ( ४३ )
## प्रकृति धर्म- पुरुष धर्म

जितके विकल्प झाले ते सर्वच प्रकृतीत येतात. विकल्प झाले नाहीत ते प्रकृतिमध्ये येत नाहीत.

हा वाणीया आहे, हा पटेल आहे, हा मुसलमान आहे. प्रकृतिच्या गुणामुळे आपण त्याना ओळखू शकतो. वाण्याची प्रकृ ति विचारशील आणि समंजस पणाची असते. पटेल म्हटला तर क्षत्रियाचा छाप असलाच पाहिजे. त्याचा स्वभाव समोरच्याचे मुंडके पण कापून आणेल आणि जर प्रसंग आला तर स्वतःचे मुंडके कापून देईल अशी असते. मुसलमान लोकांचा स्वभाव तर मारामारी करणारा असतो. खरे पाहिले तर प्रत्येक माणसाचा स्वभाव वेगवेगळा असतो त्याचा अंत लागणे शक्य नाही.

मन, वचन आणि काया हे प्रकृतिचे तीन भाग आहेत. तीनही भाग असरकारक (effective) आहेत. परिणामामध्ये (effect) भ्रांतिपासून परत कारणे (causes) निर्माण होतात आणि त्यामधून कारण प्रकृती निर्माण होते. आणि त्याचे परिणाम (effect) ती कार्यप्रकृति.

जोपर्यंत संशय जाणार नाही तोपर्यंत प्राकृत धर्म आहे. संशय जाईल, आत्म्यासाठी संपूर्ण निःशंक होईल तेव्हांच पुरुष होईल. आणि त्यानंतरच कारण प्रकृतिची निर्मिति थांबते.

## ( ४४ )
## प्राकृत बगीचा

जे जे (effect) परिणाम आहेत, कार्य प्रकृती आहे ती कधीसुद्धा बदलत नाही. प्रत्येक मुलाचा बाप आपला मुलगा आपल्या सारखा व्हावा अशी इच्छा करतो. अरे, घराचा बगीचा तयार करावयाची आहे की शेत? प्रत्येकाची प्रकृति निरनिराळी, प्रत्येकास फुले निरनिराळी येतात. मोगऱ्याच्या झाडास गुलाबाचे फूल येऊ शकणार काय? जर नुसतीच गुलाबाची झाडे असती तर त्यास बगीचा म्हटला असता का? नाही. गुलाबाचे शेत म्हटले असते. जसे बाजरीचे शेत तसे गुलाबाचे शेत. ह्याच्यात जर मोगरा, चाफा जुई असली तर त्यास बगीचा म्हणता येईल. प्रकृति हा असाच बगीचा आहे.

लोकाना गुलाब आवडतो परंतु त्याना काटे आवडत नांहीत. तर काट्या शिवाय गुलाब कसा असणार?

ही लिंबोळी पेरली ती कशाने वाढवतात? तिचे पोषण पृथ्वी, पाणी, वारा, प्रकाश आणि आकाश ह्या तत्त्वांपासून होते. ह्या तत्त्वांमध्ये स्वाद आहे का? नाही, मग आंबटपणा कोठून आला? आणि शेजारी कडुलिंब लावले तर त्याच्या दर एक पानात आणि प्रत्येक फांदित कडुपणा कसा उत्पन्न झाला? पोषण तर पाच तत्त्वांनेच झाले. पाणी कडु होते का? नाही. तर मग ते कशामुळे झाले? हे तर बीमध्येच आंबटपणा आणि कडूपणा होता म्हणून तसे फळ आले. ह्या वडाचे बी राई पेक्षा सुद्धा लहान असते आणि वड केवढा मोठा असतो? तर वडाच्या बीमध्येच संबंध वडाच्या डहाळ्या, पाने फांदीसकट सूक्ष्म रीतीने असते. शक्ति रूपाने असते. ते 'व्यवस्थित'नें अनुकुलता केल्यावर एकत्र येते आणि वडाच्या रुपाने तो त्याच्या प्राकृत स्वभावानीच मोठा होतो. असे अजब रीतीचे प्रकृतिचे ज्ञान आहे. नदीच्या दुसऱ्या टोकावर जाता येते. परंतु प्रकृतिच्या पलिकडे जाणे अशक्य आहे.

## ( ४५ )
## वैराग्याचे प्रकार

तीन प्रकारचे वैराग्यः- (१) दुःख गर्भित वैराग्यः- कोणी दुःखाचे भाराने संसार सोडून पळून जातो तो बायका मुलांचे हाल करतो. संसारामध्ये कशास काही पत्ता लागत नाही. तर विचार करतो की चला, वैराग्य घेतले तर दोन वेळा जेवावयास तर मिळेल ना? फक्त अनवाणी चालावयास लागेल आणि भिक्षा मागण्याचेच फक्त दुःख. ते तर देखा जायेगा. तो त्याप्रमाणे वैराग्य धारण करतो. तर त्याचा परिणाम काय होतो?

चौर्याशी लाख अवतार भटक भटक करावी लागते.

(२) मोह गर्भित वैराग्य:- शिष्य मिळतील, मान मिळेल, कीर्ती मिळेल, वाहवा करतील, लोक पूजा करतील ह्या लालचेने वैराग्य घेतो. त्याचे सुद्धा फळ संसारात भटकंतीच आहे.

(३) ज्ञान गर्भित वैराग्य:- यथार्थ वैराग्य हेच आहे. ज्ञान मिळविण्याकरिता जे वैराग्य घेतो ते. ज्ञानाकरिता एखादाच वैराग्य घेतो. परंतु ज्ञान मिळविण फार कठिण आहे. ज्ञान तर ज्ञानी माणसाकडून मिळते आणि त्यानंतरच ज्ञान प्रकाशित होऊन योग्य वैराग्य उत्पन्न व्हावयास लागते.

आत्म्याचे उपयोग चार प्रकारचे:- (१) अशुद्ध उपयोग :- एखादा मनुष्य कारण नसताना हरणाची शिकार करतो आणि फक्त शिकार करण्याचा आनंद मिळविण्याकरिता आणि परत गर्व करतो, मी कसे मारले! हेतुशिवाय फक्त मौज मिळविण्याकरिता मारतो तो आत्म्याचा अशुद्ध उपयोग. कोणाचे घर जाळून गर्व करतो. खोटे कृत्य करून हसतो. समोरच्या माणसाचे नुकसान करून परत मिशीवर हात देऊन मिशी वर करतो. हे सर्व तिसऱ्या वर्गाचे उतारू, त्यांचे फळ नर्कगति.

(२) अशुभ उपयोग:- घरचे लोक म्हणतात कीं आज तर नाईलाजाने हरणाचे मास खाणें भाग पडले आहे. कारण बायका, मुले उपाशी आहेत. म्हणून हरण मारून आणले आहे. परंतु आतल्याआत त्यास खूपच दु:ख होते. पश्चाताप होती कीं मी केले ते खोटे केले. तो आत्म्याचा अशुभ उपयोग. अशुद्ध आणि अशुभ उपयोगामध्ये क्रिया एकसारखीच असून सुद्धा एकाला केलेल्या क्रियेचा गर्व असतो, मौज मारतो आणि दुसरा पश्चातापाचे अश्रू गाळतो. तितकाच फरक. हे सर्व अशुभ उपयोग करणारे जीव दुसऱ्या वर्गाचे म्हणजे ह्या सर्वांची तीर्यंच गति होते.

(३) शुभ उपयोग :- शुभ उपयोगामध्ये घरांतील माणसे उपाशी असतील तरी सुद्धा तो असेच म्हणेल कीं कोणाला मारून माझी भूक शांत करावयाची नाही. तो आत्म्याचा शुभ उपयोग. दुसऱ्यांसाठी चांगली इच्छा ठेवतो, लोकांचे भले करतो, उपकृत (oblige) करतो, मनाने नीतिनियमांनी चालतो तो शुभ उपयोग. केवळ शुभ उपयोग क्वचितच बघावयास मिळतो. बहुतेक लोकांच्या हातातून आत्म्याचा शुभ, अशुभ उपयोगच होतो. शुभ उपयोग म्हणजे पहिल्या वर्गाचे प्रवासी. त्याचे फळ मनुष्यगति. जेव्हा एकट्या शुभ उपयोगामध्येच जो रहातो तो देवगतिला जातो.

(४) शुद्ध उपयोग:- शुद्ध उपयोग कोणास म्हणतात? शुद्ध उपयोगी शुद्धच बघतो. आतील मालासच बघतो. आवरणाला (packing) नाही. तात्त्विक दृष्टीने

बघितले तर तो शुद्ध उपयोग. शुद्ध उपयोग आत्मा प्राप्त केल्यानंतर सुरु होतो. उपयोग संपूर्ण शुद्ध होतो. तेव्हा केवळज्ञान होते. शुद्ध उपयोगाचे फळ मोक्ष. आम्ही संपूर्ण शुद्ध उपयोगी आहोत. एका महाराजाने मला विचारले कीं, तुम्ही ह्या मोटारीतून फिरता तर इतके जीव त्याच्या खाली चिरडून जातात त्याचा तुम्हास दोष लागत नाही का? मी त्यांना सांगितले, ''महाराज तुमची शास्त्रे काय म्हणतात?''

''शुद्ध उपयोग असणाऱ्या मनुष्याला समता प्राप्त होते आणि केवळज्ञानामध्ये लीन होतो''.

आम्ही शुद्ध उपयोगी आहोत. शुद्ध उपयोगीना हिंसा असते का? महाराज म्हणले, नाही. आम्हास दोष लागत नाही. तुम्हास लागतो. कारण कीं, ''मी महाराज आहे''. हा पाय माझा आहे आणि हे जीव माझ्याने मारले जातात, अशा प्रकारचे ज्ञान, भान, तुम्हास सतत होत असते. अरे झोपेत सुद्धा होते म्हणून तुम्हास दोष लागतो. परंतु आम्ही नेहमी शुद्ध उपयोगात रहातो. हे शरीर माझे आहे असे आम्हास एक क्षण सुद्धा वाटत नाही, अशा प्रकारच्या मालकी हक्काची भावनाच आमची उडून गेली आहे म्हणून आम्हास दोष लागत नाही.

समजा तुमचा एक प्लॉट आहे. तो तुम्ही आठ दिवसापूर्वी एका रमेश नावाच्या माणासाला विकला असेल आणि दस्तावेज पण केला असेल. एक दिवस पोलीस तुमच्या घरी हातकडी घेऊन आला आणि सांगू लागला ''चला चंदुभाई ! तुम्हाला पोलीस स्टेशनवर यावे लागेल''. तर तुम्ही विचाराल, ''काय भाऊ, मी काय गुन्हा केला आहे?'' तेव्हां पोलीस सांगतो, ''तुमच्या जमिनीत दहा लाखाच छुपे सोने आतमध्यें लपवून ठेवलेले सापडले आहे. हा तुमचा अपराध आहे''. त्या संबंधी तुम्ही सावकाश रमेशला जमिनीचा खरेदी केलेल्याचा दस्तावेज पोलिसास दाखवाल. पोलीस नंतर समजून जाईल आणि तुमची माफी मागून निघून जाईल व रमेशच्या घराचा रस्ता पकडेल.

तसे आमचे आहे. ह्या शरीराचे पण आम्ही मालक नाहीत. आम्ही सर्व जगाचे स्वामी आहोत. परंतु मालकीभाव एकाहि जगामध्ये नाही. सर्व ब्रह्मांड हादरून टाकू अशी शक्ति ''आमच्या'' मध्ये आहे. परंतु ह्या अंबालाल मुळजीभाई पटेलमध्ये भाजलेला पापड मोडण्याची सुद्धा ताकद नाही.

## ( ४६ )
## मनुष्यपणाचा विकास

ह्या जगामध्ये मनुष्यांचे चौदा लाख प्रकार (अशाप्रकारचे लोक आहेत) आहेत. त्याच्यातील वरचे पन्नास हजार थरच (तितक्या प्रकारचे लोक) ही गोष्ट ऐकण्याचे लायक आहेत. मनुष्य गतिमध्ये असून सर्वाचा विकास सारखा नसतो. प्रत्येकाचा दर्जा (standard) निरनिराळा असतो. म्हणून त्याच्या विकासाच्या आधारे त्यांचा परमेश्वर असतो. त्या नियमानुसार परमेश्वराची भक्ती त्यांच्यात उत्पन्न होते आणि शास्त्रे सुद्धा त्यांच्या विकासाप्रमाणे असतात. ही सर्व माणसे विकासाच्या आधारानेच आहेत. त्यांचा दर्जा (standard)सुद्धा तसाच आणि त्यांच्या दर्जाप्रमाणे त्यांचा परमेश्वर असतो. हे सर्व दर्जे (standard) लौकीक– सापेक्ष (Relative) धर्माचे आहेत.

## ( ४७ )
## माया आणि मुक्ति

''मायेच्या डोक्यावर शिंगे, लांब नऊ नऊ हात.

पुढे मारते शिंग, आणि मागे मारते लाथ''.

माया काय म्हणते? माझा मान नावाचा मुलगा जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत माझ्या सर्व मुलांना माराल तरीपण ती परत सजीव होतील. क्रोध, मान, माया, लोभ, राग व द्वेष ही माझी सहा मुले आणि मी सातवी अशी आमची कायमची वंशावळी आहे. ती ही माया आणि तिचे सहा मुलगे ह्यानी सर्व जगात भांडण लावून दिले आहे. अरे ॲटमबॉंब जर टाकावयाचा असेल तर, त्याच्यावर टाक ना. भांडण हीच करविते आणि संसारात हीच गुरफटून टाकते. हिच्या सहा मुलांत क्रोध भोळा आहे. ताबडतोब ओकून टाकतो. ह्याला सर्व लोक ओळखतात. मान पण चांगला आहे. परंतु तो क्रोधापेक्षा कमी दर्जाचा आहे. कोणीही म्हणेल कीं अरे, तू काय छाती पुढे काढून फिरतोस? कपट आणि मोह कोणालाही दिसणार नाही. ते मालकाला स्वत:लाच कळत पडत नाहीत आणि शेवटात शेवटी नंबर लोभाचा येतो. कपट, लोभ आणि मोहामुळे तर परमेश्वर सुद्धा कंटाळतो. लवकर मोक्षास जाऊ देत नाही. ही तर ह्या मायेची जबरदस्त वंशावळी आहे! शेवटच्या घटकेपर्यंत मायेला जिंकू शकणार नाही अशी आहे. क्रमिक मार्गांत परमेश्वरपद समोर हार, तुरा घेऊन आले तर माया आड येऊन ईश्वर पद घेऊ देत नाही. हे तर ज्ञानीपुरुष मिळाला तरच ह्याचा उलगडा होतो आणि मायेची वंशावळी मुळासकट निर्मूलन होते. आम्ही दुसरे काहीच करित नाही मान, अहंकार

नावाचा जो ह्याचा मोठ्यातला मोठा मुलगा, त्यालाच मुळापासून उकरून टाकतो, मारुन टाकतो. म्हणून दुसरी पांच मुले आणि माया नावाची म्हातारी हे सगळेच मरून जातात. अशा तऱ्हेनी सुटका होते आणि मुक्त होतो. आम्ही ज्ञान देतो म्हणून तुम्हास सर्व मायेपासून मुक्ती मिळवून देतो.

जगामध्ये तीन प्रकारचे सुख आहे.

१) इंद्रिय सुख

२) निरिंद्रिय सुख

३) अतींद्रिय सुख

ह्या पांच इंद्रियापासून जे पांच विषय भोगवले जातात. ते इंद्रिय सुख. इंद्रिय सुखाची डहाळी मोडुन टाकली आणि अतींद्रिय सुख हातात आले नाही तर तो मध्येच लटकला. निरिंद्रिय सुख म्हणजे गद्धेपंचविशी. आणि अतींद्रिय सुख हे फक्त स्वत:चे आत्म्याचे अनंत सुख ते तर आत्म्यास ओळखल्याशिवाय निर्माण होणारच नाही.

रात्रीची कडकडीत थंडी होती. एका गावात धर्मशाळेमध्ये एक इंद्रिय सुख भोगणारा, दुसरा निरिंद्रिय सुख भोगवणारा आणि तिसरा अतींद्रिय सुख भोगवणारा असे तिघेजण रात्री वस्तीकरता आले. त्या रात्री बर्फ पडला. तिघांच्याकडे पांघरण्यास किंवा अंथरण्यास काहीच नव्हते. त्या तिघांची रात्र कशी गेली माहित आहे का? इंद्रिय सुखवाला पाच पाच मिनीटानी मोठमोठ्यानी बोलत होता ''अरे बाप रे ! मेलो रे मेलो, ह्या थंडीत तर मी मेलो''. दुसऱ्या दिवशी सकाळी तो खरोखरच मरून गेला.

निरिंद्रिय सुखवाला थोड थोड्या वेळने बोलत होता, ''अबे साली थंडी बहुत है, मगर ये मुझे कहां लगती है? ये तो शरीर को लगती है''. अशा तऱ्हेने अहंकार करून सर्व रात्र काढली आणि सकाळी बघितले तर सर्व शरीर थंड पडले होते. परंतु त्याचा श्वास हळू हळू चालू होता.

अतिंद्रिय सुखवाला? हा तर बर्फ बाहेर पडू लागला कीं तो स्वत:च्या ज्ञानाने गुफेमध्ये जाऊन बसतो. संपूर्ण देहापासून सर्व रात्र सुटाच राहिला! स्वत:च्या अनंत सुखाच्या घरामध्ये राहिला व सकाळी उठून चालू लागला.

निरिंद्रिय सुखवाला अहंकाराच्या मस्तीमध्ये रहात असतो. लोक बाबा, बाबा असे करू लागले आणि तो गाढव मस्तच रहातो.

## ( ४८ )
## मळ-विक्षेप-अज्ञान : राग-द्वेष-अज्ञान

वेदांतामध्ये सांगितले आहे की, ''मळ, विक्षेप आणि अज्ञान गेले तर मोक्ष मिळतो''. आणि जैन ग्रंथात सांगितले आहे कीं, ''राग, द्वेष आणि अज्ञान गेले तर मोक्ष मिळतो.''

देहामधील मळ तर जुलाबाच्या गोळ्यानी सुद्धा जातो. परंतु मनाचा मळ जात नाही आणि चित्ताचा मळ तर कशानेही जात नाही. जो पर्यंत अज्ञान आहे ता`पर्यंत सर्व विक्षेप रहातात. थोडीशी शांती मिळावी म्हणून हे लोक मळ, विक्षेप काढ-काढ करीतच असतात. ज्ञान मिळाल्यावर मग काय राहिले ! मळ, विक्षेप तो तर सत्संगामध्ये आल्यामुळे ताबडतोब निघून जातो.

हा जीव कशानी बांधला आहे? अज्ञानाने, तो कशानी सुटेल? ज्यांनी बांधलेला आहे त्याच्या प्रतिपक्षाने म्हणजे ज्ञानाने.

''मी चंदुलाल'' हिच आरोपित जागेवर आसक्ति आहे आणि दुसऱ्या जागी द्वेष आहे, म्हणजे स्वरूपामध्ये द्वेष आहे. एका बाजूस आसक्ति असेल तर त्याच्या दुसऱ्या बाजूस द्वेष असतोच. आम्ही स्वरूपाचे भान करवितो, शुद्धात्म्यावर लक्ष बसवितो. म्हणजे त्या क्षणास वीत-द्वेषात येतो आणि जसा जसा पुढे प्रगति करतो तसा तसा वीतराग होत जातो. वीतराग म्हणजे मूळ जागेच्या स्वरूपाचे ज्ञान-दर्शन आणि आम्ही तुम्हास पूर्ण केवळज्ञान आणि केवळदर्शन देतो. त्यामुळे तुम्हास संपूर्ण केवळदर्शन उत्पन्न होते आणि काळामुळे डिग्रीचे केवळज्ञान संपूर्ण पचत नाही. अरे आम्हाला सुद्धा चार डिग्रीचे अजीर्ण झाले ना? आम्ही तुम्हास ३६० डिग्रीचे केवळज्ञान देतो. परंतु ते तुम्हास पचणार नाहीं आणि तुम्ही अंश केवळज्ञानी समजले जाता. जितके अंश, आत्मस्वभाव प्रगट होत जातो, तितक्या अंशानी केवळज्ञान प्रगट होत जाते. सर्व अंशानी आत्मस्वभाव प्रगट होतो. तेव्हां सर्व अंशच केवळज्ञान समजले जातात.

भ्रांतिने भ्रांतिला कापावे असे क्रमिक मार्गामध्ये सांगितले आहे. उदाहरणार्थ कपडा जर मळलेला असेल तर त्यास स्वच्छ करण्यासाठी साबण पाहिजे. आता तो साबण स्वत:चा मळ त्या कापड्यावर ठेवून जातो. त्या साबणाचा मळ काढण्याकरिता परत टिनोपॉल साबूचा मळ काढते आणि परत ते स्वत:चा मळ ठेवून जाते. ह्याप्रमाणे शेवटपर्यंत जी जी साधने वापरली जातात ती ती त्यांचा मळ ठेवत जातात. निर्मळ कधीच होत नाही. हे तर निर्मळ अशा ज्ञानी पुरुषाची भेट होईल तेव्हांच स्वच्छ होईल. ज्ञानी पुरुष म्हणजे जे स्वत: संपूर्ण निर्मळ झाले असतील, शुद्ध असतील तेच

तुमच्यामधील एक परमाणूना सुटे करून तुमच्या पापाना भस्मीभूत करून फक्त शुद्ध आत्मा तुमच्या हातात देतील तेव्हां निकाल लागेल. तेव्हांच मोक्ष होईल. नाहीतर अनंत अवतार कपडा धू धू करीत रहाशील आणि जे जे साबण वापरशील त्याचा मळ चिकटत जाईल.

## ( ४९ )
## वाणीचे विज्ञान

सासूबाईने सकाळपासून संध्याकाळपर्यंत जर कचकच केली तर सुनेला त्या गोष्टीपासून त्रास होईल. ती जर चार तासपर्यंत सतत शिव्या देत असली आणि आपण तिला सांगितले की, ''सासूबाई परत त्याच शिव्या तशाच तऱ्हेने द्या''. तर ती पुन्हा तशा शिव्या देईल का? नाहीं का म्हणून? अरे ही तर रेकॉर्ड बोलली. रेकॉर्ड बोलते चंचलमध्ये अक्कल नाही. तर काय चंचल रेकॉर्डला खरोखर सांगणार की ''तुझ्यामध्ये अक्कल नाही'' वाणी रेकॉर्ड स्वरूप आहे, अशी स्पष्टता करणारे आम्हीच आहोत. वाणी ही जड आहे. रेकॉर्डच आहे. ही टेप रेकॉर्ड केल्यानंतर रेकॉर्ड वाजते किंवा नाही? त्याच प्रमाणे ही वाणी पण पूर्वी रेकॉर्ड झालेली आहे आणि तिचा संयोग उत्पन्न झाल्यानंतरच रेकॉर्ड नुसती पिन ठेवल्यावर सुरू होते आणि उनाड मनुष्य सांगतो कीं ''मी बोललो''. तो वकील केस जिंकला की तो सर्वाना सांगतो की मी केस जिंकलो. जेव्हां तू हारतोस तेव्हां तुझी Pleading (बहस) चालविण्याची पद्धत कोठे जाते? तेव्हां तो म्हणाला, कीं मला वादविवाद (Argument) करावयाचा होता परंतु तो करावयाचा राहून गेला. अरे तू बोलत नाहीस, ही तर रेकॉर्ड बोलत आहे. अरे विचार करून बोलावयास गेलास तर एक अक्षर सुद्धा निघणार नाही.

पुष्कळ वेळा असे होते किंवा नाही कीं तुम्ही दृढ निश्चय केला असेल की सासू समोर किंवा नवऱ्या समोर बोलावयाचे नाही, तरी सुद्धा बोलले जाते, किंवा नाही? बोलले जाते. हे काय आहे? आपली तर इच्छा नव्हती, तर मग काय नवऱ्याची इच्छा होती कीं सुनेनीं मला शिवी द्यावी? तर कोण बोलावयास लावते? ही तर रेकॉर्ड बोलते आणि तयार झालेली रेकॉर्ड कोणाचा बाप सुद्धा फिरवू शकत नाही.

पुष्कळ वेळा कोणी मनांत नक्की करून आला असेल कीं, आज तर त्याला मी असे ऐकवीन आणि तसे ऐकवीन आणि तो जेव्हां खरोखरच जवळ येतो आणि त्याच्या समवेत इतर दोन चार जणांना बघतो, तेव्हां एकहि अक्षर बोलल्या शिवाय परत येतो किंवा नाही? खरोखरच बोलावयास जातो परंतु बोबडी वळते, असे होते किंवा नाही? जर तुझ्या सत्तेची वाणी असेल तर तुला पाहिजे तशीच वाणी निघेल. परंतु असे

होते का? कोठून होणार? हे अंबालाल मुळजीभाई, देह धारण करणारे असून आत परमेश्वर संपूर्ण प्रगट झाला आहे तरी सुद्धा त्यांची वाणी रेकॉर्ड स्वरूपाची आहे. आमच्यामध्ये बोलण्याची सत्ताच नाही. आम्ही तर रेकॉर्ड कशी वाजते ती बघतो आणि समजून घेतो. वाणी संपूर्ण जड आहे. परंतु आमची वाणी प्रगट परमात्म्यास स्पर्श करून बाहेर निघते म्हणून चेतन आहे. प्रत्यक्ष सरस्वती आहे. ही फोटोमधील सरस्वती परोक्ष सरस्वती आहे. आमची वाणी ही प्रत्यक्ष सरस्वती आहे. आणि कोणाच्याही अनंत पापाना जाळून भस्मीभूत करते. आमची वाणी संपूर्ण वीतराग आहे. स्याद्वाद आहे. वीतराग मनुष्यास ओळखण्याची साधी रीत, त्याची वाणी आहे. जितकी तुमची ओळखण्याची शक्ति असेल तितकीच त्याची किंमत होईल. परंतु ह्या काळांत ओळखणारा मनुष्य नाही. अरे पांच अब्ज रुपयाच्या हिऱ्याची किंमत पाचशे रुपये करतात तेव्हां हिऱ्यास स्वत: बोलावे लागते कीं माझी किंमत पाच अब्ज आहे. त्याप्रमाणे आम्हास स्वत: बोलण्याची वेळ आली आहे की आम्ही भगवान आहोत. अरे, भगवानच्या सुद्धा वरती आहोत. संपूर्ण वीतराग भगवानने आम्हास वरीष्ठ पद स्वत: दिले आहे. त्यानी सांगितले कीं आम्ही सत्पात्र मनुष्य शोधत होतो. तो सत्पात्रपणा आम्हास तुमच्यामध्ये दिसून आला. आम्ही तर आता संपूर्ण वीतरागी बनून मोक्षामध्ये बसलो आहोत. आता आम्ही कोणाचेही काही करू शकत नाही. म्हणून तुम्ही प्रगट स्वरूपाने सर्व शक्तिमान आहात. म्हणून आम्ही आमचेच वरीष्ठपण देत आहोत आणि तुम्ही जगाचे कल्याण करा. म्हणून आम्ही भगवानांचे सुद्धा वरीष्ठ आहोत. चौदा लोकांच्या नाथांचे ही आम्ही वरिष्ठ आहोत. सर्व सिद्धीसकट आम्हास हा ज्ञानावतार प्रगट झाला आहे. अरे, तुझा दिवा (ज्योत) पेटवून चालू लाग. फार विचार करण्यांत वेळ घालवू नकोस. ज्याला तोलणें व तुलने शिवाय मापणे तुझ्या शक्तिच्या बाहेर आहे. अशा ज्ञानीपुरुषाची तू काय किंमत करणार आहेस? जिकडे तुमची घरीच किंमत होत नाही तिकडे तुम्ही ज्ञानी पुरुषाची किंमत काय ठरविणार? अरे माझे मोज-माप करावयास गेलास तर तुझी मतीच कुंठित होईल. तेव्हां तुझा हा अनेक अवतारांत जमविलेला आडदांडपणा वांद्र्याच्या खाडीत टाकून सरळ विनयाने, ''मी काहीच जाणत नाही'' असे सांगून टाक आणि मला अनंत काळाच्या भटकण्यामधून सोडवा इतकेच सांग. मग आम्ही तुला सर्व माहिती करून देऊ. ''ज्ञानी पुरुष जे पाहिजे. ते करू शकतो''. कारण मोक्षदानाचे लायसन्स त्यांच्या हातात असते! जगांत ज्ञानी किती आहेत? पाच किंवा दहा. अरे कधीकाळी ज्ञानीपुरुष प्रगट होतो आणि त्याच्यात सुद्धा अक्रम मार्गाचे ज्ञानीपुरुष तर दहा लाख वर्षानी एकदाच उदयास येतात आणि ते सुद्धा ह्या वर्तमान काळातील आश्चर्य युगातच लिफ्टमधून मोक्षाला घेऊन जातात. पायऱ्या चढून धापा टाकावयाच्या नाहीत. अरे ''ही वीज चमकलेली आहे. तेव्हाच मोती गूंफुन

घे". तेव्हां ह्याला दोराच सापडणार नाही. काय होणार पुण्याई कमी पडणार. आकाशात विजेचा एकच सैकंड प्रकाश पडतो तेव्हां त्यां वेळांत आपले काम उरकून घे. (मोक्ष मिळव.) परत अशी संधी येणार नाही. तेव्हां ही संधी गमावू नकोस.

वीतराग वाणीच एकटी मोक्षास घेऊन जाणारी आहे. आमची वाणी गोड मधुर असते. अपूर्व असते. पूर्वी कधीही ऐकली नाही अशी आहे. प्रत्यक्ष (direct) वाणी आहे. शास्त्रात जी वाणी आहे ती अप्रत्यक्ष वाणी आहे. प्रत्यक्ष वाणी जर एक तासच ऐकली तर समकित होऊन जाईल. आमची वाणी सर्वाना अनुकूल आहे. सर्वानाच प्रिय आणि मान्य असणारी आहे. सर्वाचा दृष्टीकोण कबूल करतो. कारण आम्ही केन्द्र मध्ये बसलेले आहोत. आमची वाणी नि:पक्षपाती आहे. हिंदू, मुसलमान, पारसी सर्वच आमची वाणी ऐकतात आणि त्यांना आम्ही आप्तपुरुष असे वाटतो. कारण आम्हास भेदबुद्धि असत नाही. सर्वाच्यामध्ये मीच बसलो आहे ना! बोलणारा पण मी आणि ऐकणारा पण मीच.

संपूर्णपणे समोरच्याचे आत्मकल्याण कशा तऱ्हेने होईल ती भाववाही वाणी तीच वीतरागी वाणी आणि तीच त्याचे कल्याण करते आणि थेट मोक्षास घेऊन जाते.

## ( ५० )
## मौन-परमार्थ मौन

ही आमची रेकॉर्ड सबंध दिवस चालू रहाते तरीसुद्धा आम्ही मौन आहोत. आत्मार्थाशिवाय दुसऱ्या कोणत्याही अर्थाने आमची वाणी नसते म्हणून आम्ही मौन आहोत. मौन पाळतो तो मुनी तर बाहेरचे मौन पाळतो आणि आतमध्ये बेचैन असतो. त्याला मुनी कसे म्हणता येईल? आम्ही महामुनी आहोत. संपूर्ण मौन आहोत. ह्यास परमार्थ मौन म्हणतात.

हित, मित, आणि प्रिय ह्या तीन गुणांची वाणी ते सत्य आहे आणि दुसरे सर्व असत्य आहे. व्यवहारातील वाणीला हा नियम लागू पडतो.

ह्या आमच्या वाणीस, नटुभाई तुम्ही लिहुन घेता. ती तुम्हास ५० टक्के फायदा करून देईल आणि दुसरे वाचतील त्याना दोन टक्के पण फळ देणार नाही. हा बुडबुडा जोपर्यंत फुटला नाही तोपर्यंत मोक्ष मिळवून घे. नंतर काहीच कामास येणार नाही. आम्ही सर्वाना सांगतो की, आमच्या पश्चात् आमची मूर्ती किंवा फोटो ठेऊ नका. ह्या महावीरभगवान आणि कृष्णभगवान ह्यांचे फोटो नाहीत काय? तेच राहू द्या, आमचे ठेऊ नका. नंतर हे फोटो काहीच कामास येणार नाहीत. आम्ही आमचे पश्चात् ज्ञानी पुरुषांची

वंशावळी ठेऊन जाऊ आणि त्यानंतर ज्ञानी पुरुषांची साखळी - श्रृंखला (Link) चालू राहील. म्हणून सजीवनमूर्तीला शोधून काढ. त्याच्याशिवाय काही गत्यंतर नाही.

## ( ५१ )
## अंत:करण

सर्वजण जे सायन्स शोधू लागले आहेत त्या सायन्सची प्रथम फोड आम्ही देत आहोत. मनाला ओळखणे फार कठीण आहे. मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार काय हे जसे आहे तसे मी तुम्हाला सांगत आहे.

अंत:करण चार वस्तुचे तयार झाले आहे.

१) मन २) बुद्धि ३) चित्त ४) अहंकार.

ह्या चौघाना रूप आहे आणि वाचता येईल असे आहे. डोळ्यानी दिसत नाही. ज्ञानाने समजतात. पूर्णत: भौतिक आहेत. शुद्ध आत्म्याचा आणि ह्याचा काही देण्या घेण्याचा संबंध नाही. ह्याच्यापासून संपूर्ण वेगळेच आहे. आम्ही संपूर्ण वेगळे आहोत, म्हणून जसेच्या तसे वर्णन करू शकतो.

कार्य:- प्रत्येकाचे कार्य निरनिराळे आहे. तरी चारी जणांचे कार्य एकत्र सहकार्याने होत असते. मनुष्य देह ज्याच्या आधाराने कार्य करीत असतो, त्याचे दोन भाग आहेत.

१) स्थूल देह:- बाह्य विभाग त्याला बाह्यकरण म्हणतात.

२) सूक्ष्म देह:- आंतर विभाग त्याला अंत:करण म्हणतात.

कोणत्याही कार्याचा पहिला फोटो (पहिली छाप) बरोबर (exact) जशीच्या तशीच अंत:करणात पडते आणि नंतर ती बाह्य जगात येते.

शरीरामधून जे कधीही बाहेर पडत नाही त्याला मन म्हणतात. मन तर आतल्याआत नाचत रहाते. निरनिराळ्या तऱ्हेच्या पत्रिका (pamphlets) दाखविते. मनाचा स्वभाव रखडपट्टी करणारा नाही.

लोक म्हणतात की माझे मन भटकते, ते खोटे आहे. भटकत असते ते चित्त. फक्त चित्तच ह्या शरीराच्या बाहेर जाऊ शकते. ते जसे असते तसे फोटो पाडते. ते आपण पाहु शकतो. बुद्धि सल्ला देते आणि निर्णय घेते, त्यानंतर अहंकार त्याचेवर सही करतो. मन, बुद्धि आणि चित्त ह्या तिघांची सौदेबाजी चालते आणि बुद्धि दोघापैकी,

चित्ता बरोबर किंवा मनाबरोबर मिसळते त्यावर अहंकार सही करतो.

उदाहरणार्थ तुम्ही सांताक्रुझमध्ये बसलेले आहात आणि आतल्या मनाने पत्रिका (pamphlet) दाखविली की दादरला जावयाचे आहे. तेव्हां चित्त ताबडतोब दादरला पोहोचते आणि दादरचा हुबेहुब फोटो येथे बसल्या– बसल्या दिसतो. नंतर मन दुसरी पत्रिका (pamphlet) दाखविते कीं चला बसनी जाऊ. तेव्हां चित्त बस बघून येते. परत मन तिसरी पत्रिका दाखविते कीं चला टॅक्सीनी जाऊ,नंतर मन चौथी पत्रिका दाखविते कीं गाडीतून जाऊ. तेव्हां चित्त गाडी, टॅक्सी, बस सर्वच बघून येते. त्यानंतर चित्त टॅक्सीच दाखवित रहाते. शेवटी बुद्धि निर्णय घेते कीं टॅक्सीने जावयाचे आहे. म्हणून अहंकार हिंदूस्तानच्या राष्ट्रपति प्रमाणे सही करतो. म्हणून कार्य ताबडतोब होते आणि तुम्ही टॅक्सी करीता उभे रहाता. जेव्हां बुद्धिने निर्णय दिला कीं ताबडतोब मन पत्रिका दाखविण्याचे बंद करून टाकते. नंतर परत दुसऱ्या विषयाच्या पत्रिका दाखविते. बुद्धि+मन, अहंकार सही करतो. बुद्धि तर मन आणि चित्तामध्ये सामान्य (common) रूपाने रहाते. कारण बुद्धिशिवाय कोणत्याही कार्याचे निर्णय होत नाहीत आणि जेव्हां निर्णय घेतो तेव्हां अहंकार सही करून टाकतो आणि कार्य होते. अहंकारा शिवाय तर काहीच काम होत नाही. पाणी पिण्याकरिता सुद्धा उठता येत नाही.

हे अंतःकरण तर लोकसभा पद्धत (parliament system) आहे. आता हे मन काय आहे? त्याचे स्वरूप काय आहे ते सांगतो.

## ( ५२ )
## मन कसे आहे? विचार काय आहे?

मन हे तर ग्रंथी आहे. निरनिराळ्या गाठीनी तयार झाले आहे. मन सूक्ष्म आहे. अणु पण नाही आणि परमाणू पण नाही. दोघांच्या मधली अवस्था (stage) आहे. जी जी अवस्था उभी रहाते त्याच्यामध्ये तन्मयाकार होते. ह्या अवस्थेमध्ये अवस्थित होत असते. ते कारण मन रूपानी तयार होते आणि त्याचे जे फळ येते ते व्यवस्थित फळ देत असते. ते कार्य मन रूपाने असते. प्रत्येकाचे निरनिराळे मन असते कारण कीं, कारणमन निरनिराळे असते. जसे जसे जास्त आणि जास्त अवस्थेमध्ये अवस्थित होत जाते तसे तसे त्याचे जास्तीत जास्त परमाणू एकत्र होत असतात आणि त्याच्याच ग्रंथी तयार होत असतात. ''मन ग्रंथीस्वरूप आहे.'' जेव्हा ''व्यवस्थीतच्या'' नियमाच्या आधाराने timing (वेळे)चा संयोग होताच ग्रंथी फुटते तेव्हां त्यास विचार असे म्हणतात विचारावरून मनाचे स्वरूप समजू शकते की कशाची ग्रंथी आहे. विचार येतात त्यास वाचू शकतो. आवडते विचार आले की खुष होतो आणि न आवडणारे विचार आले

की, द्वेष करतो आणि असे म्हणतो की आम्ही मनास वश करण्यासाठी जात आहोत. मन तर कधीही वश होऊ शकत नाही. हे तर मनाला ज्ञानानेच बांधू शकतो. मनास वश करणे हा मोठ्यातला मोठा विरोधाभास आहे. स्वत: चेतन आहे आणि मन अचेतन आहे. त्या दोघांचा गुणाकार कशा रितीने होईल? चेतन चेतनचे कार्य करते आणि मनास कार्य करू दिले तरच निकाल होईल. जागृती इतकी ठेवावयाची की मनाच्या कार्यांत अडथळा करावयाचा नांही, तन्मय जागृती इतकी ठेवावयाची की मनाच्या कार्यांत अडथळा करावयाचा नाही, तन्मय व्हावयाचे नाही.

ह्या मनाच्या गाठी कशा असतात. ते मी तुम्हाला समजावून सांगतो. एका शेतात उन्हाळ्यात गेला असाल तेव्हा तुम्हास शेत स्वच्छ दिसेल. तर तुम्ही अशी समजूत करून ध्या की आमचे शेत एकदम स्वच्छ आहे. तेव्हा मी सांगेन की 'नाही, जरा पाऊस पडू द्या, मग बघा'. नंतर पाऊस पडला आणि शेतात निरनिराळ्या जातीच्या वेली उगवल्या. करटोलीची, कारल्याची, तोंडल्याची आणि पडवळाची, अशा निरनिराळ्या जातीच्या वेली उगवल्या तर ह्या वेली कोठून वर आल्या? आत मध्ये प्रत्येक वेलीची गाठ होती. ती पावसाच्या अनुकूलतेने एकत्र आल्यावर त्या वेली उगवल्या. म्हणून तुमचे शेत स्वच्छ करण्याकरिता मुळापासून वेली काढून टाकून खूष झालात. की माझे शेत स्वच्छ झाले. तर मी म्हणतो नाही. अद्याप, तीन वर्षे पाऊस पडून द्या, नंतर बघत रहा, आणि त्यानंतर ज्यावेळी काहीच उगवणार नाही तेव्हांच तुमचे शेत स्वच्छ झाले असे म्हणता येईल. त्यानंतरच मुळाशिवाय होईल. त्याप्रमाणे हे मन सुद्धा ग्रंथीने तयार झाले आहे. ज्याची ग्रंथी मोठी त्याचे विचार फार येतात, ज्याची ग्रंथी लहान असते त्यास फार थोडे विचार येतात उदाहरणार्थ:- एक वाण्याचा मुलगा आहे. त्याला विचारले कीं तुला मांसाहाराचे विचार किती वेळा आले? तर तो सांगतो कीं, माझ्या बावीस वर्षाच्या आयुष्यांत चार पाच वेळा आले. ह्याचा अर्थ असा कीं त्याची मांसाहाराची ग्रंथी लहान आहे. सुपारी एवढी आहे. तसेच एका मुसलमानाच्या मुलास विचारले तर तो असे सांगेल कीं मला तर रोज मांसाहाराचे विचार येत असतात. ह्याचा अर्थ असा कीं त्याची मांसाहाराची ग्रंथी फार मोठी आहे. सुरणाच्या गाठी एवढी आहे. जर कोणी एखाद्या जैनाच्या मुलाला विचारले तर तो सांगेल कीं, "मला सर्व आयुष्यात मांसाहार करण्याचा विचारच आला नाही". ह्याचा अर्थ हा कीं त्याच्यामध्ये मांसाहाराची ग्रंथीच अजिबात नाही.

जर तुमच्यावर कामगिरी सोपविली कीं, एका महिन्याचा आलेख (graph) काढून आणा व त्यांत नोंद करा कीं सर्वांत जास्तीत जास्त कोणत्या विषयांचे विचार येतात? नंतर त्याच्यापेक्षा कमी प्रतीचे कसले विचार येतात अशा प्रकारे नोंद करीत

जा. नंतर एक आठवड्याचा आलेख (graph) तयार करा. नंतर एका दिवसाचा आलेख तयार करा, म्हणजे तुम्हाला कळून येईल कीं आंतमध्ये कशा कशाच्या ग्रंथी आहेत. आणि किती मोठमोठ्या आहे. मोठमोठ्या ग्रंथी तर पाच किंवा दहाच असतील. त्याचीच हरकत आहे. लहान लहान ग्रंथीची फारशी हरकत नाही. एवढे करता येईल किंवा नाही?

आमच्या मध्ये एक सुद्धा गाठ नाही. आम्ही निर्ग्रंथी समजले जातो. मनुष्य तर ग्रंथीचे लाकूड समजले जाते. त्याचे फर्नीचर सामान सुद्धा होऊ शकत नाही. आता तर मनाच्या ग्रंथी पुष्कळच आहेत. जास्त प्रमाणांत झाल्या तर शरीरावर सुद्धा फुटून बाहेर पडतात. त्याला ट्यूमरची गाठ म्हणतात.

मन स्वरूपापासून एकदम वेगळे आहे आणि कधीसुद्धा एकत्र होऊ शकत नाही. जेव्हां आवडते विचार येतात तेव्हा भ्रांतीमूळे असे वाटते कीं मी विचार करीत आहे. माझे किती उच्च विचार आहेत. आणि जेव्हा न आवडणारे विचार येतात तेव्हा सांगतो कीं मला फार वाईट विचार येतात. मी नाही म्हणतो तरी येतात. हे काय सुचवितात? उत्तम विचार करणारा तू आणि वाईट विचार येतात तेव्हा म्हणतोस की मी काय करू? जर स्वत:च विचार करतोस, विचार करण्याची सत्ता असेल तर सर्व लोक आवडतेच विचार करतील. न आवडणारे विचार कोणीच करणार नाहीत. परंतु तसे घडते का? नाही. हे तर आवडणारे आणि न आवडणारे दोन्ही विचार येणारच.

## ( ५३ )
## कार्य करण्याची प्रेरणा मनातून होते

कित्येक लोक म्हणतात की चोरी करण्याची प्रेरणा परमेश्वर मला आतून देतो. अरे, तर तू खरा आणि परमेश्वर चोर असेच ना तुझे म्हणणे? परमेश्वर अशी प्रेरणा देतो का? परमेश्वर तर चोरी करण्याची प्रेरणा देणारच नाही आणि चोरी न करण्याची सुद्धा प्रेरणा देणार नाही. तो काय म्हणून तुम्हास प्रेरणा देऊन चोर ठरेल? कायदा काय सांगतो? चोराला चोरी करण्याची जो प्रेरणा देतो तो चोर.

परमेश्वर असल्या गोष्टीमध्ये हात घालत असेल का? तो तर ज्ञाता, द्रष्टा आणि परमानंदी आहे. सर्वच पहातो आणि समजतो, मग ही प्रेरणा काय असेल? अरे ही तर आतून चोरी करण्याची ग्रंथी फुटते, तेव्हा तुला चोरी करण्याचा विचार येतो. जर मोठी ग्रंथी असेल तर पुष्कळ विचार येतो आणि चोरी सुद्धा करून येतो आणि नंतर सांगतो की, 'मी चलाखीने चोरी केली' असे सांगितले की चोरीच्या ग्रंथीला खाद्य

मिळते. पोषण मिळाले म्हणजे नवे बी पेरले जाते आणि चोरीची ग्रंथी मोठमोठी होत जाते. परंतु दुसरा चोर असतो तो चोरी करतो खरा, परंतु त्याबरोबर त्याला आतमध्ये डाचते की चोरी होत आहे ती फार वाईट गोष्ट आहे. परंतु करणार काय? पोट भरण्याकरिता हे सर्व करावे लागते. तो हृदयपूर्वक पश्चाताप करत रहातो. त्यामूळे चोरीच्या ग्रंथीस पोषण मिळत नाही आणि पुढील जन्माकरिता चोरी करू नये अशा तऱ्हेचे बी पेरतो आणि तो पुढच्या जन्मात चोरी करणार नाही.

आपले मन जे काही संकल्प, विकल्प करते त्याचे फोटो पडतात. त्याची मूळ प्रतिमेची नेगेटिव फिल्म तयार होते आणि त्याचे कोणत्याही वेळी रुपांतर होते. तेव्हां ती पडद्यावर चित्र (picture) म्हणून दिसते. ह्या सिनेमामध्ये आपण जी फिल्म पहातो,ती तीन तासानंतर समाप्त (the end) असे दाखविते. ती तर समाप्त (the end) होणारी अशी फिल्म आहे, परंतु मनाची फिल्म तर समाप्त न होणारी आहे आणि हिचा जेव्हां शेवट (the end) होतो तेव्हा मोक्ष होतो. म्हणून तर कवी नवनीत संघवी ने औरंगाबादमध्ये सिनेमा गृहाच्या उद्घाटन समारंभाचे वेळी गायले होते कीं:-

"तीन घंटेका फिलम दिखावा, दुनियाभरमे चलते है,

किंतु मनकी फिल्मोका the end को मोक्ष ही कहते है"

हे लोक तर मनास वश करण्याकरिता निघाले आहेत आणि न आवडणारी फिल्म दाखवितात. तेव्हा ते तिला कापा, कापा असे म्हणतात. ती कशा रीतीने कापली जाईल? येथे तर फिल्म तयार होतानाच नीट सावध रहावयास पाहिजे होते ना? मन ही तर फिल्म आहे. फिल्म मध्ये जे दाखविले जाते ते बघावयाचे व समजावून घ्यावयाचे. ती बघताना रडावयाचे किंवा हसावयाचे नसते. कित्येकवेळा तर फिल्म मध्ये बायको, मरून गेली असे बघितले तर हे लोक सुद्धा खुर्चीमध्ये बसल्या-बसल्या रडत असतात. जणुकाय ह्यांचीच बायको मेली आहे! अरे ही फिल्म बघताना रडावयाचे नसते, ही तर फिल्म आहे.

## ( ५४ )
## ज्ञाता-ज्ञेयाचा संबंध

आम्ही तर मनाच्या फिल्मला बघतो आणि जाणतो. कोणकोणते विचार आले आणि गेले ते बघतो आणि ओळखतो. आमचा आणि विचाराचा फक्त हात मिळविण्या पुरताच संबंध आहे. त्याच्या बरोबर लग्न लावीत नाही. भगवान महावीर सुद्धा तसेच करत होते. त्यांना तर विचार येत असताना दिसत असत जाताना सुद्धा दिसत असत.

त्यांना विचार शेवटपर्यंत येत असत. अरे विचार आहेत म्हणून तू आहेस तो ज्ञेय आणि तू ज्ञाता. ज्ञेय-ज्ञात्याचा संबंध आहे. जर ज्ञेयच नसते तर तू कशाचा ज्ञाता. थेट मोक्षास जाण्याच्या शेवटच्या वेळी सुद्धा मनाची फिल्म दिसते आणि ती पूर्ण झाली म्हणजे मनुष्य संपूर्ण मुक्त होतो म्हणजे त्याचा मोक्ष होतो.

तुम्ही अंधारामध्ये एकटेच निघालात आणि जर तुम्हास चोराचा विचार आला तर समजून जावे कीं आज नाही तर कधीतरी आपण लुटले जाणार आहेत. जर विचारच आला नाही तर समजावे की आपण लुटले जाणार नाही. विचार येतात ते भविष्य (forecast) असते. हा माल आतमध्ये भरलेला आहे. म्हणून विचाराच्या रूपानी प्रगट होतो. असा विचार आला हा एक सांयोगिक पुरावा (evidence) आहे. आपण तर बघावयाचे आणि माहिती करून घ्यावयाची आणि तिकडे पुढे लक्ष ठेवावयाचे. जगामध्ये मानसशास्त्र सुद्धा खास समजावून घेण्या जोगे आहे. सर्वजण मनाचा लय करण्याच्या पाठीमागे आहेत. अरे मनाचा नाश करावयाचा नसतो. जर मनाचा नाश झाला तर मग तू वेडा (मेन्टल) होऊन जाशील. मनामध्ये चांगले विचार यावेत. असे असता कामा नये. जे विचार येतात त्याना येऊ द्यावे. मनास आपण काय सांगावयाचे? तुला जेवढी गडबड, बडबड धडपड, करावयाची असेल तेवढी करून घे. कार्यमनास थांबवणारे किंवा फिरवणारे आपण कोण? ब्रह्मा सुद्धा फिरवूं शकणार नाही कारण तो तर परिणाम (effect) आहे. त्याच्या पासून भ्यावयाचे काय? वाजविणाऱ्यांनी जर वाजा वाजविला नाही तर आपण काय ऐकणार? आपण फक्त जमवून - adjustment घ्यावयाचे. ज्याचे गावयाचे असेल त्याचे गा. आम्हास तर सर्व तऱ्हेची आवड आहे. ज्ञान होण्याचे अगोदर चांगले ऐकण्याची आवड होती. त्यामूळे दुसरे न आवडणारे ऐकण्याची आवड नसे. आता तर आमचे व तुमचे जमले आहे. मग तुला जे काही वाजवावयाचे असेल ते वाजव. आता प्रीती आणि द्वेष करणारे दुसरे.

## ( ५५ )
## मनावर स्वार होऊन बसा

आम्हांस ज्ञान नव्हते तरीपण आमच्या मनात विचार येत होते तेव्हा मला समजत होते की, आज झोपण्यास मिळणार नाही: तेव्हा मी मनास सांगत असे कीं "धाव, धाव, फार उत्तम, फार उत्तम. तू घोडा आणि मी वर बसणारा स्वार. तुला ज्या रस्त्याने चालावयाचे असेल त्या रस्त्याने चाल. तू आहेस आणि आम्ही आहोत". तेव्हा सकाळचे सात वाजायचे. ह्या जगात काय नियम आहे? ज्याच्याशी भांडण केले, ज्याच्यावर ताबा (control) मिळविला की तो वर चढून बसतो. ज्याप्रमाणे साखरेवर नियंत्रण (control)

आणले तर साखरेची किंमत वाढते. मनाचे पण तसेच आहे. मनाला जर आवडले, तर ते दुप्पट वेगाने धावते, म्हणून तुम्ही मनाच्या आड येऊ नका. मन जर आज्ञेच्या आधीन असेल आणि जर तुम्ही त्याच्यामधी आलात तर चालेल. आज्ञेच्या आधीन जर नसेल त्याला तर धावावयास लावावयाचे. ते थकून जाईल. श्वास चढेल. आपणास त्याच्याशी काय करावयाचे आहे? लगाम आपल्या हातात आहे ना? तर लोक काय म्हणतात? ह्या मनाचा होतो, झोप येत नाही, म्हणून मनास दाब दाब करतो आणि भडकण्याचा प्रयत्न करतो झोपण्याचे काम बाजूला ठेव. मनावर बसावयास मिळते. अशी संधी परत केव्हां मिळेल?

आम्ही तर मनावर स्वार होऊन बसलो आहोत तेव्हा तर हे अविरोधाभासी ज्ञान उत्पन्न झाले आहे.

अरे मन हे संसाररुपी समुद्राची होडी आहे. हे लोक तर मनास fracture करून निर्विचार भूमिका तयार करतात. परंतु त्यामूळे त्याना निर्विचार पद कधीही प्राप्त होत नाही. अमुक एक बावतीत निर्विचार झाला की तो दगड झाला असे म्हणतात. त्या गोष्टीला ते दाबून टाकतात. त्यामूळे मन दुसऱ्या बाजूस उड्या मारू लागते. तर निर्विचार पद कोणास म्हणतात? ''थोड्या-थोड्या वेळाने विचार आल्यावर स्वत: शुद्धात्मादशेमध्ये राहून पूर्णपणे निराळा राहून बघतो आणि समजतो, तेच परमेश्वराच्या बाबतीत निर्विचारी पद आहे''.

मनास वश करण्याकरिता एकजण लंगोटी लाऊन, बाकी सर्व घर-दार, बायका-पोरे सोडून निघून जातो. येथे लोकदर्शन सोडून जंगलामध्ये जंगली जनावरे आणि झाडांचे दर्शन करण्याकरिता जातो. परंतु तो त्याचे मन तर स्वत:बरोबर घेऊन जातो आणि तेथे सर्वच करतो. गाय, बकरी, पाळतो, गुलाबाची फांदी लावतो. झोपडी बांधतो. अरे मनाचा स्वभावच असा आहे की जेथे जाईल तिथे संसार उभो करील. हिमालयात गेला तरी संसार उभा करणार. आता अशा तऱ्हेने मनास तू कशा तऱ्हेनी वश करणार? मनास वश करणे हा तर मोठा विरोधाभास आहे. मनाच्या स्वभावास वश करणे हे शक्य नाही. परंतु योगी वगैरे पूर्वजन्माच्या अशा प्रकारच्या ग्रंथी घेऊन आले आहेत, तेव्हा त्यांना असे वाटते कीं आपले मन वश झाले आहे. परंतु त्यांचे मन जेव्हा उलट वागते तेव्हा स्वत: माहीत पडते कीं आपले मन वश झाले नाही. योगीचा अपमान करून बघा म्हणजे मन किती वश झाले आहे ते समजेल. योग करण्याची त्यांची ग्रंथी आहे. हे तर प्राकृत स्वभावाने योग करतात. तेव्हा तो असे समजतो कीं मी योग केला. मी मनास वश केले.

मन ज्ञानाने वश होते. म्हणजे ज्ञानी, स्वरूप ज्ञानाने ग्रंथी विरघळून टाकतो. आणि निर्ग्रंथ पद प्राप्त होते.

तुमचे मन हेच तुमच्या श्रीमंतीचा फोटो आहे. मनास ओळखा. त्याचा स्वभाव कसा आहे ते पूर्णपणे ओळखून घ्या.

क्षत्रियाचे मन कसे असते? राजमान्य राजश्री सारखे असते. जर देवळात गेला आणि खिशात हात घातल्यावर जितके पैसे निघतात तितके तो पेटीत टाकतो. मग तो मोजत नाही की मी किती पैसे टाकले, वाणी बुद्धिवाल्याचे मन फारच संकुचित असते. पाटिदारास तर क्षत्रिय म्हणतात. त्यांचे मन राजश्री असते. त्यांच्यात वाण्याची व्यवहारिक बुद्धि नसते. कोणीही पूर्ण असू शकत नाही.

## ( ५६ )
## लक्ष्मी कोठे रहाते?

लक्ष्मी काय म्हणते? शंभर लोकां बरोबर जो Sincere (विश्वस्त) असतो त्याच्या घरांत माझे वास्तव्य असते. वास्तव्य म्हणजे समुद्राची भरती जशी येते तशी आहे. दुसरीकडे जेवढी महेनत करावी लागते तेवढेच फळ मिळते. Sincere - विश्वस्त म्हणजे काय? कशा तऱ्हेने Sincere – विश्वस्त समजले जाते? तर मग मनास ओळखा. त्याचा Sincerity- विश्वस्तपणा कसा आहे ते ओळखा.

मेहनत करून कमवत नाहीत. हे तर मोठ्या मनाचे लोक कमाई करतात. हे जे शेठ लोक आहेत ते काय मेहनत करतात? नाही, हे तर राजश्री मनाचे लोक असतात. मेहनत तर त्यांचे मुनीमजीच करीत असता आणि शेठ तर मजा व चैन करीत असतात.

मन तर दैवी असावे लागते. दैवी मन म्हणजे अपकार करणाऱ्या माणसावर उपकार करते ते. समोरचा आपले खाऊन गेला असेल आणि वर आपणास मूर्ख म्हणत असेल. परंतु जेव्हा तो अडचणीत सापडतो तेव्हा दैवी मानवच त्याची मदत करतो. दैवी मनाचा मनुष्याला देवगति प्राप्त होते.

हा वाणी–बुद्धिचा काय करतो? आपणास थंडीमध्ये ओढण्याकरिता पांघरूण मिळाले असेल आणि त्यास मिळाले नसेल तर तो स्वतः अंगावर पांघरूण ओढून झोपून जातो. डोक्यावर एकसारखे ओढून झोपून जातो आणि झोपून गेल्याचे स्वांग करतो. स्वतः जागा असला तर दुसरा पांघरूण मागेल ना! तर हेच मन पुष्कळ मार खायला लावते. जेवढे राजश्रीचे तेवढे तुमचे. "ही दुनिया तुमची आहे. तुम्हास तिचा कसा उपभोग घ्यावा ते समजले पाहिजे". कबीर फार हुशार होता तो म्हणायचा :–

"खा पी खीलाई दे, करले अपना काम
चलती वखत है नरो, संग न चले बदाम".

अपना काम करले म्हणजे मोक्षाचे काम करून घे. संकुचित मना मूळे च लक्ष्मी दूर राहते? नाही तर लक्ष्मी दूर कशी राहु शकते? वणिक बुद्धि शहाणी, म्हणावयाची परंतु मोक्षास जाण्या करिता किती विघ्नरूप आहे?

## ( ५७ )
## मनाचा संकोच-विकास

मन जर दररोज हिशोब करित राहिले तर उद्या कढी सुद्धा होणार नाही. दुकानामध्ये चार आणे कमविले नाही तर दुसऱ्या दिवशी कढी करू नये का? ह्या मनाचे कसे आहे? जर रस्ता पाच फुट रुंद असेल तरी सुद्धा निवडुंगामध्ये मनुष्य अडकेल. दोन फुट रुंद असेल तरी तीच गत होणार. एक मनुष्य जाण्या जेवढा रस्ता असला तरी तीच तऱ्हा. परंतु तो त्याच्यातून नक्की निघून जाणार. ही गोष्ट खरीच. आज कोणत्या रस्त्याने जावयाचे आहे ते मनाला माहीत असते. अंग चोरुन वाटेल त्या रस्त्यानी जाते. दोन तारेच्या मघून सुद्धा जाते. म्हणून आम्ही सांगतो कीं राजासारखे मन झाले असेल त्यास भिकारी करू नका. फुल नाही तर फुलाची पाकळी टाका. पण मन भिकारी करू नका. अरे एखाद्या वेळी असा काही योग येतो कीं राजा सुद्धा भिक मागतो. त्यामूळे काय त्याचे मन भिकारी होते का? हे तर राजश्रीच रहाणार. जितके मन मोठे तितकी विशाल जागा मिळते जितके मन लहान तितकी अडचणीची जागा मिळते.

हे तर असे आहे कीं, ज्याची जशी मनाची तयारी असते त्याप्रमाणे त्याला खेचतात. लोभी मनुष्यास लोभाची ग्रंथी असते, दानशूर माणसास दान करण्याची ग्रंथी असते, तपस्वी माणसास तपाची ग्रंथी असते, त्यागी पुरुषास त्यागाची मोठी ग्रंथी असते. ती ग्रंथी त्यास त्याग करावयास लावते आणि तो म्हणतो की मी त्याग केला. अरे हे तर त्या ग्रंथीस जास्तीत जास्त मजबूत केलेस. एवढी मोठी ब्रह्मग्रंथी तिचा समज केव्हां पडणार? ग्रंथीला तर बघावयाचे आणि माहिती करून घ्यावयाची. तू निराळा आणि तुझ्या मनाची ग्रंथी निराळी. मन आपल्या पासून निराळे हे तर प्रत्यक्ष समजते. कारण कीं जेव्हा झोपायचे असते तेव्हा मन आतल्या आत चलविचल करते आणि झोपू देत नाही. झोपण्याकरिता सर्व तऱ्हेच्या सुखसोयी असून सुद्धा झोपू देत नाही.

या मनाची शांतता शोधण्याकरिता परदेशातील लोक हिंदुस्तानात धावत धावत

येतात. तर मग शांती कशाने मिळेल? हे जैन लोक सुद्धा शांती मिळविण्याकरिता शांतीनाथ भगवानच्या दर्शनाला जातात. परंतु परमेश्वर म्हणतो कीं माझे दर्शन करतात त्याबरोबर जोड्याचे पण दर्शन करतात आणि परत दुकानाचे पण दर्शन करतात. तर शांतता कोठून मिळणार? अरे मुलीचे नाव शांती ठेव तर शांती, शांती करीत रहाशील म्हणजे तुला शांती मिळेल.

## ( ५८ )
## मनाचे वक्र परिणाम

ह्या हल्लीच्या काळात मनुष्याचे मन निराळे, वाणी निराळी आणि त्याचे वर्तन त्याहून वेगळे. उदाहरणार्थ:- रमेश आणि त्याचा मित्र फिरावयास गेले तर रमेशच्या मनात वेगळेच, वाणी वेगळी, वर्तन वेगळे. तो असे मनात नक्की करतो कीं कमी कींमत देऊन सौदा पटवुन देऊ आणि वाचेने आणि वर्तमानात दाखवितो कि वाजबी भावाने घ्यावे. परंतु त्याचा मित्र मनाने वाचेने आणि शरीराने असेच नक्की करतो की जर योग्य भावाने दिले तर घ्यावयाचे. तर रमेशचा मित्र ऊर्ध्वगतिमध्ये जाईल आणि रमेश मात्र अधोगतिला जाईल. मनास वेगळे का ठेवले? हाच मनाचा वक्र परिणाम. त्यामूळे त्यास तेवढे कर्म चिकटले. मन, वचन आणि काया ह्या तिघांना वेगळे ठेऊन ज्याचे वर्तन असते ते सुद्धा परमेश्वरास कळते. हे कलियुगाचे वक्र परिणाम आहेत आणि ते प्रत्येकात कमी जास्त प्रमाणात असतात.

## ( ५९ )
## मनाचा स्वभाव

मनाचा स्वभाव कसा असतो? त्याला स्वत:पेक्षा कमी सुख असणारा दाखविला म्हणजे त्या मनाला आपण जास्त सुखी आहोत असे वाटते. दमयंती बघ, तुला दोन खोल्या आहेत. तिचे मन कधीकाळी चलविचल करते की जर आपणास स्वतंत्र फ्लेट मिळाला असता तर फार बरे झाले असते. म्हणून आपल्या मनास दाखवावे कीं, जी एक खोलीत राहाते ती कशी रहात असेल? घरी तर बसण्यास खुर्ची सुद्धा नाही तर ती काय करीत असेल? मग परत तुझे मन खुश होईल. हे तर मन जेव्हां कधी कधी विचाराशिवाय रहाते तेव्हा खावयास मागते. तेव्हा आपण मनास अशा तऱ्हेने शिक्षण दिले पाहिजे. हे तर ज्याचे मन कमकुवत झाले असेल त्यास जरा शिकविले पाहिजे. बाकी आम्ही जे ज्ञान देतो ते ज्ञानच आहे असे कीं कशाचीही जरूर पडत नाही. ''व्यवस्थित'' चे ज्ञानच असे आहे कीं मन आरडा-ओरडा करणार नाही. मन जिकडे-

तिकडे समाधान, समाधान आणि समाधानातच रहाते. सर्व अवस्थेत संपूर्ण समाधान रहाते तेच ज्ञान तोच धर्म.

मनाचा स्वभाव तर फारच विचित्र आहे. हा तर असा आहे कीं खोटे बोलून लोकाकडून पाच रूपये काढून घेतो आणि परत बाहेर पडला की दुसऱ्या कोणास दोन रूपये सुद्धा देतो. ज्याच्यावर सतत फुलांचा वर्षाव होत असेल त्याच्यावर कोणत्याही वेळी अभाव उत्पन्न करेल असे आहे. म्हणून सावध राहिले पाहिजे. मन जसे चालेल त्याप्रमाणे चालून देऊ नये. कबीरजी काय म्हणतात:– ''मनका ताका जो चले ताको सर्वस्व जाय''. केव्हां मन फसवील त्याचा पत्ता लागणार नाही असे ते चंचल आहे. मनामध्ये जर आत्म्याची शक्ति जाईल, तन्मयाकार होईल तर घातपात (sabotage) करून टाकेल. तलावात स्वत:च जाऊन पडतो आणि मग ओरडू लागतो की ''वाचवा वाचवा''.

ह्या काळात लोकांचे मन fracture करून टाकले आहे. ते जेव्हा टोकावर जाते तेव्हा समुद्रात पडते तसे आहे.

मन तर नृत्य करणाऱ्यासारखे आहे. लोक म्हणतात कीं बादशाह नर्तकीस नाचवितो. मी म्हणतो कीं, नाही. नर्तकी बादशाहास नाचविते. त्याप्रमाणे तुमचे मन तुम्हास नाचविते.

दोन मित्र जात असले आणि त्यापैकी एकास रस्त्यामध्ये हॉटेलमधून मांसाहारी जेवणाचा जर वास आला तर त्याची मांसाहाराची ग्रंथी फुटू लागते. त्याला तर आतल्या आत गुदगुल्या होतात. त्याला मांसाहार करण्याची तीव्र इच्छा होते म्हणून तो त्याच्या मित्रास सांगतो कीं, ''मला माझ्या नातेवाईकाकडे भेटावयास जावयाचे आहे. तू येथे उभा रहा.'' आणि असे खोटे बोलून तो मांसाहार करून येतो. अरे परमेश्वराची खोटी शपथ सुद्धा घेतो.

ग्रंथी फुटते तेव्हां सर्व उलटे बोलावयास लागतो. ह्यालाच परमेश्वराने कषाय म्हटले आहे. तो कपटाची ग्रंथी बांधतो, खोटेपणाची ग्रंथी बांधतो आणि मांसाहाराची ग्रंथी मजबूत करतो. अज्ञानी माणसाची एक ग्रंथी फुटते आणि तो दुसऱ्या पाच नवीन तयार करतो. ह्यापेक्षा जेव्हा मांसाहार करण्याची ग्रंथी फुटते त्यावेळेस जरा नरम झाला तर मग त्यास लवकर समजण्याची शक्यता आहे. परंतु अज्ञान दशेत ग्रंथी सुटणे शक्यच नाही. परंतु जर खरे सांगून गेला कीं. ''मी मांसाहार करावयास जातो तर त्याचा पुष्कळ फायदा होईल''. दुसरा मित्र जर उच्च घराण्यातला असला तर मांसाहाराच्या ग्रंथीतून सोडवील किंवा तो एखादा दूसरा रस्ता दाखविल. समजावील आणि जर पश्चाताप करीत

राहील तर शेवटी ह्या सवयीपासून सुटून सुद्धा जाईल. परंतु नरम होणार नाही आणि खोटे कपट केले तर कधीही सुटणार नाही. उलट कपटाची आणि खोटे बोलण्याची नवीन ग्रंथी बांधतो. एवढ्या करिता परमेश्वराने मन वचन आणि कायेने चोरी करणार नाही असा नियम पाळवयास सांगितला होता. त्यामूळे केव्हा तरी ही ग्रंथी विरघळून जाईल.

आतमध्ये तर निराळ्या तऱ्हेच्या ग्रंथी असतातत लोभाची, अभिमानाची, कपटाची, रागाची सर्वांची असते. लोभापेक्षा मनाची ग्रंथी चांगली. लोभाची ग्रंथी तर फारच वाईट. लोभी माणसाला तर स्वत: त्याचा पत्ता नसतो. परंतु अभिमानाची ग्रंथी तर दुसऱ्यास दिसून येते. तुला कोणी एखाद्याने सांगितले कीं, ''एवढी छाती वर काढून का फिरतोस? किती आखडून गेला आहेस''. तेव्हा अहंकाराची ग्रंथी तुटली जाते. लोभाची ग्रंथी तर क्वचितकाळी माहीत पडते. परंतु कपटाची ग्रंथी तर कधीही लक्षात येणार नाही.

## ( ६० )
## मनाच्या ग्रंथी कशा विरघळतील?

लोभाच्या ग्रंथी आणि रागाच्या ग्रंथी स्वत:स मार खावयास लावते (नुकसान करते) आणि दुसऱ्यास सुद्धा मार खावयास लावते. परमेश्वराने लोभाच्या ग्रंथीवाल्यास दान देण्यास सांगितले आहे. एक वेळ पाच पंचविस रुपये सुटे करून रस्त्यावर वाटतो, नंतर मन चलविचल करू लागले म्हणजे रुपये जास्त वाटावे असे वाटते, म्हणजे मन हळू हळू गप्प रहाते आणि जर विचार करून लोभाची ग्रंथी सोडवाल तर मग त्याच्यासारखे दुसरे काही नाही. जो असा विचार करील कीं एवढे सर्व जमा केले ते कोणाकरिता? स्वत:च्या सुखाकरिता? स्वत:च्या सुखाचा स्वत: उपभोग न घेता दुसऱ्याकरिता आपण आपले सुख गुमावणार आणि त्या व्यतिरिक्त जे जे गुन्हे केले त्याची कलमे स्वत:स लागू करून घेणार.

जेव्हा ज्ञानी पुरुषाची ग्रंथी फुटते तेव्हा तो ग्रंथीस बघतो आणि जाणतो. ज्ञानी पुरुषाच्या आज्ञेने, शुद्धात्म दृष्टीने मनाच्या ग्रंथीवर नजर टाकत गेलात तर ग्रंथी हळू हळू विरघळतात. आमच्याकडे तर अनंत सिद्धी आहेत. आम्ही तुमच्या ग्रंथी विरघळून टाकू अशी आमच्या शक्ति आहे. परंतु आम्ही ह्या सिद्धी क्वचितच वापरतो. आम्ही तुम्हास रस्ता दाखवितो. ह्या ग्रंथी फुटतात ह्याचा तर तुम्हास अनुभव आला आणि तुम्हास तुमचीच फिल्म बघावयास मिळेल. ज्ञेय नसेल तर ज्ञाता काय करणार? जितके मन प्रसन्न होते तितकाच आत्मा प्रसन्न होतो. जितके ज्ञेय वाढते तितकेच शुद्धात्म्याचे

ज्ञान वाढते. मनास येथे मळ लागला आहे, तेथे माझ्या ज्ञानाच्या वाक्याचा चांगल्या प्रकारे उपयोग केला तर मळ धुऊन निघेल.

जर मन भजी खाण्याची इच्छा करित असेल तर ताबडतोब जागृती ठेवा आणि विचारा कीं हे व्यवस्थित बोलत आहे किंवा लबाड बोलत आहे? तीन वेळा ठोके झाले. तर समजून जा की हे व्यवस्थित आहे. शरीराला जरूरीपुरतेच जर अन्न मिळत राहिले तर मन, बुद्धि ठिकाणावर राहील तरी सुद्धा आमच्या ज्ञानामध्ये ग्रहण, त्याग नाही. तुम्हाला सव्यवस्थित दाखविल.

मनाला नेहमी खाद्य पाहिजे दाब-प्रेशर पाहिजे गर्दीतच एकांत असतो एकांतात तर मन बेचैन असते. आमचे ज्ञान घेतलेले महात्मे तर संसारात निर्लेप रहातात आणि खूप गर्दीत एकांतच अनुभवितात. खूप गर्दी असेल तेव्हां मनास तर त्याचे खाद्य मिळते. तेव्हा मन कामात मग्न होते. शुद्धात्मा एकटाच असतो आणि परमानंद प्राप्त करतो.

कोणाचे मन जरा कमकुवत झाले तर अज्ञानी पण बोलतात कीं काय विचार करित राहिला आहेस? चल नीघ आणि बाहेर जा. मन तर सर्व तऱ्हेचे बोलते.

ह्या मरणाचा विचार सर्वांना येत नाही का? येतोच, सर्वांना मरणाचा विचार येतो, पण लोक काय करतात? विचार येता क्षणीच त्यास काढून टाकतात. अरे तर सर्वच विचारांना काढून टाक ना? परंतु नाही. दूसरे जे आवडते विचार येतात त्याना तो काढून टाकत नाही. आमच्या ज्ञानाचे असे आहे कीं मरणाचा क्षण येईल तेव्हा ते 'स्वत:' संपूर्ण प्रगटच होते. त्यावेळेस आत्मा 'स्वत:'च्या गुफेत बसून रहातो. मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार सर्वच गप्प बसतात. विमानांमध्ये जरी बॉंब पडला तरी हा शांत रहातो. तेव्हां मरणाच्या वेळेस समाधि लागते. आमच्या ज्ञानी महात्म्यांना समाधि मरण येईल.

## ( ६१ )
## मन भौतिक (Physical) आहे

मन तर पूर्णतया भौतिक (complete physical) आहे. यांत्रिक (mechanical) आहे. उदाहरणार्थ :- कोणी एक अमुक यंत्र (machinery) तयार करतो तेव्हा त्याचा आत्मा यंत्राबरोबर एकाकार होतो आणि यंत्र चालते. तेव्हा त्याला अहंकार होतो कीं मी किती उत्तम यंत्र तयार केले? परंतु जर ते यंत्र बंद करावयाचे साधन त्यामध्ये नसले तर मग तो मनुष्य त्यास कशा तऱ्हेने बंद करणार? आणि चुकीने त्यानेच तयार केलेल्या दाते (gear) असलेल्या यंत्रामध्ये जर त्याचे बोट सापडले तर काय ते मशीन (यंत्र)

त्याची लाज ठेवील काय? ठेवणार नाही. झटकन बोट कापून टाकील. कारण यंत्र भौतिक आहे. तयार करणाऱ्याची सत्ता तेथे उपयोगात येत नाही. त्याप्रमाणेच मनाचे आहे. शरीराच्या परमाणू पेक्षा वाणीचे परमाणू बारीक असतात. त्यापासून वाणी तयार होते आणि त्याच्या पेक्षाही सुक्ष्म परमाणूने मन तयार होते.

## ( ६२ )
## मनाचे प्रकार

मन दोन प्रकारचे आहे. स्थूल मन आणि सूक्ष्म मन. ह्यालाच दुसऱ्या शब्दात, सूक्ष्म मनास भावमन आणि स्थूल मनास द्रव्य मन म्हणतात. कारण मन आणि कार्यमान. भावमन हे कपाळाच्या मध्यावर भुवयां (भवां) च्या तीन इंच दूर असते आणि स्थूलमन हृदयामध्ये असते. स्थूल मनाला पंख असतात म्हणून पुष्कळ लोक म्हणतात कीं माझे हृदय कबूल करत नाही. जरा धसका बसला तर हृदयामध्ये खळबळाट होतो ते द्रव्यमन आहे. द्रव्यमन पूर्ण परिणामकारक (complete effective) आहे, डिस्चार्ज (discharge) स्वरूपात आहे. परंतु भावमन कारण (cause) उत्पन्न करते. ते चार्ज (charge) करते.

भावमन सहेतुक आहे, म्हणूनच नवे बीज त्यात पडते. हेतूवरून भावमन पकडले जाते. परंतु ती हेतू बघण्याची दृष्टी, जेव्हा शुद्धात्मा होतो आणि संपूर्ण नि:पक्षपाती होतो आणि नंतर जेव्हा मनाला पूर्ण निराळे करुन फिल्म सारखी बघेल तेव्हाच भावमन काय आहे ते लक्षात येईल. भावमना पर्यंत तर सर्वाज्ञा- शिवाय कोणीही पोहोचू शकणार नाही. ज्ञानी पुरुष कीं जो सर्वज्ञ आहे. तेच तुमच्या भावमनास बूच मारतात (बंद करतात) म्हणून नवे मन चार्ज होत नाही. यानंतर राहिलेल्याचे परिणाम (effects) बघावयाचे आणि समजून घ्यावयाचे.

हे इंग्रज लोक sub conscious mind आणि conscious mind असे म्हणतात. हे सर्वच स्थूल मन आहे. सूक्ष्म मनाचा एकसुद्धा परमाणू कोणी पकडू शकत नाही. हे तर ज्ञानी पुरुषाचे काम आहे. कारण की ते परमाणू ज्ञानगम्य आहेत.

तुम्हा महात्म्यांना स्वरूपाचे ज्ञान दिले म्हणून तुम्ही मनापासून संपूर्ण मुक्त झालात. तुमचे चार्ज कारणमन मी बंद केले आहे आणि डिस्चार्ज कार्यमनाचा तुम्हास ज्ञाता दृष्टा केले. म्हणून आता तुमच्या मनाची अनंतगुण्या अनंत अवस्था होतात तरी तुम्हीं स्वस्थ राहू शकता तेच ज्ञान आहे आणि ज्या मनाच्या अवस्थेत अस्वस्थ होता तिकडे ते अवस्थित होते. आणि नंतर त्याचे व्यवस्थित होऊन उभे रहाते. तेव्हां परत अस्वस्थ होते आणि असे येणे जाणे चालूच रहाते.

## ( ६३ )
## मन-आत्म्याचा ज्ञेय-ज्ञाता संबंध

आपण अचल आहोत आणि विचार हे विचल आहेत. दोन्ही वेगळे आहेत. ज्ञाता ज्ञेयाच्या संयोग संबंधाशिवाय आपला कोणाशी काहीही संबंध नाही.

म्हणूनच आम्ही सर्वांना सांगतो कीं कोणत्याही तऱ्हेच्या संयोगामध्ये भाव बिघडवू नका. जर अचानक पाहुणा आला तरी भाव बिघडवून देऊ नका. मीठ भाकरी खाण्यास द्या. परंतु तुमचा भाव बिघडवून देऊ नका. मनाला पातळ नका करु.

रागामूळे तर दुसऱ्या माणसाचे मन तुटून जाईल व ते परत कधीही जोडता येणार नाही आणि अनंत अवतारापर्यंत भटकावयास लावील, अशी म्हण आहे, की मन, मोती आणि काच तुटल्यानंतर परत सांधले जात नाहीत.

''मन:पर्यंत ज्ञान'' म्हणजे तिसऱ्या व्यक्तीच्या मनात काय विचार चालत आहेत त्याचा प्रतिध्वनी स्वत:च्या अंतकरणात पडतो ते पहिल्यादा समजते आणि मग हळू हळू स्पष्ट रीतीने स्वत: वाचतो, बघतो आणि ओळखतो, त्यास ''मन:पर्यंत ज्ञान'' म्हणतात.

वीतरागाच्या भाषेमध्ये स्वत:च्या मनास एक-एक पर्यायाने बघतो आणि जाणतो ते 'मन:पर्याय ज्ञान'.

आम्ही जगात 'मनाचे' डॉक्टर आहोत. शरीराचे डॉक्टर ठिकठिकाणी मिळतील परंतु मनाचे डॉक्टर शोधावयास लागतील मनाच्या रोगामूळे शरीराचे आजार उत्पन्न होतात. आम्ही तुमच्या मनाचे सर्वच रोग नाहीसे करू. नवे उत्पन्न होत असताना त्याना अडवून ठेवतो आणि जी तंदुरुस्त (स्वस्थ) प्रकृतिप्राप्त झाली आहे तिला संभाळतो. शेवटी तुमच्या मनाला तुमच्या पासून सुटे करून देतो आणि ''शुद्धात्मा'' रोकडा तुमच्या हातात देतो. नंतर मन तुम्हास त्रास देणार नाही आणि तेच तुम्हास मोक्षपदास घेऊन जाईल, इतकेच नाही तर तेच मन तुम्हास संपूर्ण वश होईल.

## ( ६४ )
## बुद्धिप्रकाश-ज्ञान प्रकाश

सर्व जगाचे, सर्व विषयांचे ज्ञान बुद्धिमध्ये सामावते. फक्त निरहंकारी ज्ञान ज्ञानामध्ये दिसते. जगातील सगळ्या विषयाचे (subjects) ज्ञान असते. परंतु त्यात अहंकार असेल तर ते सर्व बुद्धिमध्ये सामावते. अहंकारी व बुद्धिमध्ये समावते. अहंकारी

व बुद्धिजन्य ज्ञान केव्हा शून्य होऊन जाईल त्याचा भरवसा नाही. भलेभले बुद्धिशाली लोक संयोगाच्या झपाट्यात येऊन बुद्धु झाले. बुद्धिवालेच बावळट होतात.

बुद्धि ही तर अप्रत्यक्ष (indirect) प्रकाश आहे. ती अहंकाराच्या माध्यमा मधून येते. उदाहरणार्थ सूर्याचा प्रकाश छपराच्या कोपरातून येऊन आरश्यावर पडतो. आणि त्यामधून किरणांचे परत प्रतिबिंब पडते.

परंतु ज्ञान हे आत्म्याचा सरळ – direct प्रकाश आहे. पूर्ण प्रकाश आहे. जसे असेल तसे हुबेहुब दाखविते त्याला ज्ञान म्हणतात. बुद्धि परप्रकाशक आहे. स्वयंप्रकाशित नाही. परंतु ज्ञान स्वयंप्रकाशित आहे. स्वतः स्वयंज्योतिर्मय आहे आणि सर्व जगास प्रकाशित करू शकेल इतकी त्याच्यामध्ये अनंत शक्ति आहे. उदाहरणार्थ सूर्य स्वयं प्रकाशित आहे परंतु चंद्र पर-प्रकाशित आहे.

संपूर्ण ज्ञान प्रकाशाच्या पुढे बुद्धि ही तर सूर्याच्या समोर दिव्यासारखी आहे. आमच्याकडे संपूर्ण ज्ञानप्रकाश आहे, म्हणून आमच्याकडे बुद्धि नावास सुद्धा नाही. आम्ही स्वतः अबुध आहोत. आम्हास एक बाजू अबुध पदवी प्राप्त झाली तर दुसऱ्या बाजू सर्वज्ञपद येऊन उभे राहिले. अबुध झाला की तोच सर्वज्ञ होऊ शकतो.

## ( ६५ )
## बुद्धिचे प्रकार

बुद्धि चे दोन प्रकार आहेत. (१) सम्यक् बुद्धि (२) विपरीत बुद्धि.

सम्यक् बुद्धि म्हणजे सरळ वागणारी बुद्धि. समकित होते. त्या नंतरच सम्यक् बुद्धि उत्पन्न होते आणि सरळच दाखविते. जसे आहे तसे दाखविते. थोड्याच लोकांना सम्यक् बुद्धि प्राप्त होते.

विपरीत बुद्धिः- जेथे सम्यक् बुद्धिचा अभाव असतो, त्या ठिकाणी विपरीत बुद्धि अवश्य असते. विपरीत बुद्धि म्हणजे मोक्षाकरिता विपरीत. बुद्धिचा स्वभावच असा आहे की जेणेकरून तुम्ही संसार आणि संसारातच रहाल. त्यामूळे संसाराचा पाया मजबूत करते आणि मोक्षाला जाऊ देत नाही ती विपरीत बुद्धि. बुद्धि संसार अनुगामी आहे म्हणजे संसाराचे हित-अहित पहाणारी आहे. मोक्षाचे नाही.

जशी जशी बुद्धि वाढते तसे तसे असमाधान वाढत जाते. दोन वर्षाच्या मुलाची आई जर मरण शय्येवर असली तर त्याला काहीच वाटणार नाही. ते त्यावेळी हसत खेळत रहाणारे परंतु त्या ठिकाणी दुसरा बीस वर्षाचा मुलगा असला तर त्यास खूपच

दु:ख होईल. त्याची बुद्धि वाढली म्हणून असमाधान वाढेल.

ह्या मजुरांना कधीही चिंता वाटत नाही. ते तर रोज आरामशीर झोपतात. परंतु हे शेठ लोक तर सतत चिंता करीत रहातात. ते रात्री सुद्धा स्वस्थ झोपत नाहीत. असे कशामूळे? बुद्धि वाढली म्हणजे बुद्धिच्या समोर असमाधान त्याच्या समक्ष असते.

बुद्धि असते तेथे "मी करतो, मी करतो" असा गर्व असतोच आणि म्हणूनच चिंता करीत रहातो. बुद्धिच आपणास परमेश्वरापासून वेगळे ठेवते.

श्रीकृष्णभगवानांनी बुद्धिला व्यभिचारिणी म्हटले आहे. ही तर संसारात रखडावयास लावते असे म्हटले आहे.

बुद्धिची जरूर किती आहे? जोपर्यंत ज्ञान प्राप्त झाले नाही तोपर्यंत बुद्धिची जरुरी आहे परंतु ती किती? संसारामध्ये दगडाच्या खाली बोट सापडले गेले असेल तर ते कुशलतेने त्याच्यातून बाहेर काढण्या पुरतीच. आणि परत बोट आत सापडू नये एवढ्या पुरतीच बुद्धि वापरावी. पैसा कमविण्याकरिता किंवा दुसऱ्यास लुवाडण्याकरिता बुद्धि वापरावयाची नसते. ही तर फार मोठी जोखीम समजली जाते.

लक्ष्मी तर पुण्याईने येत असते. बुद्धिचा उपयोग करून येत नसते. या गिरणी मालकांना थोडी सुद्धा बुद्धि नसते. परंतु त्यांच्याकडे लक्ष्मी भरपूर असते. त्यांचा मुनिम बुद्धि वापरतच असतो. मुनिम इनकम टेक्स ऑफीसमध्ये जातो तेव्हा तो साहेब लोकांच्या शिव्या पण खातो. परंतु शेठजी तर मजेमध्ये झोपलेले असतात.

## ( ६६ )
## बुद्धि चा हेतू

प्रत्येक माणसास स्वत:च्या घरातच आनंद वाटतो. झोपडीत रहाणाऱ्यांना बंगल्यात आनंद वाटणार नाही आणि बंगल्यात राहणाऱ्यांना झोपडीत आनंद वाटणार नाही. ह्याचे कारण त्यांच्या बुद्धिचा साठा. जो जसा बुद्धि चा साठा बरोबर घेऊन येतो तसे त्यास फळ मिळते. बुद्धिच्या बरोबर जे आलेले असते त्याचे दोन फोटो पडतात. एक पाप फळ आणि दुसरे पुण्य फळ. बुद्धिची प्रत्येकाने वाटणी केली. शंभर टक्यातील पुष्कळशी बुद्धि मोटर, बंगला, मुलगा, मुलगी, सून ह्या सर्वाकरीता वापरली म्हणून बहुतेक सर्वच पुण्य खर्च झाले आणि बाकी राहिलेले एक दोनच टक्के पुण्य धर्मा करीता वापरले.

दोन चोर चोरी करतात. त्यांच्यातून एक पकडला जातो आणि दुसरा बिंदास्त

सुटून जातो. हे काय दर्शवितात? दाघांच्या बुद्धिमध्ये चोरी करण्याचे निश्चित होते. जो पकडला गेला ते त्याचे फळ उदयास आले आणि वापरले गेले आणि दुसरा सुटला त्यात त्याचे पुण्य वापरले गेले. त्याप्रमाणे प्रत्येकाच्या बुद्धि प्रमाणे जे असते त्याच्यात पाप आणि पुण्य काम करतात. बुद्धिच्या साठ्यांत लक्ष्मी प्राप्त करावयाची आहे, असा साठा केला आहे आणि त्यात त्याचे पुण्य वापरले गेले तर लक्ष्मीचा ढीगचा ढीग होईल. दुसरा बुद्धिच्या साठ्यात लक्ष्मी प्राप्त करावयाची असे घेऊन आला परंतु त्यात पुण्याचा उपयोग होण्या ऐवजी पापाचे फळ समोर आले तर लक्ष्मीजी तोंडच दाखवणार नाही. लक्ष्मी प्राप्त होणार नाही. अरे हा तर इतका चोख हिशोब आहे कीं कोणाचे जरासुद्धा चालणार नाही. तेव्हां हे 'अक्करमी' असे समजतात कीं मी दहालाख रुपये कमविले. अरे ही तर पुण्याई वापरली आणि ती सुद्धा जरा वाकड्या मार्गाने वापरली. ह्यापेक्षा तुझ्या बुद्धिची दिशा फिरव. धर्माच्या दिशेनेच जर बुद्धिचा वापर केला तर चांगले. ह्या जड वस्तु मोटार, बंगला, रेडिओ ह्या सर्वाचे भजन केलेस. तेथे बुद्धिचा उपयोग करण्यासारखे नाही. आत्मधर्माकरीताच बुद्धिचा वापर करा. आता तुम्हास जे प्राप्त झाले आहे ते भले असू द्या. पण आता मात्र बुद्धिची दिशा संपूर्णपणे शंभर टक्के धर्माकरीताच वापरा.

आम्ही आमच्या बुद्धिबरोबर शंभरटक्के धर्म आणि जगाच्या कल्याणाची भावना घेऊन आलो आहोत. दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी आमचे पुण्य वाया गेले नाही. उदाहरणार्थ पैसा, मोटार, बंगला, मुलगा, मुलगी कोठेही नाही बुद्धिच्या हिशोबा प्रमाणेच पुण्य उगवते.

आम्हास जे जे भेटले आणि आमचेकडून ज्ञान घेऊन गेले त्यानी दोन, चार टक्के धर्माकरीता आणि मुक्ती करीता टाकले म्हणून आम्ही भेटलो आम्ही शंभरचे शंभर टक्के धर्मामध्ये टाकले म्हणून सर्वाकडून आम्हास धर्माकरीता अविरोध प्रमाणपत्र (no objection certificate) मिळाले आहे.

## ( ६७ )
## गणपति-बुद्धिचा अधिष्ठाता देव

गणपति हा सर्व गणांचा अधिपति आहे. बुद्धिचा अधिष्ठाता देव आहे. शास्त्र लिहिण्याचा मुख्य अधिकार तर ह्यांनाच आहे. त्यांना कोणात्याही ठिकाणी बुद्धिचा प्रकाश पडणार नाही. असे होणार नाही. म्हणून त्यांच्या बुद्धिमध्ये थोडासुद्धा कच्चेपणा नाही. एवढ्याकरीताच त्यांना सर्व देवामध्ये पहिला देव मानला आहे. कोणतीही पूजा करताना पहिल्याप्रथम गणपति-पूजन करतात. त्यांची पूजा केल्याने बुद्धि विनम्र होते.

भटकत रहात नाही. विपरीत होत नाही. एका महिन्यात जर दोनच अडचणी आल्या असल्या तरी रोज भिती वाटते हीच विपरीत बुद्धि. अशा बुद्धिला विभ्रम होत नाही. विपरीत होत नाही. एवढ्याकरीता जगाच्या पतिला म्हणजे गणपतिला पूजेमधे पहिले स्थान असते. परंतु समजल्याशिवाय पूजा केली जाते. म्हणून फळ पाहिजे तसे मिळत नाही. समजून जर पूजन केले तर फारच चांगले फळ मिळते.

गणपति बुद्धिच्या अडचणीतून निघून गेलेला देव आहे. म्हणून त्याची समजूत करून पूजा केली तर बुद्धिचा भ्रम नाहीसा होतो आणि सद्‌बुद्धि प्राप्त होते.

## ( ६८ )
## बुद्धिजन्य अनुभव तसाच ज्ञानजन्य

ज्यानी आईस्क्रीम खाल्लेच नाही, त्याला अंधारात आईस्क्रीम दिले तर तो कल्पना करित राहिल की, आईस्क्रीम हे थंडगारच गुणधर्माचे असेल का? दुधाचा गुणधर्म असाच थंडगार असेल का? इलायची सुद्धा थंड गुणधर्माची असेल का? परंतु आईस्क्रीम आणि त्याच्या आतील वस्तुंना जर निरनिराळे बुद्धिजन्य अनुभव असतील आणि दरएक वस्तुच्या गुणाच्या आधाराने वेगवेगळे ओळखत असेल तर आईस्क्रीम का थंड आहे ते कळेल. हे बुद्धिजन्य अनुभवाने जाणले जाते. बुद्धितत्त्व जर संसारामध्ये इतके काम करते, तर आत्मतत्व किती काम करेल ह्याची कल्पना येईल. हा तर प्रत्यक्ष स्पष्ट प्रकाश आहे.

ज्ञान प्रकाश दिल्यानंतर आम्ही सर्वाना, बुद्धिला पेन्शन घ्यावयास सांगतो सर्व जगास बुद्धिची जरूर आहे. ती त्यांच्यावर अवलंबून आहे. परंतु स्वरूप ज्ञान असे आहे की, बुद्धिची त्यास जरूर (आवश्यकता) नाही. आम्ही बुद्धिला लबाड म्हणतो. तिचे कधीसुद्धा ऐकू नका. तिला तर सांगून द्या की "अहो बुद्धिताई तुम्ही मला जन्मभर त्रास दिलात, ताई आता तुम्ही जा माहेरी खुशाल जा. ज्यांना तुमची आवश्यकता आहे, त्यांच्याकडे जा. आम्हास तुमची आता आवश्यकता नाही." म्हणून आता बुद्धिस पेन्शन देऊन पाठवा. बुद्धिपाशी तंटाकरून तिला पाठवू नका. बुद्धिला असे वाईट वागवले तर हा मोक्ष प्राप्त होणार नाही. म्हणून तिला नीट समजावून पेन्शन देऊन जाऊ द्या. पेन्शन म्हणजे आश्वासन.

जर तुम्हास मोक्षास जावयाचे असेल तर बुद्धिचे जरा सुद्धा ऐकू नका. बुद्धि तर अशी आहे की, ज्ञानी पुरुषाचे सुद्धा वाकडे दाखविल. अरे ज्यांच्या पासून तुम्हाला मोक्ष प्राप्त होणार आहे, त्यानाच तुम्ही वाईट म्हणणार तर निश्चितच मोक्ष तुमच्या पासून अनंत अवतार दूर राहील.

बुद्धिच संसारामध्ये तकरार निर्माण करते. अरे एका बायकोच्या मताने चालले तरी सुद्धा लक्ष्मीचा नाश होतो. अडथळा येतो. तरीपण ही तर बुद्धिताई ! तिचे जर ऐकले तर तुम्ही कोठल्या कोठे फेकले जाल. अरे रात्री दोन वाजता उठवून बुद्धिताई वाकडे दाखविते. बायको तर ठराविक वेळेसच येते. परंतु बुद्धिताई तर एकसारखी जवळ आणि जवळच रहाते. ती बुद्धि तर तुम्हाला पदावरून पदच्युत– हाकलून देईल.

एका हिरा पाच अब्जाचा आहे. आणि तुम्ही जर शंभर जव्हेरीस किंमत आकारावयास सांगितली, तर सर्वच निरनिराळी किंमत सांगतील कारण प्रत्येक जण आपापल्या बुद्धि प्रमाणे किंमत करतो. अरे हिरा तर तोच आहे आणि किंमती का वेगवेगळ्या? प्रत्येकाच्या बुद्धिमध्ये फरक आहे म्हणूनच सांगतो की, हा ''ज्ञानावतार'' तुमच्या बुद्धिच्या भाषेत येणार असे नाही म्हणून मोजमाप करू नका.

ज्ञानी पुरुषाचे बुद्धिने मोजमाप करण्याचा प्रयत्न करू नका. ज्ञानी पुरुषाचा तर एक एक अवयव आणि त्याचे दिव्यकर्म पूजन करण्यासारखे आहे. त्याच्या जवळ बुद्धि वापरणे योग्य नाही. हा ज्ञानी पुरुष तर देहधारी आहे परंतु आत तर अजब तऱ्हेने अहर्निश जागृतरूप आहे. तुम्हास जे काही दिसत आहे तो हा देहधारी ज्ञानी पुरुषाचा नाटकाचा भाग आहे. आम्ही संपूर्ण नाटकी भाषेमध्ये रहातो. आम्ही अबुध आहोत. अबुधच्या संगतित अबुध होता येईल.

जगांतील लोकांचे काम बुद्धि चालविते. परंतु ज्ञानी पुरुषाची कामे ''व्यवस्थितशक्ति'' चालविते. म्हणून त्याच्यामध्ये अडचणी होत नाही.

बुद्धि काय आहे? ती तर पूर्वीच्या आयुष्याचा तुमचा दृष्टीबिंदु (view point) आहे.

उदाहरणार्थ**:**– तुम्ही राजमार्गावरून जाताना पहिल्या मैलावरचा अमुक दृश्य दिसते. त्यावर बुद्धिने सही केली की, आपल्याला असेच असेल तर बरे असे वाटते, म्हणून पहिल्या मैलाचा दृष्टीबिंदु नक्की होतोच. नंतर जेव्हा तो पुढे जातो आणि दुसऱ्या मैलावर येतो तेव्हा त्याला निराळेच दिसते. सर्वच दृष्टी बदलून जाते. तेव्हा दृश्याच्या हिशोबाने आपल्याला असेच पाहिजे ह्याप्रमाणे बुद्धि परत सही करते. परंतु मागचा दृष्टीबिंदु विसरू शकत नाही म्हणून तो पुढे आणि पुढे जातो. जर मागील दृष्टीबिंदुचा अभिप्राय न घेतला तर हरकत नाही. परंतु तो घेतल्या शिवाय चालत नाही. अभिप्राय पुढे येऊन उभाच रहातो. ह्यास आम्ही पूर्वीचे ज्ञान दर्शन म्हणतो कारण बुद्धिने सही, शिक्का करून दिला आहे, म्हणून आत मतभेद होतो आमची बुद्धि व तुमची बुद्धि ती मागील जन्माचा तुमचा दृष्टीबिंदु आहे. आणि आजचा दृष्टीबिंदु हा तुमच्या पुढील

जन्माची बुद्धि होते आणि असे चालूच रहाते.

चोर चोरी करतो तो त्याचा दृष्टीबिंदु आहे. तो मागील जन्माच्या बुद्धिने शिक्का मारून टाकला आहे म्हणून ह्या जन्मात चोरी करतो आणि जर चांगल्याची संगत मिळाली तर परत त्याचा दृष्टीबिंदु बदलतो आणि असे नक्की करतो की चोरी करणे हे खोटे आहे, वाईट आहे, म्हणून मागील जन्माचा दृष्टीबिंदुच्या आधाराने ह्या जन्मात तो चोरी तर करतो. परंतु आताचा त्याचा दृष्टीबिंदु चोरी करू नये असा झालेला आहे. म्हणून पुढील जन्मी चोरी करू नये अशी बुद्धि त्याला प्राप्त होते.

## ( ६९ )
## मतभेद कशामूळे?

काही लोकांशी मतभेद होतो. तो कशामूळे होतो? प्रत्येकाचा निरनिराळा दृष्टीबिंदु असतो त्या मूळे प्रत्येक जण निरनिराळ्या तऱ्हेनी पाहतो. चोर चोरी करतो तो त्याचा दृष्टिबिंदु आहे. तो स्वत: चोर नाही. कोणाच्या दृष्टिबिंदुला चूक म्हणणे म्हणजे त्याचा आत्म्याला खोटे म्हणण्या सारखे आहे. कारण त्याच्या विश्वास त्यांच्यात आहे. म्हणून तर त्यालाच चेतन मानतो. म्हणून चेतनने खोटे सांगितले असे बोलले जाते. त्याच्या दृष्टिबिंदु प्रमाणे ते खरे आहे. कारण जोपर्यंत अज्ञान आहे, तो पर्यंत दृष्टीबिंदु त्याचा आधार आहे. ज्ञान मिळाल्यावर अज्ञान आणि दृष्टी बिंदु निराधार होतात.

आम्ही कोणालाही तू खोटा आहेस, असे बोलत नाही. चोराला सुद्धा तू खोटा आहेस असे बोलत नाही. कारण त्याच्या दृष्टीबिंदुने तो खरा आहे. आम्ही त्याला चोरी केल्यावर फळ काय मिळते ते तसेच्या तसेच समजावून सांगतो.

जगांतील सर्व माणसे सद्‌बुद्धि आणि दुर्बुद्धि ह्यांच्यातच निमग्न असतात. सद्‌बुद्धि ही शुभ दाखविते दुर्बुद्धि ही अशुभ दाखविते. एकंदर तर दोन्ही प्रकारची बुद्धि संसारानुगामी आहे, म्हणून आम्ही तिला विपरीत बुद्धि असे म्हणतो. विपरीत बुद्धि घेणारा (वापरणारा) आणि देणारा (शिकवणारा) दोघांचेही अहित करते. परंतु सम्यकबुद्धि असणारा आणि देणारा दोघांचे हितच करते.

बुद्धि तर जबरदस्त मार खावयास लावते. एखादा कोणी मनुष्य घरी आजारी पडला असेल आणि बुद्धिने दाखविले की हा मरून जाईल तर? सर्व रात्र बुद्धि त्याला रडावयास लावते.

वाणिया लोकांत बुद्धि पुष्कळ असते. त्यामूळे त्यांचे फारच नुकसान होते. वाणिया बुद्धिमूळे तर मोक्ष मार्ग दूर जातो. मोक्षास जाणे हे शूरवीरांचे काम आहे, क्षत्रियांचे

काम आहे. आत्मा तर वर्णाने निराळा आहे. परंतु प्राकृत गुण त्याला पेचात टाकतात. उलटे सुलटे दाखवितात. क्षत्रिय तर जबरे असतात. चोवीस तीर्थंकर क्षत्रिय होते. क्षत्रियांना तर जेव्हां मोक्षाची आवड उत्पन्न होते तेव्हां ते संसाराच्या वस्तुकडे ढुंकुन सुद्धा पहात नाहीत. परंतु वाणिया तर जेव्हा त्यांना मुक्तीचा भाव उत्पन्न होतो तेव्हा सुद्धा ते संसाराच्या वस्तुचा विचार करतात. वणिक बुद्धि तर लक्षात ठेवण्या सारखी आहे. तिच्या पासून जागृत रहावयास पाहिजे. मोक्ष मार्गासाठी वणिक बुद्धि पुष्कळ पेचात टाकते.

वाणिया लोकांची लोभाची ग्रंथी फार मोठी असते आणि ती तर दिसत सुद्धा नाही. परंतु क्षत्रियाची तर अस्थिर असते. जिकडे तिकडे क्षात्रवृत्ति दाखविते. परंतु ती तर मार खाल्यावर ठिकाणावर येते. परंतु वाणियाला ठिकाणावर आणणे फार कठिण आहे.

क्षत्रिय देवळांत पैसे टाकण्याकरितां खिशांत हात घालतात. जितके पैसे खिशांतून निघतांत तितके सर्व ते पेटीत टाकतात. परंतु वाणिया तर घरून निघते वेळी नक्की करतो व रस्त्या मध्ये एखाद्या दुकानात पैसे सुटे करून घेतो आणि प्रत्येक देवळात पाच किंवा दहा पैसे टाकतो. जेव्हा भाव होईल तेव्हा वाणिया बुद्धिचा उपयोग करतो.

पैसा वैसा काय आहे? पूरण (भर) आणि गलन (झीज) आहे. पूरण झाले तर गलन होणारच. हे सगळे हिशोबी काम आहे. ह्यामध्ये लोक बुद्धिचा उपयोग करतात. आडकाठी करतात. हे तर पूरण आणि गलन ह्यातच शक्ति वाया घालवितात. पैसा तर बँकेतील शिल्लक आहे. हिशोब आहे. नक्की झालेले आहे. लोक पैसा कमविण्याकरिता बुद्धि वापरतात आणि स्वत:चे लक्ष दुसरीकडे वापरले जाते आणि पुढील आयुष्य खराब होते.

हे लोक आणखी चलाखी (trick) करण्याचे शिकले आहेत. चलाखी म्हणजे दुसऱ्या कमी बुद्धिच्या माणसाचा गैरफायदा घऊन स्वत:च्या जास्त बुद्धिने दुसऱ्या माणसाला फसवून त्याचे हिरावून घेतो. तो चलाखीवाला फार चलाख असतो. दुसरा, चोरसुद्धा चपळ असतो. चलाखीवाला, तो तर भयंकर अधोगतिला जातो.

वणिक् बुद्धिवाला बुद्धिचा असा उपयोग करतो की, स्वत: पुरतेच सांभाळतो शेजाऱ्याचे बघत नाही. तो व्यवहारामध्ये चांगला कसा दिसणार? बुद्धिच्या कुंपणामूळे हा तर स्वत:च्याच बाजूला दृष्टी टाकतो. स्वार्थ आणि स्वार्थातच रहातो. तो स्वार्थाकरिता वाटेल ते करावयास तयार होतो. जर त्यास न्याय करावयास सांगितला, तर त्यामध्ये समोरच्या माणसास सुख होईल किंवा दु:ख होईल हे बघत राहील. म्हणजे न्याय असा

करील की समोरच्या माणसास वाकडे लागणार नाही. तो समोरच्या माणसास वाईट वाटू नये म्हणून खोटे बोलेल आणि खोटा न्याय देईल. परंतु परमेश्वर तर आत बसलेला आहे. तो बघणार की ह्यानी दोन्ही बाजूला पडदा ठेवला आहे. अरे नक्की सरळ बोल. कडू लागणार नाही असे खरे बोलावे. परंतु हा पडदा ठेऊन निराळा न्याय करतो. ती भयंकर जोखीम आहे. दुसरा खोटा असला तर त्यास खरा ठरविणे ही तर फार मोठी जोखीम घेतली असे म्हणतात. जसे आहे तसे सांगितले पाहिजे.

हे सर्व कशामूळे झाले आहे, तर तो सांगतो की दुसऱ्या माणसाला दिसत नाही तोपर्यंत तो स्वार्थामध्ये रहातो. संसारात शांति राहील एवढ्यासाठीच करतो. जर वाईट संग्रह केला तर मोक्षास जाताना तो माल त्याच्या बरोबर येईल आणि त्याचा त्याला फार त्रास होईल आणि सरळ रीतीने मोक्षास जाऊ देणार नाही.

हे वणिक् बुद्धिवाले तर कोणत्याही प्राण्यास मारत नाहीत आणि कोणाच्या खिशामधून काढून घेत नाहीत. त्यांनी स्थूल चोरी आणि ठोकळ हिंसा बंद केली आहे. परंतु सूक्ष्म चोरी आणि सूक्ष्मतम चोऱ्या ठोक मार्गानी चालूच असतात. स्थूल चोरी करणाऱ्यांची जात उच्च ठरते. सूक्ष्म चोरी करणाऱ्यांची जात उच्च ठरत नाही. हा चलाखी करणारा तर घरात बसला असेल परंतु अशी सर्व सूक्ष्म यंत्रे त्यानी एकत्र केलेली असतात की, बिचाऱ्या शेतकऱ्यांची हाडके आणि  चामडीच राहील व रक्ताचा थेंब आणि थेंब चलाखी करणारा शोषून घेईल. भगवंताने ह्यास सूक्ष्म हिंसा म्हटली आहे. बंदुकीने मारणाऱ्याचे उपाय आहे पण ट्रिकबाज चे उपाय नाही. असे परमेश्वराने सांगितले आहे.

बंदुकीने मारणारा तर नरकात जाऊन परत ठिकाणावर येईल आणि मोक्षाचा रस्ता शोधून काढेल परंतु चलाखी करणारा तर संसारात आणि संसारातच जास्त गुरफटला जातो लक्ष्मीचे ढीग होतील आणि परत दानधर्म करीत राहील त्यामूळे बी पडतच राहील आणि संसार चालू आणि चालूच राहील. ह्याला चमकणारी चलाखी (polished tricks) म्हणतात.

ज्ञानी माणसामध्ये एकसुद्धा चलाखीचा माल नसतो. वणिक् बुद्धिचा आधार चलाखीवर असतो. ह्यापेक्षा न करता आले तर बरे. मी ज्ञानी होण्यापूर्वी लोकाना अशी चलाखी शिकवीत होतो. त्याचे कारण समोरचा मनुष्य फसून गेला असल्या कारणाने माझ्यामध्ये करुणा उत्पन्न होत असे. परंतु मग तर मी तेही बंद केले. चलाखी असता कामा नये. खरेपणाने व्यवहार करावा. मनाने, शरीराने, आणि वाचेने एकच असले पाहिजे. त्यांत बदल  होता कामा नये.

हे घड्याल तुम्ही ९० रुपयांस विकत घेतले आणि ११० रुपयांस विक्रिस काढले. परंतु चलाखी करून असे म्हणता कामा नये की, मी ते ११० रुपयांस विकत घेतले आहे आणि ते ११० रुपयांस विकतो. तर मग स्पष्ट सांगा की, हे मी ९० रुपयांस विकत घेतले आहे आणि ते मला ११० रुपयांस विकावयाचे आहे. जर त्या माणसास घ्यावयाचे असेल तर तो ११० रुपयांस विकत घेईल. 'व्यवस्थित' असे आहे की, ११० रुपये तुम्हाला मिळणारच. तुम्ही चलाखी का करता आणि जोखीम का घेता? चलाखीचे फळ अधोगति आहे.

लक्ष्मीजी कशामूळे अडवली जाते? हा एकसारखा चलाखी वापरतच असतो म्हणून चलाखी करण्याची संवय लागली आहे. नाहीतर वणिक तर व्यापार करतो. शुद्ध व्यापार करतो. ह्याला नोकरी करावयाची असते का?

## ( ७० )
## सरळ व्यापार करा

आम्ही तुम्हाला परमहिताचे सांगत आहोत. चलाखी वापरावयाची बंद करा. खऱ्या इमानदारीने व्यापार करा. ग्राहकाला स्पष्ट सांगून टाका की बाबा, ह्यामध्ये मला पंधरा टक्के फायदा घ्यावयाचा आहे. तुम्हास पाहिजे असेल तर माल घेऊन जा. परमेश्वराने काय सांगितले आहे? जर तुला तीनशे रुपये मिळावयाचे असतील, तर तू चोरी केलीस, किंवा चलाखी केलीस किंवा सरळ इमानदारीने धंदा केला तरी तुला तितकेच मिळतील. ह्याच्यामध्ये एक पैसा सुद्धा कमी जास्त होणार नाही. तेव्हां चोरी आणि चलाखी ह्याची जोखीम कशाकरीता घेतोस? थोडे दिवस न्यायाने धंदा करून बघ. सुरवातीला सहा किंवा आठ महिने अडचण पडेल. परंतु नंतर पहिल्या दर्जाचा (अगदी उत्तम) धंदा चालेल. लोकसुद्धा समजतील की ह्या माणसाचा धंदा चोख आहे. भेळसेळ करीत नाही. ग्राहक न बोलविता आपणहून तुमच्याच दुकानात येईल. ते 'व्यवस्थित' च्या ताब्यात असतात. परंतु अक्करमी आपल्या जागेवर बसून आता ग्राहक येईल तर चांगले असा विचार करीत राहील. तो स्वत:चे ध्यान बिघडवितो.

जर मनामध्ये असे नक्की केले असले की मला तर चोख, भेळसेळ न करता धंदा करावयाना आहे तर तसा मिळत जाईल. भगवंतांनी सांगितले आहे की खाण्याच्या वस्तुमध्ये, सोन्यामध्ये जर भेळसेळ केली तर तो भयंकर गुन्हा आहे.

कच्छी लोकांना चलाखीचा भयंकर रोग आहे. हे तर वाण्याला सुद्धा फसवून टाकतील. हल्ली तर चलाखीवाल्या लोकांमध्येच रहावे लागते. अशी परिस्थिती आहे.

तरीपण आपण चलाखीमधून कधी सूटून जावु हेच सतत लक्षात ठेवले पाहिजे. ह्या विचारात असलात तर पश्चातापाच्या मोठ्या जबाबदारीतून सुटून जाल. आणि असा संयोग प्राप्त होईल कीं, तुम्हास एक सुद्धा चलाखी वापरावी लागणार नाही. धंदा उत्तम चालेल आणि लोक तुमच्या धंद्याची वाखाणणी करतील.

जर आपणास मोक्षास जावयाचे असेल तर ज्ञानीने सांगितल्या प्रमाणे करावे लागेल आणि जर मोक्षास जावयाचे नसेल तर हल्लीच्या काळास अनुसरून चालावे. परंतु मनामध्ये इतके पक्के समजा की मला असला चलाखीचा धंदा करावयाचा नाही, मग त्याप्रमाणे धंदा मिळून जाईल. व्यापारामध्ये तर असे असले पाहिजे की जरी एखादा लहान मुलगा आला तरीसुद्धा त्याच्या आई वडिलांना भीती नाही वाटणार की तो व्यापारी आपल्या मुलास फसवील.

## ( ७१ )
## लक्ष्मीजी कोणत्या कारणाने कमी होते?

लक्ष्मीजी कशामूळे कमी होते. चोरीमूळे? ज्या ठिकाणी मन, वचन आणि काया यांची चोरी होत नाही, त्याठिकाणी लक्ष्मीजी चैन करते. चोरी करण्यामूळे लक्ष्मीजी दूर जाते.

पैसा कमविण्यास अक्कल वापरावयास लागत नाही. अक्कल तर लोकांचे भले करण्याकरिताच वापरावायाची असते.

ज्ञान घेतल्यामूळे आपण प्रकांशात येतो की काय केले असताना स्वतः सुखी होतो आणि काय केल्यामूळे दुःखी होतो? अक्कलवाले तर चलाखी वापरून बिघडवून टाकतात.

चलाखी हा शब्दच शब्दकोशामध्ये असू नये. 'व्यवस्थित'चे ज्ञान कशाकरिता दिले आहे? व्यवस्थितमध्ये जे होते ते भले होऊ द्या. अकराशे रुपये नफा झाला तरी, भले होऊ द्या आणि नुकसान झाले तरीपण भले होऊ द्या. ही तर 'व्यवस्थित'च्या हातामध्ये सत्ता असते. आपल्या हातामध्ये सत्ता नसते. जर आपल्या हातामध्ये सत्ता असती तर कोणीही डोक्यावरचे केस पांढरे होऊन दिले नसते. कोणती तरी चलाखी शोधून काढली असती आणि केस कायमचे काळेच ठेवले असते.

चलाखी न करणारा मनुष्य सरळ वाटेल. त्याचे तोंड बघितले तरीसुद्धा आपण खुश होऊ. परंतु चलाखी करणाऱ्याचा चेहरा तर भारी आणि गंभीर दिसतो जणुकाही एरंडेल प्यायले आहे असा दिसतो. स्वतः 'शुद्धात्मा' झाल्यानंतर हा सर्व माल चोख

करावा लागेल ना? जितके घेतले तितके द्यावयास लागेलच ना? चालाखीने भरलेला माल मार खाऊन सुद्धा द्यावयास लागेलच ना? म्हणून आम्ही सांगतो की– ''Honesty is the best policy and dishonesty is the best foolishness''. प्रामाणिकपणा हे सर्वोत्कृष्ट नीति आहे आणि अप्रामाणिकपणा हा उत्तम गाढवपणा आहे.

## ( ७२ )
## बुद्धिक्रिया आणि ज्ञानक्रिया

जे जे अशुद्ध, अशुभ शुभ समजतो ती बुद्धिची क्रिया आहे. ज्ञानक्रिया नाही. ज्ञानक्रिया तर फक्त शुद्धालाच बघते आणि जाणते. बुद्धि ज्ञेयला ज्ञाता म्हणावयास लावते. 'मी चंदुलाल आहे' हे ज्ञेय आहे. त्यालाच ज्ञाता बनविते. ती बुद्धि आहे. ह्याच्यामध्ये अहंकार मिळालेलाच असतो. तो ज्ञेयला ज्ञाता मानतो. बुद्धिक्रियेलाच ज्ञानक्रिया मानली तर मग मोक्ष कसा अनुभवला जाणार?

बुद्धिने कितीही उड्या मारल्या तरी बुद्धिला ज्ञेय आणि ज्ञाता निरनिराळे पहाण्याची शक्ति नाही, कारण बुद्धि स्वत: ज्ञेय स्वरुप आहे म्हणून रीयल सत्य पाहू शकत नाही.

जगाचा आदि अंत नाहीच. ह्या बाबतीत सर्वांनी बुद्धिचा उपयोग करून अडथळा आणला हे माहीत करून घेण्यामध्ये तुझा काय फायदा होईल? हे जग अनादी अनंत आहे. गोलाकार आहे. गोलामध्ये आदि कसला आणि शेवट कसला? अनादि अनंत आहे ते तू जेव्हा बुद्धिपासून निराळा होऊन ज्ञानी होशील तेव्हा आपोआप समजू शकशील.

स्वच्छंद म्हणजे बुद्धिभ्रम. स्वछंदाने तर स्वत:, स्वत:चे भयंकर अहित करीत राहिलो आहेत. स्वत: स्वत:च्या समजुतीप्रमाणे चालत रहातो तो स्वछंद. मग तो शुभ किंवा अशुभ कार्यामध्ये असो किंवा शास्त्र वाचण्यामध्ये असो. जर एक वाकडी समजूत शास्त्र वाचताना उत्पन्न झाली तर अनंत अवतार भटकण्याचे साधन उत्पन्न होते. म्हणून सावध रहा.

जिकडे विपरीतबुद्धि सुरू झाली तिकडे 'you are whole and sole responsible for that' 'तुम्हीच त्याला संपूर्ण जबाबदार आहात'– मग तेथे भगवान सुद्धा मध्ये पडणार नाहीत. विपरीतबुद्धि तर देणाऱ्या आणि घेणाऱ्या असे दोघांना दु:खी करते.

बुद्धि दोन जातीची असते. आतील आणि बाहेरील. हिदुस्तानमधील लोकांची

अंतरबुद्धि असते. आणि परराष्ट्रातील लोकांची बाहेरील बुद्धि असते. अंतरबुद्धिवाले जास्त दु:खी असतात. कारण बुद्धिची जास्त वाढ झाली असते की, दु:ख वाढते. बाहेरची प्रजा साहजिक आहे. परंतु हिंदुस्तानी लोक तर कित्येक बाबतीत साहजिक आहेत आणि कित्येक बाबतीत विकल्पी आहे. इथे आध्यात्म पेक्षा अंतरबुद्धिच कामास येते.

ही बुद्धि बाहेर शोधाशोध करते. बाहेर तर काटे आहेत. आत शोधाशोध केली तर फायदा आहे. लोकांची बुद्धि सतत बाहेर फिरत असते. ती नंतर थकून जाते. नेहमी आतच फिरेल अशी बुद्धि मी देईन. मग त्याचे काम होईल. तुमची बुद्धि विपरीत आहे. ती सुखाला काढून टाकते आणि दु:खाला आमंत्रण करते. तुम्ही सुख आणि दु:खाला ओळखू शकत नाही.

बुद्धि तर वाकडेच दाखविते जडामध्ये सुख हे अस्थायी आहे. त्यास बुद्धि ग्रहण करते. खरे पाहिले तर वस्तुमध्ये सुख किंवा आनंद असतच नाही. नव्या मोटारीवर कोणी चार रेघोटे ओढले तर? खड्डे पडले तर. जे सुख बुद्धि ग्राह्य आहे. ते तर शेवटी दु:ख परिणामी आहे. वस्तुच्या आकर्षणामूळे बुद्धि तर त्याच्यावर सुखाचे आरोपण करते. पुष्कळ वस्तु आहेत, स्वत:च्या सुखास शोधण्याकरिता एक एक वस्तुची चव घेतो आणि प्रत्येक प्राणी नक्की करतो की, कोणाच्या प्रभावाने हे सुख उत्पन्न झाले आहे? ते शोधण्यास तो बाहेर निघाला. पहिले हे नक्की केले पाहिजे की, पैशामध्ये सुख आहे. त्या पैशाच्या प्रभावामूळे सुख मिळते. परंतु नंतर तो त्याच्या मागे लागून वेडा होतो व फिरत राहून दु:खी होतो. नंतर दुसरे नक्की करतो की, स्त्रीमध्ये सुख आहे. स्त्रीने पुरुषास व पुरुषाने स्त्रीस असे नक्की करून सेक्स आणि पैसा हे दोन शोधून काढले. ह्या दोन वस्तुनीच सुख मिळते, असे नक्की केले. परंतु बायको भांडण करण्यास आली तर दु:खाचा वणवा प्रगट होतो. पैसा वाकडा झाला तर काय? इन्फोर्समेन्ट डिपार्टमेंट वाले धाड घालणाऱ्यांनी जर धाड पाडली तर हाच पैसा तुमच्या दु:खास भयंकर कारण होईल.

## ( ७३ )
## बुद्धिभेद तेथे मतभेद

हल्लीच्या जगांत घरांत जरी तीन माणसे असली तरी, संध्याकाळ झाली की त्यांच्यामध्ये ३३ मतभेद होतात. तर त्याचा निकाल कसा लागणार? तसेच शिष्य आणि गुरु ह्या दोघांमध्ये संध्याकाळपर्यंत कित्येक मतभेद होतात. तर ह्याचा शेवट कसा होणार. जेथे भेद आहे तेथे मतभेद अवश्य होणारच. जर अभेदबुद्धि उत्पन्न झाली तर

कामच होऊन जाईल. स्वत: नि:पक्षपाती झाल्यावर मध्ये बसून सर्वांना निर्दोष पहाणार. बुद्धिने वाकडे दाखविले तर ताबडतोब आपण सम्यकबुद्धिला सांगावयाचे की जा, निर्णय घेऊन ये म्हणजे ती निर्णय घेऊन येईल.

आत्मा भ्रमित झाला म्हणजे संसार सुरु झाला. आणि बुद्धि भ्रमित झाली की ज्ञान प्रगट होते.

मी कोणाचीही बुद्धि बघत नाही. मी तर त्याची समजण्याची शक्ति पहातो. बुद्धि जर तीनशे ठिकाणी वाकडी असेल परंतु जर समज योग्य असेल तर हरकत नाही. बुद्धिवाला तर बुद्धिमूळे उंच चढतो आणि परत खाली सुद्धा पडतो. परंतु समजणारा, दर्शनवाला उंच उंच चढेल, थेट टोकापर्यंत परंतु पडणार तर निश्चित नाही. बुद्धि हा प्राकृत गुण आहे. स्वत:चा गुण नाही. दर्शन हा स्वत:चा गुण आहे.

जास्त पित्तवाल्याला जास्त बुद्धि असते आणि वातवाल्याला समजुत जास्त असते.

सर्वच बुद्धिच्या कल्पनेने तयार झालेले आहे. लौकिक आहे. सर्वच धर्मामध्ये जी जी कल्पना आली ती शास्त्रामध्ये लिहिली. शास्त्र हे बुद्धिजन्य ज्ञानच आहे. ह्यामध्ये चेतन मिळणार नाही. परंतु ज्ञान हे स्वयंप्रकाशित आहे आणि ते ज्ञानी पुरुषाच्या हृदयामध्येच आहे. बुद्धिचे पर्याय आहेत. तिची बोधकता अपार आहे. बुद्धि ही अवस्थेला स्वरूप करून घ्यायला फिरते म्हणून आम्ही सांगतो की, बुद्धिपासून सावध रहा. बुद्धि दाखविते त्यावेळेस 'दादा'ची आठवण काढून सांगा की, 'मी वीतराग आहे'. नंतर बुद्धिताई बसून जाईल (गुपचुप राहील).

ज्ञान कोणाचीच चूक काढीत नाही. बुद्धि सर्वांचीच चूक काढते. बुद्धि तर सख्या भावाची सुद्धा चूक काढते. आणि ज्ञान तर सावत्र आईची सुद्धा चूक काढत नाही. सावत्र आई असली आणि मुलगा जेवावयास बसला व तिने भांड्याच्या तळाला असलेली करपलेली खिचडी जर वाढली तर बुद्धि उभी रहाते व सांगते की, ही सावत्र आईच वाईट आहे आणि तो मुलगा आतल्याआत जळफळत रहातो. परंतु ज्या मुलास ज्ञान मिळाले आहे त्याचे ज्ञान ताबडतोब हजर होते आणि सांगते की, "अरे हा शुद्धात्मा आणि मी सुद्धा शुद्धात्मा आहे आणि हा तर पुद्‌गलचा खेळ आहे." म्हणून निकाल होतो. (समजण्यात येते.) शरीर तर मातीचे तयार झाले आहे आणि बुद्धि तर तेजाची बनली आहे. ती प्रकाश पण देते आणि चटकेपण देते. म्हणून आम्ही बुद्धिला लबाड म्हणतो. 'अबुध' होण्याची जरूर आहे. बुद्धि तर माणसाचा above normal करते आणि कधी कधी त्याला below normal एकदम खाली आणते. जगामध्ये दर एक वस्तु

सर्व सामान्यपणामध्ये normality पाहिजे. अबुध झाल्याशिवाय सर्व सामान्यपणा normality कधीही येणार नाही.

आम्ही 'अबुध' आहोत. निराग्रही आहोत. सर्व सामान्यपणा normality मध्ये आहेत. माझ्या एका केसातच सर्व जगाच्या ज्ञानाचा समावेश झाला आहे. (सर्व ठिकाणी देहात आत्मा जागृत आहे).

ज्याची बुद्धि कमी असते त्याचे हृदय कोमळ असते. ते काम काढावयाचे असेल (मोक्ष मिळवावयाचा असेल) तर मिळवेल. आणि नाही तर उलटपण करेल. आठवड्यात एक रविवारी, एकच दिवस जर बुद्धिचा उपयोग केला नाही तर ती काम काढून टाकील (मोक्षात ठेवेल). पुढील जन्माकरिता जर बी पेरावयाचे असेल तर बुद्धिचा उपयोग करा. बुद्धिप्रकाश जास्त करण्याचे तुझ्या हातात नाही. परंतु मंद (dim) करण्याचे तर तुझ्या हातात आहे, म्हणून बुद्धिचा प्रकाश मंद (dim) ठेव. बुद्धि सामुदायिक हितकारी नसते. ज्ञान सामुदायिक हितकारी असते.

## ( ७४ )
## अवधानाची शक्ति

खोट्या बुद्धिच्या लोकांना द्वेष जास्त असतो. ज्याच्या बुद्धिची वाढ झाली आहे त्याच्यामध्ये द्वेष नसतो. आपण जर संग्रहालय बघावयास गेलो तर कोणत्याही वस्तुवर द्वेष करतो का? कुसंग म्हणजे बुद्धिचा खटाटोप, असा खटाटोप करतो आणि तसा खटाटोप करतो.

अवधान मर्यादित (limited) आहे. ते बुद्धिच्या शक्तिवर अवलंबून आहे. प्रत्येक मनुष्याने स्वतःच्या बुद्धिच्या आशयात जो माल भरून आणला आहे, तोच माल ह्या जन्मात बाहेर निघेल. त्याशिवाय दुसरे काहीच होणार नाही. ह्या हिंदुस्तानातील चोर, चोरी करते वेळी सोळा गोष्टी एकाच वेळी लक्षात ठेवतात. चोर चोरी करण्याच्यावेळी काही एक न खातापिता चोरी करण्यास जातो. त्यामूळे त्याची सावधगिरीची शक्ति वाढते. तो चोरी कोठे करावयाची आहे? कोणत्या ठिकाणावर करावयाची आहे? कोणत्या वेळी करावयाची आहे? पोलीस कोठे आहे? पाकीट कोणत्या खिशात आहे? कोणत्या तऱ्हेने खिसा कापावयाचा? कोणत्या बाजूने पळावे? अशा एकाच वेळी सोळा गोष्टीकडे आपल्या हिंदुस्तानातील चोरांना लक्ष ठेवावे लागते. अवधानशक्ति पूर्ण बुद्धिजन्य आहे. ज्ञानजन्य नाही. अवधान कधी वाढते आणि अर्धा शेर बासुंदी खाल्ली की, अवधान नाहीसे होते असे हे सर्व विचित्र आहे! ज्ञानजन्य असते वेळी चढ ऊतार हे नसतात.

प्रश्न :- बुद्धि हीच माया?

दादा :- नाही. माया म्हणजे अज्ञान. ज्ञान मिळाले म्हणजे अज्ञान-माया जाते परंतु अंत:करण तर रहातेच. बुद्धि रहाते, बुद्धि संसाराकरता हितकारी वस्तुमध्ये हात घालायला लावते आणि संसारामध्ये भटकविते. बुद्धि काय आहे? कोणी एक मनुष्य तुमच्या मुलास फसवत असेल तर तुमची बुद्धि मध्ये पडते. खरे पाहिले तर 'व्यवस्थित' च सर्व करते. तरीपण बुद्धि ढवळाढवळ करावयास लावते. प्रथम मन बुद्धिला फोन करते तेव्हा मध्ये गडबड करून सांगते, ''काय सांगितले, काय सांगितले?'' प्रत्येकामध्ये तिची ढवळाढवळ प्रथम असते. रात्री झोपेत, स्वप्नामध्ये ती ढवळाढवळ करीत नाही. तर तो सरळ चालतो. अरे ह्या जगात तर स्वप्नेच आहेत ना!

हे मोटर ड्रायव्हर्स मोटर हाकण्याचे काम करतात आणि समोरून जर बस आली आणि बाजूला बसणाऱ्या माणसाने चालविणाऱ्याचा हात धरला तर? अरे टक्कर होईल ! ते लोक फार पक्के असतात. बस आली तरी सुद्धा स्टिअरिंग धरीत नाहीत. कारण ते समजतात की, स्टिअरिंग चालविणाऱ्याच्याच हातात असते ज्याचे काम तोच करतो. ह्यामध्ये मोटारीच्या स्थूल बाबतीत लोक समजतात. परंतु ह्या आतल्या बाबतीत कशा तऱ्हेने समजतील? ते स्वत:मध्ये अडथळा आणतातच. म्हणून अडथळा होतोच जर आतील बाबतीत सुद्धा ड्रायव्हरवर सोडले तर कसलाच अडथळा होणार नाही.

तत्त्वबुद्धि म्हणजे 'मी शुद्धात्मा आहे' आणि हे हातामध्ये आले (समजले) म्हणजे देहबुद्धि जाते. शरीरामध्ये जी बुद्धि होती ती आता तत्त्वात बदलली. तत्त्वबुद्धि म्हणजे सम्यक् ज्ञान उत्पन्न झाले म्हणजे सम्यक बुद्धि, तत्त्वबुद्धि उत्पन्न होते. त्याशिवाय तर विपरीतबुद्धि असते!

## ( ७५ )
## अंत:करणाचे तीसरे अंग-चित्त

चित्त हे अंत:करणातील तिसरे अंग आहे. चित्ताचे काम भटकण्याचे आहे. ते जसे आहे तसेच फोटो काढते. येथे बसून अमेरिकेची फिल्म जशी आहे तशी दाखविते ते चित्त आहे. मन तर ह्या शरीराच्या बाहेर जात नाही. जे जाते ते चित्त आणि बाहेर भटकते ते अशुद्ध चित्त. शुद्ध चित्त शुद्ध आत्मा.

चित्त म्हणजे ज्ञान + दर्शन.

अशुद्ध चित्त म्हणजे अशुद्ध ज्ञान + अशुद्ध दर्शन

शुद्धचित्त म्हणजे शुद्ध ज्ञान + शुद्ध दर्शन.

**दादांची ज्ञान गोष्ठी**

मन पत्रिका (pamphlet) दाखविते आणि चित्त फोटो (चित्र) दाखविते. ह्या दोघांच्या गडबडीत बुद्धिने निर्णय देते आणि अहंकाराने सही केली म्हणजे कार्य होते. चित्त ही अवस्था आहे. अशुद्ध ज्ञान दर्शनाचे पर्याय ते चित्त, बुद्धि निर्णय देते आणि अहंकाराने सही केली म्हणजे कार्य होते. चित्त ही अवस्था आहे. अशुद्ध ज्ञान दर्शनाचे पर्याय ते चित्त. बुद्धि निर्णय देण्यापूर्वी मन आणि चित्ताची चर्चा चालते. परंतु निर्णय झाल्यानंतर सर्व गप्प रहातात. बुद्धिला बाजूला बसविले तर चित्त किंवा मन काहीच त्रास देणार नाही.

अनादि काळापासून चित्त स्वत:चे घर शोधते. ते भटकतच असते. ते निरनिराळे प्रकार पहात असते. म्हणून निरनिराळे ज्ञान दर्शन एकत्र होते आणि चित्तवृत्ति जे जे बघते त्याचा साठा (stock) करते आणि वेळ आल्यानंतर असे आहे, तसे आहे असे दाखविते. चित्त जे जे काही बघत असते त्यामध्ये जर चित्त लागले तर त्याचे परमाणू खेचतात आणि ते परमाणू एकत्र होऊन त्याच्या ग्रंथी होतात. त्या मन स्वरुपी आहेत आणि वेळ आल्या नंतर मन पत्रिका (pamphlet) दाखविते ते चित्त बघते. बुद्धि निर्णय- निकाल देते.

ही तुमची चित्तवृत्ति जी बाहेर भटकत होती आणि जगामध्ये खेळत होती ती आम्ही आमच्या बाजूस खेचून घेतली. म्हणजे वृत्ति दुसऱ्या ठिकाणी भटकण्याची कमी होते. चित्तवृत्ति चे बंधन झाले हाच मोक्ष आहे.

अशुद्ध चित्तवृत्ति अनादि काळापासून भटकत होती आणि तीच तुम्ही परत ज्या भागात जात असता तेथून परत घेऊन जाण्यास फिरता तर ती उलट त्याच भागात परत खेचते. ती चित्तवृत्ति स्वत:च्या घरामध्ये परत वळते तेच अजब आहे ना! चित्तवृत्ति जितक्या जागेत भटकते तितक्या जागेवर देहास भटकावे लागते. क्रमिक मार्गात तर मनाचे अनंत पर्याय आणि परत चित्ताचे अनंत पर्याय ओलांडत ओलांडत जावे लागते. तेव्हां सापेक्ष (relative) अहंकारापर्यंत पोहोचते आणि आम्ही तर तुम्हास हे सर्व घडवून सरळ स्वरुपातच स्वत:च्या घरात बसविले आहे.

स्वत:चे घर शोधण्यासाठी चित्त भटक भटक करीत असते. ते जे बघते त्यामध्ये सुख शोधत असते. जेथे पुढे चित्त स्थिर होते, तेथे अंत:करणाचा दुसरा भाग शांत होतो, म्हणून सुख मिळते. परंतु स्थिर किती वेळ रहाणार? चित्त परत दुसऱ्या ठिकाणी जाते म्हणून त्यास दुसऱ्यामध्ये सुख वाटते आणि पूर्वीचे दु:खदायक होते. कारण जे बाहेरचे सुख शोधत असते ते परिणामिक दु:खदायक आहे. कारण बुद्धि त्याच्यावर आरोप केल्याशिवाय रहाणारच नाही. की ह्यामध्ये सुख नाही, दु:ख आहे. तेव्हा परत चित्त भटकते. जो पर्यंत चित्तवृत्ति स्वत:च्या घरामध्ये स्थिर होत नाही

तोपर्यंत ह्याचा अंत येणार नाही. खरे सुख जेथे चाखतो तेथे कल्पित सुख आपोआप फिक्के पडते. नंतर जे भटकत असते ते अशुद्ध चित्त आणि त्यास जसे आहे तसे पहाणार आणि जाणणार ते शुद्ध चित्त. अशुद्ध चित्ताचा पर्याय नंतर हळू हळू कमी होत जाऊन बंदच होऊन जातो मग केवळ चित्ताचा पर्यायच रहातो. तेच 'केवळज्ञान'.

ज्ञानी पुरुष अशुद्ध चित्तास हात लावणार नाही. मात्र स्वत:चे शाश्वत सुख अनंत सुखाचा कंद जे आहे ते चाखावयास देतो. म्हणून स्वत:चे घर मिळाल्यावरच शुद्ध चित्त हाच शुद्धात्मा प्राप्त होतो. आणि शुद्ध चित्त जसेजसे शुद्ध आणि शुद्धालाच पहात राहील तशी तशी अशुद्ध चित्तवृत्ति फिक्की पडत पडत शेवटी फक्त शुद्ध चित्तच रहाते. नंतर चित्ताचा पर्याय बंद होत जातो. जो राहिला तो फक्त शुद्ध पर्याय.

## ( ७६ )
## ज्ञानीच फक्त शुद्ध आत्मा देऊ शकतो

अशुद्ध चित्ताची शुद्धि करण्याकरिता जगातील सर्वच धर्म खटपट करीत राहिले आहेत. साबणानी मळलेल्या कपड्यांना धुऊन स्वच्छ करावयाचे त्या प्रमाणे! साबू तर कपड्यांचा मळ काढतोच. परंतु परत स्वत:चा मळ ठेऊन जातो. साबणाचा मळ काढण्याकरिता परत टिनोपॉल पाहिजे. ते टिनोपॉल, साबणाचा तर मळ काढून घेते पण परत स्वत:चा मळ ठेऊन जाते ते शेवटपर्यंत चालुच असते. एक मळ साफ करणारी वस्तु स्वत:चा मळ स्वच्छ होणाऱ्या वस्तुवर ठेऊनच जाते. त्याप्रमाणें ह्या जगातील सर्वच सापेक्ष (relative) धर्मात असे आहे. संपूर्ण शुद्ध करणाऱ्या चित्तावर सुद्धा शेवटी अशुद्धि मळ रहातोच. संपूर्ण शुद्ध तर तोच करू शकतो की जो स्वयंपूर्ण शुद्ध, सर्वांग शुद्ध आहे. म्हणून हे सर्व ज्ञानीपुरुषच करू शकतो. एवढ्यासाठी तर प्रत्येक शास्त्र शेवटी सांगते की "तुला आत्मा प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर ज्ञानीकडेच जा. तोच तुला शुद्धात्मा देऊ शकेल. आमच्याकडे तर भेळसेळवाला आत्मा आहे; अशुद्धात्मा आहे. ज्याची काहीच किंमत नाही."

मोक्ष मार्गांत मनाला काहीच करावयाचे नसते. मात्र चित्तालाच शुद्ध करावयाचे असते. तरच उलगडा होईल. कित्येक लोक समजल्याशिवाय मनाच्या पाठीभागे लागलेले आहेत. त्यास वश करण्याकरिता प्रयत्न करतात. ते त्यांच्या दृष्टी बिंदु (view point) च्या बरोबर आहे. आणि सत्याने ते पूर्ण चुकी (complete wrong)चे आहे. जर मोक्ष पाहिजे असेल तर सत्या (fact)ची माहिती करून घेतली पाहिजे. शुद्धचित्त झाल्यानंतर मनाच्या बरोबर काहीच घेणे देणे रहात नाही. नंतर शुद्धचित्त मनाची फिल्म पहात असते.

## दादांची ज्ञान गोष्ठी

ह्या जगामध्ये मनास अडवून ठेवण्याचे स्थान आहे, परंतु चित्तास अडवून ठेवण्याकरिता स्थान नाही. हे पत्ते (playing cards) ते काय आहे? त्यामध्ये काय सुख आहे? ते चित्तास अडवून ठेवण्याचे ठिकाण आहे. परंतु पत्ते खेळताना मूळे चित्तास अडवून ठेवणे ते घसरण्यासारखे आहे आणि नंतर हळू हळू जास्त आणि जास्त घसरत जातो. परंतु पत्यामध्ये सुद्धा चित्तास किती वेळ अडविणार? आणि काय हे सुद्धा शेवटी दु:ख उत्पन्न करीत नाही का?

चित्तच स्वत:च्या आवडत्या ठिकाणी आणि भीतीच्या ठिकाणी विशेष भटकते. दुपारी खोलीत साप बघितला असेल तर झोपताना सुद्धा सापाची आठवण येते. चित्तास जेव्हां भय वाटते. तेव्हा तिथल्यातिथेच जाते. जड पण नाही आणि चेतन पण नाही असे मिश्र चेतन अशुद्ध चित्त जिकडे आवडेल तिकडे भटकते. तिकिटाशिवाय भटकावयाचे म्हणून भटकते. तिकिट असते तर बरे झाले असते. तर मग चित्त भटकलेच नसते.

ह्यावरून चित्त चेतन झाले आहे. शुद्धज्ञान + शुद्धदर्शन = शुद्धचेतन. पूर्वी ज्या ज्या ठिकाणी आपण रमलो होतो त्या गोष्टीची वर्तमान काळात विशेष करून आठवण येते आणि चित्त तेथे च चिकटुन रहाते. दुर्विचार जर सतत ४८ मिनिटे राहिले तर अनंत जन्माची भर पडते. तेथेच जास्त बी पडते. जर पर्याय पातळ झाला तर त्याचा मार चित्तास जास्त मिळत नाही. चिकटले म्हणजे लवकरच ते सुटे पडणार.

ज्ञान आणि दर्शन ह्यास एकत्र बोलावयाचे म्हणजे चित्त म्हणून म्हणावे लागेल. चित्त नाशिवंत वस्तुच दाखविते. जेथे वासना जाते तेथे तेथे चित्त भटकते. जितके ज्ञान असते तितके दिसते आणि दर्शन असते तितके अंधुक दिसते. ज्ञानाने बरोबर दिसते.

ह्या देवळात मूर्तीचे दर्शन करते वेळी स्वत: मधील संयोग, जसे की मनाचे परिणाम, चित्तवृत्ति ची स्थिती ह्याप्रमाणे फेरफार दिसतात. उदाहरणार्थ पहिल्या तासात अमुक तऱ्हेचे दर्शन होते. दुसऱ्या तासात अमुक तऱ्हेचे दर्शन होते. बाहेरचे आणि आतले पुरावे (evidence) जसे गोळा होतात तसे दर्शन घडते. मूर्तीच्या समोरून प्रकाश येत असेल तर निरनिराळे दर्शन होते. बाजूने येत असेल तर आणखी दुसरे वेगळे दर्शन होईल. ज्ञानी पुरुषाचा चेहरा तर एकसारखाच असतो. परंतु तुमच्या मनाच्या परिणामामूळे किंवा चित्तवृत्ति च्या आधाराने निराळा दिसतो. ज्ञानी पुरुषाचे तर एकाच तऱ्हेने दर्शन करावयाचे असते.

( ७७ )

## चित्त प्रसन्नता

आनंदघनजी महाराज काय करतात? ज्यांचे सर्व जगाचे भाव, अभाव नष्ट झालेले आहेत अशा वीतराग भगवान ऋषभदेवाच्या मूर्तीचे दर्शन करतात. तेव्हा अशा भाविक भक्ताला ती मूर्ती हसत आहे अशी दिसते. डोळे तर काचेचे असून ती अशी हसणारी का दिसते? कारण त्यांची स्वत:ची चित्तवृत्ति , स्वत:ची चैतन्यशक्ति त्यामध्ये गुंफलेली असते म्हणून हसत असलेली दिसते. ह्यास चित्त प्रसन्नता म्हणतात. ज्या ठिकाणी संपूर्ण कपटभाव निघून गेलेला आहे तेथे चित्त प्रसन्नता आणि कपट ह्या दोघांचा गुणाकार होऊ शकत नाही. कबीरजी काय म्हणतात?

''मै जानू हरि दूर है, हरि हिरदे मांही,

आडी त्राटी कपट कीं तासें दिसे नाही''.

जेथे कपट असते तेथे भगवान दिसत नाही. अन्यभाव वृत्ति मध्ये नसलेल्या वृत्ति ला शुद्ध वृत्ति म्हणतात. जर आपल्या महात्म्यांच्या वृत्ति मध्ये दुसरा भाव राहिला नाही तर चित्त प्रसन्नतेची भक्ती उत्पन्न होते. अवस्थेने बांधलेले लोकव्यवहार सुखाने भोगू शकत नाहीत.

एका तासापूर्वी कोणत्याही अवस्थेमध्ये चित्त एकाग्र झाले असेल तर त्यात आणि त्यातच राहिल. म्हणजे अवस्थेचा बोजा डोक्यावर रहातो आणि चहा पिण्याच्या प्रसंगी हा बोजा डोक्यावर रहाणारच. व्यवहारामध्ये चित्त हेच चेतन आहे. त्याची हाजरी असेल तरच कामास येईल. खात असताना जर चित्त हाजर नसेल तर ते खाल्लेले काय कामाचे?

''चित्तामध्ये क्लेश नसतो. ती सर्वच धर्माचा धर्म आहे'' जर हे पद मिळाले तर पुनर्जन्म जाईल.

प्रश्न:- दादा, काल रात्री झोपेमध्ये एक सूर्यासारखा खूप जोराचा प्रकाश पुष्कळ वेळ दिसला ते काय?

दादा:- ते तर चित्ताचे चमत्कार. चित्त चमत्काराची अजब शक्ति आहे. पहिला चित्त चमत्कार उत्पन्न होतो आणि मग ज्ञान प्रकाश उत्पन्न होतो.

प्रश्न:- देवळात घंटा का बांधलेली असते ?

दादा:- चित्तास एकाग्र करण्याकरिता जेव्हा ती घंटा घणघण वाजते, त्या बाजूस

मन आणि चित्त थोडावेळ पर्यंत एकाग्र होते. जोपर्यंत स्वरूपज्ञानाची प्राप्ती होत नाही तोपर्यंत संपूर्ण एकाग्रता होतच नाही.

जे चित्तास व्यत्यय करते ते सर्वच विषय आहेत. हे बाहेर जे सर्व काही घडते ते सर्वच विषय आहेत. ज्या ज्या वस्तुत चित्त गेले ते सर्वच विषय आहेत भजी खाल्ली त्यास हरकत नाही, परंतु त्यामध्ये चित्त चिकटले आणि त्याची परत आठवण होत राहिली तर तो विषय होतो. ज्ञानाच्या बाहेर जाणे ते सर्वच विषय आहेत. जेव्हा दुसऱ्या वस्तुमध्ये चित्त जाते, तेव्हां पुढील जन्मासाठी बी तयार होते.

चित्त नेहमी फोटो पाडते, अस्पष्ट पाडते, स्वच्छ पाडते, तुम्ही जसे जसे फोटो पाडाल तसे पडतील आणि ते परत पहावयास लागतिल. भोगावयास लागतिल म्हणून चांगले फोटो पाडा. तुमची फिल्म फुकट जाऊन देऊ नका.

## ( ७८ )
## अहंकार

अंत:करणाचा चोथा आणि शेवटचा भाग म्हणजे अहंकार. मन किंवा चित्त एकत्र मिळून बुद्धि निर्णय देते, त्यावर जो शेवटी सही करतो तो अहंकार. जोपर्यंत अहंकार सही करत नाही, तोपर्यंत कोणतेही कार्य होत नाही. परंतु बुद्धि ही अहंकारा मार्फत येणारा प्रकाश असल्यामूळे बुद्धिने निर्णय घेतला की, अहंकार नियमाप्रमाणें मिसळून जातो आणि ते कार्य होते.

मी चंदुलाल ह्यालाच ज्ञानी मोठ्यातला मोठा आणि शेवटचा अहंकार म्हणतात. ह्यामूळे सर्व जग चालत आहे. हा अहंकार गेला तर मोक्षास जाता येईल. हे जीवन कशावर उभे राहिले आहे? पायावर का देहावर? नाही, ''मी'' ह्याचावरच उभे राहिले आहे. ''मी शुद्धात्मा आहे'' ह्या शुद्ध अहंकारमूळेच मोक्षास जाता येते. बाकी सर्वच्या सर्व जन्मोजन्माचे साधन होईल.

अचेतन ''मी आहे'' असे समजण्यात येते तो अहंकार. जे चेतनमध्ये 'मी आहे' असे समजण्यात येते त्यास अहंकार म्हणता येणार नाही. 'मी आहे' म्हणजे अस्तित्व तर आहे. म्हणजे 'मी आहे' असे बोलण्याचा अधिकार तर आहे. परंतु 'मी आहे' हे कशामध्ये आहे त्याची तुला माहिती नाही. अचेतनमध्ये 'मी' बोलावयाचा अधिकार नाही. मी काय आहे?'' ह्याचे भान नाही. जर हे कळले तर मग कामच झाले ना?

कोणाच्या चलाव्यणानी काहीच चालत नाही. परंतु जग तर चालतच रहाते.

मात्र अहंकारच सांगतो की 'मी' चालवतो. जोपर्यंत स्वतःच्या स्वरुपाचे भान नाही तोपर्यंत सर्व चावीवाल्या मोठारीच आहेत !

## ( ७९ )
## त्याग कशाचा करावयाचा?

भगवानने सांगितले आहे की, जर तुला मोक्षास जायचे असेल तर त्याग करण्याची काहीच जरूरी नाही. एक अहंकार आणि ममता अशा दोन वस्तु टाकल्या म्हणजे सर्वच आले. अहंकार म्हणजे 'मी' आणि ममता म्हणजे 'माझे' ह्या दोन वस्तु टाकावयाच्या आहेत. आम्ही ज्ञान देतो. तुमच्या स्वरूपाचे भान करवितो तेव्हा तुमचा अहंकार आणि ममता ह्या दोघांचा त्याग करावयास लावतो. त्याग एका बाजूस केला तर दुसऱ्या बाजूस ग्रहण काय करून घेतोस ह्याची तुम्हाला माहिती आहे का? आम्ही तुम्हास 'शुद्धात्म्याचे' ग्रहण करावयास लावतो. नंतर ग्रहण, त्यागाची काहीच भानगड रहात नाही. अहंकार काढण्याकरिता सर्व त्याग करावयाचा आहे. आम्ही तुमच्या सर्वच अहंकार घेऊन टाकतो. नंतर अस्तित्व काय राहिले? तर सांगतात की जेथे अस्तित्व आहे तेथेच मूळ जागेवर आणून ठेवतो. कोणत्या एकाच जागेवर अहंकाराचे अस्तित्वपण असते. ते आम्ही मूळ जागेवर अहंकारास बसवून ठेवतो.

तुम्ही निश्चय करा की सकाळी पाच वाजता उठावयाचे आहे तर उठण्याचा निश्चय म्हणजे अहंकार, अहंकार करण्याने काय होत नाही? एकदा सहजानंद स्वामी फिरता फिरता काठियावाडमध्ये गेले, तेथे त्याना एक राजा भेटला तो सांगू लागला की माझ्याकडे एक जबरदस्त साधु आला आहे. तो १५ दिवस जमिनीमध्ये स्वतःस बंद करून राहिला. सहजानंद स्वामीनी सांगितले की त्याच्यासमोर हा प्रयोग करून दाखवा. तेव्हां तो साधु १५ दिवस अहंकार करून खढ्यामध्ये राहिला. बाहेर गेल्याच्या वेळी सहजानंदानी सांगितले की, फक्त दोन पोलीसांना पाठवा. प्रत्येकवेळी जेव्हा स्वतः वाजता गाजता त्याचे सामैया (स्वागत) करिता जाता ते सर्व स्थगित करा. तो साधु जेव्हां बाहेर आला. तेव्हा त्याने बघितले की तेथे कोणीच नाही. तो ओरडू लागला राजा कुठे आहे? बगी कुठे आहे? बाजा कुठे आहे? अशा तऱ्हेने ओरडत ओरडत तो साधु तेथून निघाला आणि मरून गेला. तो अहंकार करित राहिला आणि त्याचे पोषण नाही झाले तेव्हां तो मेला. जिथे स्वयं नाही तेथे आरोपकरणे तो अहंकार.

खरे पाहिले तर स्वतः मरतच नाही अहंकार मरतो आणि अहंकाराचा जन्म होतो. जो पर्यंत अहंकार सही करीत नाही, तो पर्यंत मरण येऊ शकत नाही परंतु अक्करमी सही केल्याशिवाय रहातच नाही. बिस्तर मधे खूप यातना होत असतात की

मोठे दु:ख येऊन पडले जे सांगू शकत नाही, तेव्हां तो सही करून टाकतो की ह्यापेक्षा मरून गेले तर फार उत्तम म्हणून — होणारच.

## ( ८० )
## भोगणारा कोण आहे ?

आत्मा स्वत: काही सुद्धा भोगत नाही. कोणत्याही विषयास आत्मा भोगवू शकतच नाही. जे भोगावयाचे त्याचे स्वत:चे गुण असतील तर मग ते कायम स्वरूपाच्या बरोबर आणि बरोबर राहतात, म्हणून मोक्ष कधीही होतच नाही. भोगवतो तो फक्त अहंकार करतो की मी भोगले. इंद्रिय परिणामकारक (effective) आहेत आणि कारणा (causes)च्या आधाराने परिणाम (effect) होत असतात. तेव्हां भ्रांतिमूळे अहंकार म्हणतो की 'मी करतो' 'मी भोगवतो'. मी करणारा नाही ही जर भ्रांति गेली आणि करणारा कोण आहे हे जर समजले, तर मग मोक्ष काही लांब रहात नाही. सदेह मोक्ष होतो असे आहे.

माणसांची गर्दी नाही, परंतु अहंकाराची गर्दी आहे. ज्ञानामूळे अहंकाराच्या गर्दीमध्ये रहाता येते. निसर्ग पद्धतशीर आहे. आत्मा पद्धतशीर - आहे. परंतु, मध्ये अहंकार (मी) आहे. ते फार वाईट आहे. तो करू नये. ते करतोच. अहंमूळे जग चालता आहे आणि ह्या चार गति सुद्धा अहंमूळेच होतात. अहंकारामूळेच भगवान जगापासून वेगळा झाला आहे.

मनुष्य दिसण्यामध्ये कितीही सुंदर असला तरी अहंकारामूळेच तो कुरुप दिसतो. रूपवान केव्हां दिसेल? अर्थात प्रेमात्मा होईल तेव्हां. तसाच अहंकार असल्यामूळे सुंदर पण कसा कुरूप दिसतो.

प्रश्न:- अहंकाराचे प्रकार असतात काय?

दादा:- सापेक्ष वस्तुला 'मी आहे' असे बोलले तोच अहंकार. गर्व, मद, मत्सर, अभिमान, मान आणि अपमान हे सर्व निरनिराळे शब्द वेगवेगळ्या वेळी वापरले जातात. ह्या सर्वाचे स्थूल अर्थ आपल्यास माहीतच आहेत. म्हणून ज्ञानी पुरुषाने निरनिराळी नावे दिली आहेत.

कित्येकजण स्वत:स निर्मानी असे समजतात. स्थूलमानी पेक्षा निर्मानीची नशा चढली की तो पुष्कळ भटकावयास लावतो. निर्मानीचे मानीपण डोके वर केल्याशिवाय रहाणार नाही. स्वरूपज्ञाना शिवाय संपूर्ण अहंकार जातच नाही. लोक निर्मानीपण प्राप्त करण्याच्या मागे लागले आहेत. परंतु अरे ह्याची नशा वाढली त्याचे काय करावयाचे?

ह्याचा जो सूक्ष्म अहंकार भयंकर वाढला त्याचे काय?

स्वरुपज्ञान प्राप्त झाल्यावर अंत:करण जसे आहे तसे रहाते. मात्र जेथे स्वत: नाही, तेथे 'मी आहे'. ह्याचा भ्रांतिने आरोप केला होता ती भ्रांति आम्ही काढून टाकतो आणि real सत् (खरे) मीमध्ये 'मी' ला बसवतो. नंतर अंत:करणातील अहंकार जो रहातो तो तर तुमचा व्यवहार सांभाळतो. त्याला काही दाबावयाचा नाही. मात्र निरस करावयाचा आहे.

## ( ८१ )
## अहंकाराचा रस खेचून घ्या

मूळ वस्तु प्राप्त झाली आता अहंकाराचा रस खेचून घ्यावयाचा आहे. रस्त्यांतून चालताना कोणी बोलले कीं, ''अरे तुम्ही बेअकली आहांत, नीट चाला''. त्यावेळेस अहंकार उभा रहातो. तो अहंकार सहज रीतीने तुटुन जातो, खेचला जातो, राग येतो. ह्यामध्ये राग येण्यासारखे काय आहे? आपणास राग येण्याजागे आत काहीच नाही. अहंकाराचा जो रस आहे तो खेचावयाचा आहे.

सर्वांना अपमान आवडत नाही. परंतु आम्ही सांगतो की, तो फार मदत करणारा आहे. मन, अपमान हा तर अहंकाराचा कडु गोड रस आहे. अपमान करतो तो तर तुमचा कडु रस खेचावयास आला असे समजा. 'तुम्ही बेअकली आहात'. असे म्हटले म्हणजे तो रस समोरच्यानी खेचून घेतला. जितका रस खेचला गेला तितका अहंकार तुटला आणि हा सुद्धा मेहनत केल्याशिवाय दुसऱ्यानी खेचून घेतला. अहंकार तर रसवाला आहे. जेव्हा कोणी तो नकळत काढतो, तेव्हा जळफळाट होतो. म्हणून अहंकार सहज कापला जाऊ द्या. समोरचा सहज रितीने रस खेचून घेण्यास तयार झाला तर दूसरे काय पाहिजे? समोरच्याने कितीतरी मदत केली म्हणायची. वाटेल ते करून रस वितळून टाकला की निकाल लागतो. अहंकार तर फार उपयोगी आहे. नाहीतर संसारातील व्यवहार चालणार कसे ? मात्र अहंकाराला निरस करावयाचा आहे. आपणास जे धुवावयाचे ते दुसऱ्याने धुवुन टाकले हाच आपला फायदा. आम्ही ज्ञानीपुरुष अबुध आहोत. ज्ञानीपुरुषाकडे इतकी भरपूर शक्ति आहे की तो स्वत:च अहंकारचा रस खेचून काढतो परंतु तुमच्याकडे अशी शक्ति नसते, म्हणून जर तुमच्या अहंकाराचा रस खेचून घ्यावयास एखादा कोणी मनुष्य आला तर तुम्ही खुष झाले पाहिजे. तुमची किती मेहनत वाचेल आणि किती काम होऊन जाईल. आपणास तर फायदा कोठे झाला हेच बघावयाचे. हा तर अजब तऱ्हेचा फायदा झाला असे म्हटले पाहिजे.

अहंकाराचा स्वभाव नाटकी बनून सर्व काम काढून घेतो. तुमचा कडू आणि गोड रस जर निरस झाला असेल तर सर्वच काम नाटकी रीतीने करून देतो. अहंकारास मारावयाचे नाही नीरस करावयाचा आहे.

जेवताना दुसऱ्यास प्रोत्साहन देण्यासाठी असेसुद्धा सांगावे लागते की ओहो! कढी तर उत्तम झाली आहे ना?

## ( ८२ )
## हसत मुखाने विष प्या

समोरच्या माणसाचा अहंकार आपणाकडून कापला गेला (अपमान केला) तर त्यास कडू लागते. (राग येतो) परंतु त्याचे मोजमाप, नफा आपणास माहीत असतो, म्हणून कोणास कडू लागेल तसे आपणाकडून न होईल तर उत्तम.

कवीने गायले आहे ना की,

''हसते मुखे जेर पिअे, निलकंठी खानदान,

निःस्पृह अयाचकने, खपे नही मान-तान.''

आम्ही नीळकंठ आहोत. लहानपणापासून ज्यांनी कोणी विष दिले ते आम्ही हसत मुखाने प्यायलो आणि वर त्यास आशिर्वाद देऊन पिवून टाकले. त्यामूळेच नीळकंठ झालो.

विष तर तुम्हास प्यावयास लागेलच. हिशोबी आहे म्हणून प्याला तर समोर येईलच मग तुम्ही हसत हसत प्या किंवा तोंड खराब करून प्या, प्यावयास तर लागेलच. अरे तुम्हास पुष्कळवेळा विष न प्यावयाचे असेल तरीसुद्धा लोक बळजबरीने प्यावयास लावतील. ह्यापेक्षा ते हसत हसत पिऊन वर त्यास आशिर्वाद देऊन का म्हणून पिऊन टाकू नये? त्याशिवाय नीळकंठ होणारच कसे? हे विष द्यावयास येतात ते तुम्हास उच्चपद देण्यासाठी येतात. तेथे जर तोंड वेंगाडले तर आपले फार नुकसान होईल. आम्ही तर सर्व जगामध्ये, ज्यांनी ज्यांनी आम्हास विषाचे पेले दिले ते पेले त्याना आम्ही आशिर्वाद देऊन हसत मुखानी पिऊन टाकले आणि आम्ही महादेवजी (शंकर) झालो.

''मी चंदुलाल आहे'' तोपर्यंत सर्व कडू लागेल. परंतु आपणास तर हे सर्व अमृतच होऊन गेले आहे. मान, अपमान, कडू, गोड हे सर्व द्वंद्वातीत आहोत म्हणून तर हा सत्संग करीत आहोत ना! शेवटी सर्वांना द्वंद्वातीत दशाच प्राप्त करावयाची आहे ना!

जर समोरचा कडू पाजील आणि तुम्ही हसत मुखाने त्यास आशिर्वाद देऊन पिऊन टाकाल तर एका बाजूने तुमचा अहंकार धुऊन निघेल आणि तुम्ही त्यातून मुक्त व्हाल आणि दुसऱ्या बाजूस समोरच्या माणसाला कडू पाजणाऱ्याला पण प्रतिक्रिया होते आणि तो पण बदलून जातो. त्याचेसुद्धा चांगले होते. तो सुद्धा समजून जातो की कडू प्यावयाचे आहे. तो माझा निर्बळपणा आहे आणि हा हसत मुखाने समोर पिऊन टाकतो. तो अतिशय शक्तिवान आहे. आपणाला जर कोणी कडू प्यावयास दिले तर आपण थोडेच पीतो? हे तर समोरचा कडू पाजतो. हा तर खूप उपकार करतो. खावयास घालणारी तर आईच समजली जाते. परत घेतल्याशिवाय चालेल असे नाही. नीळकंठ होण्याकरिता कडू प्यावयास लागते.

आपण तर अरुणास सांगून टाकले की तुला हे शंभरवेळा कडू प्यावयास लागेल. बस. मग ह्याची सवय होईल. कडू औषध लहान मुलास जबरदस्तीने पाजावयास लागणार नाही. आपोआप पिऊन टाकील का?

एकदा नक्की केले की जे जे कोणी देईल ते सर्वच कडू प्यावयाचे आहे परंतु कडू पिता आले पाहिजे. केव्हा तर प्यावयास लागेल ना? हा तर मग नफा आहे तर कडू पिण्याची सवय (practice) करावी लागेल ना?

सर्वांच्या समोर आपला अपमान झाला तर नुकसान वाटेल पण त्यामध्ये तर अतिशय फायदा आहे, हे समजले पाहिजे तर मग नुकसान भासणार नाही ना?

''मी शुद्धात्मा आहे'' असे बोलता तर खरे तर मग ह्याच पदावर रहावयाचे आहे ना? ह्याकरिता तर अहंकार धुवून काढावा लागेल. जीव तोडून मेहनत करून निश्चय करा म्हणजे धुतले जाईल.

समजा एका वाघरीला राजा बनविला आणि गादीवर बसल्यावर जर तो असे म्हणाला की, मी वाघरी आहे तर ते कसे दिसेल? शुद्धात्म्याचे पद मिळाल्यानंतर दुसरे आपणास काहीच नसणार.

कडू, गोड अहंकाराच्या पदामधून तुम्हास निघून जावयाचे आहे ना? तर मग ह्यामध्ये पाऊल कशा करिता ठेवता? नक्की केल्यानंतर दोन्ही बाजूवर पाऊल ठेवता येईल काय? ठेवता येणार नाही. नाराजगी केव्हा येऊ शकतो? जेव्हा कोणी कडू दिले असले तेव्हा आपण विधी करते वेळी बोलतो, मी शुद्धात्मा आहे. तर मग शुद्धात्म्याचे रक्षण करावयाचे की दुसऱ्या बाजूचे? अहंकारास स्वत: निरस करणें फार कठिण आहे. म्हणून जर कोणी निरस करून देत असेल तर मग फारच उत्तम. ह्यामूळे अहंकार नाटकीच रहातो आणि आंतले फार उत्तम चालते. हे सर्व नफ्याचे आहे, तर अहंकारास

निरस बनविण्याकरिता हसत मुखानेच त्याला पिऊन का टाकू नये?

अहंकार संपूर्ण निरस झाला म्हणजे आत्मा पूर्ण होतो. इतके नक्की करा की अहंकार निरस करावयाचा आहे, म्हणजे तो निरस होतच जाईल.

हे कडू औषध जर पचले गेले तर मग काहीच अडचण रहाणार नाही. ना? आणि मग तुम्ही आता समजून गेलात की हे फायद्याचे आहे. जितके गोड लागते तितकेच कडू भरलेले आहे, म्हणून पहिल्यांदा कडू पचवून घ्या. नंतर गोड तर सहजच पचेल. त्यास पचविण्याकरितां फार त्रास होणार नाही. हे कडू औषध पचले म्हणजे खूप काम झाले. फुले स्वीकारताना सर्व खूष होतात. परंतु दगड पडतील तेव्हा?

## ( ८३ )
## अदृश्य तप म्हणजे काय?

अहंकार हे तर ज्ञेय स्वरुप आहे. तुम्ही स्वत: ज्ञाता आहात. ज्ञेय-ज्ञाता चा जेथे संबंध आहे तेथे ज्ञेयाचे रक्षण करता येणार नाहीच ना? एक अहंकार ह्याचे रक्षण करणार म्हणजे सर्वांचे रक्षण करावे लागेल. कारण की, सर्वच ज्ञेय आहेत. अनंत असतात. अदृश्य तप करावयाचे आहे. अहंकार वगैरे असतात. ह्यांच्यामध्ये तन्मयकार होता येणार नाही. हे लक्षात ठेवावयाचे, जागृती ठेवावयाची हेच तप. हे अदृश्य तप. कारण अनादि कालापासून तन्मयाकार होण्याची सवय लागली आहे म्हणून, हे अदृश्य तप करावे लागते. हे फिक्के पडत जाते. अहंकार कमी होत गेला म्हणजे ध्यानात यावयास वेळ लागत नाही. एक निश्चय केला म्हणजे तप होतच जाते.

ज्या अहंकारामध्ये काही फायदा झाला नाही, जिकडे तिकडे ठोकर लागली प्रत्येक ठिकाणी रूपवान असून बेरुप दाखवितो. तो अहंकार काय कामाचा? ज्ञेय ज्ञाता स्वरुपात रहातो. हीच जागृती, हेच तप. अहंकाराचा रस कमी करताना जी जागृती ठेवतो, तेच अदृश्य तप.

विरोध बाहेरून येतो तसा आतून पण येतो. अहंकार विरोधाचे रूप आहे. त्याच्यासमोर तर बरोबर तयार व्हावे लागेल.

मान दिला तर तो सुद्धा सहन होईल असे नाही. ज्याला अपमान सहन करता येतो त्यालाच मान सहन करता येईल; कोणी दादांना विचारले की, लोक तुम्हास हार घालतात, त्याचा तुम्ही स्वीकार का करता? तेव्हां दादानी उत्तर दिले तुम्हाला सुद्धा लोक हार घालतील परंतु ते तुम्हाला सहन होणार नाही. लोकानी तर हाराचे ढीग पाहिले की, आश्चर्यचकित होतील. कोणाचे पाय धरले तर तो ताबडतोबच उभा राहिल.

## ( ८४ )
## मान अपमानाचे खाते

जेव्हां अपमानाचे भय रहात नाही, तेव्हां कोणी अपमान करणार नाही असा नियमच आहे. जोपर्यंत भय आहे तो पर्यंत हा व्यापार चालतो. भय गेले म्हणजे व्यापार बंद. कोणी तुमचा अपमान केला तर जमा करा. उधारी करू नका. कितीही मोठा किंवा लहान कडू डोज दिला तो चोपडीमध्ये जमा करा की महिन्या मध्ये शंभर अपमान जमा करावयाचे तर तितके जास्त येतील तितका जास्त फायदा आणि शंभर एवजी सत्तर मिळाले तर तीस नुकशानीमध्ये तर पुढील महिन्यात एकशेतीस जमा करावयाचे. जर त्याच्या चोपडी मध्ये तीनशे अपमान जमा झाले तर त्यास मग अपमानाचे भय रहाणार नाही. तो मग दुसऱ्या टोकावर निघून जातो. पहिल्या तारखेपासून चोपडी चालूच करावयाची हे होणार किंवा नाही?

ज्ञानीपुरुषास हात जोडले ह्याचा अर्थ हा कीं, व्यवहार, अहंकार शुद्ध केला आणि पायाच्या अंगठ्यावर मस्तक ठेवून खरे दर्शन केले ह्याचा अर्थ हा की व्यवहार, अहंकार अर्पण केला असे समजावे. अहंकार अर्पण झाल्यानंतरच फायदा होतो.

ज्ञानीपुरुषामध्ये दया नावाचा गुण असत नाही. त्याच्यामध्ये अपार करुणा असते. दया हा भयंकर अहंकारी गुण आहे. दया हा अहंकारी गुण का आहे? दया हा द्वंद्व गुण आहे. द्वंद्व म्हणजे दया असते त्यामध्ये निर्दयता अवश्य भरलेली असते ती निर्दयता जेव्हा दृष्टीस पडते तेव्हां माहीत पडते. सर्व जग द्वंद्व गुणानी भरलेले आहे जोपर्यंत द्वंद्वातीत दशा प्राप्त झाली नाही तोपर्यंत जगात दया वाखाणली जाईल. कारण की, तिचा हा पाया आहे. तरीसुद्धा दया करावयाची तर आपली बाजू सुरक्षित ठेवण्याकरिता, भगवंताला सुरक्षित ठेवण्याकरिता नाही. जे लोक लोकावर दया करण्याकरिता निघाले ते तर स्वतःच दयापात्र आहेत. अरे तू तुझ्यावर दया कर ना. दुसऱ्यावर कशाकरिता करतो? कित्येक साधु संसारी माणसावर दया करतात. अरेरे ह्या संसारी लोकाचे कसे होईल? अरे त्यांचे जे होयचे असेल ते होणार. त्यांच्यावर दया दाखवणारा तू कोण? तुझे काय होणार? जेथे तुझाच पत्ता नाही तेथे लोकांचे काय शोधण्याकरिता जाता? ही तर भयंकर नशा (धुंदी) समजली जाते. तर ह्या संसारीक लोकांची धुंदी तेलाच्या आणि साखरेच्या रांगेत आठ तास उभे राहून उतरली जाते का? परंतु त्यांची धुंदी कोठून उतरणार. उलट वाढतच जाईल. बेभान नसणाऱ्या लोकांचा मोक्ष होतो असे भगवानने सांगितले आहे. बेभानपणा हा तर अतिशय भयंकर गुन्हा आहे. तो फारच मार खावयास लावतो. स्थूल अहंकार तर सहज दिसण्यात येतो. सहज जर

कोणी सांगितले की, ''अरे छाती वर काढून का चालतोस? जरा वाक ना''. म्हणजे तो ताळ्यावर येतो. परंतु हा सूक्ष्म अहंकार, मी कोणीतरी आहे, मी काही तरी साधन प्राप्त करून घेतले आहे. मला विशेष माहीत आहे अशा प्रकारचा अहंकार कधीच जात नाही. मी थोडे समजतो असला गर्व तर कधीही जाणार नाही. अरे जाणणे कोणास म्हणतात ह्याची तुला माहिती आहे का? ज्ञानाचा प्रकाश पडला म्हणजे उजळांत ठोकर लागते का? ही तर उठता बसता ठोकर लागते. त्यास जाणले असे कसे म्हणता येणार? जो स्वत:च अज्ञानदशेत ठोकर खात असतो त्याला दुसऱ्यावर दया करण्याचा काय अधिकार आहे?

## ( ८५ )
## अहंकाराचे विष

काहीतरी प्राप्त झाले म्हणजे मनुष्य अहंकाराने पछाडला जातो. आपल्या महात्म्यांना ज्ञानाचा अहंकार आला तरी ''दादा'' आहेत म्हणून पछाडला जात नाही. परंतु ज्ञानावर त्याचे आवरण येते. दैवीशक्ति प्रगट झाली आणि अहंकार आला तर जितका उंच चढला जातो तितकाच तो खाली आपटतो. काम दैवीशक्तिच्या आधाराने होते आणि मी केले असा गर्व केला तर अधोगतिला जातो. किंवा दैवी शक्तिचा उपयोग जर भलत्या ठिकाणी केला तरी सुद्धा तो अधोगतिला जातो. दैवी अहंकाराची प्रतिक्रिया (reaction) झाली तर नर्कगति मिळते.

लहान मुलांचा अहंकार सुप्त दशेत असतो. अहंकार तर असतो परंतु तो दबलेला (compress) असतो. तो जसा मोठा होत जातो तसा तसा फुटतो. लहान मुलास खोट्या अहंकाराचे पाणी पाजू नका म्हणजे ते समंजस होईल. त्याच्या अहंकारास पोषण्याकरिता तुमच्या स्वत:कडून खाद्य मिळाले नाही तर मुलगा चांगला संस्कारी होईल.

ह्या जगातील लोकांबरोबर वादविवाद करूच नये. ते लोक तर स्वत:चा अहंकार पोसण्याकरिता शोध करतात. म्हणून जर गुंतागुंत पाडावयाची नसेल तर आपण त्याचा अहंकार पोसून पुढे गेले पाहिजे. नाही तर तुमचा रस्ता अडकला जाईल. अहंकारी मनुष्य अहंकाराची मोठी गुंत पाडतच असतो. त्यांना लोभाची गाठ नसते.

उच्च विचार समजून घेण्याची शक्ति असेल तर तो सुसंस्कृत (cultured) समजला जातो. अशे सुसंस्कृत माणसात अहंकाराचे विष पुष्कळ असते. ममतेचे विष पण फार त्रास देते. ममता सुटू शकते, परंतु अहंकार सुटू शकत नाही.

जे लोक स्वत:ची आत्महत्या करतात तो भयंकर अहंकार आहे. जेव्हां अहंकार भग्न होतो आणि त्या अहंकाराने पोषण मिळण्याचे सर्व बाजूने बंद होते तेव्हा आत्महत्या घडते. ह्याचे फळ म्हणजे भयंकर अधोगति. अहंकार जसा कमी तशी गति उच्च होते आणि अहंकार जसा जास्त तशी गति कमी प्रतीची असते.

कोणी जीव मारण्याचा अहंकार करतात, कोणी जीव वाचविण्याचा अहंकार करतात. भगवाननी दोघांना अहंकारी म्हटले आहे. कारण कोणालाही जीव मारण्याची किंवा वाचविण्याची शक्तिच नाही. त्याच्या सत्तेत नाही. फक्त अहंकारच करतो की मी जीव वाचविणाऱ्यास चांगली गति आणि मारणाऱ्यास अधोगति मिळते. दोघाना बंधन तर आहेच.

सिंह भयंकर अहंकारी असतो. तो तर जंगलाचा राजा आहे. सर्व अवतारामध्ये भटकून भटकून आला आहे. परंतु कोठेही सुख मिळाले नाही. तो आता जंगलात अहंकाराची गर्जना आणि विलाप करतो. सुटण्याची इच्छा आहे परंतु मार्ग मिळत नाही. मार्ग मिळणे अतिशय दुर्लभ आहे. आणि त्यामध्ये मोक्षदात्याचा संयोग मिळणे अतिशय कठीण आहे. सर्व संयोग एकत्र होऊन सुटे होतात परंतु ज्ञानीचा संयोग एकत्र झाला तर काम होईल.

## ( ८६ )
## अहंकाराचे प्रभाव

हे जे दिसण्यात येते तो संसार नाही. अहंकार हा संसार आहे. तर असा संसारामध्ये काहीच संभाळून ठेवले नाही तर काय हरकत आहे? एका माणसाने आपणास पाचशे रुपयाचा दगा दिला असेल तर ते परत मिळण्याकरिता आपल्या अहंकाराचे समाधान झाले नाही म्हणून आपण त्याच्यावर फिर्याद करून धांदल करतो. परंतु मग तो येऊन आपले पाय धरू लागला, रडला म्हणजे आपल्या अहंकाराचे समाधान होते. नंतर आपण त्यास माफी देतो.

हा अहंकार तर असा आहे की, एखादा मनुष्य वाईट ठिकाणी वास्तव्य करीत असेल तरी तो त्या जागेस चांगलेच म्हणेल. वाघरी सुद्धा अहंकारमूळे त्याच्या झोपडी मध्येच रहातो व म्हणतो की आपण कुत्रा, जनावर ह्यापेक्षा तर सुखी आहोत ना? अहंकारामूळे सर्वजण जे काही प्राप्त झाले आहे त्याच्यामध्ये कमी पडू देत नाहीत.

अहंकारामूळे भेद सुद्धा उत्पन्न होतात. ज्ञानी पुरुष निरहंकारी असतो त्यांच्यापासून तर सर्व भेद नष्ट होतात. भेद पाहून रामराज्य भोगावयाचे हे अहंकाराचे कामच आहे.

कित्येक लोक खूपच संवेदनशील (Sensitive) असतात. Sensitiveness हा अहंकाराचा प्रत्यक्ष गुण आहे. काही व्यवहाराची गोष्ट चालली असेल आणि मी विचारले की वडोदऱ्याहून येताना काय भानगड झाली होती? तेव्हा कोणी मध्येच बोलला तर ती व्यक्ति sensitive हळवी म्हणावयाची. अहंकार असला की आपण पुढे जाऊच शकत नाही. अहंकाराने मनुष्य दबला जातो. अटकण म्हणजे एका मजबूत घोड्याला मशीद किंवा कबर दिसली म्हणजे तो तेथेच अडतो. हे पुढे न जाणे म्हणजे अटकण. प्रत्येक मनुष्यात अटकणपणा असतोच. ह्या अटकणपणामूळेच सर्वांचे भटकणे चालू आहे. आता अटकणपणामूळे भटकंती आणि भटकंतीमूळे अटकणपणा झाला आहे. आम्ही तर आपणास ह्यापासून अलिप्त करतो. अटकणपणाचा अहंकार चालेल परंतु सेंसिटिवपणाचा अहंकार चालणार नाही. जोपर्यंत राहील तोपर्यंत प्रगतिच होणार नाही. हट्टीपणा जर नुसता लक्षात आला तरी काम होते. परंतु सेंसिटिवपणाचा गुण तर भार देऊन पुष्कळच जागृती ठेऊन खूप जबरदस्त ब्रेक मारून तोडले तरच जाईल. ज्या पद्धतीने माल भरलेला आहे तसाच निघणार. परंतु त्यास पहात रहा. ज्ञानी पुरुषाने संपूर्ण प्रकाशधन दिले तरी बेचव तोंड होते. त्याचे कारण काय? अटकणपणा आणि सेंसिटिवपणा आहे. म्हणून सेंसिटिव माणसाचा आत्मा एकाकार होतो. तन्मयाकार होतो. शुद्धात्मा तन्मयाकार होतो म्हणून व्यवहार बेचव लागतो. तुम्ही कोठे खेचला गेलात ते समजून घ्या. तुम्ही प्रकाशात रस्त्यावर चाललात, ज्ञानमार्गावर चाललात तेथे अंधकार का दिसणार? अटकणपणा आणि सेंसेटिवपणा होता म्हणून. त्याला माहीत करून घेतल्यामूळेच हा सेंसेटिव गुण जातोच. तुम्ही जो माल बरोबर आणलेला आहात तो पहाण्यानी आणि जाणण्यानीच जाऊ शकेल. ज्ञाता द्रष्टा रहा. नुसते असे करण्याने अटकणपणाचा नाश होऊन जाईल. परंतु सेंसेटिवपणा लवकर जात नाही. सेंसिटिव झाला म्हणून आंत वीज (electricity) उत्पन्न होते. शरीरात वीज उत्पन्न झाल्यामूळे अनंत जीवने मरून जातात. जागृती विशेष राहिली की काहीच नडणार नाही. भरलेल्या मालाचा निकाल होणार. हा अटकणपणा आणि सेंसिटिवपणाचा माल तुम्हाला उगीचच चिकटून बसविलेला आहे.

## ( ८७ )
## अंत:करणाचे संचलन

हा संसार कोणत्या कारणाने सुरु झाला? अंत:करणामध्ये मन ओरडाओरड करू लागले तर स्वत: नुसता फोनचा रिसिव्हर घेऊन हॅलो, हॅलो करतो, चित्ताचा फोन घेतो. बुद्धिचा फोन अहंकार घेतो. म्हणून मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार काय धर्म

बजावतात ते बघा आणि समजून घ्या. आपण कोणाचाही फोन घ्यावयाचा नाही. डोळा, कान, नाक वगैरे काय धर्म बजावतात त्याचे आपण ज्ञाता द्रष्टा. जर मनाचा किंवा चित्ताचा फोन घेतला तर सर्व ठिकाणी अडथले येतील. हा तर ज्याचा फोन असेल त्याला हॅलो करवून द्यावयाचे. आपण 'स्वत:' काही करावयाचे नाही.

अरे तू खाल्यावर कधी तपास केलास की, आतमध्ये आतड्यांत किंवा पोटात काय होत असते? अवयव त्यांच्या गुणधर्मामध्येच आहेत. नाक जर त्याच्या गुणधर्मामध्ये नसेल तर सुगंध किंवा दुर्गंध येणार नाही. कान जर त्याच्या ऐकण्याच्या गुणधर्मामध्ये नसेल तर ऐकू येणार नाही. त्याप्रमाणेच मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार सर्व गुणधर्मामध्ये व्यवहार करीत आहेत ह्यामध्ये सांगितले की मी केले तर ते चिकटते. ह्यांच्या गुणधर्माची माहिती करून घ्यावयाची आहे. स्वत: शुद्धात्म्यामध्ये राहिला तर काहीच हरकत होणार असे नाही. अंत:करण त्याचे गुणधर्मात राहील. जसे की मन पत्रिका दाखविण्याचे काम करील, चित्त फोटो दाखविल, बुद्धि निर्णय देईल आणि अहंकार सही करील. अशा तऱ्हेने सर्वच बरोबर चालेल. अंत:करण आपल्या स्वत:चे गुणधर्म दाखविल आणि शुद्धात्मा स्वत:चे गुणधर्म दाखविल. ज्ञाता आणि द्रष्टा पदामध्ये काहीच हरकत येणार नांही. प्रत्येक जण आपआपल्या गुणधर्मामध्येच आहे. अंत:करणामध्ये कोणकोणते गुणधर्म बिघडले आहेत त्याचा तपास करावयाच आणि बिघडलेले असतील तर कशा तऱ्हेने सुधारावयाचे, इतकेच करवयाचे परंतु तो म्हणतो, 'मी विचार केला, मीच बोलतो, मीच करतो'. हे हात-पाय पण त्याचेच गुणधर्मामध्ये आहेत. परंतु सांगतो 'मी चाललो' मात्र अहंकारच करतो आणि अहंकारानेच प्रतिष्ठित आत्म्यास स्वत:चा आत्मा मानला आहे त्यामूळे (खोट्या मान्यतेने (wrong belief) हे सर्व घडत आहे.

मनाचे गुणधर्म बिघडले आहेत हे माहीत होइल किंवा नाही? माहीत पडेल. घरी कोणी म्हातारीबाई आली आणि सबंध दिवस कचकच करीत असेल, जर पाच पंधरा दिवस तिच्याकडे लक्ष दिले नाही तर मग संवय होईल आणि आपल्या अंगवळणी पडेल. त्याचप्रमाणे हा मनाचा दारुगोळा फुटतो आणि त्याची संवय लागली आहे. उलट सुलट दारु एकत्र झाली आहे. आणि हवे मध्ये फुटते. त्याप्रमाणे मनात उलट सुलट भरलेले असते तसेच फुटते. म्हाताऱ्याबाई कडे लक्ष दिले नाही तसे जर मनाबरोबर वर्तणूक केली तर तशीच संवय लागेल. आपला तर ह्या मन, बुद्धि, चित्त आणि अहंकारबरोबर ज्ञाताज्ञेयचा संबंध आहे. आपण ज्ञाता आणि अंत:करण ज्ञेय! ज्ञेय-ज्ञाता चा संबंध हा लग्नाचा संबंध नाही म्हणून ते आपणापासून निराळे आणि निराळेच रहाते.

हे लोक जे वशीकरण (hypnotize) करतात त्याचा परिणाम अंत:करणावर होतो. अंत:करणाचा प्रत्येक भाग झपाटला जातो. पहिले चित्त झपाटले जाते, नंतर सर्व झपाटले जातात. अंत:करणावर परिणाम झाला म्हणजे बाहेरच्या बाजूवर सुद्धा त्याचा परिणाम होतो. पहिल्यादा अंत:करणावर परिणाम होणार. मन शून्य झाले म्हणजे बाह्य भाग त्याच्या म्हणण्याप्रमाणे वर्तन करते. वशीकरण झाल्यानंतर स्वत:स काहीच कळत नाही. स्वत: शून्यच होतो. मग भानावर आला तेव्हां काय झाले त्याची पण आठवण रहात नाही. सबंध वशीकरणाची शून्यता होते आणि भानच रहात नाही. वशीकरण प्रत्येकावर होऊ शकत नाही. हा पण हिशोब असला पाहिजे तरच होऊ शकतो. हे तर रूपक आहे. वशीकरणाचा अमुक वेळ पर्यंत परिणाम रहातो. फार वेळ राहू शकत नाही.

देहाबरोबर अंत:करण बाजुला करून (आत्म्यात राहून) फक्त एकच तास बसा तर जगाचे मालक व्हाल. आम्ही तुमच्या हातामध्ये दिव्यचक्षू देतो. शुद्धात्मा बनवितो. नंतर तुम्हास जेथे जावयाचे असेल तेथे जा. थेट मोक्षापर्यंत जाल, तोपर्यंत दिव्यचक्षू तुमच्या बरोबर रहातील. येथे आमच्या हाजरीमध्ये अंत:करणाची शुद्धी होत असते. त्यामध्ये दु:ख होत असले तरी ते बंद होऊन जाईल आणि वर शुद्धी होईल. त्या शुद्धीने तर खरा आनंद उत्पन्न होईल आणि खरी शांती मिळेल.

प्रश्न:- हे भक्त माळा फिरवितात तेव्हां अंत:करणाची क्रिया कशी चालू होत असते? मनामध्ये फिरवतात, बाहेर हाताने आणि चित्त परत दुसऱ्या क्रियेत असते हे काय? त्यावेळी कोणते मन हे काम करते?

दादा:- मन एक वेळ नक्की करते की माळा फिरवावयाच्या आहेत. त्यानंतर माळा आपोआप फिरु लागतात. हात त्याचे काम करतो. त्यावेळी मन आणि अहंकार अंत:करणामध्ये काम करीत असते. चित्त ठिकाणावर नसते. ते बाहेर भटकत असते. त्यावेळेस ह्या माळा मी फिरवतो असा अहंकार करतो. तो पुढील जन्माकरीता बी पेरतो. आता जे काही करतो तो complete discharge आहे. हे discharge बाहेर पडत असते तेव्हां तो त्यावर अभिप्राय करतो. जसा अभिप्राय केला असेल तसे फळ मिळते. चांगली भावनावाले अभिप्राय करतात की ह्या माळा मी फिरवतो. परंतु चित्त ठिकाणावर नसते. चित्त ठिकाणावर राहिले तर उत्तम. म्हणून पुढील जन्मात त्याप्रमाणे मिळते. आणि काही असे सांगतात की ह्या माळा लवकर फिरवावयाचे कळले तर बरे. त्याचा तसा अभिप्राय असतो म्हणून त्यास माळा लवकर फिरवावयाचे कळते. तर त्यास पुढील जन्मात तसे प्राप्त होते.

''जसा अभिप्राय होत असतो तसे पुढील जन्माचे बी पेरले जाते''. त्याची charge भर होते. ही मुले वाचतात तेव्हां जर मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार चारीही हजर राहिले तर एकच वेळा वाचावयास लागेल. परत वाचावयास लागणार नाही. हा तर वाचतो येथे आणि चित्त क्रिकेट खेळत असेल तेथे असते म्हणून वाचलेले सर्व फुकट जाते. हा एक पाय जर तुटला असेल तर काय होईल? कसे फळ मिळेल? त्याप्रमाणे ह्या अंत:करणाचे आहे !

कविराज नवनीत संघवी ने गायले आहे की :-

''भीडमा एकांत एवी स्वप्नमयी सृष्टीमां

सूणनारो 'हुं' ज ने गाणारो 'हुं' ज छुं''.

ह्या मुंबईच्या लोकल-गाडीमध्ये संध्याकाळी खूपच गर्दी असते. तेव्हा इकडून तिकडे आपोआप धक्के बसतात. तेव्हां मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार सर्वच बरोबरीच्या गर्दीमध्ये आलेले असतात सर्वच मग्न (engaged) असतात तेव्हा ''स्वत:स'' (शुद्धात्म्यास) त्यावेळेस बघण्याची खरी मजा येते. जेव्हा तो एकटा असतो तेव्हाच त्यास खरी स्वतंत्रता मिळते. अरे जशी गर्दी जास्त आणि ज्ञेय पुष्कळ तशी 'ज्ञाता'ची ''ज्ञानशक्ति'' पण खूपच वाढते खरोखर, गर्दीमध्ये असतो तेव्हां ज्ञातेपणाची शक्ति वाढते. संपूर्ण प्रकाशामध्ये येते. जितका विस्तार (scope) वाढतो तितकी शक्ति वाढते. कित्येक लोक सर्व काही सोडून जंगलात जातात. अरे खरी मजा गर्दीमध्येच आहे. बाहेर गर्दी, आत गर्दी, सर्वच ठिकाणी गर्दी असते. तेव्हा शुद्धात्मा खरोखर एकटाच असतो. तो जरासुद्धा कशातही तन्मयाकार होत नाही. हे तर स्वरूप ज्ञान प्राप्त झाल्यानंतर होऊ शकते.

## ( ८८ )
## अनिवार्य अथवा स्वैच्छिक

जग कसे चालले आहे ते समजण्याजोगे नाहीं. ह्या जगात सर्व काही सक्तीचे आहे. आणि लोक ऐच्छिक समजून चालतात. म्हणून सर्व काहीं फसगत होते. जन्मास आला तो सक्तीने, शिक्षण घेतले ते सक्तीने, लग्न केले ते सक्तीने आणि मरणार ते पण सक्तीने, अरे एक समय मर्जीचा असे कोणी जाणले असेल असा मनुष्य जगात सापडणे फार दुर्लभ आहे. स्वत: पुरुष होतो तेव्हाच त्याची स्वतंत्र मर्जी उत्पन्न होते आणि तेव्हा पासूनच त्याला सक्तीच्या जगामध्ये ऐच्छिकपण उत्पन्न होते. पुरुष झाल्या नंतरच पुरुषार्थ होऊ शकतो. अरे मूर्खा सर्वच सक्तीचे आहे. जन्मल्यापासून मरणापर्यंत

अनंत अवतारापर्यंत तूं सक्तीने भटकलास. आणि जर ज्ञानीपुरुष, त्याच्यातून सुटका करून देणारा मिळाला नाही तर त्यामध्येच तुला भटकावे लागेल.

मुलांना लहानाचे मोठे करणे, शिकवणे, लग्न करून देणे हे वडिलांना सक्तीचे आहे. सक्तीचे म्हणजे- duty bound कर्तव्याने बांधलेले आणि ऐच्छिक म्हणजे will bound इच्छेने बांधलेले लोक सक्तीच्या गोष्टीस ऐच्छिक मानतात. अरे तुझी willingness इच्छा ज्या बाजूस असेल त्या बाजूला संसार गुंडाळला जातो. संसार करावा लागतो. जे सक्तीचे आहे त्यात ऐच्छिक गोष्टीचे चित्र रेखाटले जात आहे. जी बदलू शकतो ती will power- इच्छाशक्ति आहे. पुष्कळ मुले वडिलांच्या विरुद्ध जातात. तेव्हां वडिलांना राग येतो आणि ते त्यांना सर्व स्पष्ट सांगून टाकतात. यात त्यानी विशेष नवीन काय केले? हे सक्तीचे होते. तुझे जे ऐच्छिक असेल ते दाखवना?

देवगतिमध्ये credit जमा असलेली भोगावयास जावे लागते. ते सुद्धा सक्तीने. त्याचप्रमाणे debit- खर्च केलेले भोगणे ही सुद्धा सक्ती. ही नोकरी करता ती ऐच्छिक म्हणून करता का? नाही. सक्ती म्हणून करता. तुम्ही तुमची काही ऐच्छिक गोष्ट केली असे तुम्हास वाटते का? हे जर इच्छेप्रमाणे असेल तर तुम्ही इच्छेनुसार म्हणून समजता आणि इच्छेच्या विरुद्ध झाले तर म्हणता सक्ती आहे. अरे दोन्ही सक्तीचेच आहेत. इच्छा ही सुद्धा सक्ती आहे!

ह्या सगळ्या क्रिया न थांवण्यासारख्या आहेत. सर्वच सक्तीच्या आहेत. आणि सतत बंधनरूप आहेत. ऐच्छिक केले किंवा इच्छेविरुद्ध केले, ही कल्पना आहे. इच्छेप्रमाणे आहे त्याचे भान नसते. सक्तीमध्ये कर्तेपणा सर्वच निघून जातो. परंतु ऐच्छिकमध्ये स्वत: कर्ता होतो. ऐच्छिकप्रमाणे जे काहीं होते तो egoism अहं मीपणा आहे. कमाई केली तेव्हा सांगतो की मी कमाई केली आणि नुकसान झाले तर भगवानला दोष देतो. हे स्पष्ट दाखविते की हा विरोधाभास आहे. जगास ऐच्छिक मानतो म्हणून पाप-पुण्य कमवितो. जर सक्तीचे समजले तर पाप-पुण्याचा प्रश्न येत नाहीं.

प्रश्नकर्ता- लग्न केले ते सक्ती म्हणून केले की ऐच्छिक?

दादाश्री- पूर्वी ऐच्छिक वाटत होते. आता सक्तीचे वाटत आहे.

हे तुमचे नांव आहे ते सक्ती आहे की मर्जी आहे? सक्ती आहे. कारण ते लहानपणापासून ठेवण्यात आले आहे आणि ते नांवच चालवावयाचे आहे. ते नांव आवडो किंवा न आवडो, त्यास इलाज नाही. ही तर सक्ती आहे आणि ती आपोआप होत असते. संसाराच्या मार्गामध्ये तीन माईल आणि चौथा फर्लांग यावयास लागेल, तेथे सक्तीमूळे पोलीस मारून-ठोकून काम करून घेतो. जसा बाहेरचा पोलीस आहे तसाच

आत आहे. ते आतील पोलीस सर्व भंवरे फिरवितात. एक दिवस मी ओटीवर बसलो होतो आणि दोनचारजण बैलला खेचून नेत होते. तेव्हां बैलाचे नाक खेचले जात होते. आणि तुटण्याच्या बेतात होते आणि शिवाय ते काठीने मारत व पराणीने टोचत होते. तरीसुद्धा तो बैल जरासुद्धां हलत नव्हता. मी त्या माणसाला विचारले की, बाबारे असे का मारतोस? बैल कां चालत नाही? तेव्हा त्यानी सांगितले, काल बैलास दवाखान्यात घेऊन गेलो होतो. तेव्हा त्यास दवाखान्याची धास्ती बसली, म्हणून तो आज चालत नाही. हे तर कसेही करून जाण्याशिवाय सुटका नव्हती. नाक खेचले जात होते, पराणी मारली जात होती आणि ती टोचली जात होती. व जावे तर लागत होते. त्यापेक्षा असाच्या असा गेला असता तर काय झाले असते? पराणी टोचून घेऊन शेवटी काम करावयाचे त्यापेक्षा राजीखुशीने कां म्हणून करू नये? अरे हे सर्वच सक्तीचे आहे. म्हणून सरळ होऊन गुपचुप चाल ना. नाहीतर बैला सारखे तुला सुद्धा जग फटके मारील.

जगाचे विष लाख जरी तुला प्यावयाचे नसेल, परंतु ते सक्तीचे आहे म्हणून फटकारे खाऊनसुद्धा प्यावयास तर लागेलच. रडतामुखानी पिण्यापेक्षा हसतमुखाने पिऊन तू निळकंठ हो. ह्यामूळे तुझा अहंकाराचा रस उत्तम तऱ्हेनी उगाळला जाईल, आणि तू महादेवजी होशील! आम्ही त्याच तऱ्हेनी महादेवजी झालो.

भगवान महावीरनासुद्धा त्याग सक्तीचा होता. त्यांचे ऐच्छिक तर वेगळेच होते. ते स्वतः स्वतंत्र झाले होते. पुरुष झाले होते. आणि ऐच्छिक उत्पन्न झाले होते. परंतु बाहेरच्या भागात सक्तीचे होत. भगवानने बायकोला सोडली ते सुद्धा कर्तव्याला सोडुन गेले. त्यास लोक ऐच्छिक समजतात. आमचे महात्मे जे कर्तव्य म्हणून करतात ते वैभव आणि इच्छेप्रमाणे करतात तो मोक्ष, वैभवाबरोबर मोक्ष हे दादाभगवान ह्यांचे अक्रमज्ञान आहे.

## ( ८९ )
## जगाचे अधिष्ठान

सर्व जग, जगाचे अधिष्ठान शोधत आहे. परंतु ते सापडणे फार कठिण आहे. "प्रतिष्ठित आत्मा" हा ह्या जगाचे मोठ्यातले मोठे अधिष्ठान आहे. आज जगाचे खरे अधिष्ठान– naturally सहजगत्या आमच्यामूळे बाहेर पडले आहे...

तुम्ही स्वतः "शुद्धात्मा" तर आतमध्ये कोण राहिले आहे? ही आतील सूक्ष्मी क्रिया कोण करीत आहे? हे सर्व प्रतिष्ठित आत्म्यामूळे होत आहे. प्रतिष्ठित–आत्मा म्हणजे मागील आयुष्यात जे जे कर्म केले होते, जी जी प्रतिष्ठा केली त्यामूळे प्रतिष्ठित–आत्म्याचे बंधन झाले. प्रतिष्ठा कशा रीतीने केली? "मी चंदुभाई" 'हा माझा देह',

'हे माझे मन' जे जे काहीं झाले, ते 'मी केले ही प्रतिष्ठा झाली'. त्यानंतर प्रतिष्ठित-आत्मा होऊन ह्या जन्मात मग परत देहामध्ये येतो, दुसऱ्या शब्दात तो आरोपित-आत्मा म्हटला जातो. तो सर्व आरोप करतो. विसर्जन होते तेव्हा सूक्ष्म तऱ्हेनी विसर्जन करतात. ते कशा तऱ्हेनी समजण्यात येते? जे सर्जन होते ते नव्या प्रतिष्ठित आत्म्याचे होते. आता हे कसे माहीत होणार?

प्रतिष्ठित-आत्मा केव्हा म्हणतात? जेव्हां अहंकार (मी) आणि ममता (माझे) हे एकत्र केले जाते तेव्हां 'मी नाहीं' आणि 'माझे नाहीं' हे निर्विकारी आहे. 'हा मी आहे', 'हे माझे आहे' हा विकारी संबंध आहे. विकारी संबंध हा प्रतिष्ठित-आत्म्याचा आहे. ''शुद्धात्मा'' तर निर्विकारी आहे.

प्रतिष्ठित-आत्मा च हे सर्व करीत आहे. ''शुद्धात्मा'' काहीच करीत नाहीं. हालचाल करणे हे सर्व अनात्म्याचे गुणधर्म आहेत, आत्म्याचे नाहीत. आत्मा रात्रीसुद्धा झोपत नाही आणि दिवसासुद्धा झोपत नाही. अनात्म्याचा भाग झोपतो. जो क्रिया करतो तोच झोपतो. जो क्रिया करतो त्यास विश्रांतीची आवश्यकता आहे. ''शुद्धात्मा'' तर क्रिया करीतच नाही. तेव्हा त्यास विश्रांतीची जरुर का आहे? विश्रांती कोण शोधता? ज्याला विश्रांतीमध्ये आवड आहे तो. तो कोण? प्रतिष्ठित-आत्मा. ही सर्व क्रिया प्रतिष्ठित आत्म्याची आहे. प्रतिष्ठित आत्म्यास झोप चांगली आली की वाईट आली ते कोणी ओळखले? त्याच्या क्रिया कोणी ओळखल्या? शुद्धात्म्याने ओळखले. शुद्धात्मा प्रतिष्ठित आत्म्याच्या कोणत्याही क्रियेमध्ये हात घालतच नाहीं. फक्त बघतो आणि ओळखतो. ढवळाढवळ करणे हा तर प्रतिष्ठित-आत्म्याचा धर्म आहे. प्रतिष्ठित-आत्मा जे समजतो ते ज्ञेय आहे. आणि प्रतिष्ठित-आत्म्यास ज्ञेय स्वरुपाने जो जाणतो तो ''शुद्धात्मा'' आहे. प्रतिष्ठित-आत्मा ढवळाढवळ का करतो? कारण त्यास आवड आहे. ''शुद्धात्म्यास'' आवड नाहीं. तो तर ज्ञाता, द्रष्टा आणि परमानंदी आहे. ''शुद्धात्मा'' हा स्वपर प्रकाशक आहे. परंतु प्रतिष्ठित-आत्मा पर-प्रकाशक आहे. ''शुद्धात्मा'' प्रतिष्ठित-आत्म्यास सुद्धा बघतो आणि जाणतो. म्हणून प्रतिष्ठित-आत्मा ज्ञेय आहे. ''शुद्धात्मा'' आणि प्रतिष्ठित-आत्म्याला ज्ञाता आणि ज्ञेयचा संबंध मात्र आहे.

अज्ञानी विचारतो की, दुःख कोणास होते? अरे दुःख तुलाच होते. तू आत्मा नाहीं का? आत्मा खरा परंतु प्रतिष्ठित-आत्मा, तुझा आरोपित आत्मा. खऱ्या मूळ आत्म्यास 'शुद्धात्मा' तू नक्कीच ओळखला नाहीस. तर मग ते रूप तुला कोणत्या रीतीने सांगता येईल? होय तू जर शुद्धात्म्यास ओळखशील आणि त्यातच सतत राहिलास तर तू शुद्धात्मा, आणि जर तू चंदुलाल आणि हा देह तुझा, तर तू प्रतिष्ठित-आत्मा. अहंकार आणि ममता ह्यांची प्रतिष्ठा केलीस म्हणून तू प्रतिष्ठित-आत्मा.

जपानच्या लोकांनी मोटार तयार केली. चावी अशी दिली की, पांच किलोमीटरवर उभी राहील आणि आत चार माणसे बसली. मोटार तर चावीच्या आधाराने चालू झाली. चावी तो मनुष्य रस्त्यात भेटला आणि म्हणाला ''जय सच्चिदानंद! अरे उभे रहा, उभे रहा''. परंतु मूर्खा कसा उभा राहील? चावी दिल्या नंतर मोटार कशी उभी रहाणार?

जयेशभाई- यू टर्न मारला तर मग?

दादा- ही तर समजुतीची गोष्ट आहे. त्या माणसास सांगतो की, 'उभा रहा' आणि बाकीचे अंतर मधे गोळ-गोळ फिरतो आणि गरबा गावयास लागतो! असे आहे हे जग. स्वतः चावी दिली, मोटार चालवणारा हा आणि गरबा गावयास लागतो! प्रतिष्ठा स्वतः केली, परंतु जेव्हा विसर्जन नैसर्गिक रीत्या होते तेव्हा फसगत होते.

जो ऐकतो तो प्रतिष्ठित-आत्मा, डोळ्यांनी दिसतो तो प्रतिष्ठित आत्मा, पांच इंद्रियानी अनुभव घेतो तो प्रतिष्ठित-आत्मा, प्रतिष्ठित-आत्म्याने काय जाणले काय अनुभविले? जो बघतो आणि समजतो तो 'शुद्धात्मा'. इंद्रियगम्य ज्ञान तो प्रतिष्ठित आत्मा. अतींद्रिय ज्ञान तो 'शुद्धात्मा', प्रतिष्ठित-आत्मा हे अप्रत्यक्ष मर्यादितचे ज्ञान आहे. 'शुद्धात्मा' हे सरळ अमर्यादित ज्ञान आहे. प्रतिष्ठित-आत्म्याने charge भर केलेल्या शक्तिचे गलन होत रहाते. शेवटी प्रतिष्ठित-आत्मा आणि शुद्धात्मा दोन्ही एकाच वेळी सुटे पडतात. शेवटच्या देहाच्या प्रमाणामध्ये निराकारी असुनसुद्धा साकारी प्रमाणामध्ये आहे. जगामध्ये स्थूल किंवा सूक्ष्म ह्यांची घडामोड होत आहे. ती सर्व प्रतिष्ठित आत्म्याची आहे. बाकी कोणी लुटू शकत नाहीं. आणि कोणी लुटला जात नाही. ही तर प्रतिष्ठित-आत्म्याने केलेल्या प्रतिष्ठेची देवाण व घेवाण चालू आहे.

प्रतिष्ठित-आत्म्यास जर जाळले तर भयंकर पाप लागेल. कशामूळे? कारण तो मानलेला आहे, आरोपित आहे. हे टीपॉय जाळले तर पाप लागणार नाहीं. परंतु कोणाचा आरोप असला, कोणाची प्रतिष्ठा असेल की, हे टीपॉय माझे आहे, तर भयंकर पाप लागेल. ममता, भोक्त्या पदात घडविली जाते. भोक्त्या पदामध्ये माझेपण त्याचा आरोप करते. भोक्त्यापणा मध्ये जी ममता केली त्याचेच हे फळ आहे. जशी प्रतिष्ठा करतो तसे फळ मिळते. सुखाची केली तर सुख मिळते. आवडणे, न आवडणे हे प्रतिष्ठेच्या आधारावर असते. शुद्धात्मा कधीही आकर्षित झाला नाहीं, कर्ता झाला नाहीं, भोक्तासुद्धा झाला नाहीं आणि होणारही नाहीं. वेदक म्हणजे ममता. 'शुद्धात्मा' आणि ममता हा विरोधाभास आहे. ममता, कर्ता किंवा भोक्ता जो दिसतो तो प्रतिष्ठित-आत्मा. ही चक्षुगम्य किंवा इंद्रियगम्य कोणती सुद्धा क्रिया 'शुद्धात्म्याची नाहीं. ही सर्व क्रिया प्रतिष्ठित-आत्म्याची आहे. शुद्धात्म्याची' क्रिया ही ज्ञानगम्य आहे. अनंत ज्ञान-क्रिया,

अनंत दर्शन-क्रिया वगैरे आहेत. हे तर जेव्हा 'शुद्धात्मा' स्वरुप होतो तेव्हाच माहीत पडते तेव्हाच स्वत:ला 'शुद्धात्मा' हा स्वत: अक्रीय आहे असे समजते. जोपर्यंत 'शुद्धात्म' स्वरुप झाला नाहीं तोपर्यंत हे प्रतिष्ठित आत्मस्वरुप आहे आणि म्हणून कर्ता, भोक्ता पदामध्ये आहे. भोक्ता पदामध्ये परत कर्ता होऊन बसतो. आणि नवी प्रतिष्ठा करून नवा प्रतिष्ठित-आत्मा तयार करतो. नवी मूर्ती तयार करतो. आणि असे चक्र चालूच रहाते.

'शुद्धात्मा' ज्ञाता-द्रष्टाच आहे परत प्रतिष्ठित-आत्म्यानेच ही सर्व गडबड केली. म्हणूनच आरश्यामध्ये प्रत्येकास स्वत:चा चेहरा पाहण्यास आवडतो नाहीतर आवडला नसता. हे सर्व रेखाटणे प्रतिष्ठित-आत्म्याचेच आहे. प्रतिष्ठित-आत्मा जोपर्यंत मी करतो असे समजतो ती प्रतिष्ठा केली. प्रत्येक मनुष्य स्वत:चा पुढील अवतार स्वत:च घडवतो. जशी प्रतिष्ठा करणार तसे होणार. तुझीच प्रतिष्ठा तोच प्रतिष्ठित आत्मा आहे. आणि तोच सर्वाचा कर्ता व्यवहार आत्मा आहे.

सत्याच्या शोधाकरीता सर्व जग भटकत आहे. जो परमेश्वर स्वत:मध्ये प्रकाशित होत आहे ते ''सत्य'' आहे. पण जगामध्ये आत्मा सापडला असेल असा कोणीही नाहीं. आणि जो सापडलेला आहे तो सापेक्ष आत्मा आहे. परंतु तो सुद्धा सापेक्ष आत्मा पुरता सापडला नाहीं. सापेक्ष आत्मा हाच प्रतिष्ठित-आत्मा.

प्रतिष्ठित-आत्म्याच्या हातात भावना करण्याशिवाय कोणतीही शक्ति नाहीं.

अव्यवहार राशीमध्ये जितके आत्मे आहेत ते प्रतिष्ठित-आत्म्याच्या बरोबर आणि बरोबरच असतात. अव्यवहार राशीचे जीव इतके की, ज्याचे नावपण पडले नाहीं. व्यवहार राशीमध्ये जीव येतो म्हणून त्याचे नाव पडते. तेथुन नंतर त्याचे व्यवस्थित सुरू होते.

अंत:करणाचा मालक प्रतिष्ठित-आत्मा आहे. पण तो त्याच्यापासून निराळा आहे. मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार ह्या सर्वापेक्षा निराळा आहे. मन सांगते की, अमुक करावयाचे, परंतु प्रतिष्ठित-आत्मा सांगतो की, हे करावयाचे नाहीं तर ते होणार नाहीं. ह्याच्यात जो भाव आहे तो प्रतिष्ठित-आत्म्याचा आहे. 'शुद्धात्मा' ज्ञाता-द्रष्टा आहे. आतमध्ये इच्छा होते हा प्रतिष्ठित-आत्मा काय करतो. मनाबरोबर प्रतिष्ठित-आत्मा एकत्र होतो ते 'शुद्धात्म्यास' माहीत असते आणि भेटला नाही ते सुद्धा 'शुद्धात्मा' जाणतो. अज्ञानी मनुष्यसुद्धा प्रतिष्ठित-आत्म्यास मनापासून निराळा करतो. योगाच्या शक्तिमूळे अमुक शक्ति मिळवतो.

शुद्धात्मा पद प्राप्त झाल्यानंतर आता आपण प्रतिष्ठा करीत नाहीं. पूर्वी

केलेली प्रतिष्ठा आहे ती चालत आहे. व्यवहारासाठी आहे. आपल्या शब्दामध्ये निरहंकार आहे. नवीन चित्र रेखाटणे बंद होते. ही अजब गोष्ट आहे! एका जन्मात सुद्धा जर प्रतिष्ठा झाली नाहीं तर मग कामच झाले ना! ज्ञानीपुरुषाचा प्रतिष्ठित–आत्मा आणि मिथ्यात्वी मनुष्याचा प्रतिष्ठित–आत्मा ह्यामध्ये किती फरक आहे? ज्ञानीचा 'मी' 'शुद्धात्मा' पर्यंत पोहोचतो. परंतु दुसऱ्याचा 'मी' प्रतिष्ठित–आत्म्या करताच आहे. हा सर्व दुसरा जो जाणतो तो 'शुद्धात्मा' आहे. ज्ञानी आहे. ज्ञानी प्रतिष्ठित–आत्म्यास सुद्धा परका समजतो. परंतु मिथ्यात्वी जे दुसऱ्याचा जाणतो तो प्रतिष्ठित–आत्मा आहे.

प्रश्न:– संसाराच्या व्यवहारामध्ये जे चेतन वापरले जाते ते शुद्धात्म्याचे आहे का?

दादाश्री:– हे वापरणारे चेतन, ते प्रतिष्ठित–आत्म्याचे आहे. ''शुद्धात्म्या'' चे तर काहीसुद्धा जाणार नाहीं आणि वापरलेही जाणार नाहीं. बॅटरी भरण्याचे ठिकाण असेल ते बॅटरी भरून देते. त्यामध्ये त्याची शक्ति कमी होत नाही. हे सर्व वाटेल ती, कर्मे करतील, कोणत्याही अवतारामध्ये येईल. त्यामध्ये सोने तेच आणि, फक्त घडवण्याची मजुरी जाते. अनंत अवतार नरकामध्ये फिरला परंतु सोने ९९ टचचे झाले नाहीं. १०० टचचे आहे. ही जी कमी जास्त होत असते ती तर प्रतिष्ठित–आत्म्याची होते. charge– discharge तर प्रतिष्ठित–आत्म्याची होते. मिश्र चेतनची होते. 'शुद्धात्म्याची' नाही.

ह्या दगडाच्या मूर्तीमध्ये प्राण–प्रतिष्ठा करतात. ती बरीच वर्षे फळ देते ना? प्रतिष्ठेची केवढी मोठी शक्ति आहे! अरे लोखंडास सुद्धा उडवते. ह्या जगामध्ये शास्त्रज्ञानाची सर्व शोधाशोध चालू आहे ती सर्व प्रतिष्ठित–आत्म्याची एवढी मोठी शक्ति आहे. तर 'शुद्धात्म्या' ची अनंत शक्तिची गोष्टच कोणत्या तऱ्हेने वर्णन करावयाची? आत्म्यामध्ये एवढी मोठीशक्ति आहे की ह्या भिंतीमध्ये प्रतिष्ठा केली तर भिंतसुद्धा बोलावयास लागेल.

प्रतिष्ठित–आत्मा सुद्धा इतका काही शुद्ध आहे की त्याचा विचार सुद्धा करू शकत नाही. विचार हे तर मनाचे स्वरुप आहे. ग्रंथी फुटतात तेव्हा विचार दशा प्राप्त होते. धर्माचे विचार किंवा चोरी करण्याचे विचार येतात. त्या मनाच्या गाठी आहेत. प्रतिष्ठित–आत्मा जर विचार करू शकला असता तर बुद्धि राहिलीच नसती. मग तर computer सारखे होईल. प्रतिष्ठित–आत्मा आतील कार्य करतो. ते अंत:करणा नंतर बाह्यकरणामध्ये तसेच होते. अंत:करण ज्यास बघता येते त्यास बाह्यकरणाची माहिती पडते. परंतु मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार ओळखता यावयास पाहिजे. चित्त आणि

अहंकार हे प्रतिष्ठित-आत्म्याचे भाग आहेत. अंत:करण हाच प्रतिष्ठित-आत्मा आहे. अंत:करण जसे दाखविते त्याप्रमाणे बाह्यकरणामध्ये बाहेर रूपकामध्ये येते. अंत:करणा सांगत दिमाग पण आहे. परंतु तो स्थूल आहे जेव्हा की अंत:करण सूक्ष्म आहे. ज्या-ज्या क्रिया आतमध्ये होतात त्या प्रतिष्ठित-आत्म्याच्या आहेत. मूर्तीमध्ये प्रतिष्ठा केली तर मूर्त परमेश्वर मिळतो.

## ( ९० )
## निश्चेतन-चेतन

जग ज्यास चेतन म्हणते त्यास आम्ही निश्चेतन-चेतन म्हणतो. कारण दिसते तर चेतन, लक्षण चेतनचे आहे परंतु गुण एकसुद्धा चेतनाच्या नाही तर त्यास चेतन कसे म्हणवयाचे?

उदाहरणार्थ:- पितळेस जर मुलामा दिला तर ते सोन्या सारखे दिसेल. सोन्या सारखी सर्वच लक्षणे दिसतील. परंतु हे तर सोनाराकडे घेऊन गेला तर माहीती होइल. सोनार प्रथम त्यामध्ये शोध करील की ह्यांत सोन्याचे गुणधर्म आहेत किंवा नाहीत? नसले तर ते सोने नाही. लक्षणे सोन्या सारखी असली तरी गुणधर्म नसल्यामूळे ते सोने नसते. त्याच प्रमाणे चेतनमध्ये लक्षण दिसते, परंतु एकसुद्धा गुणधर्म नसल्यामूळे त्यास चेतन कसे म्हणावयाचे? आम्ही त्यास निश्चेतन चेतन म्हणतो. पितळ सोन्या सारखेच दिसते. परंतु जेव्हा त्याच्यावर गंज चढतो तेव्हां माहीत पडते की हे सोने नाही. त्याप्रमाणे सोनेसुद्धा माहीत पडते.

हा देह तर मिश्रचेतन आहे. निश्चेतन चेतन आहे. आपण शुद्ध चेतन आहोत. पूर्वी प्रतिष्ठा केली तो प्रतिष्ठित आत्मा तेच प्रतिष्ठित चेतन मिश्र चेतन.

एक तर चेतन चांगले, नाहीतर अचेतन चांगले. परंतु अर्धचेतन चांगले नाही. कारण त्यामध्ये सर्वच चेतनची लक्षणे असतात. भगवाननी सांगितले की वाव मधे जाऊन स्पंदन कर. परंतु ह्या मिश्रचेतना पुढे स्पंदन करू नकोस. मिश्रचेतन स्वाभाविक असले तर हरकत नाही परंतु घसरता कामा नये. कोणी घसरत असेल तर त्यास आम्ही इशाऱ्याने जागे करतो. मिश्रचेतन असते तेथे त्यास आम्ही जागृत रहाण्यास सांगतो, अचेतन असेल तेथे आम्ही हरकत घेत नाही. ही विडी (bidi) आहे. ती अचेतन आहे. तेथे आम्ही हरकत घेणार नाही. खातेवही रेखाटली असेल त्यास हिशोब म्हणतात. हिशोब चुकता केला नाही तर आत परमाणु ओरड करतात. दिमाग बिघडुन जातो. हे मिश्रचेतनमध्ये आले तर आम्ही त्यास जागे करतो. अरे अहंकार करूनच जागा हो.

गाफील राहुन चालणार नाही. नाही तर जन्म फुकट जातो.

हा सिनेमा फिर्याद करतो की आमच्याबरोबर भोग का भोगविता? नाही, तो फिर्याद करणार नाही. कारण तो अचेतन आहे. परंतु मिश्रचेतन तर फिर्याद करील कारण त्याच्या आत थंड पणा नाही. त्याच्या आत पुष्कळ जळफळाट आहे. आंतमध्ये थंड असेल तर काही हरकत होणार नाही. मिश्र चेतनबद्दल जरा वाकडा विचार आला की ताबडतोब पुसून टाकावयास लागेल. केले नाही तर चालेल. मिश्रचेतन मोक्षास तर जाऊन देणार नाही परंतु आत जे सुख येत असते त्याचा सुद्धा विरोध करते.

सिनेमा किंवा जिभेच्या फाईलीमूळे रोग होईलच असे नाही परंतु मिश्रचेतनमूळेच होतो. भजीमध्ये आवड नावड अशी हरकत नसते. परंतु मिश्रचेतनमध्ये आवड नावड असतेच, ते हरकत घेतल्या शिवाय रहाणार नाही. मिश्रचेतनमूळे सर्व संसार तयार झाला आहे. मिश्रचेतन हे अंधार कोठडी आहे. हीच जर बंद झाली तर काय उपाधि होईल?

मुक्त मनानी बसता येईल अशी सुरक्षित बाजू राखून ठेवावी. मन जर ओरडा ओरड करू लागले की भजी खावयाची आहेत तर ती खावयास घातली म्हणजे ते मुक्त मनाने बसू देते. परंतु मिश्रचेतन बसू देत नाही. सत्संगामध्ये सुद्धा मन सारखे बारिक-बारिक टोचत असते.

तुम्ही ज्या रीतीने वागता त्याचे दोन भाग आहेत. एक निश्चेतन-चेतन आणि दुसरे चेतन. परंतु तुम्ही स्वतः निश्चेतन-चेतन मानता परंतु दोन्ही भाग स्वरूपाचे मिश्रण आहेत. (संयुक्त) स्वरूपाचे नाहीत. नाहीतर दोघांचे गुणधर्म नाश पावतील.

निश्चेतन-चेतन हे यांत्रिक चेतन आहे. बाहेरचा सर्वच भाग यांत्रिक आहे. स्थूल यंत्रास हेंडल मारावयास लागते. परंतु सूक्ष्म यंत्रास तू हेंडल मारूनच आणले आहेस. आत सारखे जळण टाकतच राहिला आहेस. परंतु हेंडल मारावयाचे नाही. सूक्ष्म शरीर यांत्रिक चेतन आहे. तेथे मी केले असा गर्व होतो. म्हणून भर होते आणि पुढिल जन्मासाठी बी पेरले जाते.

सर्व जग अचेतनाला चेतन मानीत आहे आणि क्रियेमध्ये आत्मा मानत आहे. क्रियेमध्ये आत्मा असत नाही आणि आत्म्यामध्ये क्रिया असत नाही अशी गोष्टी केव्हां समजणार? जगाला तर असे वाटते की अचेतन-चेतन चालविते. चेतन निराळे आहे, अचेतन निराळे आहे आणि चालविते ते सुद्धा निराळे आहे. विभाविक गुण ते अचेतन-चेतन. विभाविक गुण म्हणजे आत्म्याच्या भ्रांतिने उत्पन्न झालेले ते. चालू झालेले ते मिश्रचेतन.

## ( ९१ )
## मनुष्य देह मोक्षाचा अधिकारी

डार्विन ह्यांनी उत्क्रांती सिद्धांत (Evolution Theory) शोधली. परंतु ते पूर्ण नाही. अमुकच भाग आहे. मनुष्यगति नंतर वक्रगति होते ते तो समजला नाही. म्हणून तो पूर्ण सिद्धांत देऊ शकला नाही. मनुष्य देहाशिवाय असा कोणताही देह नाही की जो मोक्षाचा अधिकारी आहे. मनुष्य देह मिळाला आणि मोक्ष मिळविण्याची साधने एकत्र झाली तर काम होईल. परंतु हल्ली तर मनुष्य निश्चेतन-चेतन आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर भवऱ्याचे स्वरूप आाहे.

लोक जे भावमन-द्रव्यमन मानतात ते तर निश्चेतन-चेतन आहे. शुद्ध चेतन तर ज्ञानपुरुष देतात. बाकी तर यंत्र आहे. हे यंत्र चालते त्यास म्हणतात मी चालवितो. हा तर नुसता Egoism- अहंकार आहे की हे मी केले! मन गाठीचे तयार झाले आहे. गाठीचे फळ येणे म्हणजे रूपकांत येणे. ते फळ जर मिश्रचेतन असले तर आडकाठी येते. मिश्रचेतनला आपण सोडले तरीसुद्धा समोरचा सोडत नाही. परंतु अचेतनला तुम्ही जर सोडले तर कसलीच उपाधि रहाणार नाही. मन डॉक्टरला दिसू शकत नाही. परंतु ज्ञानी पुरुषाला दिसू शकते. Mind is Complete Physical आहे परंतु Subconscious Mind हे निश्चेतन-चेतन आहे.

निश्चेतन-चेतन पदास अद्वैतपद म्हणतात. त्यास जीव म्हणतात. परंतु चेतन म्हणता येत नाही. आमच्या महात्म्यांस शुद्धचेतन मिळाले आहे. आपले शरीर तर निश्चेतन-चेतन आहे आणि आपण स्वत: शुद्ध चेतन आहोत.

जोपर्यंत शुद्ध चेतन झाला नाहीस तोपर्यंत तू निश्चेतन-चेतन आहेस. सर्वच निश्चेतन-चेतन आहेत. मग तो साधु असो किंवा संन्यासी असो ! मनुष्य, तिर्यंच, सर्व प्रकारचे जीव, देव सर्वच निश्चेतन-चेतन म्हणजे भंवरेच म्हटले पाहिजेत. जोपर्यंत आत्म्याचे भान झाले नाही तोपर्यंत तू निश्चेतन-चेतन आहेस. जोपर्यंत स्वत:ची जाणीव करून देणारा ज्ञानी मिळाला नाही तोपर्यंत तू निश्चेतन-चेतन आहेस.

आम्ही ब्रह्मांडाचे मालकीशिवाय स्वामी आहोत. कारण आम्ही शुद्ध प्रगट स्वरूपाने चेतन अहोत.

जी जी अवस्था येते ती निश्चेतन-चेतन आहे. आपण शुद्ध चेतन आहोत. अवस्थेस बघावयाचे आणि समजून घ्यावयाचे. तिचा ताबडतोब नीट योग्य निकाल करून टाकावयाचा. ताबडतोब निकाल करता आला पाहिजे. तुम्ही जर अवस्थेमध्ये

चिकटलात तर दु:खी व्हाल. त्यामूळे आनंद होणार नाही. परसत्ता निश्चेतन-चेतन आहे. निश्चेतन-चेतनमध्ये आवड, नावड, आधी, व्याधि, उपाधि असतात आणि खऱ्या चेतनमध्ये आनंद, परमानंद आणि समाधि असते. चिंता, घाबरटपणा निर्माण होते ती अवस्था निश्चेतन-चेतनला होते आणि ते निश्चेतन-चेतन मी आहे असे समजतो. म्हणून चिंता उत्पन्न होते. ज्याला-ज्याला चिंता, घाबरटपणा किंवा त्रिविध ताप होतो ते सर्वच निश्चेतन-चेतन आहे. ज्ञान भाषेमध्ये खऱ्या भाषेमध्ये बाहेर चेतन स्वरूपानी जगच नाही. सर्वच निश्चेतन-चेतन आहेत. मग तो कोणीही असो. निश्चेतन-चेतनमध्ये विशेषण ''निश्चेतन'' आहे.

''मी चंदुलाल आहे'' असा आरोप भ्रांतिमूळे करीत आहे. 'मी' हा आत्मा आहे. आणि जेथे तो स्वत: नाही तेथे तो स्वत:स प्रतिष्ठित करतो. म्हणजे निश्चेतन-चेतन तयार करतो. जोपर्यंत भ्रांति तुटत नाही तोपर्यंत प्रतिष्ठितपणाने रहावयाचे. 'मी शुद्धात्मा आहे' असे जर लक्ष राहिले तर परत निश्चेतन-चेतनमध्ये जाणार नाही. 'शुद्धात्मा' प्राप्त झाला तेव्हाच, शुद्धचे चेतन माहीति होते. तेव्हाच कर्माच्या बंधनातून सुटतो.

निश्चेतन-चेतनवाला एका कर्माच्या बंधनातून मुक्त होतो आणि दुसरे कर्मबंधन उत्पन्न करतो.

## ( ९२ )

## इच्छा

इच्छा ही प्रगट अग्नी आहे. जोपर्यंत पुरी होत नाही तोपर्यंत ती पेटतच असते. भगवान काय म्हणतात? इच्छा हीच आवरण आणणारे कर्म आहे. इच्छा एक मोक्षाची आणि दुसरी ज्ञानी पुरुषाचीच करण्यासारखी आहे. ह्याच्यापासून नुकसान होत नाही. दुसऱ्या सर्व इच्छा संताप देतील आणि संसारांत ठेवतील. हा तर साक्षात अग्नी आहे. तो विझविण्याकरिता लोक पाण्याचा शोध करतात. परंतु पेट्रोल हातात येते आणि ते शिंपडतात. एक इच्छा पुरी होत नाही तर ताबडतोब दुसऱ्या वस्तुची इच्छा होते. ह्या इच्छांची साखळीच उत्पन्न होते. कायदा काय सांगतो तुला जी इच्छा होते ती नक्की पुरी होणारच. परंतु तिचा विचार करण्याने काहीच होणार नाही उलट अडथळा होईल. जी एकसारखी इच्छा होते तिचे पंचिंग होतच रहाते. काहीना काही तरी करतच रहातो. इच्छा सर्व वस्तूंची होणार नाही. हा संसार विविधरसा चा आहे, जो रस ज्याला आवडत असेल त्याची इच्छा होतच रहाते. इच्छा कशाची होणार? तुझ्या बुद्धिच्या अकलेप्रमाणे जे सुख आणलेस ते सुख तुला पुण्य खर्चून मिळत राहील.

ह्या जगाची जी ब्लेड आहे ती दोन्ही बाजूने वापरावयाची असते. परंतु शुद्धात्म्याची एकच बाजूने वापर 'मी शुद्धात्मा आहे' त्याच्या बदली जर 'मी अशुद्धआत्मा आहे' असे वापरले तर? सर्वांचा निकालच लागेल. शुद्धात्म्यास इच्छा (will) नसते, परंतु अंतरआत्म्यास असते. अंतरआत्मा शुद्धात्म्याचे पूर्णपद करून घेण्याकरिता इच्छा वापरतो. तेव्हा पूर्ण दशा होते. तेव्हा इच्छा बिलकुल रहात नाही. ती वीतरागतामूळे प्राप्त होते. संपूर्ण वीतरागास इच्छा नसते. आमची इच्छा काढून टाकणारी आहे आणि तुम्हा महात्म्यांची इच्छा ग्रहणीय पूर्णपद प्राप्त करून घेण्याकरिता आहे आणि दादांची निकालात काढली आहे, म्हणजे संपूर्णपद प्राप्त झाले आहे.

इच्छा आणि चिंतन ह्यात फरक काय?

चिंतन हे पुढील हिशोब रेखाटते आणि इच्छा मागील हिशोब काय आहे ते दाखविते. इच्छा आणि अनिच्छा ह्या दोन्ही पेटीचा माल आहे ती दाखविते. क्रम येतो तेव्हा इच्छा पूरी होते आणि अक्रम आला त्यावेळेस अनिच्छा पुढे आणि पुढे येते. उदाहरणार्थ:- अंधारामध्ये नंबर टाकले असतील आणि अंधारामध्येच उचलले असतील तेव्हा जर क्रम असतील तर एकानंतर दोन, दोनानंतर तीन असे क्रमवार आकडे हातामध्ये येतील आणि जर क्रमवार नसतील तर सात नंतर ५७ येईल. क्रमवार तर येणारच नाही. एक मनुष्य रत्नागिरीहून माझ्याकडे आला तो मला विचारू लागला, 'दादा' मी जेथे हात घालतो तेथे सोने निघते. मी त्यास सांगितले, 'बाबा, सध्या तुझा क्रम (link) जोडलेला आहे, म्हणून असे होते. परंतु थोड्या दिवसानी तुझा क्रम (link) तुटेल आणि त्यावेळेस तू माझो आठवण काढशील'. नंतर त्याप्रमाणेच झाले. त्याला धंद्यामध्ये इतका जबरदस्त तोटा झाला की मालक आणि मालकिणीने विष घेतले. परंतु ते दोघेही त्यांत वाचले. त्यावेळेस त्याना माझ्या सांगण्याची आठवण झाली. हा तर क्रम आणि अक्रम येतो आणि जातो. ह्याचेच नांव संसार. इच्छा हा मागील हिशोब आहे. परंतु चिंतनमध्ये योजना घडतात. तन्मयाकार होऊन कारणे उत्पन्न करतो. इच्छा हा परिणाम आहे. परंतु चिंतन हे कारण आहे. शास्त्रज्ञ काय म्हणतात की इच्छा होते. करण्याची जरुर नाही.

सूर्य मावळत असेल तर लोकाना उगवत आहे असे दिसते. परंतु त्याची चिन्ता करू नका. ती मावळती इच्छा आहे. मी महात्म्यांना सांगितले की वांझ इच्छा, जिचे बीज पडत नाही ती तुमची मावळती इच्छा लोकाना उगवती आणि मावळती अशा दोन्ही इच्छा असतात.

ह्या कलियुगात चटणीची इच्छा करणारेच आहेत. सर्व भोगण्याची इच्छा

करणारे नसतात. एका थोड्याश्या चटणीकरिता सर्व आयुष्य खर्च करतात.

अरे मी असे शेठजी बघितले आहेत की जे महावीर भगवानांच्या सभेमध्ये रात्रंदिवस हजर होते. शेठाणीला सांगितले की तू पुरी आणि भाजी येथे सभेमध्ये घेऊन ये व मी येथेच ते खाऊन टाकीन. त्यावेळेस भगवानांची वाणी त्यांच्या कानास इतकी गोड लागत होती की ते तेथून जरासुद्धा जाग्यावरून हलत नसत. परंतु त्यांची चटणी खावयाची इच्छा राहून गेली म्हणून ते अद्याप मोक्षाकरिता रखडत आहेत.

जे व्हावयाचे असते त्याची पहिली इच्छा होते. मॅट्रिक पास व्हावयाचे असेल तर प्रथम पास होण्याची इच्छा होते.

अंतराय तुटल्या नंतर स्वतःच्या इच्छेप्रमाणे प्राप्त होते. सत्संगा मध्ये पैसे खर्च करावयाचे अशी इच्छा तर पुष्कळ असते परंतु करणार काय? मागील अंतराय आल्यामूळे योग झाले तरी तो परत मागे फिरतो. जेव्हां अंतराय तुटतो तेव्हा आपल्या सर्व इच्छा आपोआप पूर्ण होतात.

इच्छा ही भाव नाही.

प्रश्नः- इच्छा आणि भाव ह्यामध्ये फरक काय?

दादाः- हा कापूस येथे आहे त्यास हरकत नाही. परंतु कांडी पेटवून जर तो कापूस जाळला तर त्यास इच्छा म्हणतात. इच्छा हा प्रगट अग्नी आहे आणि जोपर्यंत ती पुरी होत नाही तोपर्यंत ती पेटतच रहाते. वस्तुला पेटविली ती इच्छा आणि जे पेटते ते तुझ्या आत रहाते. आमची कशी वागणूक आहे की आमच्याकडे पेटविण्याकरिता कांड्यांची पेटीच नसते.

उगवती इच्छा आणि मावळती इच्छा म्हणजे charge- भरण्याची इच्छा आणि discharge- बाहेर टाकण्याची इच्छा, खाण्याची, पिण्याची ही मावळती इच्छा त्याला काही हरकत नाही. परंतु उगवती इच्छा ही बंधनकारक आहे आणि ती शरीरमध्ये आग उत्पन्न करते.

## ( ९३ )
## भाव म्हणजे काय?

शुद्धात्म्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भावच नसतो. प्रतिष्ठित-आत्म्याला जो भाव होतो त्यास भाव म्हणतात. प्रतिष्ठित-आत्मा ज्ञानी आणि अज्ञानीना पण असतो. अज्ञानीला भावमनाचे दृढ परिणाम असतात. पुष्कळ प्रतिक्रमण करावयाचेच आहे हा

भाव नक्की करतो म्हणून द्रव्यमन उत्पन्न होते आणि द्रव्यमन उत्पन्न होते आणि द्रव्यमधून भाव उत्पन्न होतो.

प्रश्न:- भावमन आणि द्रव्यमन म्हणजे काय?

दादा:- प्रतिष्ठित-आत्मा भाव करतो तेव्हा भाव मनाची सुरवात होते आणि त्यापासून द्रव्यमन उत्पन्न होते. भावमनाचे दोन प्रकार आहेत discharge- बाहेर टाकणे आणि charge- म्हणजे भरणे.

खरे म्हटले म्हणजे भावमन म्हणजे प्रतिष्ठित-आत्म्याचे सरळ भर (direct charge) होते ते. हे जे दिसते ते तर निर्जरा (discharge) आहे. भर (charge) दिसणार पण नाही आणि लक्षात पण येणार नाही. भर (charge) होऊ देणे जर समजण्यात आले तर कोणीही भरच (charge) होऊ देणार नाही. मग तर सगळ्यांचा मोक्षच झाला असता. भावमन (सूक्ष्ममन) कोणालाही सापडणार नाही आणि सापडले तर तो सील मारेल. फारच थोड्या लोकांना सूक्ष्ममन समजू शकते आणि ते सुद्धा मुढात्मा सूक्ष्म मन समजत नाही म्हणून घोटाळा होतो. सूक्ष्म मन ज्ञानाशिवाय लक्षात येणार नाही. अत्यंत गहन आहे. लाख वेळा जरी गहन गहन बोलले तरी सुद्धा गहनता कळणे शक्य नाही.

शुद्धात्म्यास भाव असतच नाही. भाव म्हणजे अस्तित्व. बाकी हा भाव तर प्रतिष्ठेचा आहे. लोक ज्यांची इच्छा करतात त्यावरून भाव करतात. हे सर्व प्रतिष्ठित-आत्म्याचेच आहे. त्यापासून कर्म बांधले जाते नाशिवंत वस्तुचा भाव करतात म्हणून नाशिवंत होतात. आरशाला ''स्वत:'' समजतात, तर कसे काय होणार?

## ( ९४ )
## सज्जनता - दुर्जनता

जगामध्ये सज्जन व दुर्जन दोन्ही बरोबरच असतात. दुर्जन आहेत म्हणून सज्जनांची किंमत आहे. जर सगळेच सज्जन असते तर?

सज्जन पुरुष:- सज्जन पुरुष तर कधीही दुर्जनांच्या थोड्यासुद्धा उपकारांत रहात नाहीत.

दुर्जन पुरुष:- नेहमीच अपकार करीत असतो.

कृतज्ञ पुरुष:- समोरच्या माणसाने केलेले उपकार कधीही विसरून जात नाही. आणि समोरच्या अपकाराकडे कधीही लक्ष देत नाही.

कृतघ्न पुरुषः– समोरच्या माणसाने केलेले उपकार विसरून जातो, जाणूनबुजून अपकार करतो. स्वतःची काहीच आवश्यकता नसते; फायदासुद्धा नसतो तरीपण अपकार करतो.

समुद्राच्या खोलीच्या (आतील तळाचा) अंदाज घेतो. परंतु संसाराच्या खोलीचा पत्ताच लागत नाही.

अधिकाराचा दुरुपयोग करतो त्यामूळे सत्ता जातेच. ज्याला सत्ता मिळाली आहे त्याला शोभेल असे काम त्याच्या हातून जर झाले नाही तर त्याची सत्ता जाते. तुमच्या खेड्यातील मनुष्य तुम्हास शिव्या देईल परंतु जर तुम्ही त्यास शिवी दिली तर तुमची सत्ता निघून जाईल.

खोटे हे खूप जोराने बोलतो आणि खरे सुद्धा खूप मोठ्याने बोलतो. खोटे ताबडतोब बोलाल परंतु खरे बोलण्यास पुष्कळ वेळ लागेल. खोटे तर दुसऱ्याच दिवशी बोलाल.

हळदीघाटीचे युद्ध करण्यात मजा नाही. समजूत करण्यामध्ये मजा आहे. समजावून काम करून घ्या परंतु भांडू नका. न्याय कोणास म्हणतात? कोर्टामध्ये जावे लागले नाही तर त्यास न्याय म्हणतात कोर्टात जावे लागते त्याचे नाव अन्याय.

मन, वाचा, काया आणि आत्मा यांचा उपयोग लोकांच्याकरता कर. जर तुझ्यासाठी उपयोग केला तर तुला खिरणीच्या वृक्षाचा अवतार येईल मग पाचशे वर्षापर्यंत दुःख भोगवतच रहा. नंतर तुझे फळ लोक खातील, लाकडे जाळतील. मग तू लोकांचा कैदी म्हणून रहाशील. म्हणून भगवान म्हणतात की तुझ्या मन, वचन, काया आणि आत्मा यांचा दुसऱ्याकरिता उपयोग कर आणि नंतर तुला जर काही दुःख आले तर ते मला सांग.

अविरोधाभास शोधण्याची ज्याची बुद्धि तयार झाली तीच सुमती.

जे जे संसाराचे उच्चाटण करावयास गेले त्यांचा स्वतःचा निर्वंश झाला. मनुष्यपण हे मोठ्यांतले मोठे भीतिचे ठिकाण आहे, चाचणीची परिक्षा आहे. त्यामध्ये लोक मजा करित आहेत. त्यामध्येच फक्त भयाचे स्थान आहे. क्षणाक्षणास मृत्युचे भय आहे. एक क्षणसुद्धा निरुपयोगी न जाईल असे कर. काही तरी असे कर की ज्यामूळे तुझा पुढचा जन्म सुधारेल. मनुष्यगति हे एक नवीन वळण (turning point) देणारे फाट्याचे टोक आहे. येथूनच वक्रागति सुरु होते. चारी गतिमध्ये नर्क, तीर्यंच, मनुष्य आणि देव हे सर्व ह्या मनुष्य गतितूनच जातात आणि मोक्षसुद्धा येथूनच मिळतो. जर ज्ञानीपुरुष मिळाला तर बेडा पारच होईल.

## ( ९५ )
## देहाचे तीन प्रकार

देह तीन प्रकारचे आहेत. तैजस देह, कारण देह आणि कार्य देह.

आत्म्याच्या बरोबर सतत रहाणारा जो देह तो तैजस देह. ते सूक्ष्म शरीर आहे. विजेचे शरीर (electrical body) आहे. शरीराचे जे तेज असते ते तैजस शरीरामूळे असते. ह्या शरीराचे तेज चार वस्तुमूळे प्राप्त होते.

१. कोणी लक्ष्मीवान असेल आणि सुखवस्तु परिस्थितीमध्ये राहिला असेल तर त्याचे तेज येते. ते लक्ष्मीचे तेज.

२. कोणी पुष्कळ धर्म करतो तेव्हा त्याच्यावर आत्म्याचा प्रभाव पडतो. ते धर्माचे तेज.

३. कोणी पुष्कळ विद्याभ्यास करतो सापेक्षविद्या प्राप्त करतो त्यामूळे त्यास पांडित्याचे तेज असते.

४. ब्रह्मचर्याचे तेज.

हे चारी तेज, सूक्ष्म शरीर तैजसशरीरामूळे येते. जेव्हा मातेचे रज आणि पित्याचे वीर्य एकत्र होते तेव्हा कार्य शरीर (effect body) उत्पन्न होते. जीव काय आहे? जो जगतो आणि मरतो तो जीव. हे सर्व जीव जेव्हा मरतात तेव्हा सूक्ष्म शरीर आणि कारण शरीर घेऊन जातात. मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार येथेच स्वतंत्र होतात आणि कारण शरीर बरोबर घेऊन जातो. त्यामूळे नवे कार्य शरीर (effect body) तयार होते. आईचा रज आणि पित्याच्या वीर्याने उत्पन्न झालेले कार्य शरीर त्याचे अन्न तयार करते आणि त्याची गांठ तयार होते. जीव एक तास सुद्धा खाण्याशिवाय राहू शकत नाही. जरी अन्न नाही तर हवापाणी काहीतरी घेतच राहील.

हे तेजस शरीर आहे. ते सूक्ष्म शरीर विजेचे शरीर (electrical body) आहे. हे विजेचे शरीर अन्न पचवते. शरीरात उष्णता उत्पन्न करते. रक्ताभिसरण चालू ठेवते त्याचे प्रवाह सर्व कानाकोपऱ्यांत पोहोचतात. म्हणूनच सर्व यंत्र काम करते. जर काही कर्माची कमतरता असली तर पोट लहान पणापासून खाण्याचे पचवू शकत नाही. शरीराच्या आतील विजेचे शरीरच खरोखर कार्य करते. परंतु स्थूलशरीर त्यास ग्रहण करू शकत नाही. म्हणून शरीर अशक्त होत जाते. सूक्ष्म शरीर तर सर्वांचे सारखेच असते. हा जो तुमच्या शरीराचा आकार आहे, त्याची वास्तुरचना आधीच होऊन गेली आहे. ह्याला कारण शरीर म्हणतात आणि हा जो स्थूल देह प्रा●प्त झाला तो परिणाम

देह आहे. शरीरात जो भाग सर्व सामान्यांपेक्षा जास्त किंवा सर्व सामान्यांपेक्षा कमी होतो त्या भागाचा दोष असतो आणी तो भागच भोगतो. ह्या वरून हिशोब (calculation) मांडू शकता की वेदना कोठून आली आणि कशी आली?

कारण देह समजू शकतो असा आहे. जन्मापासून उत्पन्न होतो. लहान पणापासूनच आवड निवड असते. प्रीती आणि द्वेषामूळे परमाणू खेचले जातात वीतरागापासून खेचले जात नाहीत. परमाणू खेचताना भर झाल्यावर कारण देह होतो. आता जो देह दिसत नाही तो पूर्वजन्माचा कारण देह. ज्ञानीपुरुषाना कारण देह बघता येतो आणि त्यांच्यामध्ये एवढे सामर्थ्य असते की कारण देहास बांधण्याचे बंद करून टाकतात. सील मारून टाकतात. नंतर कारण देह तयार केला जात नाही.

आत्मा जेव्हा देहापासून सुटा होतो तेव्हा त्याचे बरोबर कारण देह जातो. पुण्य आणि पाप जाते. पुण्याच्या आधारानी रूप प्रमाणबद्ध शरीरामूळे (symmetrical body) सुख वगैरे मिळते. पापाच्या आधारानी देह कुरूप मिळतो. अप्रमाणबद्ध शरीर (asymmetrical) मिळते. ह्या देहापासून आत्मा जेव्हा निघून जातो तेव्हा कारण शरीर आणि सूक्ष्म शरीर दोन्ही बरोबरच रहातात सूक्ष्मशरीर आणि कारणशरीराचे परमाणूचे संयोग पुरते एकत्र होतात तेव्हा स्थूल शरीर प्राप्त होते. आत्मा जेव्हा स्थूलदेहामधून मरणाच्या वेळी सुटा होतो तेव्हा तो एका जागेवरून दुसऱ्या जागेवर एकाच वेळी त्याच्या व्यवस्थित निश्चित केलेल्या जागेवर पोहोचतो आणि तेथे जाऊन पिताचे वीर्य आणि मातेचे रज एकत्र होताना देह धारण करतो. आत्मा त्या वेळेस एकदम दाबला (compress) जातो आणि एकदम लांबपण होतो. जो पर्यंत नवीन स्थान मिळाले नाही तोपर्यंत जुने शक्यतो सोडत नाहीं. त्याच्या स्थितीस्थापक गुणामूळे लांब होऊन एक भाग जुन्या शरीरामध्ये आणि एक भाग नव्या कार्य शरीरामध्ये घेऊन जातो. नंतरच जुना देह सोडतो. असे कित्येक गति न मिळालेले जीव असतात की ज्यांना दुसरा देह ताबडतोब मिळत नाही. त्याना खूप भटकावे लागते आणि जेव्हा त्याना नवा देह मिळतो तेव्हा त्यांची त्यामधून सुटका होते.

मनुष्य देहात आल्यानंतर परत आठ अवतार दुसऱ्या गतिमध्ये म्हणजे देवगति, तिर्यंचगति किंवा नर्कगतिमध्ये जावे लागते आणि परत मनुष्य देह मिळतो. मनुष्य देहामध्ये गति उत्पन्न होते आणि भटकण्याचा शेवटपण मनुष्य देहामधूनच होतो. ह्या मनुष्य देहाचे जर सार्थक करता आले तर मोक्षप्राप्ती होईल असे आहे. आणि जर जमले नाही तर भटकण्याचे साधन वाढवून देतो असे पण आहे. दुसऱ्या गतिमध्ये फक्त सुटतो. ह्यामध्ये दोन्ही आहे– सुटतो सुद्धा आणि त्याबरोबर बांधला पण जातो. महा कठिण असा मनुष्य देह मिळाला आहे म्हणून त्याचा उपयोग करून घ्या. ''आत्म्याने अनंत

अवतार काढले. एक अवतार जर देहाने आत्म्याकरिता काढला तर मग कामच होऊन जाईल.''

मनुष्य देहात जर ज्ञानी पुरुष मिळाला (ज्ञानीची भेट झाली) तर मोक्षाचा मार्ग मिळेल. देवलोक सुद्धा मनुष्य देहाची इच्छा करतात. जर ''ज्ञानीपुरुषाची भेट झाली व सांधा एकत्र मिळाला तर अनंत अवतारपर्यंत शत्रू सारखा वाटणारा देह परम मित्र होतो.'' म्हणून हा देह धारण केल्यावर तुम्हास ज्ञानी पुरुष मिळाले आहेत तर भरपूर उपयोग करून आपले ध्येय साध्य करा.

आमचे ह्या देहावर किती प्रेम आहे? ह्या देहाने मोक्ष मिळाला, स्वत:चे तर कल्याण झाले. आता लोकांच्या कल्याणाकरिता हा देह खर्च करावयाचा. तेवढ्यापुरतेच ह्याचे जतन करावयाचे. तेवढ्या पुरतीच ह्याची प्रीती. आम्ही ह्याच्याशी एखाद्या शेजाऱ्या प्रमाणे वागतो.

ह्या देहाचा अधिकार आपल्या स्वत:स तर नाहीच. ज्याचा ज्याचा असेल तो घेईल. आपल्यास तर ह्या देहास मित्राप्रमाणे समजावयाचे आणि आपले सार्थक करून घ्यावयाचे आहे. ह्या देहास काय काय होणार ते काहीच सांगता येणार नाही. बाकी आपल्या स्वत:च्या शुद्धात्म्याच्या भागास काही सुद्धा होणार नाही. ज्या देहाने मोक्षास जावयाचे आहे, तो देह पुष्कळ मजबूत असतो. निर्वाण पावणारा देह चरम शरीर समजला जातो.

भगवान ह्या देहात कुठपर्यंत रहाणार? प्रतिष्ठित आत्म्याचा मुक्काम आहे तोपर्यंत राहील. मूळ आधार तर शुद्धात्म्याचाच आहे. प्राणाच्या आधाराने जो जगतो तो प्राणी. नाक जर आठ मिनिटे पर्यंत बंद करून ठेवले तर प्राणवायू निघून जाईल असे आहे. ही सर्व यंत्रे (machinery) आहेत.

देहभान होणे ही बेशुद्ध अवस्था आहे. देहाध्यास हेच अज्ञान. स्वभान झाले की मुक्ती होते.

स्थूळ देह वीतरागी आहे. जितकी ही टीपोई वीतरागी आहे तितकाच हा स्थूळ देह सुद्धा वीतरागी आहे. तितकाच आत्मा पण वीतरागी आहे. सूक्ष्म देह सर्वांना जबाबदार आहे. सूक्ष्मदेह हा अमुक परमाणूनी तयार झाला आहे. स्थूळ देहाच्या कोणत्याही क्रियेशी आत्म्यास देणे घेणे नाही. सर्व दु:ख सूक्ष्मदेहच भोगत असतो. सूक्ष्मदेह तर आत्म्याचा आविर्भाव आहे. सूक्ष्मदेहानेच मी-पणाची प्रतिष्ठा केली जाते. म्हणून सूक्ष्म देह हा प्रतिष्ठित आत्म्यासारखा आहे.

कर्मे पुष्कळ असली तर देह लहान असतो. कर्म कमी असले तर देह मोठा होतो. उदाहरणार्थ मुंगी आणि हत्ती. मुंग्या जमिनीवर पहाटे चार वाजता सुद्धा साखर खेच खेच करतात. असे मी पाहिले आहे. आणि हत्ती? बादशाही थाटात मस्तीमध्ये रहातो.

## ( ९६ )
## देहाध्यास केव्हा सुटतो?

सर्व जग देहाध्यासमध्ये गुंतुन गेले आहे. असे म्हणतात की, हा देह माझा नाही, मन माझे नाही. परंतु जर कोणी तुम्हास बोलले की चंदुलाल तुमच्यामध्ये अक्कल नाही तर सबंध रात्र त्याचा परिणाम तुमच्यावर होईल. जेव्हां आत्मज्ञान प्राप्त होईल तेव्हांच देहाध्यास सुटेल. मी चंदुलाल, मी ह्याचा मामा, ह्याचा काका, हिचा नवरा, ह्याचा बाप हाच देहाध्यास. जोपर्यंत देहाध्यास सुटणार नाही. तोपर्यंत स्थूळ, आणि सूक्ष्म दशेत रहातो, शुभ आणि अशुभ रहाते. 'मी शुद्धात्मा आहे' ह्याचे यथार्थ ज्ञान झाले तर देहाध्यास सुटतो. मग जर एकुलता एक मुलगा मेला तरीसुद्धा तुम्हास त्याचे दुःख होत नाही, टोचत नाही. खरे किंवा खोटे असे काहीच रहात नाही.

जसा देहाध्यास झाला आहे तसा आत्माध्यास झाला पाहिजे. झोपेमध्ये, भर निद्रेमध्ये आत्म्याचे भान राहिली पाहिजे. आम्ही जे ज्ञान देतो त्या ज्ञानानी सर्व अवस्थेमध्ये आत्माध्यास रहातो. हे तर आश्चर्यकारक ज्ञान आहे. दही घसल्याबरोबर लोणी आणि ताक सुटेच रहाते असे हे ज्ञान आहे. देह आणि आत्मा सुटा आणि सुटाच रहातो!

पूर्वी ज्ञानी घाण्यात पिळून निघाले. ते असे आहे की, तू आत्मा आहेस. जर देहास घाणीता पिळावयाचे असेल तर पिळून दे. देहाचे तेल काढावयाचे असेल तरी काढू दे. आत्मा पिळावयाचा नाही. तशा कसोटीतून ते उतीर्ण झाले!

## ( ९७ )
## देहाच्या तीन अवस्था

देहाच्या तीन अवस्था आहेत. बाल्यावस्था,यौवन अवस्था आणि वृद्धावस्था.

बाल्यावस्थेमध्ये परमानंद, सहजानंद असतो. लहान मुलास काही चिंता नसते. जन्मल्याबरोबर पहिलीच दुधाची बाटी भरून वाहून गेलेली असते. (मातेचे स्तन दुधाचे भरलेले असतात) ह्या लहान बाळाला काही चिंता आहे का? दूध कोठून येणार, कधी

येणार? तरी सुद्धा त्याला वेळेवर मिळते ना? ज्ञानीपुरुष संपूर्ण समजण्याच्या शिखरावर पोहीचलेला असतो तरीसुद्धा ते बाळकासारखे असतात. बाळकाच्या मनाची वाढ (devlopment) झालेली नसते. बुद्धिची वाढ झालेली नसते. त्याची चित्तवृत्ति त्याच्या विषयाच्या विचाराच्या कक्षेतच असते. उदाहरणार्थ हे खेळणे त्याच्या पहाण्यास आले तर त्याची चित्तवृत्ति त्याचेकडेच असते. परंतु ती किती वेळ? थोडाच वेळ. नंतर दुसऱ्या विषयाकडे फिरते. एकाच विषयामध्ये चित्तवृत्ति मुक्काम करीत नाही. परंतु मोठ्या वयाच्या माणसांची चित्तवृत्ति तर दोन चार विषयातच फिरत असते. म्हणूनच तर संसाराचे चक्र चालू रहाते. बालक घटिके मध्ये विसरून जाते. त्याचे कारण त्याची चित्तवृत्ति त्यामध्ये स्थिर रहात नाही. ताबडतोब त्याच्यातून उडून जाते (निघून जाते). लहान बालकांची बुद्धि जोपर्यंत जागत नाही. (जागृत होत नाही) तोपर्यंत त्यांचा सहजानंद व्यवस्थित असतो. नंतर बुद्धि ज्याप्रमाणे वाढत जाते त्याप्रमाणे चिंता वाढत जाते.

यौवन अवस्था ही प्रगट अग्नीसारखी असते. ह्यामध्ये बाह्य आचार बिघडून जाण्याचे संभावना उत्पन्न होतात. म्हणून ह्यामध्ये विशेष काळजीपूर्वक चालणे उत्तम.

देवांना बाल्यावस्था किंवा म्हातारपण नसते. त्याना कायमचे यौवन असते. वृद्धावस्था म्हणजे वृद्धपण. वृद्धपण काढणे फार कठिण असते. सर्व यंत्रानी नादारी काढलेली असते. शरीर नादुरुस्त होते. दात म्हणतात की मी पडतो, कान म्हणतो की मी दुखतो, म्हातारपणी फार काळजी घ्यावी लागते. जर पुष्कळ पापी कर्मे नसली तर मनुष्य बसल्या बसल्या निघून जातो. ही तर सर्व यंत्रे नादुरुस्त झालेली असतात आणि विचारतात, काका आता जायचे का? तर हे काका म्हणतात अजून थोडे जीवेचे आहे. ही तर चहा-पाण्या सारखी लालच आहे.

जडलेली कर्मे तर दारूखाना म्हटला पाहिजे. ती सुद्धा वृद्धपणातच फुटतात. एका बाजूने बॉंब फुटतो, दुसऱ्या बाजूने सुरनळा पेटतो आणि मग भयंकर तुफान होते. ह्या देहाने जी जी सुख-शांति भोगली तो शेवट दुःख-अशांति देऊन जातो असा नियम आहे. अशांतिच्या प्रमाणात शांति देऊन जातो. एखादाच पुण्यवान असेल की जो शेवटी शाता मिळवून जाईल, असा क्वचितच पहाण्यांत येतो. जगांतील लोकाना मौज, शौकीपणा करताना भान रहात नांही की ह्याची किंमत द्यावयास लागेल, हे तर आपले बिनहक्काचे मौज, शौकीपणा ह्याचे शेवटच्या घटकेस किंमत देण्याची क्रिया करावी लागेल. सरळ वागणूकीच्या माणसाचे तर फार चागले असते. हा जे मरतेसमयी सांगून जातो की, ''आम्ही जात आहोत'' हे तर चांगले. त्यास उंच गति मिळते. उंच होद्दावर जातो. बेशुद्ध असताना मेला तर तो बेशुद्धावस्थेत जातो. गाई, म्हशीमध्ये जातो. जो हृदय गति थांबल्यामूळे (heart fail नी) मरतो त्याचा तर ठिकाणाच नसतो. आता तर लोक

रौद्रध्यान आणि आर्तध्यानच करु लागले आहेत. म्हणून जगण्याचेच मुश्किल होऊन गेले आहे. तरुण लोक मरतात ते रौद्र आणि आर्तध्यानात मरतात आणि वृद्ध मरतो तो कल्पांत यातना होऊन मरतो तो भयंकर जोखमदारी घेतो. हल्लीचे अन्न, कपडेलत्ते सर्वच अप्रामाणिकपणाचे आहे. ते आर्त आणि रौद्रध्यानानी एकत्र केलेले असते. मरतानाही कष्टाने मरतो. परमाणू आणि परमाणूना कष्ट होतो. पुष्कळ दुःख असले तर heart fail ने मरतो. मग पुढील आयुष्यात फार कठिण कर्मे भोगावी लागतात. हे तर परमाणूचे विज्ञान आहे. वीतरागाचे विज्ञान आहे. ह्यात कोणाचे काहीसुद्धा चालणार नाही.

ही तर स्वतःच्या हिशोबाची फाटलेली साडी चांगली. स्वतःच्या प्रामाणिक पणाची खिचडी चांगली असे भगवंतांनी सांगितले आहे. अप्रामाणिकपणानी मिळविलेले ते तर सर्वच खोटे असते ना.

वृद्धावस्था येते आणि जाण्याची वेळ येते तेव्हा सर्व दारुखाना एकदम फुटतो. ज्ञान नसले तर वृद्धपण काढणे फार कठिण पडते. परंतु ज्ञान मजबूत झाले असले तर जो दारुगोळा फुटतो त्याचे प्रत्यक्ष ज्ञाता, द्रष्टा राहून स्वतःच्या गुंफेत रहाता येते. आमचे ज्ञानीमहात्मे शेवटच्या श्वासाच्यावेळी सुद्धा ज्ञाता द्रष्टा रहातात व शेवटचा श्वास घेताना काय बोलतात माहित आहे का? ''तुम्ही सुद्धा बघता आणि मी पण बघतो''. सर्वांना आपली दुकाने लवकर किंवा उशीरा बंद करावयास लागणार आहे ना? सर्वच जाण्याकरिता आले आहेत ना? जन्मास आला तेव्हा पासूनच स्मशानाचा रस्ता सुरू झालेला असतो. अरे तू कोठे चाललास? स्मशाानाकडे. अरे तू स्मशानाकडे जात आहेस आणि रस्त्यामध्ये भजी विगरे का खाण्यासाठी बसलास! काही तर विचार कर! क्षणाक्षणानी तू स्मशानाकडे जात आहेस. लवकर, उशीरा शेवटच्या स्टेशनाकडे तर तुला पोहोचावयाचे आहे ना? लवकर उशीरा नाही परंतु शांतीपूर्वक जाशील इतकी आशा करू शकतोस.

वृद्धपणा येते तेव्हां सर्वच रोग एकत्र होउन एक रोग (दुःखणे) होतात. त्याचे औषध माहिती करून घेतले असले म्हणजे दुखणे आले त्यावेळेस औषध घेऊ शकतोस. हे शेवटचे दुखणे तर बोलवावयास येते.

जे शरीर सुकते, सडून जाते, दुर्गंधी येते त्याच्यावर तू प्रीती का करतोस? हा तर चामडीनी झाकलेलां मासाचा गोळा आहे. ह्या शरीरास रोज आंघोळ घातली जाते, धुतले जाते, खावयास दिले जाते. किती तरी सांभाळ केला जातो. परंतु ते शेवट दगाच देते. हे शरीरच जर आपला नातेवाईक होत नाही तर मग दुसऱ्याचे काय

बोलावयाचे? ह्या देहाचे फार चोचले करतात परंतु जर त्याच्यातून पू (pus) निघाला तर तुला आवडेल काय? त्याच्याकडे बघावेसुद्धा वाटणार नाही. वैराग्य येईल. हा तर पू (pus) रक्त आणि मासाचा गोळा आहे. आम्ही ज्ञानीपुरुषास सर्वच उघडे दिसते. जसे आहे तसे दिसते म्हणून वीतरागीच रहातो. देहावर अनंत अवतार प्रीती केली त्याचे फळ जन्म-मरण आले. एकवेळ आत्म्यास समजून घे आणि वीतरागी हो तर अनंत अवताराचा मोबदला मिळेल.

देह तर कसा असला पाहिजे? जो देह मोक्षाचे साधन होईल असा असला पाहिजे. हा देह मोक्षाचे साधन बनेल असा झाला पाहिजे. अशाकरिता चरम शरीर प्राप्त करून घेतले पाहिजे.

हे शरीर परमाणूंचे बनलेले आहे. त्यांत दुसरे काहीच नाही. शरीरात ज्या प्रकारचे परमाणू असतात त्याप्रमाणे अनुभव येतो.

सर्वच जीव, पशू, पक्षी, वनस्पति मनुष्याकरिताच जगतात आणि मनुष्य स्वतःकरिता जगतो. तरीसुद्धा भगवान सांगतात की देवांनासुद्धा मनुष्य देहाचे दर्शन घेण्याची इच्छा होते. हे समजलात तर तुमचे जीवन सार्थक होईल.

## ( ९८ )
## मनुष्य देहाचे प्रयोजन

ह्या जगात कोणास माहित आहे की, हा देह कशाकरिता प्राप्त झाला आहे? देह जो प्राप्त झाला आहे तो कशाकरिता त्याचे भानच नाही. मजा करु. परमेश्वराची भक्ती करू, योग करू, तप करू, किंवा त्याग करू असे वाटते. परंतु हा देह तर कर्माचे बंधन टाळण्याकरिता प्राप्त झाला आहे. प्रत्येक प्राप्त झालेल्या अनुकुलतेचा योग्य निकाल करून भगवानला न्याहाळून बघण्याकरिता प्राप्त झाला आहे. म्हणूनच कवि नवनीत संघवी म्हणतो की —

"देह जे प्राप्त थयो गुनेगारी टाळवा
कर्म आवरण खपे, भगवान न्याळवा".

## ( ९९ )
## आचार-विचार आणि उच्चार

आचार, विचार आणि उच्चार ह्या तिन्ही चंचल वस्तु आहेत. आपण तर फक्त समजले पाहिजे की विचार असा आला. विचार येतो त्यास आपण जबावदार नाही.

कारण तो पहिल्या असलेल्या ग्रंथी प्रगट होतात त्यामूळे येतो. ही तर पहिली सही झाली होती म्हणून येत आहे व त्याची जबाबदारी नाही. परंतु जर परत सही करून दिली तर भयंकर जबाबदारी म्हणावयाची.

आत्मा स्वत: अचल आहे. आणि आचार विचार आणि उच्चार हे चंचल भागामध्ये आहेत. जे जे कार्यात येते ते चारमध्ये येतात. आचार, विचार आणि उच्चार प्रत्यक्ष होतो तो आचार, आतमध्ये फुटतो तो विचार, आणि बोलले जाते तो उच्चार आणि जे सामान्य स्थितीमध्ये रहातात त्याला संचार म्हणतात. म्हणूनच बाहेरच्या भागास (बाह्याचारास) सामान्य अवस्थेमध्ये रहावयास सांगितले आहे.

सत्य युगामध्ये एकटा मनाचाच विचार बिघडत होता. वाणीचा आणि देहाचा बिघडत नव्हता. हल्ली तर सर्वच आचार बिघडलेले पाहवयास मिळतात. जर मनाचा आचार बिघडलेला असेल तर चालवू शकतो. परंतु वाणीचा आणि देहाचा चालवू शकत नाही. सर्व आचार बिघडलेले असतील तर भयंकर प्रत्याघाती वाणी निघते. हे सर्व बिघडलेलेच निघते. ज्ञानामूळे बाह्याचार तुटले जातात. ज्ञानाच्या प्रतापामूळे बाह्याचार जे बिघडले होते ते बंद होतात. देहाचा आचार चोख पाहिजे. मनाच्या आणि वाणीच्या आचाराचा फेरफार होत असतो. देहाचा आचार खराब असेल तर ती फार जवाबदारी म्हणावयाची. देव पण दु:ख देतात. बाह्याचार शुद्ध असेल तर देवलोक पण खुश होतात आणि शासन देवता सुद्धा खुश होतात.

बाह्याचार बिघडण्याचे कारण काय? बाहेर सुख मिळत नाही म्हणून. आत अपार सुख प्राप्त झाल्यावर नंतर बाहेरचा आचार सुधारत जातो.

ज्ञानींना तर आतील सर्वच आचार ज्ञेय स्वरुपी असतात आणि स्वत: ज्ञाता-द्रष्टा पदात रहातात. आपणाकडे ज्ञान आहे त्यामूळे कितीही दु:खी वातावरण आले तरी त्यामधून धोक्याशिवाय निघता येते. संकटेचे वेळी साखळी खेचली म्हणजे निकाल होतो.

हे ज्ञान नसले तर भंवऱ्यासारखे फिरावयास लागेल. परंतु ज्ञान आहे तर बाह्याचार सुंदर असला पाहिजे, नाहीतर जोखमदारी येईल लोकनिंद्य आचार सदैव त्याज्य समजावे. जे आचार लोकनिंद्य असतील ते आपल्या हातून घडता कामा नये. वाणी खराब असली, मन खराब असेल तर ते चालू शकते परंतु जर देहाचा आचार खराब असला तर चालणार नाही. तेथे देवलोक सुद्धा उभे राणार नाहीत.

मन आणि वचन ह्याचे आपण ज्ञाताद्रष्टा आणि ही तर ज्ञेय फिल्म म्हटली पाहिजे. परंतु बाह्याचार आपल्याला चालत नाही. तो वर्ज्य समजला पाहिजे. लोकनिंद्य

आचारामध्ये येण्यापेक्षा जर लग्न केले तर उत्तम. बाकी अशी चूक तर दिसल्या बरोबर तेथून काढून टाकली पाहिजे. ह्यामध्ये ज्ञाता द्रष्टा संबंध ठेवण्यास गेले तर मग ही चूक कोठे फेकून देईल ते सांगताही येणार नाही. एखादे वेळी ज्ञानास बाजूला बसवून त्यावर चढून बसेल. विषाची परिक्षा घेऊ नकोस. अहंकार करून सुद्धा तोडून टाकावा. कसेही करून त्याचा निकाल लावला पाहिजे. बाहेर तर चालणार नाही. आपण एकवेळ नक्की करून ठेवावयाचे. की बाह्याचार स्वच्छ असला पाहिजे. नक्की केले नाही तर दुकाने चालू रहातील. हे तर भयंकर जोखीम समजले जाते. ह्याच्यासारखे दुनियेमध्ये दुसरे जोखीम नाही. संसार जोखमी स्वभावाचा नाही परंतु बिघडलेला आचार जोखमीचा आहे. सुंदर बाह्याचारामूळे तर देवलोकांची कृपा रहाते. आणि मोक्षापर्यंत जाण्यास मदत होते.

बाह्याचारास तर ओळखले पाहिजे कारण ही तर अतिशय जोखमीची वस्तु आहे. ती आपण त्यास अर्पण करून टाकू. बाह्याचार कशामूळे बिघडला जातो, की सुख नाही म्हणून संताप होतो. परंतु आपल्याआत तर अनंत सुख आहे. मग असे असावयास नको. आपण शुद्धात्मा झालो तर अहंकार करून सुद्धा त्याच्यापासून दूर रहावे.

बिघडलेला बाह्याचार कोणास म्हणतात?

तू खिशातून काही काढून घेतोस तर आत हुरहुर लागते आणि लोकनिंद्य समजले जाते. लोकाना शिवी देणे, थापटी मारणे वगैरे बाह्याचारामध्ये दारू सट्टा सर्वच वाईट आहे. ते सुद्धा जोखमीचे समजले जाते, हे जोखीम पत्करण्यासारखे आहे. परंतु त्यात फायदा काय? परंतु मुख्य ब्रह्मचर्यामध्ये बाध येणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे आणि दुसरी चोरी संबंधी. जगातील मोठ्यातला मोठा बाह्याचार तर ब्रह्मचर्य. त्यामूळे देवलोक सुद्धा खूष होतात. संसार नडत नाही. तू एकाच्या ऐवजी चार बायका कर परंतु बाह्याचार बिघडता कामा नये. ह्यास तर भगवानांनी अनाचार सांगितला आहे. मोक्षास जावयाचे असेल तर नुकसानकारक वस्तु बाजूला ठेवलीच पाहिजे ना?

## ( १०० )
## उद्वेग ( संताप )

उद्वेग म्हणजे आत्म्याचा (प्रतिष्ठित आत्म्याचा) वेग म्हणजे संताप. वेगाचे विचार आले तर शांतीच येते आणि उद्वेगाचे विचार आले तर अशांतीच वाटते. जर संतापाचे विचार आले तर समजून जा की थोडेसे खराब (नुकसान) होणार आहे.

प्रश्नः- ही गाडी गति (motion) मध्ये चालत आहे किंवा भावनापूर्ण (emotional) होऊन चालत आहे ?

उत्तरः- गति (motion) मध्ये आहे.

दादाः- जर गाडी भावनापूर्ण (emotional) झाली तर?

तर मग अपघात (accident) होणार. हजारो माणसे मरतील.

त्याचप्रमाणे मनुष्य देह जोपर्यंत गतिमध्ये चालत आहे तोपर्यंत अपघात होत नाहीत आणि कोणतीही हिंसा होत नाही. परंतु मनुष्य जेव्हा भावनापूर्ण होतो, संतापतो तेव्हा शरीराच्या आत असलेले अनेक सूक्ष्म जीव मरतात. त्यांची हिंसा होते आणि त्याचे परत फळ भोगावयास लागते. म्हणूनच ज्ञानीपुरुष सांगतात की भाऊ तू गतिमध्येच रहा. भावनापूर्ण होऊ नको.

संताप ही सुद्धा भावनापूर्ण अवस्था आहे. संतापाच्या अवस्थेत ग्रंथी प्रगट होतात. एका मागून एक प्रगट होतात. एका मागून एक प्रगट झाल्यावर चित्त त्याच अवस्थेमध्ये तन्मयाकार होते. असंख्य परमाणू उडण्यामूळे पुष्कळ आवरण येते. जसे वादळ सूर्याच्या प्रकाशास झाकून टाकते त्याप्रमाणे संतापाच्या अवस्थेमध्ये ज्ञान-प्रकाश झाकला जातो म्हणून स्वतःची अजब शक्ति सुद्धा आवरली जाते. संतापाच्या वेळी मनाची किंवा देहाची स्थिरता रहात नाही. भाला टोचतात असे वाटते. संताप तर मोठ्यातील मोठे आवरण आहे. जर हा जिंकला तर मग भूमिका स्पष्ट होते. जर मोठ्या उद्वेगातून गेले तर लहानाची काय बिशाद? परंतु जेथे स्वरूपाचे भान आहे तेथेच संतापास जिंकू शकता येईल. जर ज्ञान नसले तर संताप लाख अवतारपर्यंत आला नाही तर बरा. कारण की त्यामध्ये भयंकर परमाणु खेचले जातात आणि ते परत फळ तर देणार आहेत ना!

संतापामध्ये अधोगतिमध्ये जाण्याचे बीज रोपले असेल त्याची ग्रंथी जर तयार असेल तर ती ग्रंथी वेगाने फुटते. जे आग्रही असतात त्यांच्या ग्रंथी पुष्कळ पडलेल्या असतात. त्या व्यवस्थितच्या नियमाच्या आधाराने प्रगट होतात, तेव्हां त्यास असे होते की, असे करू आणि तसे करू. चहाची कपबशी सुद्धा फोडून टाकतो. वाटेल तसा धुमाकुळ करतो परंतु निराग्रही ज्यास फार आग्रह नसेल त्याला पुष्कळ ग्रंथी पडत नाहीत.

उद्वेगात मनुष्याला कळत नाही की काय करावे व काय करू नये. जेव्हा संतापाचा विचार येतो तेव्हा ते काम बाजूला ठेवावे. उद्वेगामध्ये काम झाले तर ते खराब होते. वेगात झाले तरच काम चांगले होते.

उद्वेग म्हणजे उंच चढवणे. उद्वेगाने जर जोर केला तर ज्ञानामध्ये एक माईल पुढे नेईल. परंतु जर उलट चालला तर मग कित्येक माईल मागे टाकील. उद्वेग हा ज्ञानाच्या जागृतीकरिता चांगला, परंतु अट एवढीच की तो ठिकाणावर असावयास पाहिजे.

महात्मा असेल तर तुमचे मन शांत करतात. आवेगातून वेग आणतात. वेगात असेल तर सरळ करून देतात. मनुष्याचे मन गतिमध्ये आणले पाहिजे मन आवेगातून वेगात आणतात तेच महात्मा.

हा देह जर अविनाशी करावयाचा असेल तर त्याच्यावर प्रीती केलेली बरी, परंतु फोड झाल्यावर त्याच्यातून पू (pus) बाहेर येतो तर अशा देहावर प्रेम कसले करता? प्रीती एवढ्यात पुरती करावी की ह्या देहास ज्ञानीपुरुष मिळाले तर तो आत्म्यातच राहील. ह्या देहावरच्या प्रीतीमूळे तर उद्वेग होतो. प्रीती कराल तरी सुद्धा हा पळूनच जाणार ना? भगवानानी देहास धोका म्हणून म्हटले आहे, शेवटी देह तर राखच होऊन जाणार ना? हा देहच प्रीती आणि द्वेष करावयास लावतो. भगवान काय सांगतात की देहाकरिता अनंत अवतार घालविले आता एकतरी अवतार आत्म्याकरीता घालव.

उद्वेग होतो तो आपोआप होत नाही. ही तर हिशोबी गोष्ट आहे आणि ह्याची माहीती होते की तो कशामूळे आला. ओळखीचा असेल तरच येतो. न कळत तर काहीच होत नाही.

उद्वेग हा आपघात आहे घटना नाही. An incident has so many causes and an accident has too many causes- घटनेस बरीचशी कारणे असतात आणि अपघात होण्यास तर भयंकर खूपच कारणे असतात.

ह्या जगामध्ये जर कोणावर प्रीती करावयाची असेल तर ती ज्ञानी पुरुषावर करावी. दुसऱ्या सर्व दुःखदायी वस्तु आहेत. कायम सुख असते तेथेच खुष होण्यासारखे आहे. संताप कोठे होतो? जेथे खुष होण्याचे स्टेशन असते तेथे. संतापाचे कारणच हे आहे. चहा नास्ता करण्यास हरकत नाही परंतु गाडी आली की सर्व बाजूला ठेऊन गाडीमध्ये बसले पाहिजे. परंतु हा तर ह्या स्टेशनावर खुष होतो आणि तेथेच बसून रहातो आणि गाडी निघून जाते. संताप आला तर विरुद्ध दाखविले जाते आणि जर पायऱ्या चुकल्या गेल्या तर काय होईल? आमच्या सत्संगामध्ये बाकी सर्व व्यवहार बाजूला ठेवले तर मग कामच होईल. एका बाजूला सत्संग हा परम हिताचा आहे आणि दुसऱ्या बाजुने आकर्षक आहे.

## ( १०१ )
## निद्रा ( झोप )

जीवमात्र प्राण्याना झोप आवश्यक आहे. परंतु झोपेचे प्रमाणच कोणी ओळखले नाही. ह्या काळातील माणसेच कशी आहेत? हे तर चित्र-विचित्र निरनिराळ्या तऱ्हेचे लोक आहेत नाहीतर अशी झोप येईल का? ह्या पशुपक्षीना काय माणसा सारखी झोप येत असेल? झोपेचे प्रमाण तर असे असले पाहिजे की दिवसा झोप येणार नाही. हे लोक तर रात्री दहा तास झोपतात ते थेट सूर्य डोक्यावर येतो त्या वेळ पर्यंत पडून रहातात. अरे हे जग असे झोपण्याकरीता आहे का? दुसऱ्या बाजूस कित्येक लोकांना झोपच येत नाही. अमेरिकेमध्ये शेकडा ८० टक्के लोक झोपेच्या गोळ्या खाऊन झोपतात. अरे मरून जाशील. हे तर विष आहे. हे तर भयंकर दुःख समजले जाते. अरे लोक चंद्रापर्यंत पोहोचले परंतु तुमच्या देशामध्ये झोपेच्या गोळ्या खाण्याचे बंद करु शकले नाहीत, खरी जरुर याची आहे. ही झोप नसल्यामूळे तुमच्या देशातील लोक त्रासून गेले आहेत. त्याचे काही करा ना! झोप ही नैसर्गिक देणगी (natural gift) आहे. ती सुद्धा तुम्ही घालवून बसलात! तर ह्या दुसऱ्या वैभवाचे काय करावयाचे? तोफेच्या गोळयावर चढावयाचे काय? नैसर्गिक झोप येत नाही म्हणजे त्याचे कारण असे हे की त्यांचा जो आहार आहे त्याप्रमाणात ते मेहनत करीत नाहीत. थकून गेला आणि झोप आली अशा प्रकारचा आहार पाहिजे. मेहनत करण्याच्या हिशोबाने आहाराच्या प्रमाणाची अनुकूलता (adjustment) असली पाहिजे. तर प्रमाणशीर (normal) झोप येईल. झोपेची तर मारामारीच झाली आहे ना! सर्व ठिकाणी झाली आहे. आणि परराष्ट्रा मध्ये तर झोप शोधून सुद्धा सापडत नाही. एवढ्या करिता तर मी त्याच्या नैसर्गिक (natural) औषधाच्या शोधात आहे. आम्ही सर्वांना प्रमाणशीर (normal) जीवन जगण्याचे शिकवू. प्रमाणशीर खावे प्यावे, झोपावे आणि मौज करावी.

झोप किती असावी? भगवानांनी तीन तास झोपण्याकरीता सुट दिली आहे. हे जग झोपण्याकरिता नाही. ज्ञान मिळाल्यानंतर फार झोप न आली तर ते चांगले. ज्ञाता-द्रष्टा पदात विशेष रहाता येते. आम्ही गेली वीस वर्षे दीड तासावर झोपत नाही. जागृतीमध्येच रात्री गेल्या. झोप किती पाहिजे? ह्या देहास त्याच्या कामानंतर थकवा घालविण्यापुरतीच झोप पाहिजे. आणि तितका वेळ पुरता आहे.

गौतमस्वामीने महावीर भगवानाना विचारले की झोपलेला चांगला की जागा असलेला चांगला?

भगवानने सांगितले की "१००० माणसा पैकी ९९९ माणसे ह्या जगात झोपलेलीच चांगली, परंतु एखादा परोपकारी जीव जागत असेल तर उत्तम".

## ( १०२ )
## स्वप्न

स्वप्न विज्ञान गहन आहे. मोठमोठे वैज्ञानिक त्याच्या शोधाशोध करण्याच्या मागे पडले आहेत. त्यामध्ये कोणता देह कार्य करीत आहे? अंत:करण त्यावेळेस कार्य करते वगैरे शोध चालू आहेत. परंतु स्वप्नाचे विज्ञान हे कळण्यासारखे नाही. हे अंतर विज्ञान आहे.

स्वप्नामध्ये स्थूल देहाची सर्वच द्वारे बंद असतात. सूक्ष्मदेह, मन, बुद्धि आणि चित्त कार्य करते. अहंकार काहीच करु शकत नाही. जर अहंकार सुद्धा त्याच्याप्रमाणे कार्य करीत असता तर मनुष्य स्वप्नामध्ये असून एका जागेवरून उठून दुसऱ्या जागेवर मारामारी करण्यास गेला असता. स्वप्नामध्ये ज्या ज्या क्रिया होत असतात त्या सर्वच करावयास लागेल परंतु अहंकाराचे तेथे काहीच चालत नाही. तेव्हा जागृत अवस्थेत त्यास असे वाटते कीं कोणतेही काम तो करु शकेल अशी त्यास खात्री असते. खरे पाहिले तर कोणत्याही अवस्थेत तो काहीच करु शकत नाही, परंतु जागृत अवस्थेमध्ये सर्वच खिडक्या उघड्या असतात. म्हणून भ्रांतिमूळे कर्ताभाव होतो.

स्वप्ने खोटी असत नाहीत. खरी असतात. यथार्थ असतात. परिणामकारक आणि ती विज्ञानाच्या दृष्टीने समजावू शकता येतात. स्वप्नामध्ये झालेल्या देहाचा परिणाम स्थूल देहावर पण होतो. म्हणून ती परिणामकारक (effective) आहेत. ती कशा रीतीने? बघ, मी समजावतो. स्वप्नामध्ये भिकाऱ्याला महाराज झाल्याचे स्वप्न पडते. म्हणून पावशेर रक्त वाढते आणि राजा स्वप्नामध्ये भिकारी झाला तर त्याचे पावशेर रक्त कमी होते. त्याला जागेपणी जितके दु:ख होते तितकेच स्वप्नामध्ये पण होते. तो खरोखर रडतो, परंतु जेव्हां जागा होतो तेव्हां त्याच्या डोळ्यामध्ये पाणी सुद्धा असते. कित्येक वेळा जागे झाल्यानंतर सुद्धा त्याचा परिणाम (effect) गेलेला नसतो आणि तो बरेच वेळ रडत रहातो. लहानमुले सुद्धा स्वप्नाच्या परिणामामूळे घाबरून जागी होतात आणि काही बराच वेळ रडत रहातात. भीतीच्या स्वप्नात शरीरावर परिणाम होतो, त्याचा श्वासोश्वास वाढतो, नाडीचे ठोके वाढतात, रक्ताभिसरण वाढते. ह्या सगळ्या गोष्टी वैज्ञानिक रीतिने सिद्ध करू शकतो. जर स्वप्न इतके परिणामकारक (effective) आहे तर त्याला खोटे कसे म्हणता येईल?

एक व्यक्ति मला कधीही भेटली नव्हती. तरीसुद्धा त्याने स्वप्नामध्ये माझे हुबेहुब (exact) दर्शन घेतले. हे मी तुम्हाला कसे समजावून सांगू.

कोणतीही न पाहिलेली वस्तु स्वप्नामध्ये येणारच नाही. कोणत्यातरी जन्मात

ती बघितलेली असेल तरच दिसेल. स्वप्न तर कित्येक मागील जन्माची साखळी आहे. हे काही नवे नाही. कित्येक सांगतात की दिवसा जे विचार येतात ते रात्री स्वप्नामध्ये येतात. अरे दिवसा तर अनेक तऱ्हेचे विचार येतात. ते काय सर्वच स्वप्नामध्ये येतात का? आणि काय असे होत नाही की केव्हा सुद्धा विचार सरळ आला नसेल तो स्वप्नामध्ये येतो.

स्वप्नामध्ये कारणदेह आणि सूक्ष्मदेह हेच कार्य करतात. स्थूल देहाचे त्यामध्ये कार्य असत नाही.

एका माणसास स्वप्न पडले की, तो आजारी पडला. डॉक्टर आले आणि सांगितले की नाडी चालत नाही, मेला. तो स्वतः मरून गेला हे बघितले, त्याने प्रेताला जाळतानापण बघितले आणि घाबरुन जागा झाला.

स्वप्नामध्ये तर ब्रह्मचारी लग्न करतो व मुले सुद्धा पहातो आणि त्यांची लग्ने सुद्धा लावतो.

प्रश्न :- स्वप्नाचे कारण काय ?

दादा :- स्वप्नामध्ये जे जग रंगवले जाते ते कोणत्या परमाणूनी रंगवले जाते?

जग दिसते ते जागत्या कर्माचे फळ आहे स्वप्ने दिसतात ती सुद्धा पुण्य पापाच्या उदयाप्रमाणे असतात. परंतु स्वप्नात त्याचा फार थोडा परिणाम होतो

प्रश्न : - स्वप्न ही ग्रंथी आहे?

दादा :- स्वप्न ही पण ग्रंथीच आहे. स्वप्न हे दोन देहाचे कर्म आहे. तीन देहापासून बांधलेले हे कर्म नाही. म्हणून दोन देहापासून (मन-वाणी) हे कळण्यात येते.

प्रश्न :- स्वप्नामध्ये कारणे टाकली जातात का?

दादा :- नांही स्वप्न पूर्ण परिणाम आहे त्यामध्ये अहंकाराचे कार्य नसल्यामूळे कारणे टाकू शकत नाही.

स्वप्नामध्ये कारण देहाच्या कार्य स्वरुपाने सूक्ष्म देहाचे कार्य असते. त्याचे बघणारा प्रतिष्ठित आत्मा असतो, आणि प्रतिष्ठित आत्म्यास जसाचा तसा बघणारा आणि जाणणारा स्वतः शुद्धात्मा! ज्यास जितके आवरण असते त्यास तेवढे कमी दिसते. जेवढे आवरण कमी त्यां प्रमाणे जास्त स्पष्ट दिसते. पुष्कळ असे सांगतात की मला स्वप्न पडतच नाही. अरे येते तर खरे, परंतु आवरण गाढ असल्यामूळे तुला आठवण रहात नाही.

**दादांची ज्ञान गोष्टी**

एकजण मला सांगू लागला, दादा, स्वप्नामध्ये मी दोन तास रडलो. तुम्ही आलात आणि तुमचे दर्शन घेतले आणि सर्वच शांत झाले! मन हलके झाले.

मी सांगितेले, अरे कपडा भिजून गेला होता, स्वत: येऊन भेटण्यापेक्षा नुसते स्वप्नामध्ये दादा आले आणि त्यांच्याकडे मागणी केलीत तरी खूप मिळते. स्वप्नामध्ये हे दादा येऊन सर्वच करु शकतात असे आहे. मागता आले पाहिजे. आमच्या कित्येक महात्म्यांच्या तर दादा रोज स्वप्नामध्ये येतात. शास्त्रे म्हणतात की "ज्याला स्वप्नात सुद्धा दर्शन घडते त्याचे मन दुसऱ्या ठिकाणी रमत नाही." ज्ञानीपुरुषाचे एक वेळ सुद्धा जर स्वप्नात दर्शन झाले तर तुझ्या मनाचे भटकणे बंद होईल.

ज्ञानी काय सांगतात की अरे दोन देहाचे स्वप्न तुला खरे वाटते! त्यांप्रमाणे ह्या तीन देहाचे स्वप्न ज्ञानींना तर खरे वाटत नाही. हे तर भ्रांतिनी भरलेल्या ज्ञानामूळे ह्या तीन देहाच्या स्वप्नास तू खरे मानून राहीला आहेस.

इंद्रियप्रत्यक्ष म्हणजे इंद्रियाने पाहू आणि जाणू शकतो ते. जी स्वप्ने झोपेमध्ये पडतात ती दोन देहाची आहेत. परंतु ज्ञानी पुरुषास तर जागे असताना सुद्धा तीन देहाचे स्वप्नच वाटते.

स्वप्नामध्ये भिखारी जर राजा झाला तर त्यास किती मस्ती चढते! परंतु जेव्हा जागा होतो तेव्हा जसा असतो तसाच असतो. त्याचप्रमाणे हेही स्वप्नच आहे. संसार स्वप्नवत् आहे. येथून गेले म्हणजे परत होते ते आणि तेच सर्वच इथल्याइथे आणि तिथले तिथेच!

हे उघड्या डोळ्याचे स्वप्न आहे आणि ते बंद डोळ्याचे स्वप्न आहे. दोन्हीही परिणामकारक (effective) आहेत! जागे असताना अहंकार (egoism) आहे इतकाच फरक आहे.

रात्री लाख स्वप्ने पडतात. परंतु जागे झाल्यानंतर मनुष्यावर त्याचा काहीच परिणाम होत नाही. कारण तेथे तो स्वप्न द्रष्टा म्हणून रहातो. अहं कार्य करीत नाही. परंतु ज्ञानीपुरुष मागे असतानाच वेळोवेळी पुढील अवस्थेचा ज्ञाता आणि द्रष्टा रहातात. अहं नावाला सुद्धा नसतो. म्हणून जागताना सुद्धा त्याना स्वप्न वाटते. ज्ञानी पुरुष तर संपूर्ण ज्ञाता-द्रष्टाच असतो.

## ( १०३ )
## भय

सर्व ब्रह्मांडामध्ये प्रत्येक प्राणीमात्र भीतीने त्रस्त झालेला आहे. प्रत्येक प्राणीमात्रास भय तर वाटते परंतु त्यांना ते सर्व–सामान्यपणा मध्ये असते. त्यांना जेव्हा भीतीचे वातावरण एकत्र होते तेव्हांच भीती वाटते. परंतु मनुष्यांना विपरीत भय आहे. विपरीत भय म्हणजे एखादे संकट यावयाचे असेल तर ते त्याला शंभर रूपाने दिसते. आणि जे भय यावयाचे नाही त्याचे पण त्याला भय वाटते. ह्याचेच नाव विपरीत भय. एक मनुष्य जेवावयास येणार असला तर असे वाटते की शंभर माणसे जेवावयास येणार आहेत. ते विपरीत भय.

भय केव्हा वाटते? द्वेषपूर्वक त्यागात, तिरस्कारात एकसारखे भय वाटते. पोलीसाचे भय कोणत्या कारणामूळे वाटते? तो आवडत नाही म्हणून, त्याची तिरस्कार वाटतो म्हणून. कोर्टाचे भय का वाटते? कारण न्यायालय कोणाला खाऊन टाकते? नाही, त्याच्याबद्दल द्वेष वाटतो म्हणून. भय हा लपलेला तिरस्कार समजला जातो. सापामध्ये सुद्धा भगवान आहे. तो दिसत नाही म्हणून भय वाटते ना? साप परिस्थितीजन्य पुराव्याने (circumstantial evidence) येतो. जर सहज रीतीने समोर भेटला आणि मनुष्याच्या मनात भीती वाटली नाही तर साप बाजूला होऊन पुढे निघून जातो. जर त्याच्याबरोबर हिशोब नसेल तर तो काहीच करणार नाही.

संबंध संसरण मार्ग – संसारमार्ग भ्रांतिवाला आहे. जळफळाट उत्पन्न करणारा आहे. जळफळाट म्हणजे काय? झोपण्यापूर्वी भुताचे भय वाटत असेल किंवा सापाचे भय वाटले असेल तर रात्रभर त्याची भीती वाटेल आणि सर्व रात्र झोपसुद्धा लागणार नाही. रात्र संपल्यानंतर सकाळी सूर्योदय झाल्यावर त्याचे भय नाहीसे होईल आणि जळफळाट जाईल. ह्या संसाराचे सुद्धा तसेच आहे.

भूताला घाबरण्यामध्ये फरक एवढाच असतो की त्याला पाहून फक्त मनुष्य घाबरतो व त्यास वाटते की माझे काय होणार? भय वाटत नाही परंतु संसारामध्ये भय आणि जळफळाट दोन्ही असते. भय वाटले म्हणजे जागृत अवस्थेत त्याच्याबद्दल राग, द्वेष करतच रहातो आणि त्यामूळे घाबरट पणा रहातो. भयाचे संयोग, दूर करणे किंवा त्याचा प्रतिकार करण्याचे प्रयत्नात असतो. आत्म्याच्या अज्ञानामूळे भय रहाते आणि संगी चेतनाने मनुष्य भडकतो. भडकणे आदळआपट करणे हा संगिचेतनाचा गुण आहे. संगिचेतना म्हणजे आरोपित चेतन. चरणविधी करीत असताना किंवा ध्यान करीत असताना जर कोठे जोराचा आवाज आला आणि शरीरावर आपोआप (automatic) थरथरले तर त्यास चेतना म्हणतात.

जिकडे तुझी सत्ता नसते तेथे जर तू त्याच्यामध्ये हात घातलास (ढवळाढवळ केली.) तर काय होईल? सबंध दिवस तुला त्याची भीती वाटेल. कारण दुसऱ्याच्या सत्तेत आपण हात घातला म्हणून जगातील माणसेसुद्धा सतत परसत्ते मध्ये च असतात. 'मी चंदुलाल' हीच परसत्ता. (आरोप) स्वत:ची सत्ता पाहिली नाही आणि जाणली नाही व परसत्तेमध्ये मुक्काम ठोकला नाही म्हणून एकासारखे भय, भय आणि भयच वाटते.

सर्वच आपोआप मिळणार असे आहे परंतु विश्वास असला पाहिजे लोकांना असे वाटते की हे मिळाले नाही तर? असे झाले नाही तर? बस हेच विपरीत भय.

बुद्धि कशाकरिता आहे? सर्वांना शांत ठेवण्याकरिता, नीट वागविण्याकरिता, भडकविण्या करिता नाही. जी बुद्धि भय दाखविते ती विपरीत बुद्धि तिला तर सुरवातीलाच दाबून टाकली पाहिजे.

अरे तुला जर भीतीच वाटायची असेल तर मरणाचीच भीती लक्षात ठेव! प्रत्येक क्षणाक्षणाला ह्या जगास मरणाची भीती आहे त्याचे तुला भय का वाटत नाही? जर त्याची भीती वाटली तर मग मोक्षाचा उपाय शोधता येईल हे तर सगळे लोक जड झाले आहेत.

## ( १०४ )
## हित-अहिताची जाणीव

हित-अहिताचे भान तर प्रत्येकास स्वतंत्रपणे असलेच पाहीजे. मी काय केले तर सुखी होईन आणि काय केले तर दु:खी होईन? स्वतंत्र हित-अहिताचे भान नाही म्हणून नक्कल करण्यास जातोस. अरे नक्कल कोणाची करावी? अक्कलवान असेल त्याची. एकही अक्कलवान बघितला नाही, तर मग नक्कल कोणाची करणार? कारण तू जोपर्यंत खोट्या समजुतीने, 'मी चंदुलाल आहे' असे समजतोस तोपर्यंत तु नकली आहेस. खरा नाहीस. अस्सलाची नक्कल होते. नक्कलीची नक्कल केली तर काही होणार नाही. जर खरे काय ते समजले तर सार्थक होईल.

ज्ञानीच एक अस्सल असतो. बाकी सर्वच नकली आहेत. आयुष्यामध्ये कोणाचीच नक्कल करावयाची नसते. परंतु आता तर झोपणाऱ्याची, धावणाऱ्याची, चालणाऱ्याची सुद्धा नक्कल करतात. बसणाऱ्याची सुद्धा नक्कल करतात ना?

सत्ययुगामध्ये लोकांना व्यवहाराच्या हिता-अहिताचे भान होते. तेव्हा त्यावेळेस अनाचार नव्हते. लोक सदाचारी होते. हल्ली तर बहुतेक सर्वच ठिकाणी अनाचार आहे. तर मग हित, अहिताचे भान कोठून रहाणार? हे तर दुसऱ्याचे अनुकरण करण्यास

शिकलास, स्वत:च्या मताने तर कधी वागला नाहीस.

स्वत:च्या हित-अहिताची जाणीव वाढत गेली तर त्याची वाणी अंशत: वीतरागी होईल. वादी, प्रतिवादी दोन्ही लोक कबूल करतील.

क्षणा क्षणाला स्वत:च्या हित अहिताची जाणीव झाली पाहिजे, स्वत: कोण-याचे आणि व्यवहाराचे हित-अहित ह्याचीच जाणीव ठेवावयाची आहे. 'स्वत: आत्मा तर कधीही धोका देणार नाही. हा तर व्यवहार एकटाच दगेखोर आणि दगा आहे. म्हणून तेथे खूप सावधगिरीने वागा आणि हित-अहिताची जाणीव अवश्य ठेवा.'

कोणीही मनुष्य ढेकुण मारण्याचे औषध पिणार नाही. असे औषध पिण्याची त्यास हौस वाटेल का?

## ( १०५ )
## आयुष्यातील अनुकूलता
## (Life Adjustment)

प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात अमुक एक सिद्धान्त असलेच पाहिजे तरी सुद्धा परिस्थितीला अनुसरुन वागावयास पाहिजे. परिस्थिती प्रमाणे वागतो त्याला माणूस म्हणावा. जर अनुकूलता (adjustment) प्रत्येक परिस्थितीमध्ये करता आली तर तो थेट मोक्षास पोहोंचु शकेल असे हे अजब हथियार आहे. अनुकूल (adjust) म्हणजे जो तुझ्याशी अनुकूल रहात नाही त्याच्याप्रमाणे तू त्याला अनुकूल हो. दैनंदिन जीवनात सासू सुने बरोबर किंवा लहान जावे आणि मोठ्या जावे बरोबर त्यांचे पटत नसेल आणि त्यांना ह्या संसाराच्या चक्रा मधून जर सुटावयाचे असेल तर त्यांनी एकमेकास अनुकूल व्हावयास पाहिजे. नवरा बायकोमध्ये सुद्धा जर भांडण होत असेल तर एकाने आपली बाजू पडती घेऊन नमले पाहिजे. तरच संबंध नीट टिकतील आणि घरात शांती नांदेल. ज्यादा अनुकूल होता येत नाही त्याला लोक वेडा म्हणतात. ह्या सापेक्ष (relative) सत्यात आग्रहाची आणि हट्टाची जरा सुद्धा आवश्यकता नाही. मनुष्य तर कोणाचे नांव? प्रत्येक ठिकाणी अनुकूल होणारा चोराबरोबर सुद्धा अनुकूल झाले पाहिजे. आजकालच्या माणसाची स्थिती घाण्याच्या बैलासारखी झाली आहे. असा फसला आहे तर तो कोठे जाणार?

एकदा आम्ही स्नान करण्यास गेलो आणि लोटी घेऊन जाण्यास विसरलो. तर आम्ही ज्ञानी कसले? अनुकूल (adjust) करुन घेणारे. हात घातला तर पाणी पुष्कळ गरम होते. नळ उघडला तर टाकी रिकामी होती. नंतर आम्ही हळुहळु हातानी

पाणी सारखेकरुन थंड केले आणि स्नान केले. सर्व महात्मे सांगू लागले, आज दादांना स्नान करण्यास फार वेळ लागला. परंतु करणार काय? पाणी थंड होणार तेव्हा ना? आम्ही कोणालाही हे आणा, आणि ते आणा असे सांगत नाही. अनुकूल करुन घेतो. अनुकूल करुन घेणे हाच खरा धर्म आहे. या जगात तर कमी जास्ती यांची अनुकुलता करुन घ्यावयाची असते. कमी असेल तेथे अधिक (plus) करावयाचे आणि अधिक (plus) असेल तेथे कमी (minus) करावयाचे. आम्हास जर कोणी अक्कल नाही असे बोलले, तर आम्ही त्यास तुझे बरोबर आहे असे सांगतो. ते ताबडतोबच कमी (minus) करुन टाकतो. अक्कलवान तर कोणास म्हणतात? जो कोणालाही दु:ख देत नाही तो आणि जो दु:ख स्वत:कडे जमा करतो तो. सबंध दिवस सर्वांना उपकार (oblige) करतो. सकाळी उठल्यापासून त्याचे लक्ष लोकांना कसे उपयोगी पडावयाचे असे सतत ज्यास वाटते त्यास मानव म्हणतात आणि नंतर त्याला पुढे मोक्षाचा रस्ता मिळतो.

## ( १०६ )
## खटके ( संघर्ष )

"कोणाशीही संघर्षांते येउ नकोस आणि संघर्ष टाळीत रहा".

ह्या आमच्या वाक्याचे जर पालन केले तर थेट मोक्षापर्यंत पोहोचाल. तुझी भक्ति आणि आमचे वचन बळ सर्वच काम करून देईल. समोरच्याची तयारी पाहिजे.

आमचे एकच वाक्य जो कोणी पाळेल तो मोक्षास जाईल असे आहे. आमचा एकच शब्द जसा आहे तसा गिळला पाळला तरी सुद्धा मोक्ष हातात येईल असे आहे. त्याला चावण्यामध्ये आणि चघळण्यामध्ये तुझी बुद्धि कामास येणार नाही. उलट ती आड येईल.

आमचा एकच शब्द जर एक दिवस पाळला तर अजब शक्ति उत्पन्न होईल म्हणजे प्रभाव उत्पन्न होतच जाईल. आतमध्ये एवढी भयंकर शक्ति आहे की कोणतीही कशीही संकटे आली तरी त्यांचे निवारण होईल. जाणून बुजून जर कोणी दरीत (खाईत) पडण्याच्या तयारीत असेल आणि तू जर त्याच्या जवळ गेलास तर तो तुला सुद्धा त्याच्या बरोबर दरीत (खाईत) खेचेल. आपणास तर मोक्षास जावयाचे आहे. अशा बरोबर थोडेच बसून रहावयाचे आहे? हा तर कधीही मोक्षास जाणार नाही परंतु तुला सुद्धा त्याच्या बरोबर बसवून ठेवील. असे करुन कसे चालेल? जर तुला मोक्षास जावयाचे असेल तर अशांना फार शहाणपणा शिकविण्याच्या भानगडीत पडू नकोस. सगळ्यांची काळजी तुम्ही घेत बसलात आणि तुम्हाला खूप इच्छा असेल की ह्या

झंझाळामधुन सुटावे तरी सुद्धा जग तुम्हास सुटू देणार नाही. ह्या जगामध्ये भांड्याला भांडे आपटतच रहाणार. त्यामधून आपण जरा सुद्धा घर्षण उत्पन्न केल्याशिवाय निघून जावायाचे आहे. अरे आम्ही तर येथपर्यंत सांगतो कीं जर तुझे धोतर काट्यात अडकले असेल आणि तुझी मोक्षाची गाडी सुटत असेल तर तु धोतर सोडविण्याकरिता थांबु नकोस. धोतर-वितर सोडून (टाकून) देऊन धावत जा आणि गाडीत बस. अरे, एक क्षण सुद्धा इथल्या गोष्टीमध्ये चिकटून जाण्यासारखे नाही. तू जेवढा त्या वस्तुला चिकटलास तेवढा स्व-स्वरुपाला विसरलास.

जर चुकुनमाकून तू कोणाच्या भानगडीत पडलास तर त्याचा निकाल लवकर करुन टाक. सहज रीतीने ह्या भांडणातून संघर्ष आणि चकमक झाल्याशिवाय तुझा रस्ता काढ.

## ( १०७ )

## काटकसर

## (Economy)

काटकसर कोणाचे नांव? तेजी येते त्यावेळी तेजी आणि मंदी येते त्यावेळी मंदी. नेहमी देणे करून कार्य करु नका. देणे करून व्यापार करावा परंतु मौज, चैन करू नये. देणे करून केव्हा खावे? जेव्हा मरणाच्या दारी पडलास तेव्हा,परंतु देणे करून तूप पिता येत नाही.

प्रश्न : - लोभी आणि कंजूस ह्यामध्ये फरक काय?

दादा : - कंजूस फक्त लक्ष्मीचाच असतो. लोभी तर सर्वच बाजूने लोभीपणा करतो. मानाचा पण लोभ करतो. आणि लक्ष्मीचा पण करतो. ह्या लोभी माणसाचा सर्वच बाजूनी लोभ असतो. मुंग्याना जरी डासाचे पंख असले तरी त्या एकत्र होऊन ओढतात. लोभी माणसाचा हिशोब कसा असतो? एकत्र जमा करतो ते पंधरा वर्षे पुरेल इतके किड्या सारखे एकत्र करतो. त्याला फक्त साठविण्याची एकच तन्मयता असते. त्याच्यामध्ये जर कोणी आले तर तो चावून मारुन टाकतो. ह्या मुंग्या सर्व आयुष्भर बिळांत धान्य साठवितात आणि उंदिरमामा फुकटचे खाणारे एकच मिनिटात सर्व खाऊन टाकतात.

प्रश्न : - दादा, कंजूसपणा आणि काट-कसर ह्यामध्ये फरक आहे का?

दादा : - हो पुष्कळ फरक आहे. महिना हजार रुपये कमावीत असेल तर आठशे रुपये खर्च करतो आणि पाचशें रुपये आवक असेल तर चारशें रुपये खर्च

करतो ह्याचे नांव काट-कसर. परंतु कंजूस चारशेच रुपये खर्च करतो, मग भले हजार रुपये आले किंवा दोन हजार रुपये आले तो टॅक्सीने जाणार नाही. काटकसर हे अर्थशास्त्र आहे. हा तर भविष्य काळाच्या अडचणी लक्षात ठेवतो. कंजूस माणसास पाहिल्या बरोबर चीड येते, की काय कंजूस आहे? काटकसरी माणसास बघितल्या बरोबर चीड येत नाही. कारण काटकसर किंवा कंजुषपणा हे सापेक्ष (relative) आहेत. खर्चिक माणसास काटकसरी मनुष्य सुद्धा आवडणार नाही. हे सर्व अडथळे संसारामध्ये भ्रांतिच्या भाषेत राहिले आहेत कीं खर्ची असू नये. परंतु लुच्या माणसास कितीही सांगितले तरी तो लुच्चेपणा सोडणार नाही. आणि खर्चिक मनुष्य काटकसर करावयास गेला तरी सुद्धा खर्चिक राहील. खर्चिकपणा आणि काटकसरीपणा दोन्हीही सहज स्वाभाविक आहेत. किती वाटेल तेवढे केले तरी सुद्धा वळणार नाही. प्राकृत गुण सर्वच स्वाभाविक आहेत. शेवटी तर सर्वामध्येच सर्वसामान्यपणा पाहिजे.

आमच्या खिशामध्ये कनुभाई पैसे ठेवतात. ते पैसे तर, ही टॅक्सी किंवा, गाडी एवढ्याकरिताच खर्च करावयाचे असे पण नाही. असे काहीच नक्की नाही. पैसे फुकट खर्च करावयाचे नाहीत. जशी वेळ येईल त्याप्रमाणे खर्च करावयाचे.

हे दादा सुद्धा काटकसरी आहेत आणि खर्चिक आहेत. पक्के खर्चिक आहेत तरीसुद्धा पूर्ण सोयी प्रमाणे (complete adjustable) खर्च करणारे आहेत. परक्या माणसाकरिता खर्चिक आणि स्वत: करिता काटकसरी आहेत. आणि उपदेश देण्यात फार बारीक. आमची काटकसर सोयीची adjustable आणि खुप उच्च प्रकारची आहे. आम्ही पाणी वापरतो ते सुद्धा काटकसरीने एडजस्ट अनुकूल करुन वापरतो. आमचे प्राकृत गुण सहज रीतिने राहिले आहेत.

## ( १०८ )
## विषय

विषयाच्या बावतीत जगामध्ये भयंकर गैरसमजूत झालेली आहे. शास्त्र सांगते विषय हे विष आहे कित्येक लोक सांगतात की विषय हे विष आहे आणि ते मोक्षास जाऊ देणार नाही. आम्ही एकटेच सांगतो की विषय हे विष नाही परंतु विषयामध्ये निडरता हेच विष आहे. म्हणून विषयापासून घाबरा ह्या सर्व विषयामध्ये घाबरत नाही हेच विष आहे. दोन-तीन साप येत असतील त्यावेळेस तुमचा पाय खाली असेल आणि तुम्हास भीती वाटत नसेल तर पाय खाली ठेवा. परंतु भीती वाटत असेल तर पाय वर घ्या. परंतु जर तुम्हास भीती वाटतच नसेल आणि पाय वरतीच घेतले नाहीत तर पूर्ण ज्ञानी. ही केवळ ज्ञानाची निशाणी आहे. परंतु पूर्ण नसल्यामूळे तुम्ही स्वत:च घाबरुन

पाय वरती घेता म्हणून तुम्हास विषयामध्ये भयमुक्त रहाण्याकरीता थर्मामीटर देत आहोत. जर सापा समोर तू घाबरत नसशील तर विषया मध्ये भिऊ नकोस आणि तेथे जर भीती वाटत असेल पाय वरती करीत असशील तर विषयापासून सुद्धा भिऊन रहा. विषयापासून भयमुक्त होऊ शकत नाही. भगवान महावीर सुद्धा विषयापासून घाबरत होते आणि आम्ही सुद्धा घाबरतो.

जग म्हणते की विषय मोक्षास जाऊ देत नाही. अरे तसे नाही. विषय म्हणजे इंग्रजीमध्ये subject म्हणतात. ह्या जगामध्ये पुष्कळ विषय आहेत. जर विषय मोक्षास जाण्याकरिता नडत असते तर कोणीही मोक्षास जाऊ शकला नसता. भगवान महावीर मोक्षास गेले तर त्याना विषय नडले नाहीत. आणि तुम्हासच का नडतात? विषय तुम्हास नडत नाहीत. हट्टीपणा तुम्हास मोक्षास जाण्याकरिता नडतो अनंत विषयात भगवान निर्विषयी राहून मोक्षास गेले.

खरे पाहिले तर आत्मा स्वत: निर्विषयी आहे. मन, वाचा, काया हे विषयी आहेत, हे जर निराळे केले तर मन, वाचा आणि काया ह्यांच्या अनंत विषयामध्ये स्वत: शुद्धात्मा निर्विषयी राहून मोक्षास जाऊ शकतो.

आत्मा स्वत: निर्विषयी आहे तर विषय कशा तऱ्हेने भोगवतो? जर तो विषय भोगवतो तर तो कधीही मोक्षास जाऊ शकणार नाही. कारण तो त्याचा अन्वय गुण झाला असे म्हणतात. संयुक्त स्वरूप झाले असे म्हणतात. हे तर सिद्धांताच्या विरुद्ध समजले जाते. विरोधाभास म्हणतात. आत्मा केव्हाही कोणताही विषय भोगवू शकत नाही. मात्र भोगवल्याच्या भ्रांतिमूळे घमंड करतो की मी भोगले बस. म्हणूनच सर्व अडकले आहे. जर ही भ्रांति काढून टाकली तर तो स्वत: अनंत विषयातच निर्विषयी पदात राहील.

विषय कोणास म्हणतात? ज्या-ज्या बावतीत मन प्रफुल्लित होते ते विषय आहेत. मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार ज्या- ज्या मध्ये तन्मयाकार होतात ते विषय आहेत. एकाकार जेथे झाला ते विषय आहेत. विषयाचे विचार येतात ते स्वाभाविक आहेत. ते परमाणुंचे गलन आहे. पूर्वी केलेल्या charge- भरचेच गलन आहे. परंतु तू त्यांच्यामध्ये तन्मयाकार झालास ह्यामध्ये तुला taste- चव लागली तो विषय आहे. ते नुकसानकारक आहे. विषय कशास म्हणतात? सुरुवातीस सुद्धा आवडतो आणि शेवटी सुद्धा आवडतो त्याचे नांव विषय. विषय ही वस्तु नाही, परंतु हा तर परमाणूचा वेग आहे, ज्या ज्या परमाणूस ते अत्यंत आवळुन तन्मय होऊन खेचले त्याचे गलन होते. तेव्हा तु परत तितकाच तन्मयाकार होतोस तो विषय आहे. मग तो कोणताही subject- विषय असो. लोक इतिहासाचा विषय घेतात, भूगोलाच विषय घेतात

त्याच्यामध्ये तन्मयाकार होतात ते सर्वच विषय आहेत. त्याच प्रमाणे ज्यांनी तपाचा विषय घेतला, त्यागाचा विषय घेतला आणि त्यामध्येच एकाकार झाला तो सुद्धा विषय आहे. अरे विषय घेऊन विषयी बनून मोक्ष कशा तऱ्हेने होईल? निर्विषयी हो, तर मोक्ष मिळेल.

विषय म्हणजे ज्याची सारखी आठवण येते तो. ही भजी किंवा दहीवडा खाण्यास काही हरकत नाही परंतु तुला जर सारखी आठवण आली किंवा कधी तरी अशी परत तयार कर असे सांगितले तो विषय आहे. सिनेमा बघितला आणि त्यातील काहीसुद्धा आठवण परत झाली नाही तर त्यास विषय म्हणत नाहीत. परत आठवण होत नाही. म्हणजे त्याचा निकाल लागला असे म्हणतात आणि परत आठवण झाली ह्याचा अर्थ तन्मयाकार झालेला म्हणजे त्यास विषय म्हणतात. विषय किती प्रकारचे आहे? अनंत प्रकारचे. एकाद्या माणसास गुलाबाचे फूल आवडत असले आणि ते जर त्यानी बागेत बघितले व धावपळ केली तो विषय. ज्याला ज्याची आठवण येईल तो विषय. हिऱ्याची सारखी आठवण येत असेल तो विषय आणि तो आणल्यानंतर जर आठवण येण्याचे बंद झाले तर तो सारख्या भावाने निकाल लागतो. परंतु जर कधी परत आठवण आली तर मग निकाल लागला नाही असे म्हणावयाचे त्यास विषय म्हणतात.

इच्छा होणे हे स्वाभाविकच आहे. परंतु इच्छा करीत रहाणे हे नुकसानकारक आहे. स्त्रीया साड्या बघतात आणि त्याची आठवण काढतात तो त्याचा विषय म्हणतात. जेथे विषयाचा संबंध येतो तेथे वादविवाद होतो.

मोक्षास जावयाचे असते तेव्हा समोर विषयाचे ढीगचे ढीग येतात. हा 'दादा भगवानांचा' मोक्ष मार्ग अनंत विषयामध्ये निर्विषयी पदासहितचा मोक्ष मार्ग आहे.

विषयांची आराधना सुद्धा करण्यासारखी नाही. आणि तसेच त्याच्यावर भडकण्यासारखे व चिडण्यासारखे सुद्धा नाही. ह्या सापासमोर तू कसा सावधपणाने चालतोस? त्याप्रमाणे विषयापासून सावध रहा. बेदरकार होऊ नकोस. जोपर्यंत आत्मज्ञान प्रगट झाले नाही, तोपर्यंत विषय कोणलाही सोडत नाही. कारण कर्ताभाव, अहंकार जातच नाही.

ज्याचा विषय वीतरागता असेल तो वीतरागाला समजू शकेल. पण ज्याचा subject- विषय क्रोध आणि लोभ तो वीतराग कोठून समजेल. ज्ञान नसेल आणि जर विषयाचा wheel cock- नळाची चावी बंद केली तरी सुद्धा दुसऱ्या अवतारामध्ये ती उघडली जाईल. ज्ञाना शिवाय विषय सुटणारच नाही.

विषयाच्या आराधनेचे फळ विषयच मिळेल. ग्रहण केलेल्या आराधनेचे फळ त्याग मिळेल आणि त्यागाच्या आराधनेचे फळ ग्रहण मिळेल. त्यागाच्या विरुद्ध ग्रहण आहे. जेथे प्रतिपक्षी आहेत तेथे सर्व विषय आहेत.

भगवान म्हणतात कीं जे आपल्या ताब्यात नाहीत ते विषय आहेत. मी विषय भोगवतो असा अहंकार करतो. जर तू विषय भोगवत असशील तर तुला तृप्त झाले पाहिजे. परंतु तसे नाही. ''विषय हा विषयास भोगवत नाही. हा तर परमाणूचा हिशोब आहे. प्रत्येक इंद्रिय स्वतःच्या विषयात निपुण आहे''. परंतु दुसऱ्या विषयात निपुण नाही. नाकाला जर जिलेबी चावावयास लावली तर त्याला गोडाचा अनुभव येईल काय? परमाणूंचा हिशोब आणि तो चुकता झाला तर ते विषय नाहीत. परंतु त्यात तन्मयता तोच विषय आहे. त्याच्यामध्ये इंद्रियाचे सुद्धा काहीच कार्य (role) नाही. ते तर फक्त कळवते (convey) म्हणूनच आम्ही म्हणतो की इंद्रियाचा विषय जिंकतो तो जितेंद्रिय. जीव नाही परंतु ज्याची दृष्टी दृश्यामध्ये पडली ज्याचे ज्ञान ज्ञानामध्ये आले तो जितेंद्रिय जिन. भगवान महावीर सुद्धा असेच सांगत होते.

विषयाची सुरवात काय? मोह भावनाने स्त्रीला पहाणे. परंतु काय, दरेक स्त्रीला पहाताना मोह भाव येतो का? एका स्त्रीस बघून विचार येतो आणि दुसरीस बघून विचार येत नाही. तर- there is something wrong- त्यात काहीतरी चुकते. जर स्त्रीला पाहून विष चढत असेल तर प्रत्येक स्त्रीला बघितल्या बरोबर विष चढावयास पाहिजे. जर स्त्रीच मूळ कारण (root cause) असेल तर स्त्रीयाना बघितल्या बरोबर विष चढले पाहिजे. परंतु तसे होत नाही. हे तर अमुकच परमाणूने पारमाणूचे आकर्षण होत असते. जो पर्यंत विषयाचे एकपण परमाणू बाकी असेल तो पर्यंत स्याद्वाद वाणी निघणार नाही.

जनावराना ज्या विषयाची इच्छाच नसते त्याची मनुष्य एकसारखी इच्छा करतो. विषयच जर विषय असतील तर एका जागेवर दोन स्त्रीया बसल्या आहेत. एक आई आणि एक पत्नी आहे तेथे आईवर नजर का जात नाही? कारण विषय हे विषयच नाहीत. भ्रांति हाच विषय आहे. हे विषय जर बंद करावयाचे असतील तर मी त्याचा इलाज दाखवितो. हे विषय हा एक स्वयंचालित कॅमेरा आहे. त्याच्यामध्ये फिल्म-चित्र येऊ देऊ नका. 'शुद्धात्म्याचा' फोटो पाडून घ्या बाकी विषय ही वस्तुच नाही. ह्याच्यात तर मोठमोठ्या ब्रह्मचर्यांची सुद्धा फजिती झाली आहे. की हे काय आहे? ज्या वस्तुत जो सारखा मग्न असतो तो विषय. तो पुढुनही आंधळा आणि माघून सुद्धा आंधळा व त्याला दुसरे काहीच दिसत नाही. ह्याला मोहांध समजावयाचे.

विषयाची याचना करताना ज्याला मरावे असे वाटते तो ह्या जगाला जिंकू शकतो. मानाने जगणे हेच सर्वात उत्तम जीवन म्हणावयाचे.

## दादांची ज्ञान गोष्ठी

रोगिष्ट देह जास्त विषयी असतो. निरोगी माणसास जास्त स्थिरता असते.

विषयापासून रोग होत नाही परंतु विषयामध्ये लोभ शिरला कीं तेव्हाच रोग होतो. लोक विषयास डाग देतात. अरे विषयास डाग कशाकरिता देतोस? विषयात जो लोभ आहे त्यास डाग दे ना! विषय नडत नाही परंतु विषयामध्ये लोभ नडतो. भोजन गृहात सांगतोस की मला मिरची शिवाय चालणार नाही, अमुक गोष्टी शिवाय चालणार नाही, अमुक पाहिजे तोच लोभ आहे. क्रोध, मान, माया, लोभ हेच रोग तयार करणारे आहेत.

जळफळाटाने लोक विषय भोगतात. परंतु जर विचार केला तर तो विचार निघून जाईल असे आहे. जर ह्या देहावरची चामडी काढून टाकली तर ह्या देहावर प्रीती कराल काय? चामडी ही तर शरीरावरची चादर आहे आणि हे पोट तर मळाची पेटी आहे. ते चिरले तर त्यातून मळ बाहेर पडेल. ह्या हातावरची चामडी निघाली असेल आणि आतुन पू वहात असेल तर तेथे तुम्हास हात लावण्याची इच्छा होईल का? अर्थात होणार नाही. मोह तर वेडेपणा आहे. अविचारी दशेमूळे मोह उत्पन्न होतो. मोह हा तर शुद्ध जळफळाटच आहे.

गोड खाल्यानंतर जर चहा प्यायला तर अगोड लागेल ना? चहावर अन्याय करीत नाही का? चहा तर गोड आहे परंतु अगोड का लागतो? कारण ह्याच्यापेक्षा जास्त गोड पहिल्यांदा खाल्ले म्हणून अगोड लागतो. त्याचप्रमाणे आम्ही तुम्हास अनुपम ज्ञान देतो. नंतर तुम्हाला ह्या जगामध्ये सर्व, विषयी सुख गोड असून सुद्धा अगोड लागेल. लोकामध्ये म्हण आहे, की हा थंडीताप चढतो. मलेरिया होतो तेव्हां (दूधपाक) बासुंदी कडू लागते कारण त्याचे तोंड कडू झाले आहे म्हणून सर्व कडू लागते. त्यामध्ये (दूधपाकाचा) बासुंदीचा काय दोष? तसे, आम्ही दिलेल्या अक्रम ज्ञानाने जसा ताप उतरेल तसतसे जगाचे सर्व विषय निरस वाटत जातील. विषय नीरस होत जाणे हे थर्मामीटर आहे.

क्रमिक मार्गामध्ये सुद्धा अहंकार असल्यामूळे विषय निरस लागतात व ते परत समोर येतात परंतु आमच्या ''अक्रम'' मार्गामध्ये असे अडथले नाही ना! आम्ही तर विषयाच्या सागरात निर्विषयी आहोत. निर्विषयी म्हणजे जळ-कमळा प्रमाणे असणे. आम्ही तर ह्या देहाचे स्वामित्व सोडून दिले आहे. म्हणून आम्हांस काहीच शिवत नाही आणि नडत नाही. आमच्यात स्वामित्वपणाचा अभाव आहे. आमच्या महात्म्यांचे मालकीपण आम्ही घेतलेले आहे, आणि म्हणून ते जळ-कमळा प्रमाणे राहू शकतात. चित्र काढणार तर शरीर आहे परंतु त्यामध्ये तुम्ही स्वतः तन्मयाकार झालात तर तुम्ही

सही दिली असे होईल. परंतु तन्मयाकार झाला नाहीत व फक्त पहाण्याचे आणि जाळण्याचे काम केले तर तुम्ही सुटेच राहीलात.

मला लोकांनी विचारले की हा कोट असा का घातला? मी सांगितले ''हा आमचा निर्विषय'' विषय आहे.

दोन प्रकारचे विषय. एक विषय आणि दुसरा निर्विषय. ज्या विषयामध्ये ध्यान नसते, बिलकुल लक्षच नसते त्याचे नाव निर्विषय विषय.

ज्याला ज्या विषयाचे ध्यान असते त्यामध्ये तो खूपच तत्पर असतो. लोक आपआपल्या विषयामध्येच मस्त असतात आणि त्यातच ते रमलेले असतात कारण त्याच्यामध्येच तन्मयाकार झालेले असतात. आत्मा निर्विषयी आहे सर्व जग विषयाने भरलेले आहे. ज्याला जो विषय पसंत पडला त्याच्या नादी तो लागला. उदाहरणार्थ तपस्वीने तपाचा विषय पसंत केला, त्यागीने त्यागाचा, वक्त्याने वक्तृत्वाचा आणि संसारी लोक संसाराच्या विषयांच्या नादी लागले आहेत. आणि परत सांगतात की आम्ही पुरुषार्थ करीत आहोत. ज्ञानीला विचारा की हा पुरुषार्थ आहे किंवा काय आहे. अरे जे केलेच पाहिजे त्याला ऐच्छिक समजतो. अरे पूजा विषयांची करता आणि निर्विषयाला (आत्म्याला) शोधावयाला निघालास? अरे ह्याचा केव्हाही अंत येणार नाही तू जे काही केलेस त्यास तू अहंकारच दाखवलास, तन्मय झालास सर्व सामान्यापेक्षा अधिक झालास. चुकीच्या रस्त्याने जातो. त्यात त्याचा दोष नाही. हे तर जसे आहे तसे सांगावे लागते आणि ते पण करुणा आल्याने वाणी निघते, बाकी तर आम्हा ज्ञानी पुरुषांना असे कडक शब्द वापरावयाचे असतात का? ते सर्व विषय आहेत. असे खरे ज्ञान कोणी समजू शकत नाही म्हणूनच उलट्या रस्त्यास जातात. त्यांचा पण ह्यात दोष नाही हे तर जसे आहे तसे सांगण्याची पाळी आली आहे, आणि ते सुद्धा अत्यंत करुणा असल्यामूळे अशी वाणी बाहेर पडते. आमच्या सारख्या ज्ञानीपुरुषाला तर असले कडक शब्द वापरावयाचे असतात का? परंतु काय करावे? ह्या विचित्र काळामूळे खरा मार्ग दिसत नाही. तो रस्ता दाखविण्याकरिता असली कठोर वाणी बाहेर पडते. खरे म्हटले तर ज्ञानीपुरुष करुणेचा सागर आहे.

विषय आव्हान करण्यासारखे नाहीत. पोलीसाने पकडून नेले व दोन दिवस उपाशी ठेऊन एकाद्यास मांस खावयास घातले तसे विषयापाशी असले पाहिजे आणि तरच गुन्हेगारी सहेतुक नाही. विषय नाईलाजाने असले पाहिजेत. विषय अविषय ही परसत्ता आहे. मुद्दाम होऊन पोलीसाबरोबर जाण्याची इच्छा होईल काय? अर्थात होणार नाही. बळजबरीने विषय हे विषय नाहीत. परंतु विषय भोगल्याशिवाय विचार केला तर तो विषय आहे हा तर भगवानचा न्याय आहे. देहानी विषय भोगवला तर तो मुक्त

होतो आणि मनाने विषय भोगवला तर बीज पडले जाते. अवस्थित झाला तो व्यवस्थित होणारच. विषयाची धावपळ अनंत जन्मांपासून ह्या जगामध्ये चालू आहे. उत्तमात उत्तम कपडे घालून दुसऱ्याला त्याचे आकर्षण निर्माण करण्यामध्ये निमित्त झाला तर त्याचे payment- पैसा द्यावा लागतो. विषय ही नेहमी घाणच आणते. जेथे घसरला तो विषय.

अचेतना जवळचा विषय चांगला, परंतु मिश्रचेतनाच्या जवळचा विषय खोटा. तुम्हास सुटावयाचे असेल तरी समोरचे मिश्रचेतन रागी द्वेषी असल्यामूळे तुम्हास लवकर सुटू देणार नाही. अचेतन हे वीतरागी आहे. तुम्ही सोडले म्हणजे ते सुटले.

आयुष्याची ठेव श्वासोश्वासाच्या गणना- आधारावर असते. जेथे जास्त श्वासोश्वास वापरला जातो तेथे आयुष्याची ठेव वापरली जाते. क्रोध, मान, माया, लोभ, कपट ह्यामध्ये श्वासोश्वास जास्त वापरला जातो आणि देहाच्या विषयामध्ये पडला तर भयंकर वापरला जातो. म्हणूनच व्यावहारीक माणसांना सांगतो की दुसरे काही झाले नाही तर चालेल, परंतु लक्ष्मी आणि वीर्य ह्यांची काटकसर करा. हे दोन्ही जगाच्या व्यवहाराचा मुख्य पाया आहेत. दारु खराब आहे असे म्हटले आहे कारण की ती विषयाकडे नेते. कोट्यावधी अवतारामध्ये सुद्धा पत्ता लागणार नाही असे अनंत विषय आहेत. आमचे महात्मे विषय भोगवत असून सुद्धा मी त्याना निर्विषयी बनविले आहे!

लोकविषयाकरिता जगत नाहीत परंतु विषयाच्या अहंकारास पोसण्याकरिता जगतात.

ज्या ज्या विषयाचा अहंकार आणलेला आहे त्याचे परमाणु शरीरात आहेत. मी आमच्या महात्म्यांच्या विषयाच्या अहंकारास काढून टाकले आहे. तरी सुद्धा पूर्वीचे परमाणू भरलेले आहेत. ते फळ देऊन जातील. ज्या ज्या विषयाचा अहंकार भरलेला आहे ते ते विषय समोर येतील. ज्या ज्या विषयाचे अहंकार निघून गेले आहेत ते ते विषय येणार नाहीत. परंतु बाह्य अहंकार पूर्णपणे मुळासकट जातील आणि परमाणू फळ देऊन निघून जातील तेव्हा देह निघून जाईल. परमाणुने परमाणुचा सारखा निकाल लागेल तेव्हा ह्या देहाचा पण मोक्ष होईल. जगाचे सापेक्ष धर्म अबंधनाविषयी बंधन मानतात आणि ज्याच्यापासून ज्यास बंधन होत राहील त्याचे त्यांना भानच नाही. हे सूक्ष्म वाक्य आहे. समजणे कठीण आहे. सर्व जग विषयाचे ज्ञान जाणते. जो विषय शिकला त्याचे ज्ञान माहीत आहे. जो विषय समजला त्याच्या विषयी झाला. हे तर सापेक्ष धर्मामध्ये पाचच विषय सांगितले आहेत. परंतु विषय तर अनंत आहेत. सर्वसामान्यापेक्षा अधिक किंवा सर्वसामान्यापेक्षा कमी झाला म्हणजे विषयी झालास. विषयी झाला म्हणजे "जगत्-ज्ञानात" पडला म्हणावयाचा, तेथे आत्मज्ञान शक्य नाही.

## ( १०९ )
## प्रेम आणि आसक्ति

"घडी चढे घडी उतरे, वह तो प्रेम ना होय,
अघट प्रेम हृदे बसे, प्रेम कहीए सोय " -**कबीर.**

खरे प्रेम कोणास म्हणतात? जे कधीही वाढत नाही आणि कधीही कमी होत नाही. सतत एकसारखे एका धारेत रहाते ते खरे प्रेम. "शुद्ध प्रेम तेच प्रगट परमेश्वर प्रेम आहे" बाकी ज्या प्रेमात चढ उतार होत असतो त्यास प्रेम म्हणत नाही त्याला आसक्ती म्हटली जाते.

ज्ञानीचे प्रेम हे तर शुद्ध प्रेम आहे. अशा प्रकारचे प्रेम कोठेच बघावयास मिळणार नाही. जगात चढ उतार होणाऱ्या प्रेमाचे दर्शन होते. उदाहरणार्थ- नवरा-बायकोचे, आई-वडीलांचे, वडिल-मुलाचे, आई-मुलाचे, शेठ-नोकराचे हे असे अमुक चढ उताराचे प्रेम केव्हा लक्षात येते? जेव्हां हे प्रेम मोडून (fracture) टाकले जाते तेव्हा. जोपर्यंत गाडे सुरळीत चालले आहे तो पर्यंत लक्षात येत नाही. परंतु जेव्हा कडू वितंडवाद होतो तेव्हां कळते. सबंध आयुष्य मुलगा बापाच्या आज्ञेत राहीला आणि एकच वेळ जर त्याने बापाची अक्कल काढली तर सबंध आयुष्याचे मातेरे होते. बाप सांगतो की तू माझा मुलगा नाहीस आणि मी तुझा बाप नाही. खरे प्रेम असेल तर ते कायम टिकले पाहिजे. शिव्याशाप दिल्या किंवा भांडण झाले तरी सुद्धा जे प्रेम टिकते ते खरे प्रेम. हे प्रेम तर व्यापारी आणि ग्राहक ह्यांच्या संबंधासारखे आहे. त्यात सोदाबाजी आहे. दुसऱ्याबरोबर सतत रहावयाची इच्छा असणे त्यास खरे प्रेम म्हणतात. ह्या प्रेमात क्रिया (action) आणि प्रतिक्रिया (reaction) असत नाही. प्रेम हाच परमेश्वर आहे. प्रेम प्रवाह तर सारखाच वहात असतो. जास्त कमी होत नाही, भर झीज होत नाही. आसक्ती ही भर आणि झीज स्वभावाची असते.

जेथे झोपलेला असतो तेथेच आग्रह होत असतो. चटाईवर झोपलेला असेल तर त्याला चटाईचा आग्रह होतो आणि डनलॉपच्या गादीवर झोपलेला असेल तर त्याला गादीच्या आग्रह होतो. रोज चटाईवर झोपत असलेल्या माणसाला गादीवर निजविले तर झोपच येत नाही. आग्रह हेच विष आहे आणि निराग्रहता हेच अमृत आहे. निराग्रहीपणा जोपर्यंत उत्पन्न होत नाही तो पर्यंत जगाचे प्रेम संपादन करता येणार नाही. शुद्ध प्रेम निराग्रही असल्यामूळे प्रगट होते आणि शुद्ध प्रेम हाच परमेश्वर आहे.

ओळख असल्याशिवायचे प्रेम नाशिवंत आहे आणि आज जे दिसते ते प्रकृतिचे प्रेम दिसते. प्राकृतगुणामूळे प्रेम होते ते प्रेम काय कामाचे?

शुद्ध प्रेमामूळे सर्वच दरवाजे उघडे होतात. गुरु बरोबरच्या प्रेमाने काय मिळत नाही?

मनुष्य दिसावयास जरी सुंदर असला तरी सुद्धा अहंकारामूळे कुरूप दिसतो. सुंदर केव्हा दिसतो? जेव्हा तो प्रेमात्मा होतो तेव्हा. त्या वेळेस कुरूप पण रूपवान दिसू लागतो. शुद्ध प्रेम जेव्हा प्रगट होते तेव्हाच रूपवान दिसु लागते. जगातील लोकांना काय पाहिजे? मुक्त प्रेम, ज्याच्यामध्ये स्वार्थाचा लवलेश सुद्धा नसतो.

संसारातील भांडण हे आसक्तीचे पोषक द्रव्य आहे आणि झगडा नसला म्हणजे वीतरागता प्राप्त होते.

भगवान म्हणतात की द्वेष-परिषह हे उपकारी आहेत. प्रेम परिषह कधीच सोडता येण्यासारखे नाहीत. सर्व जग प्रेम परिषहामध्ये फसले आहे म्हणून जो कोणी भेटले त्याला जय श्रीकृष्ण म्हणून सुटून जावे. कोणावरही प्रेम करू नका. आणि कोणाच्याही प्रेमात पडू नका. प्रेमाचा तिरस्कार करून मोक्षास जाता येत नाही म्हणून सावध रहा. मोक्षास जावयाचे असेल तर विरोधी माणसाचे सुद्धा उपकार माना. जो प्रेम करतो तोच बंधनात टाकतो. ह्याच्या उलट विरोधी उपकार करतात आणि मदतरूप होतात. ज्यांनी आपल्यावर प्रेम केले त्याचा तिरस्कार न करता त्याच्यातुन सुटून जावे. कारण प्रेमाचा तिरस्कार केल्यामूळेच हा सबंध संसार मागे लागला आहे.

ही आसक्ती तर देहाचा गुण आहे. परमाणुचा गुण आहे. तो कसा आहे? लोहचुंबक आणि टाचणी ह्यांच्यामध्ये जसा सबंध आहे तसा आहे. त्याप्रमाणे शरीराला योग्य होतील अशा परमाणुमध्ये शरीर खेचले जाते ती आसक्ती.

आसक्ती तर सर्वसामान्यापेक्षा अधिक आणि सर्वसामान्यापेक्षा कमी असू शकते. प्रेम सर्वसामान्यपणा मध्ये असते. एक सारखे असते. त्यामध्ये कोणत्या तऱ्हेचा फेरफार होतच नाही. आसक्ती ही तर जड वस्तुची आहे. चेतनचे नावपण नाही.

व्यवहारामध्ये अभेदता रहाते त्याचे कारण आहे. हे तर परमाणु आणि आसक्तीचे गुण आहेत. परंतु त्यामध्ये कोणत्या क्षणास काय होईल ते सांगता येणार नाही. जो पर्यंत परमाणू एकसारखे असतात तोपर्यंत आकर्षण रहाते त्यामूळे अभेदता रहाते आणि परमाणु जर विरोधी असतील तर विकर्षण (अपाकर्षण) आणि वैर उत्पन्न होते. म्हणून आसक्ती असते तेथे वैर असतेच. आसक्तीमध्ये हित-अहिताचे भान नसते. प्रेमामध्ये संपूर्ण हित अहिताचे भान असते.

हे तर परमाणुंचे शास्त्र आहे. त्यामध्ये आत्म्यास काहीच देणे घेणे नाही. परंतु

लोक तर परमाणुच्या खेचण्यामूळे भ्रांतिने असे म्हणतात की, 'मी खेचला गेलो'. आत्मा कधीही खेचला जातच नाही. आत्मा ज्या गोष्टीमध्ये तन्मयाकार होत नाही त्याचा त्याने त्याग केला आहे असे म्हणतात.

कर्तापणाचा अभिमान असणे हीच आसक्ती. आपणास तर देहाची आसक्ती आणि आत्म्याची अनासक्ती असते!

## ( ११० )
## नैसर्गिक कायदा- भोगवतो त्यांची चूक

ह्या जगाचे न्यायाधीश तर प्रत्येक ठिकाणी आहेत. परंतु जगतरूपी कर्माचे नैसर्गिक न्यायाधीश तर एकच. ''भोगवतो त्याची चूक''. हा एकच न्याय आहे. त्यामूळे सर्व जग चालले आहे आणि संपूर्ण संसार भ्रांतिच्या न्यायाने चालत आहे.

एका माणसाचा खिसा कापला गेला. भ्रांतिचा न्याय काय करणार? ज्याचा खिसा कापला गेला असेल त्यास आश्वासन देण्यास बाहेर पडतात. अरे रे बिचाऱ्यावर दु:ख कोसळले असे सांगून स्वत: सुद्धा दु:खी होतो आणि चोराला शेकडो शिव्या देतो. परंतु नैसर्गिक न्याय काय म्हणतो माहित आहे का? ''अरे पकडा पकडा ह्याला, ज्याचा खिसा कापला गेला आहे त्यालाच. चोर आणि सावकार ह्या दोघामध्ये आता कोण भोगवतो? ज्याने भोगवले त्याची चूक''. खिसा कापणारा तर जेव्हा पकडला जाईल तेव्हा चोर म्हणून ठरेल. आता तर चोर मजेमध्ये हॉटेलमध्ये चहा, नास्ता करीत आहे. त्याची चूक तर जेव्हा तो पकडला जाईल तेव्हा भोगेल. परंतु आता कोण भोगत आहे? ज्याचा खिसा कापला गेला आहे. तो म्हणून नैसर्गिक न्याय सांगतो की चूक ह्याची. पूर्वी त्याने चूक केली त्याचे फळ आज मिळाले आणि म्हणून तो लुटला गेला आणि म्हणूनच तो आज भोगत आहे.

नैसर्गिक न्यायालया (Natural Court) मध्ये जो कायदा (Law) चालू आहे तो नैसर्गिक कायदा अर्थात् Natural Law. तोच आम्ही आज अतिशय स्पष्टपणे सांगत आहोत की भोगेल त्याची चूक.

स्वत:च्या चुकीमूळे मार खात आहे. ज्यांनी दगड मारला, त्याची चूक नाही. ज्यास लागला त्याची चुक! तुमच्या आजु-बाजुला लहान मुलाच्या वाटेल तेवढ्या चुका असतील तर तुम्हास त्याची झळ लागणार नाही. म्हणजे समजावे की तुमची चूक नाही आणि तुम्हास झळ लागली तर ती तुमचीच चूक आहे असे नक्की समजून घ्या.

ज्याच्या जास्त दोष असतो तोच ह्या जगात मार खातो (दु:खी होतो). मार

कोण खातो ते बघावे. जो मार खातो तोच दोषी आहे.

जो कडू प्रसंग भोगवतो तोच कर्ता, आणि कर्ता म्हणजेच विकल्प.

ह्या तुम्ही स्वतः केलेल्या मशिनरीमध्ये दाते (gear wheel) असलेले पत्र्याचे चाक आहे आणि त्यामध्ये जर तुमचे स्वतःचे बोट सापडले आणि तुम्ही यंत्राला लाख वेळा सांगितले की, मशीन तयार करणारा मी आहे आणि माझे बोट सापडले आहे तर मग ते दाते (gear wheel) असलेले यंत्राचे चाक बोट सोडेल काय? अर्थात नाही. उलट तुम्हाला ते समजावते की ह्यात माझा काय दोष आहे? म्हणुनच तू भोगवलेस म्हणुन तुझी चूक. बाहेर चालणारे यंत्र असेच आहे. हे जर दाते असलेले यंत्र नसते तर सबंध मुंबई शहरात कोणत्याही पत्नीने तिच्या पतीस किंवा कोणत्याही पतीने त्याच्या पत्नीस दुःख दिले नसते. स्वतःचे घर तर सर्वानी सुखात ठेवले असते. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. ही मुलेबाळे, नवरा– बायको सर्वच यंत्रे आहेत दाते असलेली यंत्रे आहेत. नैसर्गिक न्याय तर, जो गुन्हेगार असेल त्यालाच शिक्षा करतो. घरामध्ये सात माणसे झोपलेली असली तरी जो गुन्हेगार असतो त्यालाच साप चावतो ह्याचे नाव व्यवस्थित.

''भोगवतो त्याची चूक'' ह्या न्यायामध्ये तर बाहेरच्या न्यायाधिशाचे कामच नाही. ह्यांना कशाकरिता बोलवावयाचे? बाहेरचे न्यायाधिश तर लवाद म्हटला जातो आणि लवाद काय? येऊन पहिल्यांदा चहा, नास्ता मांगितला आणि नंतर हळुच थांबून नवराबायकोस सांगतिल कीं, तुम्ही दोघेजण अक्कलशून्य आहात म्हणून अशी चूक केलीत. लवाद स्वतःच्या अक्कल हुशारीवर पांघरुण टाकेल आणि दुसऱ्याची अक्कल उघडी करेल.

ह्या नैसर्गिक न्यायामध्ये तर कोणी न्यायाधिशच नाही. आपण स्वतःच न्यायाधिश, आपणच वकील आणि आपणच फिर्यादी. मग स्वतःला आवडेला असा न्याय करतील. स्वतः तर सतत चुका करतील. परंतु न्याय तर कोणाकडे मागावयाचा? ज्ञानी पुरुषाकडे, ज्याना स्वतःच्या देहाबद्दल सुद्धा पक्षपात असत नाही. हा स्वतःच न्यायाधिश, स्वतःच गुन्हेगार आणि स्वतःच वकील. तर तो न्याय कोणत्या बाजूने देणार? स्वतःच्या बाजूनेच. अशा रीतीने जीव बंधन करून घेतो. आंतून न्यायाधिश बोलतो की तुमची चूक झाली आहे. तर परत आतलाच वकील वकीली करून सांगतो की, ह्यामध्ये माझा काय दोष आहे? अशा तऱ्हेने स्वतःचे बंधनात येतो. स्वतःच्या आत्महिताकरीता समजून घेतले पाहिजे की, कोणाच्या दोषाने बंधन आहे. ''भोगवतो त्याची चूक'' त्याचाच दोष असणार. व्यवहारात हा अन्याय आहे असे वाटेल, परंतु

भगवानचा न्याय तर असेच सांगतो की ''भोगवेल त्याची चूक.'' ह्या ''दादांनी'' ज्ञानामध्ये जसे आहे तसे बघितले आहे की, ''भोगवतो त्याचीच चूक'' आहे.

''भोगवतो त्याची चूक'' एवढे नीट समजले तरी मोक्षास जाण्यासारखे आहे. हे जे दुसऱ्यांच्या चुका काढतात ते तर सर्वच खोटे आहे. स्वत:च्या चुकीमूळे निमित्त मिळते. हे तर, उलट जिवंत निमित्त मिळते, आणि त्याच्याच नावानी बोंब ठोकतात. रस्त्यावर एखादा कांटा सापडला असेल त्यावरून हजारो माणसे जातात परंतु कोणालाही त्रास होत नाही. परंतु लल्लुभाई त्यावरून जाताना नेमका जर काटा त्याला टोचला तर त्याच्या पायास जखम होईल. ''व्यवस्थित'' तर कसे आहे? ज्याला काटा टोचावयाचा असेल त्यालाच टोचतो. ह्यात निमित्ताचा काय दोष?

जर कोणी माणसाने औषध शिंपडून खोकला उत्पन्न केला तर त्यामूळे मोठी मारामारी होईल. परंतु मिरच्या फोडणीस टाकून जर खोकला आला तर भांडण तंटा होतो का? हे तर निमित्ताला उगीचच शिव्या देतात. परंतु जर सत्य परिस्थिती जाणून घेतली की करणारा कोण आणि कारण काय आहे तर मग भानगड राहील का?

चिकट मातीत बूट घालून फिरला आणि घसरला तर त्यात दोष कोणाचा? अरे तुझाच, जर बूट घातल्याशिवाय फिरला असतास तर बोटे भिजली असती पण घसरला नसतास. ह्यात दोष कोणाचा? मातीचा, बूटाचा का तुझा?

समोरच्या माणसाच्या तोंडावर जर आठ्या पडल्या तर ती चूक तुमची, तेव्हां त्याच्या ''शुद्धात्म्यास'' आठवून त्याच्या नावाची सारखी माफी मागत राहिलात तर ऋणानुबंधातून सुटता येईल.

जो दु:ख भोगवतो त्याची चूक आणि सुख भोगले ते त्याचे बक्षिस. भ्रांतिचा कायदा निमित्तास पकडतो. भगवानचा कायदा सत्य कायदा जसाचा तसाच आहे. तो कायदा, ज्याची चूक असेल त्यालाच पकडतो. हा कायदा जसाचा तसाच आहे. आणि त्याच्यामध्ये कोणीही फेरफार करु शकत नाही. जगात असा कोणताच कायदा नाही की जो कोणास सारखे भोगावयास लावील. सरकार सुद्धा असा कायदा करू शकत नाही. हे तर भोगेल त्याची चूक. भोगण्यावरुन हिशोब केला जातो की किती चुका होत्या !

घरामध्ये दहा माणसे असली त्यामधील दोघाना घर कसे चालते त्याचा विचार सुद्धा येत नाही. दुसऱ्या दोघांना घरामध्ये मदत करावी असा विचार येतो आणि ते दोघेजण मदत करतात. आणि एक तर सबंध दिवस घर कशारितीने चालवावे त्याच्याच काळजीत असतो. आणि दोघेजण नुसते झोपलेले असतात तर चुक कोणाची? अरे

भोगेल त्याची भूल, चिंता करीत राहील त्याचीच. जे आरामामध्ये झोपलेले आहेत त्याची भूल नसते.

सासु सुनेवर चिडते तरी सून सुखात असते आणि सासूलाच जर भोगावयास लागले तर चूक सासुचीच. मोठ्या जावेने खुरापात काढली आणि भोगवणे प्राप्त झाले आणि खुरापात न काढता ती आपल्या पाठीस लागली तर ते मागच्या जन्माचे देणे असे समजावे. म्हणून तुम्ही परत चूक करु नका नाहीतर परत भोगणे प्राप्त होईल. म्हणून सुटावयाचे असेल तर जेथे जेथे संघर्ष होईल ते जमा करुन घ्या म्हणजे हिशोब चुकता होईल. केव्हा केव्हा दुसऱ्या माणसाच्या भेटीगाठी पडतात ते हिशोबात असतात म्हणून पडतात. सर्व काही होते ते हिशोबाने होते. जेवढे म्हणून तुम्ही दुसऱ्यास दिले असेल तितकेच तुम्हास ते परत मिळेल तेव्हा तुम्ही जमा करुन घ्या आणि खूष व्हा. आता हे हिशोबाचे पुस्तक पुरे होण्याची पाळी आली आहे आणि जर तुम्ही चुका केल्या तर पुन्हा भोगण्याची पाळी येईल.

हे सर्व जग आपल्या मालकीचे आहे. आपण स्वतः ब्रह्मांडाचे मालक आहोत. परंतु आपण चुकामूळे बांधले गेलेले आहोत. लोकांनी आपल्याला बांधलेले नाही. चुका सुधारल्या म्हणजे मुक्त. अगदी खरे म्हटले म्हणजे आपण मुक्तच आहोत परंतु चुकीमूळे बंधन आहे.

जेथे आम्ही शुद्ध न्यायपूर्ण रस्ता दाखवित आहोत तेथे न्याय अन्यायाची वाटणी करावयाची शिल्लक राहीली का? हा अत्यंत गहन विषय आहे. आम्ही सगळ्या शास्त्रांचे सार सांगत आहो. हे तर नैसर्गिक जजमेन्ट (निर्णय) कसा दिला जातो ते मी तुला सांगत आहे- 'भोगवेल त्याची चूक'.

## ( १११ )
## निजदोष दर्शन

देवळांत जातो आणि देवासमोर हात जोडून म्हणतो.

हे करुणाधीन परमात्मा "मी अनंत दोषास पात्र आहे"

आणि पुन्हा म्हणतो की "मी माझे दोष पाहू शकत नाही". तर तो तरून जाण्याचा उपाय काय?

तेव्हा अशांना विचारावे की हे भक्ता, आता तुझ्यात किती दोष राहिले आहेत?

तेव्हा उत्तरात तो काय सांगतो कीं "बस दोन तीनच दोष राहिले आहेत! थोडा

क्रोध, थोडा लोभ एवढेच राहिले आहेत. बस आता दुसरे कोणतेही दोष राहीलेच नाहीत".

वारे शहाण्या आताच गावत होतास की मी तर अनंत दोषास पात्र आहे, करुणाधीन आहे.

तेव्हा तो म्हणतो, "हे गीत गाण्यासाठी असे म्हणावे लागते. परंतु दोष तर नाहीतच".

अरे रे तू भगवानला सुद्धा फसविण्याची सुरुवात केलीस. भगवान काय म्हणतात माहीत आहे का? ज्याच्यामध्ये दोनच दोष असतात तो तीन तासात मोक्षास जाऊ शकतो. मोठमोठ्या महाराजाना, आचार्यना कोणी विचारले कीं तुमच्यामध्ये किती दोष आहेत तर ते उत्तर देतात– दोन, तीन दोष असतील. एवढे दोष असले तर तीनच तासात मोक्षास जाता येते. ह्यांचे तर पुष्कळ दोष आहेत म्हणून येथे पडून राहिले आहेत. आणि जर त्याना विचारले कीं दुसऱ्याचे दोष दाखवा तर मग ते हजारानी वर्णन करावयास लागतील. परंतु त्यांना स्वतःचा एक सुद्धा दोष दिसणार नाही. प्रत्येकास दुसऱ्याचे दोषच पाहता येतात. आत्मा प्राप्त झाल्या नंतरच स्वतःचे दोष दिसावयास लागतात आणि निष्पक्षपातीपणा उत्पन्न होतो. जर स्वतःचे दोष बघता आले तर मग केव्हाच मोक्षास पोहोचला गेला असता, आणि ज्ञानीपुरुषा इतक्या ऊंच पायरीवर पोहोचला असता.

ह्यामध्ये कोणाचाही दोष नाही. हा काळच तसा आहे. संयोगाप्रमाणे सगळे होत आहे. त्यात त्याचा काय गुन्हा!

जितके दोष दिसले तितके ते निरोप घेतात (नाहीसे होतात.) ज्ञानीपुरुषांची कृपा झाली म्हणजे दोष दिसावयास लागतील. स्वतः अनंत दोषांना पात्र असे जेव्हा त्यास कळते तेव्हा तो दोष शोधू लागतो. नंतर त्यास दोष दिसावयास लागतात. जर दोष दिसले नाहीत तर त्यास प्रमाद म्हटले जाते. आणि अनंत दोष आहेत असे जेव्हा जाणतो तेव्हा त्याला आपोआप दोष दिसावयास लागतात. परंतु हा तर बहिरा आणि घरात चोर शिरला तर काय होणार? मग भांड्याचा जरी आवाज झाला तरी ऐकू येईल का?

जितके दोष दिसतात तितके ते निरोप घ्यावयास लागतात. जे चिकट दोष असतील ते दोन दिवस, तीन दिवस पांच दिवस, महिना किंवा वर्ष. पण जेव्हा दिसतील तेव्हा निघून जातात. अरे धावावयास लागतील. घरात जर चोर शिरला असेल तर तो कोठपर्यंत बसून राहील. मालकास माहीत नाही तो पर्यंतच. मालकास जर माहीत झाले

की ताबडतोबच तो चोर धावावयास लागतो.

कोणाचेही दोष पाहू नयेत. बघावयाचे असतील तर ते स्वतःचे दोष बघा. हे तर दुसऱ्याच्या चुका बघितल्या, तर डोके कसे गरम होते. ह्याच्या उलट जर दुसऱ्याचे गुण बघितले तर डोके कसे शांत होते.

समोरच्या माणसाची चुक बघू नये. आपल्या चुका सुधारुन घेतल्या पाहिजेत, हिशोबा शिवाय कोणी उलट बोलत नाही.

तुमची एक जरी चुक तुम्हास सापडली तरी भगवानांने त्यास मनुष्य म्हटले आहे. चुकामूळे घोर जंगलात भटकत असताना थांबला आणि जर त्यास चूक सापडली तर तो मनुष्य आहे. अशी चुक शोधणाऱ्याला भगवानने अतिमानव म्हटले आहे.

ह्या जगात सर्वच सापडेल, परंतु स्वतःची चूक सापडणार नाही. म्हणूनच स्वतःच्या चुका दाखविण्याकरिता ज्ञानाची जरुर आहे. ज्ञानी पुरुषच असा सर्व सत्ताधारी आहे, कीं जो तुम्हास तुमची चूक दाखवून त्याची आठवण करून देतो आणि तेव्हाच ती चुक जाते. हे केव्हा होणार? जेव्हा ज्ञानीपुरुषाची भेट होईल आणि तुम्हास निष्पक्षपाती करणार तेव्हा.

तुम्ही पण जेव्हा निष्पक्षपाती होता तेव्हाच काम सफळ होते. जो पर्यंत स्वरूपाचे भान ज्ञानीपुरुष करुन देत नाही तोपर्यंत निष्पक्षपातीपण उत्पन्न होत नाही. ''ज्ञान'' कोणाचीही चूक काढत नाही. बुद्धि सर्वाची चूक काढते. सख्या भावाची चूक काढते.

प्रश्नः- दादा व्यवहारामध्ये मोठा लहानाची चुक काढतो, लहान त्याच्यापेक्षा लहानाची चुक काढतो हे कसे काय?

दादाः- हे तर असेच आहे. मोठा लहानास दम देतो आणि त्याची चूक काढतो. त्यापेक्षा आपण सांगावे कीं माझीच चूक आहे. चूक जर कबूल केली तर त्याचा निकाल लागतो. आम्ही काय करतो ? दुसरा जर सहन करू शकत नाही तर आम्ही आमच्याच डोक्यावर घेतो. आम्ही दुसऱ्याची चुक काढत नाही. ते दुसऱ्यास कशाकरिता द्यावयाचे, आमचे सागरासारखे पोट आहे बघाना. ह्या मुंबईच्या सर्व गटारांचे पाणी सागरामध्येच राहते ना? त्या प्रमाणे आपण सगळचा चूका पिऊन टाकाव्या. त्यामूळे काय होईल, की ह्या मुलावर, दुसऱ्या सर्वावर प्रभाव पडेल. हे पण शिकतील. मुले सुद्धा समजतील की ह्यांचे समुद्राएवढे पोट आहे! जितके येईल तेवढे जमा करुन घ्या. व्यवहारात नियम आहे की अपमान करणारा स्वतःची शक्ति देऊन जातो म्हणून हसत मुखाने अपमान जमा करा.

एक डोळा हाताने दाबला गेला तर चंद्र दोन दिसतात ना? त्यामध्ये चूक कोणाची? असे जगातील लोकांचे आहे. मिनिटा मिनिटाने, वेळोवेळी चुका करतात, दुसऱ्याकरिता वेळ काढतो, स्वत:करिता एक सुद्धा क्षण काढत नाही. हे सर्व 'पर-समय'आणि स्वत:ला ओळखल्यानंतर 'स्व-समय'.

लोकांची दृष्टी दूषित झाली आहे. म्हणून ते दुसऱ्याचे दोष बघतात आणि स्वत:चे बघत नाहीत. आपण तर स्वत:ची दृष्टीच प्रथम निर्दोषी करुन टाकावयाची. निर्दोषी झाले आणि निर्दोषी बघितले. तुम्हास जर कोणी दूषित दिसले नाही तर तुम्ही सुटलात.

लोक स्वत:च्या चुकीमूळे बांधले गेले आहेत. फोजदारी चुक केली असेल तर फोजदारीने बांधलेला आहे. काही माणसे स्वत:ची एकसुद्धा चुक बघू शकत नाहीत.

हे कर्म, कर्म म्हणून ओरडतात. परंतु कर्म काय आहे त्याचे त्याना भानच नाही. स्वत:चे कर्म म्हणजे स्वत:चे दोष. आत्मा निर्दोषी आहे. परंतु निजदोषानी तो बांधलेला आहे. जितके दोष दिसतील तितकी मुक्ती अनुभवास येईल. काही दोष तर लाख लाख पट असतात. म्हणून लाख लाख वेळा बघितले म्हणजे ते दूर होतात. दोष तर मन, वचन, काया ह्यामध्ये भरलेलेच आहेत.

ह्या मन, वचन कायेचा दोष तर क्षणा क्षणास दिसला पाहिजे. ह्या दूषम काळात (कलियुगात) शरीर आहे म्हणजे दोष असलेच पाहिजेत. जितके दोष दिसतील तितका प्रकाश वाढतो. ह्या काळात हे अक्रम ज्ञान तर अजब तऱ्हेचे प्राप्त झाले आहे! तुम्ही मात्र जागृत राहून भरलेल्या मालास रिकामा करावयाचे आहे (साफ करुन राहावयाचे आहे).

निरंतर जागृती असली पाहिजे. दिवसा सुद्धा जर आत्मा कोथळ्यात पुरून ठेवला तर कसे होईल? दोष बघता बघता त्याला धुऊन निघाले तर पुढे वाट सरळ होते. नाहीतर आज्ञेमध्ये राहाण्याने लाभ तर आहेच, त्यामूळे आत्मा निरंतर स्वच्छ राहातो. जागृतीकरिता सत्संग आणि पुरुषार्थ पाहिजे. सत्संगामध्ये रहाण्याकरिता पहिल्यांदा आज्ञेमध्ये राहिले पाहिजे.

नाटक पाहिल्यानंतर आपल्यावर परिणाम झाला नाही तर समजावे की हा नाटकी अवतार झाला. नाटक पहाताना पुष्कळ भांडणे होतात परंतु त्यांचा आपल्यावर परिणाम होता नये.

हिशोबाशिवाय कोणी उलटे बोलणार नाही आणि सुलटे बोलणार नाही. खऱ्या

वस्तुवर अभिप्राय दिला म्हणजे ताबडतोब वाईट वाटते. सत्संगामध्ये निरनिराळ्या तऱ्हेचा कचरा बाहेर निघतो. खऱ्या मनुष्याचा दोष बघितला तर कचरा चिटकतो. स्वत:चे दोष पाहिले तर कचरा निघून जातो. आळशी माणसास दुसऱ्याच्या चुका जास्त दिसतात.

## ( ११२ )

## चुका

आंधळ्या चुका आणि अंधारात दडलेल्या चुका दिसत नाहीत. जशी जशी जागृती होते तसा तसा चुका दिसावयास लागतात. स्थूल चूका जर सुधारल्या तर डोळ्याचे तेज बदलेल. भाव शुद्ध ठेवावा. काळोखात एकत्र केलेल्या चुका काळोखात कशा काय दिसणार? चुका जशा जशा बाहेर पडतील तशी तशी वाणीपण अशी निघेल की एकणारा सुद्धा चकित होईल.

स्थूल चुका तर समोरासमोर आदळल्या की बंद होतात. परंतु सूक्ष्म चुका तर एवढ्या असतात, की त्या जशा जशा बाहेर पडतात तसा तसा त्या माणसाचा सुगंध पसरतो.

आंधळ्या चुकापेक्षा आणि आंधळ्या गोष्टीपेक्षा कडक माणसाच्या उजेडातल्या चुका बऱ्या, मग त्या पुष्कळ असल्या तरी हरकत नाही.

जेव्हा न आवडणारी स्थिती येते, कोणी मारतो, किंवा दगड फेकतो त्यावेळेस चुका दिसावयास लागतात.

माझ्यामध्ये एकसुद्धा चूक नाही असे कधीही बोलता कामा नये. केवळज्ञान झाल्या नंतरच चुका राहात नाहीत.

ह्या चुका तर आंधळ्या चुका. ज्ञानीपुरुष प्रकाश फेकतो तेव्हा दिसतात त्यापेक्षा उजेडातल्या चुका बऱ्या. दूसऱ्याची चुक असली तर ती दिसते.

पुरुषार्थ कसला करावयाचा? पुरुष झाल्यानंतर शुद्धात्म्याचे लक्ष बसल्यावर पुरुषार्थ आणि स्वपराक्रम होतो.

नुसत्या चुकाचे भांडार आत भरले आहे. अंतरा अंतरानी दोष दिसावयास लागतिल तेव्हां काम झाले असे समजावे. हा सर्व माल तुम्ही भरुन आणलात. तो कोणाला न विचारता आणलेला आहे.

शुद्धात्म्याचे लक्ष बसले म्हणजे चुका दिसावयात लागतात आणि जर न दिसल्या तर त्याला नुसता प्रमाद म्हणावयाचा.

ज्ञान खऱ्या कसोटीच्या वेळी हजर होते. कानाला इजा होत असेल आणि जर त्याजेळी ज्ञान हजर राहिले तर ते खरे ज्ञान म्हणावयाचे. नाही तर सर्व ढोंग आहे.

ज्ञानी पुरुष तर एकच तास झोपतो. निरंतर जागृतच रहातो. खाणे कमी झाले असले झोप कमी झाली असली तेव्हा जागृति वाढते, नाहीतर प्रमाद चर्या रहाते. झोप पुष्कळ येणे हा प्रमाद. हा तर आत्म्याला गाठोड्यात बांधल्यासारखा आहे.

चूक म्हणजे काय? त्याची स्वत:लाच शुद्ध नाही. स्वपराक्रमाने चुका सुधारतात.

जेव्हा झोप कमी होते, खाणे कमी होते तेव्हा समजावे को प्रमाद कमी झाला. चुका संपल्यानंतर त्याच्या तोंडावर तेज येते. सुंदर वाणी बाहेर पडते. लोक त्याच्या मागे फिरतात (सान्निध्यात रहातात).

जोरदार (storng) परमाणूच्या चुका असतील तर त्या ताबडतोब दिसतात. पुष्कळ कडक असतात. ज्या बाजूने शिरतात त्या बाजूतच मग्न होतात. संसारामध्ये बसला तर त्यातच गुरफटला जातो आणि ज्ञानात बसला तर त्यामध्ये गुंगुन जातो.

आत्म्याचा शुद्ध उपयोग म्हणजे काय? त्याला एकटा ठेवता कामा नये. पंधरा मिनिटे झोपावयाचे असेल तर पतंगाची दोरी आंगठ्याला गुंडाळून डुलकी घ्यावा. त्याप्रमाणे आत्म्याच्या बाबतीत जरा सुद्धा जागृत न राहीले तर चालणार नाही.

अनंत चुका आहेत. चुकामूळे झोप येते. नाही तर झोप कशाची ?

झोप येणे हे तर वैरीपणाचे लक्षण समजावे. त्याला प्रमाद चर्या असे म्हणता येईल. शुभ उपयोगात सुद्धा प्रमादाला अशुभ उपयोग म्हणतात.

सगळ्या चुका नाहीशा करण्याकरीता एक तर यज्ञ करणे (ज्ञानी आणि महात्म्यांची सेवा करणे) किंवा स्वपुरुषार्थ करावा लागेल. नाही तर तुम्ही नुसते दर्शन करुन आलात तर भक्तीचे फळ मिळेल परंतु ज्ञानाचे फळ मिळणार नाही.

स्वत:ची एकही चूक नाही असे जर समजून बसलात तर मग चुका केव्हा आणि कशा दिसणार? त्यानंतर निरंतर झोपेतच राहील. आपले ऋषिमुनी झोपत नव्हते. फार जागृत राहात असत.

स्वत:ची चुक स्वत:ला झोंबली त्यास आम्ही विजेची (electric) चुक म्हणतो आणि आंधळ्या चुका म्हणजे स्वत:च्या चुका स्वत:ला झोंबत नाहीत. जी चुक झोंबते ती ताबडतोब दिसते. परंतु जी झोंबत नाही ती समजण्यात येत नाही.

प्रश्न:- विजेच्या (electric) चुका म्हणजे काय?

दादा:- ह्या सर्व स्पष्ट चुका. त्रास देऊन निघून जातात. ह्यामूळे नेहमी जागृत

राहू शकतो. ते फार उत्तम म्हटले पाहिजे. परंतु काळोखातील चुका कोणालाही दिसणारच नाहीत. त्यामध्ये तो स्वतःच प्रमादी असतो, अपराधी असतो आणि दाखविणारा सुद्धा मिळत नाही परंतु विजेच्या (electric) चुका दाखविणारा कोणीतरी भेटू शकेल. ''मला माहीत आहे की ही अंधारातील चुक तर फारच मोठी आणि पुन्हा आता काही हरकत नाही ही तर मारुनच टाकते. फक्त ज्ञानी पुरुष असे बोलु शकेल की माझ्यात एकही चूक राहिली नाही.'' जेवढ्या म्हणून चुका आहेत तेवढ्या दूरच करावयाच्या आहेत. हे कनुभाई इतक्या उच्च पदावर आहेत तरी सुद्धा ते माझ्यात काही चुका नाहीत असे कधी बोलत नाहीत.

आपण स्वतः ''शुद्धात्मा'' आणि बाहेरच्या जगात ''मला काहीच माहिती नाही'' असा भाव ठेवावयाचा मग कोठलीच हरकत येणार नाही. परंतु मला काही तरी विशेष माहीत आहे अशा रोगाच्या प्रवेश नाही झाला पाहिजे. आपण तर शुद्धात्मा, शुद्धात्म्याचा एकही दोष नसतो. परंतु तुमच्यामध्ये म्हणजे अमृतलालामध्ये जे जे दोष असतील त्याचा निकाल करावयाचा.

आपली जर दृढ इच्छा असली की ज्ञानी पुरुषाच्या आज्ञेमध्येच रहावयाचे आहे तर त्यांची निश्चित कृपा मिळू शकेल. आज्ञा पाळली म्हणजे निराळीच मस्ती येते. ज्ञानाची मस्ती तर कोणास रहाते की जो दुसऱ्याला उपदेश देतो त्यास.

आमची गोष्ट जर कोणी समजेल आणि कोणी आत स्वीकार करून देणार नाही तर समजावे की आत मोठी गाठ आहे. मोठा रोग आहे!

चुका पुष्कळ आहेत हे जर समजले तर चुका दिसावयास लागतात आणि मग चुका कमी होण्यास लागतात. आम्ही सर्वाचे दोष थोडेच बघत रहातो. एवढी आम्हास फुरसतच नाही. जर तुमची पुष्कळ पुण्याई असेल तर आम्ही तुमचे दोष दाखवू. ह्या दोषामूळे आत भयंकर रोग उत्पन्न होतात. फार पुण्याई असली तर आमच्या सिद्धीने शस्त्रक्रिया (operation) करतो व त्याचे दोष काढून टाकतो. हे डॉक्टर जे शस्त्रक्रिया करतात त्यापेक्षा लाखपट मेहनत आमच्या ऑपरेशनमध्ये असते.

ज्याला जेवढ्या चुका दिसतात तेवढ्यांचा तो वरिष्ठ. ज्याच्या सर्व चुका खलास झाल्या आहेत, त्याचा कोणीही वरिष्ठ नाही. माझा कोणीही वरिष्ठ नाही म्हणून मी सर्वाचा वरिष्ठ. वरिष्ठाचा वरिष्ठ ! हे ह्याचे कारण. आमच्यामध्ये स्थूल दोष तर नाहीत सूक्ष्म दोष सुद्धा नाहीत. सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम आहेत त्याचे आम्ही संपूर्ण ज्ञाता द्रष्टा आहोत. भगवान महावीर सुद्धा असेच करीत होते. नावाला सुद्धा चिकटपणा नसला तरच सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतम दोष दिसू लागतील.

भगवान महावीरांना केवळज्ञान झाले तोपर्यंत त्यांना दोष दिसत होते. भगवानना केवळज्ञान प्राप्त झाले तो काळ आणि स्वत:चे दोष दिसण्याचे बंद होण्याचा काळ एकच होता. शेवटचे दोष दिसण्याचे बंद होणे आणि त्यावेळी केवळज्ञान प्राप्त होणे असा नियम आहे.

प्रश्न :- दादा, लहानपणापासूनच सर्वजण माझ्याविरुद्ध होते. आता मुले सुद्धा माझ्या विरुद्ध वागत आहेत. तर आता कशा रीतिने सहन करू? ह्यात चुक कोणाची आहे.

दादा :- हा चहाचा कप तुमच्या स्वत:च्या हातून फुटला तर तुम्हास दु:ख होईल काय? स्वत: फोडला तर तुम्हास सहन करावे लागते ना? आणि जर मुलाकडून फुटला तर दु:ख, काळजी आणि जळफळाट होतो. स्वत:च्याच चुकीचा हिशोब आहे असे जर समजले तर दु:ख किंवा काळजी वाटेल काय? हे तर दुसऱ्याचे दोष काढून दु:ख आणि काळजी उभी करतात आणि नवी चिंता उत्पन्न करुन रात्रंदिवस मनात जळफळतो आणि त्या वर स्वत:स असे वाटते की मला पुष्कळ सहन करावे लागत आहे.

स्वरुपाचे ज्ञान, असे आहे की जसा परिणाम होतो तसे काहीच सहन करावे लागत नाही. ज्ञाता ज्ञेयाच्या संबंधामूळे सहन करण्याची पाळी येत नाही. दुसऱ्या बरोबर तंटा झाला हा तुझाच दोष आहे. आपल्या दोषानी आपण बांधलेले आहोत. स्वत:च्या दोषांतूनच सुटावयाचे आहे. हा तर संयोग संबंध आहे. हिशोबाशिवाय कोणीही भेटतच नाही. सर्व स्वत:च्या दोषांनी बांधले गेलेले आहेत. स्वत:चे दोष पाहूनच मुक्त होण्यासारखे आहे. आम्ही आमचे दोष पहात राहीलो आणि त्यातुन सुटलो. स्वत:चे दोष समजू लागले म्हणजे तो मुक्त होतो.

स्वत:च्या हातांतून पांचशे रूपये हरवले तर तो सहन करू शकतो. त्याप्रमाणे स्वत:च्या चुका आपल्यास समजल्या तर सहन करण्याची शक्ति आपोआप येते. जेव्हा हे समजते की दोष माझा होता म्हणजे लवकर सुटू शकतो नाहीतर बंधनात जास्त पडतो.

लोक सहन शक्ति वाढविण्यास सांगतात. परंतु ती कोठपर्यंत रहाते? ज्ञानाची दोरी तर थेटपर्यंत पोहोचते. सहन शक्तिची दोरी कोठपर्यंत पोहोचते? सहनशक्ति मर्यादित आहे. ज्ञान अमर्यादित आहे. आमच्या ज्ञानाचे असे आहे की थोडेसे सुद्धा सहन करावयाची पाळी येणार नाही. सहन करावयाचे हे तर लोखंडाला डोळ्यानी पाहून वितळविण्याची शक्ति पाहिजे. परंतु ह्या ज्ञानामूळे किंचित् मात्र सहन केल्याशिवाय परमानंदासहित मुक्ति मिळते. परत समजू लागते की हा तर हिशोब पुरा होत आहे म्हणून

मुक्त होतो.

निजदोष-दृष्टी म्हणजे सकळ चढलेला. एकदाच सरळ चालला तर त्याचे संसाराचे दुकान रिकामे होत जाते. सरळ वागणारा नेहमी स्वत:चे दोष बघतो. परंतु उलट चालणारा म्हणजे स्वत:ची भांडी खरकटी टाकून दुसऱ्याची भांडी घासावयास (स्वच्छ करण्यास) जातो.

जग कशाने बांधलेले आहे ते आम्ही ज्ञानाने स्वत: पाहिले आहे. निजदोषांनीच ते बांधले गेले आहे.

शेवटी दृष्टी कशी पाहिजे? सर्व प्राणिमात्र निर्दोष दिसले की काम झाले असे समजावे. माणसामध्येच नाही परंतु हे झाड वाकडे आहे असे सुद्धा बोलता कामा नये. हे अनंत अवतार बोलत आला आहेस.

आमचा दोन आज्ञा जो पालन करील त्याचे संपूर्ण कल्याण होईल असे आहे.

(१) मन हे निरनिराळ्या गाठीने तयार झाले आहे. मनास परके असे म्हटले आहे. मनास वश करण्यासाठी बहादुरी करावयास गेला तर मन सुद्धा समोर भांडावयास येईल. आपण मनाला ग्रंथी म्हणून म्हटले तर ग्रंथीने तयार झालेले बाकी काय राहिले.

(२) दुसरी आज्ञा ''भोगवेल त्याची चूक''.

## ( ११३ )
## वाकडे वागणे- स्वच्छंदता

आपल्यामध्ये स्वच्छंद नावाचा असा एक दोष आहे की तो आपणास संसारा मधून सुटून देत नाही. अनंत काळाची जमा-उधार म्हणजे चंदुभाईची चोपडी. अरे अनादिकालापासून तू एवढेच कमवलेस? आठ प्रकारच्या कर्माच्या कमाईमध्ये अनंत ज्ञानातला एक थेंब सुद्धा उत्पन्न झाला नाही. अनंत दर्शनामधून किंवा अनंत सुखामधून एक बिंदू सुद्धा उत्पन्न झाला नाही. हे जे सुख तू मानतोस ते आरोपित आहे. खरे सुख नाही. कल्पना केलेला मोक्ष चालणार नाही. यथार्थ मोक्ष पाहिजे. आपला वरिष्ठ जगामध्ये कोणीच नाही. असे मुक्तिचे सुख प्राप्त झाले म्हणजे यथार्थ मोक्ष झाला असे म्हणावयाचे.

स्वच्छंद म्हणजे स्वत: होऊन औषध तयार करून घेणे. स्वत:च रोगाचे निदान करुन घेणे. स्वत:च औषध तयार करणे. आणि स्वत:च औषध लिहून (Prescribe) देणे. अरे मोक्ष मार्गाचे औषध सुद्धा तू स्वत:च तयार केलेस? आणि ते परत विष

झाले! म्हणूनच वाखाणणी केली तर आनंद होतो. आणि निंदा केली तर द्वेष उत्पन्न होतो.

धर्मामध्ये, जपामध्ये, तपामध्ये, आणि शास्त्र समजावून घेण्यात स्वच्छंदता चालत नाही. साधन केले आणि ते जर स्वछंदाने केले तर चालणार नाही. स्वत:च्या कल्पनेने काहीच करू नका. हा तर स्वत:च गुन्हेगार, स्वत:च वकील आणि स्वत:च न्यायाधीश अशा तऱ्हेने चालत आहे. स्वच्छंद म्हणजे स्वत:च्या बुद्धिची कल्पना, मरावयाचे असेल तर स्वछंदाच्या पाठिमागे लागा.

स्वत:च्या मनातले करणे म्हणजे तो स्वच्छंद. स्वच्छंद थांबू शकला तरच काम होईल. स्वत:च्या शहाणपणाने धर्म आणि ध्यान केले तर काहीच हाती लागणार नाही. स्वत:च्या बुद्धिने स्वैरपणाने वागले तर अनंत अवतार संसाराचे बंधन राहील. त्यापेक्षा ह्या स्टेशनावर न आलास तर चांगला. जिकडे होतास तिकडे बसून जा नाही तर ह्या धर्माच्या स्टेशनावर आल्यानंतर जर स्वच्छंद केलास आणि तुझ्या स्वत:च्या बुद्धिने चाललास तर अनंतानंत संसारामध्ये रखडशील.

स्वच्छंद गेला तर स्वत:चे कल्याण स्वत:च करू शकशील. परंतु स्वच्छंद स्वत: काढावयास गेला तर तो निघणार नाही. स्वच्छंद स्वत: ओळखला पाहिजे. तू जे काही करतोस तो स्वछंदच आहे. कृपाळु देवाने (श्रीमद् राजचंद्राने) सांगितले होते की, ''सजीवन मूर्तीच्या लक्ष्याशिवाय जे काही करण्यात येते ते जीवास बंधनकारक आहे, असे आमचे हृदय आहे''. जे काही करतोस ते बंधन आहे, हाच स्वच्छंद आहे. व्याख्यानास गेलास किंवा साधु बनला, तप, त्याग केले, शास्त्र वाचले हे सर्वच स्वच्छंद आहेत. तू जी जी क्रिया करतोस ती ज्ञानी पुरुषास विचारुन केली नाही तर ती स्वच्छंद क्रिया म्हटली जाईल. त्यामूळे तर बंधनात पडला जाशील.

मी वालजीभाई आहे, हाच स्वच्छंद आहे. तो गेल्यानंतर तप, त्याग, किंवा शास्त्राची जरूर नाही. स्वच्छंद चालू ठेवला तर कधीही पत्ता लागणार नाही. स्वच्छंद सुटला तर एक तासांत मोक्ष मिळेल.

स्वच्छंद म्हणजे आंधळा छंद. मी नटुभाई हाच स्वछंद. ह्या स्वछंदामूळे तर अनंत अवतारपर्यंत भटकणे चालू राहील. स्वच्छंद जर गेला तर काम होणार.

हे जग स्वत:च्या बुद्धिने चालण्यासारखे आहे. स्वत:पेक्षा पाच अंश हुशार मनुष्य शोधून काढला पाहिजे. तो सुद्धा जोपर्यंत ज्ञानीपुरुष भेटत नाही तोपर्यंत दुसरे काही शोधू नकोस. फक्त एका सत्पुरुषास शोधून काढ, त्याच्या चरणकमळावर सर्व भाव अर्पण करून वाग. नंतर जर मोक्ष मिळाला नाही तर माझ्याकडे ये असे श्रीमद् म्हणत असत.

आता तर धर्मसुद्धा स्वच्छंदता ने चालतो. कित्येक वर्षापासून अमुक मूर्तीची तुम्ही आराधना करता आणि एकदम जर लल्लुभाई म्हणून हाक मारली तर ताबडतोबच कान लावून ऐकताना? आणि नंतर लल्लुभाई लबाड आहेत असे जर म्हटले तर ताबडतोब द्वेष सुरु होतो. एवढी थोरली गुरुची आराधना केली आणि प्रीति व द्वेष तर गेले नाहीत हे काय कामाचे? परंतु तुमची आराधना जर मोक्षाकरिताच असेल तर केव्हा तरी ज्ञानीपुरुषाची भेट होईल.

स्वच्छंद जरा सुद्धा चालणार नाही. न कळत अग्निमध्ये हात घातला तर हात भाजतो किंवा नाही? न कळत केल्याचे फळ मिळतेच म्हणून पहिल्यांदा हे जाणून घेतले पाहिजे की तू स्वतः कोण आहेस आणि हे सर्व काय आहे?

स्वच्छंद नावाचा दोष जातो. मग नंतर दादांच्या छंदात बसतो स्वच्छंद गेला मग तो स्वरूपात येतो. ज्याचे स्वच्छंद कमी असतील तो मनुष्य कसा दिसतो? जसा वळवावा तसा वळतो. तसा flexible- लवचीक असतो. अशाना मोक्ष-मार्ग मिळून जातो. स्वछंदी तसा वागत नाही.

स्वच्छंद म्हणजे बुद्धिभ्रम. ह्या जगात कोणी दोषी नाही. स्वच्छंद हाच तुझा मोठ्यांतील मोठा दोष आहे.

भगवाननी मोक्षाच्या मार्गास जाण्याकरिता सुंदर पद्धतिचे मिश्रण तयार केले होते. ते सर्वाकरिता होते. त्यानी ह्या मिश्रणाचा सिद्धांत दिला होता. आज हा सिद्धांत नष्ट झाला आहे. कोणाकडेही राहिला नाही. आज आम्ही तुम्हाला तोच सिद्धांत परत देत आहोत.

ह्या मिश्रणामध्ये वीस टक्के ''शास्त्राचे'', सत्तर टक्के ''ज्ञानीचा परम विनय'' आणि दहा टक्के ''संसारी भावना'' ठेव आणि मग पिऊन टाक. परंतु लोकानी तर शास्त्रच पी, पी प्यायले म्हणून पोट दुखु लागले. भगवाननी सांगितले होते की, हे औषध दिवसातून तीन वेळा हलवून पी. तर कित्येक उनाड लोक दिवसातून तीन वेळ हलवतच राहिले आणि कित्येकांनी तर ''हलवून प्यावे, हलवून प्यावे'' असे गाणे गातच राहिले.

हे कोणासारखे आहे? डॉक्टरच्या पुस्तकावरून वाचून स्वतः मिश्रण तयार करून प्यावे तसे आहे. तेथे तो मिश्रण स्वतः तयार करीत नाही. मरणाचे भय वाटते. मरणाकरिता, डॉक्टरांना विचारल्याशिवाय औषध तयार करित नाही आणि अनंत अवताराचे मरण बिघडविण्याकरिता भगवान महावीराच्या वीतरागाचे शास्त्र स्वतः मिश्रण तयार प्यायला, ते तर विष झाले आहे. भगवानने ह्यालाच स्वच्छंद म्हटले आहे,

आंधळा छंद म्हटले आहे.

मोक्षाची गल्ली अतिशय अरुंद आहे. त्यामध्ये जर तू वाकडा चालावयास गेलास तर अडकशील. त्याच्यामध्ये तर सरळ चालावे लागेल तरच मोक्षापर्यंत पोहोचशील. साप सुद्धा बिळात जाताना नीट सरळ जातो.

वाकडे चालण्यानेच हा संसार बंधनकारक झाला आहे. आणि वाकडेपणानेच मोक्ष अडकला गेला आहे. भगवाननी साधु होण्यापूर्वीच सरळ होण्यास सांगितले आहे. कसेही साधुपण प्राप्त झाले असेल, परंतु जर वाकडेपणा गेला नसेल तर काय कामाचे? वाकडेपणा हा तर भयंकर विकृत अहंकार आहे. हा वाकडेपणा तर असा आहे की जेव्हा सत्य (real) समोरून भेटण्यास आले असताना त्याची भेट घडवून देत नाही.

बायकामुलाचे आणि स्वत:चे जेवढे जतन केले नाहीस, त्यापेक्षा अधिकपट ह्या वाकडेपणाचे तू जतन केले आहेस. अनंत अवतार वाकडेपणामूळेच भटक-भटक करीत आहेस. वाकडेपणा अंध बनवितो. सरळ खरा मार्ग सुचू देत नाही. वाकडेपणा स्वच्छंदी बनवितो. आणि स्वच्छंद हे तर प्रत्यक्ष विषाचे स्वरुप आहे.

व्यवहारामध्ये जर कोणी वाकडेपणानी वागत असेल तर त्याला कोणीही विचारत नाही. आणि जर वाकडेपणा कमी असेल तर त्याला सर्वजण विचारतात. मग तो लोकामध्ये वंदनीय होतो.

केवळज्ञानाच्या प्राप्तीपर्यंत हा वाकडेपणा असतो. वाकडेपणाच्या समुद्राला पार करावयाचा आहे. आपण वाकडेपणाच्या ह्या किनाऱ्यावर आहोत आणि आपणास जावयाचे आहे पलिकडल्या किनाऱ्यावर. ह्या जगात वाकडे चालणाऱ्या मनुष्याबरोबर जर वाकडा चाललास तर त्याचा शेवट येणार नाही, सरळच चालावयास पाहिजे. सापसुद्धा बिळात जाताना वाकडा तिकडा जात नाही. सरळ होऊन बिळात जातो. जर मोक्षास जावयाचे असेल तर सरळ व्हावयास पाहिजे. ग्रंथी काढून अबुध व्हावयास पाहिजे.

जशे जशे स्वत:च्या कल्पनेतून, स्वबुद्धितून शास्त्रे वाचतोस तसे तसे वाकडेपणा वाढत जातो. त्यामूळे उलट आवरण वाढते. अरे जर वाचून थोडासा प्रकाश प्राप्त होत असेल तर अद्याप ठोकर का खातोस? ठेचा ह्या नेहमी अंधारामध्ये लागतात. उजेडात कोठून लागणार? जर तू काही जाणले आहेस तर तुझी एक तरी काळजी कमी झाली आहे का? उलट हे खरे का ते खरे ते तुला समजत नाही व गोंधळून जातोस. जास्त शंकेखोर होतोस आणि जेथे शंका तेथे अज्ञान. जर शंका उत्पन्न झाली तर आत्मा ओळखता येणार नाही. जे संपूर्ण नि:शंक बनविते त्याचे नांव ज्ञान.

**दादांची ज्ञान गोष्ठी**

ज्याच्यात परमाणु हालत नाही, त्याचे नाव ज्ञान. शंका ही तर आत्म्याची शत्रू आहे. शंका आत्म्याला फेकून द्यावयास लावते. आत्मा विसरला जातो, म्हणून जेथे शंका आली तेथे तिला तर मुळापासून उपटून टाकली पाहिजे. आत्मा प्राप्त झाल्यानंतर, आत्म्यामध्ये स्थिर झाल्यानंतर अशी कोणती वस्तु आहे की ती त्याला हलवू शकेल? जगात असे कोणते तत्व आहे की, जे ''तुमचे स्वत:चे'' हिरावून घेते. शंकेचा किडा हा तर भयंकर रोग आहे. आपणास कळणार सुद्धा नाही की शंका केव्हां आली आणि किती नुकसान केले. एका अवताराची आम्ही खात्री देतो. ''व्यवस्थितच्या'' नियमामध्ये काहीच फरक होणार नाही. मग शंका करण्याचे कारण काय? अरे ठावठिकाणा नसलेले जग की ज्या घरापासून निघाला आणि तेथे परत आलो तर खरे, अशा जगामध्ये कोठे शंका करावी आणि कोठे करू नये? आणि आता जे घडत आहे ते काय पूर्वी घडले नव्हते? हे काय नवीन आहे? ह्याची फिल्म तर आधीच तयार झाली आहे ना? मग ह्यात शंका कसली? कोणत्याही गोष्टीबद्दल शंका करण्यासारखे नाही. तेथे हे लोक मोक्षाची शंका करतात! वीतरागाची शंका करतात! धर्माच्या बाबतीत शंका करतात! अरे जर शंका केली तर कोठल्या कोठे फेकला जाशील!

अनंत अवताराचा देहाध्यास जर सुटला तरच आत्मा प्राप्त होईल. देहात्म बुद्धि आत्मा प्राप्त होऊ देत नाही, उलटच दाखविते, कारण देहात्मबुद्धि संसाराचेच रक्षण करते आणि संसारामध्येच भटकविते. ही देहात्मबुद्धि तर स्वत:च्याच स्वरूपाचे सतत अहितच करीत असते. कधी सुद्धा सरळ सुचू देत नाही. उलटेच दाखविते. एक वेळ सरळ मार्गावर आल्यानंतर समजणे शक्य आहे. सरळ मार्गावर येणे म्हणजे समकित होणे. उलटे चालणे म्हणजे देहात्म बुद्धिमध्ये राहाणे आणि आत्म्यामध्ये आत्मबुद्धि होणे त्याचे नाव समकित! आत्म्यामध्ये आत्मस्वरुप अर्थात आत्मस्वरुप होणे त्याचे नाव ज्ञान

देहात्मबुद्धिस fracture करून आत्म-बुद्धि उत्पन्न होते. तेव्हाच मुक्तानंद प्रगट होतो! देहात्म बुद्धिच देहाध्यास करविते.

## ( ११४ )
## मताग्रह

कित्येकजण लोकमतातच राहिले आहेत. कित्येक लोक पक्षात पडले आहेत. हे पक्षाची पाया मजबूत करीत आहेत. फुकट मतांध झाले आहेत. अरे मोक्षास जावयाचे आहे की, मत आणि पक्षामध्ये पडून राहावयाचे आहे? मोक्ष आणि पक्ष ह्या दोन्ही विरुद्ध दिशा आहेत. पक्षाच्या बाहेर जाशील तेव्हाच मोक्ष मार्ग मिळेल. जेथे निष्पक्षपातीपणा तेथेच भगवान तेथेच मोक्ष!

मतांध कधीही ''सत्य वस्तु''ला प्राप्त करू शकत नाही. कारण तो स्वतःच्याच मताचा आग्रह धरतो म्हणून तो दुसऱ्याचे सत्य कशा प्रकारे स्विकारेल? आणि हा आग्रह करीत आहे तो permanent- शाश्वत वस्तुचा किंवा temporary- तात्पुरत्या वस्तुचा? अरे पाहिजे तर permanent- शाश्वत वस्तु म्हणजे आत्मा परंतु आग्रह करतो तो temporary- तात्पुरत्या वस्तुचा! तर मग आत्मा कोठून प्राप्त होईल? सर्व रीतिने संपूर्ण, निराग्रही होऊन फक्त एकच आत्मा जाणण्याचा आग्रह करु, तरच तो प्राप्त होईल. सर्व इच्छा बाजुला ठेवून 'सत्य'लाच जाणण्याच्या मार्गात असशील तरच परमसत्य प्राप्त होईल.

## ( ११५ )
## दृष्टिराग

मतांधापेक्षाही दृष्टिराग हा भयंकर रोग आहे. तो अनंत अवतारापर्यंत निघणार नाही. जोपर्यंत एकसारखेपणा होणार नाही तोपर्यंत अंधश्रद्धा रहातेच. मिथ्यात्व असते त्याला अंधश्रद्धा असते. भगवानला तर अंधश्रद्धेची जितकी हरकत नाही तितका दृष्टिरागीचा आहे असे म्हटले आहे. दृष्टिरागी म्हणजे काय? ३६० डिग्री असतात. म्हणजे ३६० डिग्रीचे view point- दृष्टिकोण आहेत. आणि प्रत्येक दृष्टित अनंत दृष्टि आहेत. ह्यातल्या कोणत्याही दृष्टिकोणावर जर संपूर्ण राग उत्पन्न झाला तर तो दृष्टिराग म्हणावयाचा. तो दृष्टिराग कधीही जात नाही. अनंत अवताराच्या भटकण्यानंतर जेव्हां ज्ञानीपुरुष भेटतो तेव्हा त्याचा दृष्टिरागरूपी रोग upset होतो.

दृष्टिरागी माणसाच्या आत्म्यावर आवरण आलेले असते. संसाराची प्रीती आणि द्वेष एकवेळ निघून जाईल परंतु दृष्टिराग जाणार नाही. ह्याला काहीएक इलाज नाही. ह्या अवतारांत आणि अनंत अवतारात सुद्धा राग जाणार नाही.

दृष्टिरागाची लक्षणे कोणती? वीतरागाचे एकपण लक्षण नाही ते.

ज्याला दृष्टिराग असेल त्याला आमची भाषा समजणार नाही. बाकी कसाही न शिकलेला असेल तरी सुद्धा त्याला आमची भाषा समजेल.

दृष्टिराग तर रागाचा राग आहे. त्याला तर मुळातूनच काढून टाकले पाहिजे तरच सत्य समजेल.

## ( ११६ )
## वैरभाव

प्रश्न:- जर साप चावण्यास आला तर आपण त्यास मारावयाचा नाही कां?

दादा:- परंतु आपणच बाजूला व्हावे ना. जर गाडी समोरून येत असेल तर काय करता? तसेच बाजूला व्हावयाचे.

साप तर पंचेद्रिय जीव आहे. त्याला जर मारला तर तो वैर ठेवतो. त्याच्या लक्षात येते की मला काही अपराध नसताना मारले. परत तो पुढील जन्मांत आपल्यालाच मारील.

वैरामूळे सर्वजग उत्पन्न झाले आहे ना? अरे, ह्या मुंग्याना सुद्धा असे वाटते की, जर माझ्यामध्ये शक्ति असती तर तुम्हाला सुद्धा त्रास दिला असता. हे ढेकूण सुद्धा जर दिवा लावला तर घाबरतात आणि पळून जातात. त्याना भीती वाटते की, मला मारून टाकतील आणि असेही वाटते की हे तर माझे खाणे आहे. ते आम्ही खातो तेव्हा हे मला का मारतात? रक्त पितात ते सुद्धा त्यांच्या ऋणानुबंधनामूळे. बंधन दोन प्रकारचे असते. एक तर वैरभावाचे आणि दुसरे प्रेमभावाचे. प्रेमभावामध्ये पूज्यभाव असतो. स्नेह हे तर चिकट स्वभावाचे आहे. ते सुकून जाते परंतु वैर जात नाही. दिवसेदिवस वाढत जाते.

## ( ११७ )
## संसारसागराच्या लहरी

संसारसागर तर परमाणुंचा समुद्र आहे. त्याच्यामध्ये सूक्ष्म स्पंदन निर्माण होतात. तेथे लाटा निर्माण होतात आणि त्या लाटा परत दुसऱ्यावर आदळतात. त्यामूळे दुसऱ्यामध्ये सुद्धा लाटा उत्पन्न होतात आणि नंतर वादळ सुरु होते! हे सर्व परमाणुमूळेच निर्माण होते. जर आत्मा त्यामध्ये तन्मयाकार झाला तर जोरामध्ये स्पंदन सुरु होते.

हे जग सुद्धा समुद्राप्रमाणेच आहे. एक जरी स्पंदन निर्माण झाले तर समोर किती स्पंदने उसळतात. सर्व जग प्रतिध्वनिनेच तयार झाले आहे सर्वच जातीचे, सर्व प्रतिध्वनि खरे आहेत आणि अजूनसुद्धा प्रतिध्वनि ऐकू येतात.

विहिर असली आणि त्यामध्ये तू जर तोंड आत घालून जोराने ओरडलास की 'तू चोर आहेस' ती वावेतून समोरून काय उत्तर मिळणार? 'तू चोर आहेस.' तू ओरडलास की, 'तू राजा आहेस' तर वावेतून सुद्धा आवाज निघेल की, 'तू राजा आहेस'

आणि 'तू महाराज आहेस' असे ओरडलास तर वावेतून समोरून 'तू महाराज आहेस' असा प्रतिध्वनि निघेल. तसे हे जग विहिर प्रमाणे आहे. तू जसा आवाज करशील त्याप्रमाणे समोरून जबाब मिळेल. Action and reaction are equal and opposite- क्रिया आणि प्रतिक्रिया ह्या बरोबर आणि विरुद्ध असतात. असा नियम आहे. म्हणून तुला जसे योग्य वाटेल तसा आवाज कर. जर समोरच्यास चोर बोललास तर तु सुद्धा चोर आहेस असे ऐकावे लागेल आणि राजा आहेस असे समोरच्यास बोललास तर राजा आहेस असे तुला ऐकावे लागेल. आम्ही तर तुला परिणाम दाखविले, परंतु स्पंदन टाकणेही तुझ्या हातातील गोष्ट आहे. म्हणून तुला जसा योग्य वाटेल तशी ध्वनि काढ.

जर आपण दगड टाकला नाही तर लहरी उपन्न होणार नाहीत आणि समोरच्या माणसात सुद्धा लहरी निर्माण होणार नाहीत आणि आपल्यावर त्यापासून काहीच परिणाम होणार नाही. परंतु काय होते? सर्व माणसे लहरी निर्माण करतात. कोणी लहान तर कोणी मोठ्या लहरी निर्माण करतात. कोणी लहान खडे टाकतात किंवा कोणी मोठे दगड टाकतात आणि शिवाय स्पंदनाबरोबर अज्ञान असते म्हणून पुष्कळ फसवणूक होते. ज्ञान असले आणि पुन्हा स्पंदन झाले तर काही हरकत नाही. भगवानांनी सांगितले आहे की स्पंदने तयार करू नकोस. परंतु मनुष्य तर स्पंदन निर्माण केल्याशिवाय राहातच नाही ना! शरीराच्या लहरी तयार केल्यातरी हरकत नाही. परंतु वाचेच्या आणि मनाच्या लहरीस हरकत आहे. म्हणून जर तुला सुखाने रहावयाचे असेल तर सर्व थांबव. जेथे जेथे ढेकळे टाकली तेथे तेथे लहरी तयार होणारच. लहरी पुष्कळ निर्माण झाल्या की नर्क भोगण्यासच जावे लागेल आणि ते भोगून हलका होऊन परत येशील. हलक्या लहरी एकत्र केल्या असशील तर तू देवगति भोगून येशील. समुद्र नडत नाही तर आपण टाकलेल्या ढेवळाच्या लहरी आपणास नडतात. जर समुद्राच्या बाजूला लक्ष दिले नाही तर तो शांत आहे. आणि जेथे जेथे धांधल केली तेथे त्या समुद्राच्या लहरी नडतात.

भगवानांनी काय सांगितले कीं एकवेळ तू स्वत: स्वत:चा झाला नाहीस, लहरीतच सर्व वेळ घालवितोस. तो पण लाटा उसळवितो आणि आपण सुद्धा लाटा उसळवितो म्हणून बुडू शकत नाही. आणि पोहु शकत नाही !

देहाच्या सूक्ष्म लहरी बंधनकारक नाहीत परंतु वाचा आणि मनाच्या लहरी बंधनकारक आहेत. म्हणून भगवाननी त्यास समरंभ (सुरवात करणे), समारंभ आणि आरंभ ह्याच्या लहरी सांगितल्या आहेत. मनामध्ये पहिली लहर आली त्यास भगवाननी समरंभ (सुरवात करणारे) असे म्हटले आहे. उदाहरणार्थ चर्चगेटला जाण्याचा पहिला विचार सुरवातीस मनात आला म्हणजे समरंभ. नंतर तेथे जाण्याची व्यवस्था केली आणि निर्णय घेतला की आपणास चर्चगेटला जावयाचे आहे ते बी पेरले त्यास समारंभ असे

म्हटले आहे. नंतर जेव्हा संपूर्णपणे तो चर्चगेटला जाण्यास निघाला त्या लहरीच्या लाटात सापडला त्यास आरंभ असे म्हटले आहे. आता हे कोडे कसे उकलणार?

मनात इच्छा आली तर पहा. त्यागी लोकांची इच्छा कठोर असते. वीतरागास तर लाख इच्छा झाली तरी त्याच्या मनात लहरी निर्माण होत नाहीत. रिकाम्या मनात लहरी तयार करुच नका. त्यास काय तोफेच्या गोळ्यावर चढावयाचे आहे? हे तर नाश होऊन जाणार, मग तो हिऱ्या खोका असेल किंवा मोत्याची असेल, त्याच्यामध्ये लहरी उभ्या करुन काय होणार?

स्वत: स्वत:च्या मनामध्ये फसलेला आहे. त्यामध्ये लग्न केले तर निश्चेतन चेतनमध्ये फसला, ते सुद्धा परके. जर वडिलांच्या बरोबर लहरी तयार होतात तर पत्नी बरोबर का होणार नाहीत? पत्नी ही तर मिश्रचेतन आहे. म्हणून तेथे काय करावे? लहरी बंद कराव्यात. वडिलाबरोबर वर खाली लहरी चालू ठेवशील तर चालेल. परंतु बायको बरोबर तयार करण्यासारखे नाही. त्यामध्ये काय फायदा? परंतु जगामध्ये लहरी निर्माण झाल्याशिवाय राहणारच नाही ना !

जिभेचा प्रकार काय आहे ? हा पूर्व जन्माचा अहंकार आहे. ह्या अहंकारामूळे जीभ वाटेल ते बोलते आणि त्यामध्ये लहरीची तक्रार सुरु होते. हल्ली तर जे दु:ख आहे ते मुख्यत्वेकरुन जिभेच्या आणि वाणीच्या लहरीचे आहे.

ह्या कलियुगामध्ये तर चांगली कर्मे करण्याचे नशिबात नाही. आणि खोट्या कर्माचे वाटेकरी होतो! ज्ञान मिळाल्यानंतर महात्म्यांना खोट्या कर्मामध्ये खोटे होत आहे ते ज्ञानामूळे तर आवडत आही. म्हणजे कार्य खोटे किंवा खरे असले तरी सुद्धा ते निकाली बाबत होत आहे. आणि तेवढ्यापुरतेच स्पंदन होते. आणि ते शांत होणार आहे. परंतु ज्याच्यावर हा अन्याय होत आहे तसे सुद्धा गूढात्मदशेत होत नाही. म्हणून तर क्रिया म्हणजे कार्याच्या लहरी आणि अज्ञानामूळे नवे तयार होणाऱ्या प्रतिक्रियेच्या भावनांच्या लहरी अशा दुप्पट लहरी होतात. अज्ञान आहे म्हणून लहरी केव्हां तयार होतील ते सांगता येणार नाही. मग ते काहीही असो, संसारी असो किंवा त्यागी असो. कारण की जेथे अज्ञान आहे तेथे भय आणि संताप असतो आणि जेथे संताप असतो तेथे लहरी अवश्य निर्माण होणार. ही चिमणी आरशासमोर येऊन बसते तर आरसा ह्यात काय करणार? आरसा तर आहे तसाच आहे. परंतु हुबेहुब दुसरी चिमणी आरशात दिसते. तिच्यासारखेच डोळे, तशीच चोच, तशीच बघते आणि त्यामूळे त्या चिमणीची धारणा बदलते आणि स्वत:सारखी दुसरी चिमणी आहे असे ती समजते. त्यामूळे आरशातील चिमणीला चोच मार मार मारते (टोचत रहाते) असे हे सर्व आहे. सूक्ष्म

लहरीनी जग निर्माण झाले आहे. अशा मान्यतेत थोडा फरक झाला कीं तसेच दिसते. जशी कल्पना करतो तसेच होते. आरसा तर अजब आहे! हे तर असे आहे कीं लोक पूर्ण दिवस आरशात स्वत:चे तोंड बघ बघ बघत असतात, केस विंचरतात, स्नो-पावडर लावतात, म्हणून हे आरसे सुद्धा स्वस्त झाले आहेत. नाही तर आरसा ही अलौकिक वस्तु आहे. कशी आहे देहाची करामत ! ही चिमणी आरशासमोर बघते तेव्हां तिचे ज्ञान बदलत नाही. परंतु तिची धारणा बदलते की त्या आरशात चिमणी आहे म्हणून ती चोचीने टोचते तसेच हे जग आहे. एक लहर उसळली त्यामूळे समोर किती लहरी उसळतात. ज्ञान बदलत नाही परंतु धारणा बदलते. धारणा क्षणाक्षणाला बदलते. जर ज्ञान बदलत असते तर मग आत्माच रहाणार नाही. कारण आत्मा आणि ज्ञान हे काही दोन्ही एक दुसऱ्यापासून निराळी वस्तु नाही. आत्म्याचे स्वरुपच ज्ञान स्वरुप आहे. ज्याप्रमाणे वस्तु आणि गुण बरोबरच राहातात आणि निराळे होत नाहीत तसे ! हे तर असे आहे की जशी धारणा (belief) करु तसे होते.

## ( ११८ )
## क्लेश

''क्लेशाच्या वातावरणात ज्याला जरा सुद्धा त्रास होत नाही त्याचे नाव मोक्ष''.

त्रासाचे वातावरण तर असणारच. हे ऊन पडते ना? हे दरवाजे हवेमूळे फडाफड आवाज करतात ना? असे तर होतच रहाणार. दरवाजे आपटत असतील तर जरासे दूर उभे रहा. हे जर त्रासाचे वातावरण नसेल तर मुक्ती कशी चाखणार? ''दादांचा'' मोक्ष असा आहे कीं सर्व ठिकाणी जरी क्लेशाचे वातावरण असले तरीसुद्धा मुक्ती मिळते.

भगवानने कोणत्याही गोष्टीला बंधन म्हटले नाही. खातो, पितो, ही प्रकृतिआहे. परंतु आत्म्याचा क्लेश दूर झाला हीच मुक्ती, हाच मोक्ष. बाकी खिचडी असो किंवा कढी असो. ह्यामध्ये कोणतेही पुढे मागे होणार नाही.

केव्हाही वाटेल तसे वातावरण असले तरी सुद्धा कोणताही क्लेश जर झाला नाही तर म्हणावयाचे की तू सर्व शास्त्रे शिकलास. बाहेर तर कोणतेही वातावरण असले आणि त्यामूळे उलटी होण्यासारखे वाटले आणि उलटीला दाबण्याचा प्रयत्न केला आणि बरे आहे असे करण्याचा प्रयत्न केला तर आज क्लेश होतो. तरी सुद्धा भडका होत नाही तर समजावे की शास्त्रे शिकलास. गुरुशिष्यानासुद्धा क्लेश होतो. ज्ञानी पुरुष मिळाल्यानंतर तर कसल्याही कष्टाच्या वातावरणात सुद्धा आतमध्ये कष्ट होणार नाही ना?

**दादांची ज्ञान गोष्टी**

ह्या ''दादांनी'' महात्म्यांना कसे ज्ञान दिले आहे? कधीही क्लेश होणार नाही, आणि वैराग्यसुख राहते. क्लेश संपला त्याचेच नाव मुक्ती. येथेच मुक्ति झाली.

क्लेशात तर काय असते! जीव तडफडतच राहतो. विझवला तरी विझत नाही. शांतपणा येत नाही. अरे जीव हा जाळण्याची वस्तु नाही! कपडा जळत असेल तर जळु दे, परंतु दु:खी होऊ नकोस. त्रास करुन घेऊ नकोस. हा तर रात्रंदिवस त्रास करीत राहील. थोडा वेळ मोहाच्या जागेत बुडून जाईल. मोहात पडेल. आणि परत मग क्लेशामूळे दु:खी होतो. त्रास होतो. सर्व जग त्रासातच बुडून गेले आहे. आज तर सर्व 'त्रासलेलेच' आहेत. हे तर मूर्च्छेने विसरुन जात आहेत. बाकी त्रास सुटणार नाही. आणि त्रास संपला तर मुक्ती.

हल्ली तर सगळीकडे क्लेशाच्या लाटा पसरल्या आहेत. खाण्याच्यावेळी सुद्धा त्रास आणि जर ह्याच्यापेक्षा जास्त त्रास झाला तर ढेकुण मारण्याचे औषध आणतात. आज तर सहन झाले नाही तर मग ढेकूण मारण्याचे औषध पिऊन टाकतात. तर काय त्यामूळे शेवट होतो? हे तर पुढे ढकलले ते कपट करुन परत भोगावे लागेल. त्यापेक्षा काही करुनही वेळ काढ. ही तर नुसती चुकीची समजूत आहे.

हे दु:ख कोठून आले? दु:खी माणसाचा आश्रय घेतला म्हणून. सुखी माणसाचा आश्रय घेतला असता तर दु:ख झालेच नसते. दादा तर संपूर्ण सुखी मनुष्य. तर मग त्यांचा आश्रय घेतल्यानंतर काहीच नडणार नाहीच.

जितके निरनिराळ्या स्वभावाचे आहेत अशा लोकांचा दु:खी माणसे आश्रय घेतात. तर मग ते दु:खीच होणार ना? जो मनुष्य स्वत: दु:खी असतो तो स्वत:चे दु:ख दूर करु शकत नाही तर तो दुसऱ्याचे दु:ख दूर कसे करणार?

जे पूर्ण स्वरूप आहेत, अनंत सुखाचे घर आहेत, ज्यांना कोणत्याही तऱ्हेचा मोह नाही, इच्छा नाही अशा पुरुषाकडे तुम्ही जाऊन त्यांचा जर आश्रय घेतलात तर मग तुम्ही पूर्ण मुक्तच होणार.

हा त्रास वाढतो त्यास भांडण म्हणतात. त्या भांडखोर माणसाबरोबर लोक मैत्री कशी ठेवणार? हे तर आंबट ताक त्याला गोड करण्यासारखे आहे. ते स्वत: आंबट आहे. त्याच्यापासून दूर राहिलास तर उत्तम. किंवा जर तो ज्ञानी असला तर बरे. ज्ञानी असेल तर त्याला माहीत असते की अशी रेकॉर्ड तर सर्व बाजूने वाजते. आतमध्ये आत्मा तर स्वच्छ आहे ना? परंतु तुरुंगात अडकला आहे, तर मग कसे होणार? ही त्रासाची फसवणूक तर कशी? जर घरातील सर्व माणसे एकाच वस्तुवर तुटून पडली तर मग घरातच युद्ध होणार. जर भाऊबंधानी सांगितले असेल की घरी जेवावयास या

तर तो बिचारा सांगतो की बाबा, नाही, माझेकडून येणे होणार नाही, मी येणार नाही. येथे घरी परत क्लेश होणार. त्या बिचाऱ्यास शांतपणी झोपावयास मिळणार नाही. क्षणाक्षणास क्लेश. ते सुद्धा निश्चितच भोगावयास लागणार कसा कर्माचा उदय! ते परत स्वत:चेच कर्म! हे तर वेदनामधून मुक्त होता येणार नाही असे हे जग आहे.

एक इसम माझ्याकडे आला होता. तो मला सांगू लागला, 'दादा' मी लग्न केले खरे, परंतु मला माझी बायको आवडत नाही.

दादा :- कां बाबा, न आवडण्याचे कारण काय?

भाई :- ती जरा पायानी लंगडी आहे.

दादा:- तर तुझ्या बायकोस तु आवडतोस किंवा नाही?

भाई:- मी तर तिला आवडणार असाच आहे ना! रुपवान आहे, शिकलेला आहे, कमावता आहे आणि माझ्यामध्ये काहीच खोड नाही.

दादा:- तर मग त्यात चुक तुझीच. ती अशी की, तुला लंगडी बायको मिळाली आणि तिने किती उत्तम पुण्य केले की तिला तू असा देखणा मिळालास.

अरे, हे स्वत: केलेलेच स्वत:च्या समोर येते. त्यामध्ये दुसऱ्याचा काय दोष? तुझी चूक भोगून घे आणि परत नवी चूक नकोस. तो मनुष्य समजला आणि त्याचे दु:खी जीवन सुधारले.

मुक्तीचे सर्वात श्रेष्ठ अंग हे की क्लेश दूर करणे. क्लेश दूर करणे हे मोठ्यातील मोठे सुख आहे. भले ज्ञान नसले परंतु घरामध्ये धर्म, कर्म आहे हे कोठपर्यंत म्हणतात? तर घरामध्ये कोणत्याही परिस्थितीचे वातावरण सहन करतो आणि वादविवादाने क्लेशाला प्रश्रय देत नाही. ह्यालाच खानदानी म्हटले आहे. तो पर्यंत परमेश्वराचे वास्तव्य राहील. जर घरामध्ये क्लेश झाला तर सर्वच खलास होते. परमेश्वराचे वास्तव्य तर राहणारच नाही आणि लक्ष्मीजी सुद्धा निघुन जाईल.

धर्माप्रमाणे वागणारे घर असेल तर त्या घरातील माणसे भांडण होऊ देणार नाहीत. आणि जर कदाचित झालेच तर घराचे दरवाजे बंद करतात आणि. घरातल्या घरात भांडण संपवतात. आणि परत भांडण नाही ह्याची खबरदारी घेतात.

संपूर्ण प्रामाणिकपणा म्हणजे दुसऱ्याकडून घेण्यापूर्वी त्यास परत द्यावयाची भावना ठेवणे आणि लक्ष्मीचे कायदे पाळले तरच लक्ष्मीजी प्रसन्न रहाते. जर लक्ष्मीजीचा कायदा पाळला नाही आणि तिची नुसतीच पूजा केली तर ती कशी खूष होणार?

भगवान म्हणतात की हा संसार कोठपर्यंत तर जोपर्यंत क्लेशवाशी मन आहे

तोपर्यंत. मन क्लेशरहित झाले तर मुक्ती. मग मन जेथे जाईल तेथे समाधान असते.

हा लहान बाबा येथे आमची वाणी ऐकतो तर त्याला सुद्धा शांत वाटते. हा सुद्धा थंड पाण्याला थंड आणि उकळत्या पाण्याला उकळते समजतो. घरी जेव्हा भांडण होते तेव्हा बघतो आणि ऐकून घेतो की वडिलानी आईला असे सांगितले आणि आईने वडिलाना असे सांगितले, ती अक्कल त्याला असते. तो विचार करतो की अमक्याचा अपराध वाटतो, परंतु मी लहान आहे म्हणून माझे चालणार नाही. परंतु मी मोठा होईन तेव्हा त्याना समजून सांगेन मुलगा तर क्लेश असलेले डोळे ओळखतो आणि थंड डोळे सुद्धा समजतो. क्लेश होतात तो वेळ जसा तसा निघून जातो. परंतु त्या काळात अनंत अवताराचे कर्म बांधून घेतो. अनंत अवतारापासून क्लेशाचे बीज भरलेले असते ती सामग्री मिळताच क्लेश सुरु होतात. ज्ञानी, पुरुष ज्याचे क्लेशाचे बीज भरलेले असते त्याला जाळून टाकतात. त्यानंतर क्लेश होणार नाही.

भगवान श्रीमद् राजचंद्र सांगतात की ज्याच्या घरी एक दिवस क्लेशाशिवाय जाईल त्यांना आमचा नमस्कार असो.

## ( ११९ )
## खरे सुख-दु:ख काय आहे?

दु:ख कशाला म्हणावयाचे? ज्ञानीच्या भाषेत दु:ख तर नाहीच. लोकांच्या भाषेत दु:ख आहे, ज्ञानीच्या भाषेत दु:ख कधीही येत नाही. आणि लोकांच्या भाषेत तर, ह्यांचे गेले तरी दु:ख आणि त्यांचे गेले तरी दु:ख, तेथे कधीही सुख नसते.

दु:ख तर कोणास म्हणतात? खावयास गेला आणि खाण्यास मिळाले नाही व पोटात आग होते ते दु:ख तहान लागली असेल आणि पिण्यास पाणी मिळत नाही ते दु:ख. नाक दाबले तर पांचच मिनिटामध्ये घुटन (suffocation) होते ते दु:ख. बाहेरुन कितीही ताण (tension) आला तरी चालेल, परंतु भूक, तहान, आणि हवा यांच्याशिवाय चालत नाही. कारण बाकी सर्व ताण (tension) तर वाटेल तेवढा आला तरी सहन होईल. त्यामूळे मनुष्य काही मरून जाणार नाही.

प्रश्न:- एकास सुख मिळते आणि दुसऱ्यास दु:ख होते ते कसे?

दादा:- सुख, दु:ख कल्पित आहे. ज्यानी कल्पना केली की हे चांगले आहे तर सुख वाटेल. दुसऱ्याला काय आवडते? ह्याप्रमाणे केले म्हणजे पुण्य मिळते. बुद्धिचा हेतू बदलत असतो परंतु भरणाच्यावेळी जो हेतु असेल त्या प्रमाणे परिणाम भोगावे लागतात.

हे परिवर्तन evolution आहे. पहिल्या माईलाचे ज्ञान दुसऱ्या माईलावर उत्क्रांतीत होते. त्याला उत्क्रांतीवाद म्हणतात. मागील जन्मात चोरीची इच्छा झाली असेल परंतु ह्या अवतारात असे ज्ञान होईल की हे खोटे आहे. ते त्याच्या मनामध्ये रहात असते की हे खोटे आहे परंतु चोरी तर पूर्वीच्या जन्मामध्ये adjust झालेली असते म्हणून चोरी होतच असते. Adjustment झालेली गोष्ट अर्धवट रहातच नाही. पुरी होतेच त्याशिवाय तो मरत नाही. आम्ही काय सांगतो की जर तुझा हेतू चुकीचा आहे तो बदल. चोरी करावयाची नाही असे परत नक्की कर. जितका वेळ चोरी करण्याचा विचार येईल तितका वेळ तिला तू मुळापासून काढून टाक तरच तुझे काम होईल. सर्व नीट होईल.

संसारातील लोकांना व्यवहार धर्म शिकविताना आम्ही सांगतो की परानुग्रही हो. स्वतःच्या जातीबद्दल विचारच येणार नाही. लोककल्याणाकरिता परानुग्रही हो. जर तू तुझा देह स्वतः करिता खर्च करशील तर ते सर्व संसारामध्ये जाईल. फुकट जाईल आणि दुसऱ्याकरिता जर उपयोगी पडलास तर ते तुला पुढील जन्मात उपयोगी पडेल.

शुद्धात्मा भगवान काय सांगतो की जो दुसऱ्याचा सांभाळ करतो त्यास मी सांभाळतो. आणि जो स्वतःचेच सांभळतो त्याचे मी त्याच्यावर सोपवतो.

## ( १२० )
## दोषदृष्टी

प्रश्नः- दुसऱ्या माणसाचे दोष दिसतात ते दोष स्वतःमध्ये दिसतात का?

दादाः- नाही, असा काही कायदा नाही. तरी सुद्धा असे दोष असतील. ही बुद्धि काय करते? स्वतःचे दोष झाकून ठेवतो आणि दुसऱ्याचे दोष काढत असते. हे तर वाकड्या माणसाचे काम. ज्याची चुक निघून गेली असेल तो दुसऱ्याच्या चुका बघत नाही. दुसऱ्याची चुक बघणे ही वाईट सवय नसते. सहज निर्दोषीच बघतो. ज्ञान असे असते की ते दुसऱ्याची सहज रीतीने सुद्धा चुक पहात नाही.

दोष तर सर्वाची गटार (नाळे) आहेत. ही बाहेरची गटारे आपण उघडत नाही. ह्या लहान बाबाला सुद्धा हा अनुभव असणार. हे स्वयंपाकघर तयार केले आहे यास गटार असणारच, परंतु त्या गटाराला आपण उघडावयाचे नसते. तर मग कोणामध्ये अमुक दोष असतील, कोणी चिडत असेल, कोणी क्रोध करीत असेल तर ते फक्त बघावे. ते गटार उघडे आहे असे म्हणतात. त्यापेक्षा गुण बघणे सर्वात उत्तम. गटार तर आपली स्वतःचीच बघण्याजोगी आहेत. पाणी भरले असेल तर स्वतःचे गटार साफ

करावे. हे गटार तर एकसारखे भरतच असते. परंतु समजत नाही आणि समजेल तरी काय? त्यामूळे तर हे सर्व रोग तयार झाले आहेत. शास्त्र वाचून एकसारखे गात रहातो की 'कोणाची निंदा करू नका' परंतु निंदा तर चालूच असते.

कोणाला जर उलट बोलले की तितके नुकसान झालेच. ह्या बाहेरच्या गटाराची झाकणे कोणी उघडत नाहीत. परंतु लोकांच्या गटरांची झाकणे एक सारखी उघडत असतो.

कोणाची टीका करावयाची म्हणजे आपली दहा रुपयाची नोट वटवून (सुटे करुन) एक रुपया आणावयाचा त्याप्रमाणे आहे. टीका करणारा नेहमी स्वत:चेच घालवितो. ज्याच्यापासून काहीच निष्पन्न होत नाही ती मेहनत आपण करु नये. टीका करण्यामूळे तुमचीच शक्ति फुकट जाते. आपल्यास जर दिसेल की हा तीळ नाही परंतु रेतीचा खडा आहे तर मग त्यास पिळण्याची मेहनत का करावयाची? वेळ आणि शक्ति ही दोन्ही फुकट जातात हा तर टीका करुन दुसऱ्याचा मळ धुऊन काढतो आणि तुझा स्वत:चा कपडा मळका करतोस! तर मूर्खा आता केव्हा धुशील.

ह्या आमच्या 'मूआ' (मेल्या) शब्दाचे भाषांतर किंवा अर्थ काय करशील? ह्या शुद्धाचा गूढ अर्थ आहे. ह्याच्यात ठपका खरा परंतु तिरस्कार नाही. फार खोल शुद्ध आहे. आमची ग्रामीण भाषा आहे. तरी पावरफूल शक्तिशाली आहे! प्रत्येक वाक्याचा विचार करावयास लागेल असे आहे. कारण ही तर ज्ञानीची हृदयस्पर्शी वाणी आहे. साक्षात सरस्वती आहे.

## ( १२१ )
## स्मृति ( आठवण )

प्रश्न:- दादा भूतकाळ विसरुन जाता येत नाही हे काय आहे?

दादा :- भूतकाळ म्हणजे आठवण केले तर त्याची आठवण करु शकत नाही आणि विसरण्याचा प्रयत्न केला तरी विसरु शकत नाही ह्याचेच नाव भूतकाळ. जगाची इच्छा पुष्कळ असते की भूतकाळ विसरुन जावा परंतु ज्ञानाशिवाय जग विसरता येणार नाही. आठवण येते त्याचे कारण आसक्ती आणि द्वेष हे आहे. ज्याची ज्याच्यावर जितकी आसक्ती असते तितकी त्या वस्तुची आठवण होते आणि ज्या वस्तुबद्दल आपल्या मनात तिटकारा असतो तितकीच त्या वस्तुची जास्त आठवण येते. सून माहेरी गेली तरी सासुने जरी सुनेला विसरण्याचा प्रयत्न केला तरी सुद्धा तीं विसरु शकत नाही कारण द्वेष आहे, आवडत नाही. परंतु नवऱ्याची आठवण येते कारण त्याने तिला सुख

दिलेले असते म्हणून लोभ आहे. पुष्कळ दु:ख दिलेले असले किंवा पुष्कळ सु:ख दिले असले की त्याचीच आठवण येते कारण तेथे आसक्ती आणि आणि द्वेष चिकटलेला असतो. त्या चिकटलेल्यास पुसून टाकले म्हणजे विस्मृती होते. जे विचार आपोआप येतात त्यास आठवण आली असे म्हणतात. हे सर्व धुवुन गेले म्हणजे स्मृती थांबते आणि त्यानंतर मुक्तहास्य उत्पन्न होते. प्रत्येकाला निरनिराळी आठवण येते. तुला जी आठवण येईल ती दुसऱ्याला येणार नाही. कारण सर्वाचा निरनिराळ्या ठिकाणी आसक्ती, द्वेष असतो. स्मृती ही आसक्ती व द्वेषामूळे असते.

प्रश्न :- दादा, तिला काढून तर टाकावी लागेल ना?

ही स्मृती स्वत: आम्हाला सांगते की आम्हास काढ, धुऊन टाक. ही जर आठवण झाली नसती तर सर्व घोटाळे झाले असते. ही जर आली नाही तर तुम्ही काय धुणार? तुम्हास माहीत कसे होइल कीं कोठे आसक्ती व द्वेष आहे? आठवण येते ती तर आपोआप स्वत:चा निकाल होण्याकरिता येते! चिकटलेले असेल ते धुऊन काढण्याकरिता आठवण येते. जर आठवण आली आणि ती धुऊन टाकली तर धुतल्यावर तिचा विसर पडतो. आठवण एवढ्याच करीता येते की येथे काही चिटकलेले आहे. ते दूर करा, त्याचा पश्चाताप करा. आणि परत असे होणार नाही असा दृढनिश्चय करा. अशामूळे ते पुसले जाईल, विसरले जाईल. म्हणजे त्याची आठवण रहाणार नाही ज्यामूळे आपण जगात विसरतो ते यथार्थज्ञान.

## ( १२२ )
## गैरसोयीत सोय

भगवानने सांगितले होते की गैरसोयीमध्ये सोय शोधून काढ. गैरसोयी मध्येच सोय असते परंतु शोधता आली पाहिजे.

सोफा पाच वर्षाचा झाला की तो मालकिणीस गैरसोयीचा वाटतो. जुन्या प्रकारचा झाला असे वाटते. ही तर सोयीमध्ये गैरसोय उत्पन्न केली! आज काल तर मनुष्य आरामखुर्चीमध्ये बसुनसुद्धा बेचैन होतो. अरे सबंध आयुष्यामध्ये एकच वेळ बेचैन व्हावयाचे आहे. परंतु हा तर सबंध दिवस बेचैन रहातो. सबंध दिवस बाहेरच काढतो. ह्या मुंबईमध्ये भरपूर सुख आहे. परंतु हा तर सबंध एकसारखा दु:खातच रहातो. ह्याचे नांव ही ज्यामध्ये सोय असते आणि सोय केली तर गैरसोय निर्माण होते. हल्लीचा सोफा तर कसा की पाच दिवसातच त्याचे पाय तुटून जातात. ही नव्या सोफ्याच्या सोयीमध्ये अडचण उभी केली. शेजाऱ्यानी सोफा सेट घेतला म्हणून नवऱ्याबरोबर सहा महिने वादविवाद करुन त्या बाईने नवा सोफासेट उधार पैसे घेऊन आणला तो मोडला तेव्हा

तिचा जीव जळफळला. अरे असे काय जळफळायचे असते? कपडे जळला तरी हरकत नाही परंतु जीव जळला जाता कामा नये. कमी अकलेचा मनुष्यच नक्कल करतो आणि दु:खी होतो. हल्ली तर सोफासेट कोणीही विकत घेत नाही आणि आपण असे का करावे? आपण तर नक्कल नसले पाहिजे. परंतु अस्सल असले पाहिजे. घरामध्ये खोलीमध्ये अस्सल भारतीय बैठक मांडावी गाद्या व तक्के ह्याना पांढऱ्या चादरी गुंडाळाव्या म्हणजे मग कोणाचीही नक्कल करावयास लागणार नाही. आणि बसावयास सुद्धा खूप सोयीचे होईल. खरे पाहिले तर गोष्टी इतक्या पाहिजेत. खाण्याकरिता, पिण्याकरिता, पांघरण्याकरिता आणि रहाण्याकरिता. परंतु आज तर नवीन दु:खे निर्माण होत आहेत. खरोखर दु:ख तर जगामध्ये नावाला सुद्धा नाही. ही तर गैरसमजुतीने दु:खे निर्माण होतात.

शेजारी आज बोलवेल आणि उद्या बोलावणार सुद्धा नाही. ह्यामध्ये रोज बोलावण्यात काय समाधान वाटते. बोलावतो तेव्हा त्यास वाटते की ह्यास माझी फार किंमत आहे म्हणून समाधान वाटते आणि जेव्हा बोलावत नाही तेव्हा असमाधान वाटते. परंतु असे समजावे की बोलावेल तरी उत्तम आणि न बोलावेल तरी सुद्धा उत्तम.

स्वत:कडे तर भरपूर सुख पडले आहे. परंतु कशा तऱ्हेनी त्याचा उपभोग घ्यावा हे माहीत नाही. एकच तऱ्हेचे सुख, एकच जातीचा माल आहे. परंतु हे तर समाजाने विभाग पाडले. वास्तविक जाणले तेव्हां सुख मिळते. कोठपर्यंत ह्या कल्पित सुखामध्ये रहावे? परंतु करणार काय? ही कोणासारखी गोष्ट आहे ती तुम्हास सांगतो. एक वाणीया होता. त्याची दोस्ती एका मियाभाईबरोबर होती, अतिशय दोस्ती. एकदा मोहरमच्या दिवशी वाणीया आणि मियाभाई फिरवयास निघाले. तेव्हां रस्त्यात ताबूत दिसला. मियाभाईला तर ताबूत पाहिल्याबरोबर आतमध्ये गुदगुल्या झाल्या! तो अजिबात थांबला नाही आणि त्यानी वाण्याला सांगितले की मी आता दोन मिनिटात जाऊन येतो. असे सांगून तो गर्दीत ताबडतोब घुसला आणि आनंदाने फिरु लागला. वाण्यानी तर दोन मिनिटा ऐवजी पांच मिनिटे वाट बघितली, दहा मिनिटे झाली, अर्धा तास झाला परंतु मियाभाई तर बाहेर पडण्याचे नावच घेई ना. त्याला तर फारच मजा वाटली. वाणीया मियाभाईला पांच पांच मिनिटानी सांगत होता, बाबा आता चल रे. बाहेर पड. परंतु मियाभाई तर निघालाच नाही. शेवटी कंटाळून एक तास झाला म्हणून वाणीया मियाभाईस हात धरुन बाहेर काढण्यास गेला. परंतु मियाभाईने तर वाण्यालाच उलट गर्दीत खेचून नेला आणि त्यास सांगितले ''दोन मिनिटे आपण हौसे हौसे बोलू आणि निघून जाऊ''. सर्वजण हौसें हौसे बोलत होते परंतु वाणीया नाराज चेहरा करुन बोलला येथे येऊन फसलो रे फसलो.

त्याप्रमाणे हे जग आहे. एक वेळ येथे सापडला तर मग त्याच्यातून परत बाहेर निघणे अतिशय कठीण आहे. हे तर ज्ञानीपुरुष जर मिळाले आणि त्यानी हात खेचून बाहेर काढले तरच बाहेर निघता येईल. ह्या भ्रांतिच्या फसवणुकीतून जर भ्रांति गेली तरच सुटता येते. परंतु ही भ्रांति कशी जाईल? ही तर ज्ञानी पुरुषाने जर हालवून जागे केले तरच जाईल. त्यांच्याशिवाय कोणीही काम करु शकणार नाही. त्यांच्याशिवाय तो जसजसा सुटावयास जातो तसतसा जास्त आणि जास्त अडकतो.

## ( १२३ )
## भर आणि निर्जरा
(Charge-Discharge)

दर्शनमोह हा charge मोह आणि चारित्र्य मोह हा discharge मोह अर्थात निर्जरामोह. हा दर्शन मोह हे पाणी, आणि चारित्र्य मोह हे बर्फ आहे.

चेतन जडाला चिकटले आणि स्वत:च्या स्वरूपाचे भान राहिले नाही तर याच्याने चार्ज होते. ज्याची फार आठवण येते त्यामध्ये तो तन्मयाकार होतो. त्यामूळेच charge होते. कोणत्या वस्तुची आठवण होते? तर ज्याच्यावर पुष्कळ राग असेल किंवा ज्याच्याबद्दल पुष्कळ द्वेष असतो तरच आठवण येते. जे डिस्चार्ज (निर्जरा) होते त्याच्या वर राग व द्वेष करतो तेव्हा आत्म्याची स्वाभाविक कल्पनाशक्ति, विभावपणे विकल्प होऊन मिसळते त्यामूळे charge होते. ह्याप्रमाणेच संसारक्रम चालत असतो. चुकीने charge होते, भ्रांतिने भरले आहे ते discharge- निर्जरा होते.

रस्त्यातून जाताना चंदनने दुकानामध्ये साडी बघितली त्यास हरकत नाही परंतु त्याचा मोह उत्पन्न झाला त्याचीच हरकत आहे. साडी बघितली आणि आवडली तो discharge मोह आहे. परंतु त्याच्यामध्ये चंदन तदाकार अशा तऱ्हेनी होते की जो मोह discharge आहे तो परत charge होतो. चंदन साडीमध्ये तदाकार अशी होते की जर साडी सव्वासहा मीटर लांब असली तर चंदन सुद्धा सव्वासहा मीटर लांब होते. आणि जर साडी साडेतीन मीटर असली तर ती सुद्धा साडेतीन मीटर लांब होते. त्या साडीमध्ये जितकी डिझाईनची फुले असतात किंवा नक्षी असते तितकीच चंदनला दिसतात. त्यामध्ये प्रतिष्ठित आत्मा एकाकार होऊन घुटमळतो. चंदन तर घरी येते परंतु चित्त तर त्या दुकानामधील साडीमध्येच असते. नवरा चंदनला विचारतो की काय तुला आज बरे नाही किंवा काय? तुझे तोंड उतरलेले दिसत आहे? तर त्या बिचाऱ्याला काय माहीत असते की ही तर इकडे तिकडे घरात फिरत आहे, परंतु तिचे चित्त तर दुकानाच्या साडीमध्येच आहे. यालाच भगवाननी charge मोह सांगितला आहे.

चांगल्यात चांगली भजी आणि चांगल्यात चांगली वस्तु खावयास मिळाली आणि जर खाल्ली तर त्यास हरकत नाही, परंतु त्याची चव तशीच रहाते त्यामूळे charge होते त्याच्यात तदाकार होऊन भजी आणि तो पदार्थ खातो म्हणजे भजाच्या आकारासारखा आणि त्या वस्तुच्या आकारासारखा होतो. आणि पुन्हा मोह charge होतो.

धंदा करतो ते discharge होते. पूर्वी charge केले म्हणून धंदा सुरु केला, आणि सुरु केला तेव्हापासून discharge होते आणि त्यामध्ये तदाकार होऊन charge करतो.

जन्मास आला तेव्हापासून मरे पर्यंत सर्वच discharge होते. मनुष्यपणा हे discharge आहे. गेल्या अवतारामध्ये मनुष्यपणा charge केले ते आता discharge-निर्जरा होत आहे. त्याची भगवानाला सुद्धा हरकत होत नाही परंतु discharge निर्जरा होत असताना तुझे लक्ष कोठे आहे, त्याची किंमत आहे. भगवानचे दर्शन करण्यास देवळात गेला आणि भगवानच्या मूर्तीचे दर्शन घेतले व त्याबरोबर बाहेर जोडे ठेवले असतील त्याचाही जर फोटो पाडला, ते जे दर्शन केले ते discharge- निर्जरा आणि जोड्याचा फोटो पाडला ते charge केले गेले.

पाणी प्यायले ते charge म्हणावयाचे कारण तो स्वत:ला कर्ता मानत आहे. नंतर ह्या पाण्याची लघवी होते ती जेव्हां बाहेर येते त्यास discharge- निर्जरा म्हणावयाचे.

मनुष्य खाजवतो ते discharge- निर्जरा आहे, देहाच्या ज्या स्थूल क्रिया आहेत त्या discharge- निर्जरा होतात. त्यामध्ये आनंद मानण्यासारखे काहीच नाही आणि शोक करण्यासारखे सुद्धा काहीच नाही. आनंद होतो तो "प्रतिष्ठित आत्म्यास" होतो त्याला जाणणारा स्वत: शुद्धात्मा आहे, तो समजतो की आत जळफळाट होईल तेव्हां कळेल. परंतु जर त्या आनंदात तन्मयाकार झाला म्हणजे परत charge केले जाते. discharge मोह संपत आहे. परंतु तो मूर्ख पुढील अवताराकरिता परत charge करतो. मनुष्यपणा charge करावयास जातो पण होतो गाढव! असे हे सर्व बिनबुडाचे आहे. हित अहिताचे भानच नाही म्हणून काय करावयास जातो आणि काय होते? लोकनिंद्य होत असेल तेथे मन, वचन, काया, ह्याना सांगावयाचे आणि त्यास बाजूला करावयाचे परंतु लोकमान्य असेल तर हरकत नाही. लोकास अमान्य असेल तर तेथे उपाय करावयास लागेल. यांत्रिक (mechanical) 'मी'ला ताब्यात control ठेवावयाची सत्ता मूळ 'मी' ची नाही. एंजिन चालू झाले मग बंद करावयाची सत्ता नाही. Charge केले म्हणजे discharge होणारच. ह्यामध्ये भगवानची सुद्धा सत्ता नसते. Discharge होताना

बॅटरी जशी charge केली असेल तशीच निघणार. ''मी'' ला ओळखल्यानंतर नवीन बॅटरी charge केली जात नाही. हे सर्व थांबते. स्वरुप मिळाल्यानंतर discharge होताना हात घालत नाही परंतु शक्य तितके पुरुषार्थाने विरघळले जाते.

Chargable मोह तर १, २, ३ डिग्री अशा क्रमिक रीतीने भर करतो तो ५०० पर्यंत होतो आता discharge मोह कसा असेल? तो सुरुवातीला एकदम ५०० वरती येतो उदाहरणार्थ क्रोध प्रथम ५०० डिग्रीवर येतो, नंतर ४५० नंतर ४०० डिग्रीवर येतो आणि शेवट एक डिग्रीवर येतो आणि त्यानंतर पूर्ण निघून जातो. प्रत्येक वस्तु discharge होताना एकदम मोठी होते नंतर हळु हळु कमी होते. क्रोध प्रथम ५०० डिग्रीवर येतो आणि नंतर एकदम घडाका करतो ५०० डिग्री पासून सुरू होतो आणि नंतर हळु हळु विरघळतो.

## ( १२४ )
## आवड आणि नावड
(Likes and dislikes)

रस्त्यातून जाताना आवड आणि नावड उत्पन्न होते. आपली इच्छा नसली तरी आपल्या मनासारखे व मनाविरुद्ध होत असते. परंतु ते कशामूळे होते त्याचा कोणी विचारच करीत नाहीत. तुझी इच्छा नसली तरी तो बदलेल असे नाही. तुझ्या इच्छेची गोष्ट नाही. जन्मास आला तेव्हापासून मन, वचन, काया ह्यांची बॅटरी discharge होत जाते. कारण की पूर्वी charge केली होती. Discharge होते, तेव्हां समजते की हे खोटे (म्हणजे उलटे) charge केले म्हणून परत सारखे (सरळ) charge केले तर जीवन सरळ तऱ्हेने जगता येईल. बाकी आता सर्वच फिल्म पडत आहे आता जे करावयाचे ते करा. जी फिल्म आता पडद्यावर दिसते त्याचे शूटींग आधि झाले आहे. परंतु अक्करमी पडद्यावर फिल्म बघतो ती न आवडणारी पहाण्यास मिळते. तेव्हा जो सांगतो की फिल्म कापा, कापा. अरे ती आता कशा रीतीने कापली जाईल? तो जेव्हा शुटींग करीत होता, charge करीत होता, तेव्हाच विचारावयास हावे होते ना! आता तर कोणाचा बापही फिरवू शकणार नाही म्हणून राग व द्वेष केल्याशिवाय गुपचुप तू आपली फिल्म पुरी करुन टाक.

सर्व जग charge मधे वश झालेले आहे.

आवड आणि निवड (likes & dislikes) हा आत discharge मोह आहे. आणि राग व द्वेष हा charge मोह आहे. भर charge मोह हा भगवानच्या आज्ञेविरुद्ध

आहे. निर्जरा discharge हा भगवानच्या आज्ञेविरुद्ध नाही. लोक discharge मोहाची पाने कापतच असतात आणि charge मोह तर चालूच आहे तर मग शेवट कसा होणार? कित्येक तर फांद्या कापतात व कित्येक सबंध मूळापासून कापून टाकतात. परंतु जोपर्यंत पांढरे मूळ (कोंब) असतो तो पर्यंत ते परत बाहेर येणार. लोक ह्या संसाररुपी वृक्षास निर्मूळ करण्याकरिता पाहिजे तितके उपाय करतात परतु त्याचा शेवट होणे शक्य नाही ह्यासाठी ज्ञानी पुरुषाचीच गरज आहे. ज्ञानीपुरुष पानाला शिवणार नाही आणि डहाळ्यांना सुद्धा शिवणार नाही. अरे असंख्य मुळांना सुद्धा शिवणार नाही. तो तर झाडाचे मुख्य मुळाला जाणतो आणि ओळखतो. तो मुख्य मुळात चिमुटभर औषध दाबतो त्यामूळे सर्व झाड सुकून जाते. अहंकार जातो.

ज्ञानीपुरुष तर काहिच करित नाहीत. ते फक्त तुमच्या charge होणाऱ्या बॅटरीला बाजूला सारुन आठफूट लांब ठेवतात म्हणून ती परत charge केली जात नाही. तुमचे charging point जडवून टाकतात.

बाकी वाटेल तो उपाय केला तरी जोपर्यंत charge बंद होत नाही तोपर्यंत मोह सुटत नाही. मग तू त्याचा त्याग करशील, किंवा वाटेल ते करशील, किंवा उलटे डोके करुन लटकवशील तरी सुद्धा मोह सुटणार नाही. उलट तु त्यास जास्त फसला जाशील. पन्नास प्रकारचे २५ charge आणि २५ discharge मोह जातील तरच समजण्यात येईल.

'मी हे केले' असे बोलले की charge केले गेले, दर्शन केले, प्रतिक्रमण केले, सामायीक केले असे बोलले की charge केले जाते. नाटकी भाषेमध्ये बोलला तर हरकत नाही, परंतु निश्चय करुन बोललास तर त्याची धुंदी चढते. म्हणून discharge होण्याऐवजी कर्म charge होते. Charge भर हे आपल्या हातात आहे. Discharge होणे हे आपल्या हातात नाही. फक्त एक मोक्षाचीच इच्छा करण्यासारखी आहे. तरच मोक्ष मार्ग मिळेल. मोक्षाच्या इच्छेला charge कर!

पहाण्याचा प्रत्येकास अधिकार आहे. परंतु चिंतन करण्याचा नाही. त्यामध्ये तन्मयाकार व्हावयाचे नाही. ज्ञानीपुरुषसुद्धा चिंतनात फिरत असतो. ह्या मोहनीय नगरीमध्ये (मुंबईमध्ये) सर्व लोक फिरतात आणि ज्ञानीपुरुष सुद्धा फिरतो परंतु कोणत्याही वस्तुमध्ये त्यांना चिंतन नसते! कोणात्याही ठिकाणी त्यांचे चित्त जात नाही.

भाव कर्म हे charge आहे. आत्म्याच्या अत्यंत निकट आहे. आणि त्याच्यामधून एकसारखी charge केली जाते. ह्या बेटरीस आम्ही charge करण्याचे बंद केले म्हणून आता महात्म्यांची आत discharge होणारी बेटरी च राहिली. आता तर ज्या भावनेने

discharge व्हावयाचे असेल त्या भावनेने होऊ द्या. आणि त्यास बघ. जर मन मागे पुढे होत असेल तर त्यास माहीत करुन द्यावयाचे आणि जर सरळ असेल तर त्यास सुद्धा जाणावयाचे, म्हणजे charge होणार नाही. आता तर जे यायचे असेल ते येऊ द्या, हे होय तो भले होय आणि न होय तो पण बरे.

''भावकर्म ही charge होणारी बेटरी आहे''. ह्या पांच शब्दात भगवानचा पंचेचाळीस आगमांचा समावेश झाला आहे. बाकी एका मोहास काढण्यास लाखो अवतार घ्यावे लागतील.

प्रश्न:- कल्पना आणि इच्छा ह्यात काय फरक आहे?

दादा:- कल्पना ही मूळ स्वरूपाच्या अज्ञानामूळे होत असते. आणि इच्छा ही discharge मूळे होते. परंतु मूळ इच्छा होते ती कल्पने मधून होते. वरुन पाणी पडत असते. आकाश त्याच्या जागेवरच आहे. हवा जोराने वहात असते आणि वरचे पाणी खालच्या पाण्यामध्ये पडते, नंतर बुडबुडे तयार होतात. त्यात पाऊस पडतो त्यांच्यात कोणाचीही इच्छा नसते. हवेची सुद्धा नसते. आणि पाण्याची पण सुद्धा नसते, असे हे सर्व आहे!

प्रश्न:- Charge किंवा discharge हे कसे समजावयाचे?

दादा:- ''मी नवनीत आहे'' असे जेव्हां माहित झाले तेव्हापासून charge केले गेले. ''मी शुद्धात्मा आहे असे जेव्हां माहित झाले तेव्हां काहीच charge होणार नाही. परंतु हा जर मागे पुढे करेल तर charge केली जाईल. परंतु असे कोण करणार? जितकी charge करण्याची लक्षणे दिसतात तितकीच निर्जरा होण्याची असतात. Charge केली जाते किंवा discharge होते ते समजत नाही. हे जर समजले तर कोणीसुद्धा बंद करून टाकील हे तर ज्ञानीपुरुषाशिवाय कोणीही त्याची फोड करू शकणार नाही. स्वत: 'शुद्धात्मा' आहे म्हणून discharge होते. जर नवनीत झाला तर charge होइल. हे discharge होत आहे ते जुन्या बेटरीचा परिणाम सहन होत नाही म्हणून त्याच्या परिणाममूळे नवी बेटरी charge होते.

Charge सुरू झाल्यावर त्यानंतर चिंता चालू होते. आतमध्ये आग होते. जळफळाट होतो. स्थिर असलेले मन अस्थिर होते. काय करतो ते समजत नाही. परंतु एकटे discharge होताना तसे रहात नाही. निराकुळता राहते कारण त्यामध्ये तन्मयाकार झालेला नसतो.

भगवान म्हणतात जे discharge होत आहे त्याची जोखमदारी आमच्यावर आहे. परंतु charge होऊ देऊ नकोस.

ह्या दोन वाक्यातच जगाच्या सर्व शास्त्राचा व ज्ञानाचा समावेश केला आहे.

Charge करणे बंद झाले म्हणजे discharge निर्जरा होणे बंद झालेच असे म्हटले जाते. मोह charge केला तर तो (promisery note) कर्जरोखा आहे आणि जे discharge होते ती हातात असलेली रोकड रक्कम आहे.

बघ आम्ही तुला खात्री देतो की, ''दादाभगवान'' मिळाल्यानंतर तु charge होणार नाही !

## ( १२५ )
## मोहाचे स्वरुप

मुख्य मोह दोन प्रकारचा आहे.

दर्शन मोह म्हणजे charge मोह आणि चारित्र्य मोह म्हणजे discharge मोह.

दर्शन मोह रूचिवर आधारीत आहे. अर्थात कोठे रूचि आहे त्यावर आधारलेला आहे. संसाराच्या विनाशी वस्तुवरच रूचि आहे तो मिथ्यात्व मोह.

आत्मा जाणण्याची आणि त्याबरोबर संसारातील नाशिवंत वस्तुवर रूचि असणे तो मिश्र मोह. हे खरे आहे आणि ते सुद्धा खरे आहे असे वर्तन करणे हा मिश्र मोह.

आत्मा जाणण्याची उत्कंठा होते आणि हेच खरे आहे असे सांगणे तो समकित मोह. आत्म्यामध्ये आत्मस्वरुप होणे त्याचे नाव ज्ञान.

ज्ञान आणि ज्ञानीवर असलेला मोह तो शेवटचा मोह आहे. त्यास समकित मोह असे म्हटले जाते. दुसरा सर्वच खोटा मोह आहे.

जसे आहे तसे दर्शनात येत नाही ते दर्शनमोहामूळे असते. दर्शनांच्या आवरणाने 'मी चंदुलाल आहे' असे दिसते.

हे जग कोणाच्या आधारानी राहिले आहे? दर्शन मोहामूळे.

भगवान म्हणतात की चारित्र्य मोहाची मला हरकत नाही. हा निर्जरा मोह आहे. अज्ञानाने भरलेला माल निघत आहे. परंतु परत 'मी चंदुलाल आहे' म्हणून भरत आहे.

मन, वाणी, काया ह्यांच्या योगानी मूर्छित होणे हा चारित्र्य मोह. 'मी करीत आहे' आणि 'माझे आहे' असे समजणे हा चारित्र्य मोह आहे. भगवान सांगतात की, चारित्र्य मोहास यथार्थ समजणे हे समजण्याजोगे आहे. 'मी सामायिक करित आहे.' असे जे वाटते तो चारित्र्य मोह आहे.

सामायिक प्रतिक्रमण किंवा संसाराच्या प्रत्येक क्रियेमध्ये जो कर्ताभाव तो चारित्र्य मोह, रूचिभाव तो दर्शन मोह.

चारित्र्य मोह म्हणजे अनुभव मिळालेला मोह. जो फळ देण्याकरिता समोर आला आहे. तो चारित्र्य मोह म्हणजे वर्तन मधे मिळालेला discharge मोह. मोह charge केला जातो तो दर्शनमोह आणि (discharge) होतो तो चारित्र्य मोह.

Discharge मोह भुलावतो (विसर) पाडतो.

आत्म्याच्या हजेरीमूळे पुद्गलात charge केली जाते आणि तोच परत परत discharge होतो. पुदगल् चेतनच्या संसर्गात आल्यामूळे चेतन charge केली जाते परंतु त्यामध्ये चेतनचे काहीच जात नाही. ह्या शरीरामधून discharge होणारी प्रत्येक वस्तु अनुभव घेऊन बघण्यात येते. म्हणून charge केली गेली असे म्हणतो. गलन ह्याचा अर्थच discharge. आम्ही त्यास भावाभाव म्हणतो. त्यामध्ये चेतन नसते.

एका माणसास सर्व आयुष्यभर तुरुंगामध्ये बसून रहावे लागते आणि यास खावयास मिळते परंतु जिलेबी, लाडु मिळत नाहीत म्हणून त्याचा मोह थोडाच गेला काय? नाही. आत मध्ये तर मोह असतोच, मिळत नाही, म्हणून मोह गेला असे म्हणता येणार नाही.

प्रश्न:- दादा, माझ्यामध्ये मोह पुष्कळ असेल आणि ह्या सर्वामध्ये कमी असेल?

दादा:- किंचित थोडेसे मोहाचे एक बी असेल ते जेव्हा व्यक्त होते तेव्हा सर्व जगामध्ये व्यापून जाईल तसे आहे. म्हणून थोडे किंवा जास्त ह्यामध्ये समजणे फेर नाही. जेव्हां संपूर्ण मोहाचा क्षय होईल तेव्हाच काम होईल.

भगवान आणि सत्पुरुष ह्यांच्या सत्संगाचा मोह असणे तो प्रशस्त मोह आणि प्रशस्त मोहामूळे मोक्ष मिळतो.

मोहाचे तर अनंत प्रकार आहेत. त्याचा शेवट येईल असे नाही. एक मोह सोडण्याकरिता लाख अवतार घ्यावयास लागता असे आहे. मनुष्यपण हे तर मोहाचे संग्रहस्थान आहे! स्वरूप ज्ञानाशिवाय मोह जाईल असे नाही.

प्रश्न:- मायेच्या बंधनातून मुक्त होण्याकरिता काय करावे?

दादा:- अज्ञानता हीच माया. स्वत:च्या निजस्वरूपाचे अज्ञान हीच माया आणि ती माया तर मुका मार मारते. ह्या जगामध्ये कोणी वरिष्ठच नाही. मायेमूळे वरिष्ठपणा वाटत आहे.

माया काय आहे? भगवानचे relative- सापेक्ष स्वरूप ती माया. ती माया फसवते असे लोक म्हणतात. हे काय आहे? हे सर्व कोण चालवतो ते समजत नाही. म्हणून 'मी चालवतो' असे समजतो तीच माया आहे. आणि त्यामध्ये फसतो.

ह्या जगामध्ये जर कोठे कच्ची माया नसेल तर तो भगवान. सर्व कच्चे लोक मार खातच असतात. हा मार हद्दीच्या बाहेर आहे, देवाच्या मायेचे तर आपण सांगू शकत नाही. परंतु हा मारच मोक्षास जाण्याची प्रेरणा देईल.

स्वत: स्वत:ला ओळखत नाही हीच मोठ्यातील मोठी माया आहे. अज्ञान बाजूला झाले की माया वेगळी होते.

जेथे जी वस्तु नाही त्या वस्तुचा विकल्प येतो त्याचेच नाव माया.

आम्ही हजर असताना तुमची माया उभी रहाणार नाही. बाहेरच उभी राहील. मग तुम्ही आमच्यापासून परत बाहेर निघालात म्हणजे तुमची माया तुम्हास चिटकेल. आमच्यापासून हे स्वरूपज्ञान एकवेळ घेऊन जाल मग तुम्ही कोठेही गेलात तरीसुद्धा तुम्हास माया शिवणार नाहीच!

भगवान सांगतात की, हे सर्व नाटकी आहे. अरे तू नाटकी होऊ नकोस. मनाची भानगड आहे म्हणून लोक मनाच्या माघे लागले आहेत. परंतु मन तर हैराण करीत नाही. त्याच्या माघे माया आहे. तीच त्रास देते. माया गेली मग मन तर अनंत (endless) फिल्म आहे. कित्येकांनी संसाराची माया सोडून त्यागीपणा स्वीकारला तर. काय त्यांची माया कमी झाली का? नाही. उलट त्यांची माया तर दुप्पट झाली. माया सोडली असे कोणास म्हणतात? संसारातील वैभव भोगवताना ते सोडले त्याने खरी माया सोडली. हे तर बायका मुले सोडली, परंतु त्याबरोबर संपूर्ण अज्ञान गुंडाळले ते घेऊन रखडत आहे. त्याने माया सोडली असे कसे म्हणावयाचे?

कोणत्याही ठिकाणी गेला परंतु माझे-तुझे गेले नाही, आणि 'मी' गेले नाही तर तुझी माया आणि ममता तुझ्याबरोबर रहाणार!

एकजण माझेकडे आला आणि खूप रडू लागला. तो सांगू लागला की आता तर जगणे फार कठिण झाले आहे. आत्महत्या करावी अशी इच्छा होत आहे. मला माहित होते की, ह्या माणसाची बायको पंधरा दिवसापूर्वी मरून गेली होती आणि तिच्या माघे ती चार मुले ठेवून गेली होती. मग मी त्यास विचारले ''बाबा तुला लग्न होऊन किती वर्षे झाली? तो म्हणाला, ''दहा वर्षे झाली'' तर दहा वर्षापूर्वी तू जेव्हां तिला बघितली नव्हती तेव्हा मरून गेली असती तर तू रडला असतास का?

भाई:- नाही, तेव्हा का म्हणून मी रडलो असतो? मी तर तिला ओळखतसुद्धा नव्हतो.

दादा:- तर आता तू कशाकरिता रडत आहेस? ते मी तुला समजावून देतो. जेव्हा तू लग्न करण्यास गेलास तेव्हा वाजत-गाजत होते आणि जेव्हा होम पात्रांच्या समोर सप्तपदीचे फेरे मारलेस व फिरू लागलास त्यावेळी ''ही माझी बायको, ही माझी बायको'' अशी मनाशी गाठ बांधली आणि मनाशी नक्की केले व तिच्यासमोर बघून ही ''ही माझी बायको'', ''ही माझी बायको'' असे बोलत गेलास व असे गुंडाळल्यामूळे ममता वाढत गेली. जर बायको उत्तम निघाली तर रेशम गुंडाळले आणि वाईट निघाली तर सूत गुंडाळले. आता जर तुला ह्याच्यातून सुटावयाचे असेल तर जितके वेळा तू माझी आहे असे गुंडाळे मारलेस त्याप्रमाणे ''तू माझी नाही, माझी नाही'' असे बोलून ते गुंडाळे सोडवून टाक तरच त्या मायेतून सुटून जाशील.

माझी ही गोष्ट तो मनुष्य बरोबर समजला आणि त्यानी नंतर ''माझी नाही, माझी नाही.'' असे एक सारखे म्हटले आणि त्याचा परिणाम असा झाला की, त्याचे सर्व दु:ख नाहिसे झाले. तो पंधरा दिवसानी माझ्याकडे परत आला व त्याने आनंदाश्रूंनी माझे पाय पकडले व नमस्कार केला आणि म्हणाला की, दादा तुम्ही मला वाचविले. माझी सर्वच माया कमी करावयाचा मार्ग मला दाखवलात त्यामूळे मी सुटलो.

माझी ही खरी घडलेली गोष्ट ऐकून कित्येकांचे दु:ख कमी झाले!

## ( १२६ )
## क्रोध

जगामध्ये कोणीही मनुष्य क्रोधास जिंकू शकत नाही. क्रोधाचे दोन प्रकार आहेत- एक क्लेश आणि दुसरे अशांत रूप. जी माणसे क्रोधाला जिंकतात ती अशांत (दृश्य) रूपाने क्रोधाला जिंकतात. ह्यात असे होते की, एकास दाबले तर दुसरा वाढतो आणि म्हणतो की मी क्रोधाला जिंकलो. म्हणजे त्याचा मान वाढतो. खऱ्या तऱ्हेनी राग पूर्णपणे जिंकला जात नाही. दृश्य क्रोध जिंकला असे म्हणता येते. क्रोध हा तर विस्त्या (अग्नि) सारखा आहे. स्वत: जळतो आणि दुसऱ्यास सुद्धा जाळतो.

ज्यावेळेस क्रोध येतो, त्यावेळेस जर रागावला नाही तर ते शुभ चारित्र्य म्हणावयाचे. शुभ चारित्र्याने संसार मार्ग सुधारतो. शुभ होते, परंतु मोक्ष तर शुद्ध चारित्र्यानेच होतो.

क्रोध हा उग्र परमाणु आहे. रांजणाच्या आत दारुगोळा भरलेला असतो तो

फुटतो तेव्हा आग लागते आणि आतमध्ये सर्व दारु गोळा संपून जातो तेव्हा आपोआप रांजण थंड होतो. तसेच क्रोधाचे आहे. क्रोध जेव्हा 'व्यवस्थितच्या' नियमाच्या हिशोबाने फुटतो तेव्हा सर्व बाजूने जळतो. आम्ही उग्रता रहाते त्यास क्रोध म्हणत नाही, परंतु क्रोधातच रागावलेला रहातो त्यालाच क्रोध म्हणावयाचे. क्रोध तर केव्हा म्हणतात की जेव्हा आत्म्याची लाही लाही होते. लाही झाली तेव्हा झळ लागते आणि दुसऱ्यावर सुद्धा त्याचा परिणाम होतो. त्याला क्लेश रूपाने झालेला क्रोध म्हणतात आणि बेचैन स्वरूपात फक्त आतमध्येच जळत रहातो. परंतु डूक ठेवणे तर दोन्ही स्वरूपात असते. उग्रता तर निराळीच गोष्ट आहे. क्रोधामध्ये डूक ठेवतो त्यालास क्रोध म्हणतात. उदाहरणार्थ नवरा-बायको रात्री खूप भांडले. क्रोध जबरदस्त अनावर झाला. सबंध रात्रभर दोघेही जागत राहिले. सकाळी बायकोने चहाचा कप ठेवताना सहज आपटला तर नवरा समजून जातो कीं, अद्याप राग आहे. ह्याचे नाव क्रोध. मग राग कितीही जुना असो. अरे कित्येकाचा सर्व आयुष्यभर असतो. बाप मुलाचे तोंड बघत नाही आणि मुलगा बापाचे तोंड बघत नाही. क्रोधाचे अस्तित्व तर बिघडलेल्या चेहऱ्यावरूनच समजू शकते.

## ( १२७ )
## लोभ

क्रोध, मान, माया व लोभामध्ये लोभाचा तंतु अधिक असतो. लोभ म्हणजे काहि तरी इच्छा असणे. लोभी माणसाला जर कोणी बोलला तरीसुद्धा तो हसत रहातो. ज्ञानीसुद्धा हसतो, परंतु लोभी माणसा गाठ जास्त मोठी करून हसतो.

शेठजी दुकानामध्ये बसले असतील आणि कोणी गिऱ्हाईक भांडावयास आले की, माझ्या मुलाचे आठ आणे तुम्ही लबाडीने घेतले, तर शेठजी तक्त्यावर बसून हसत रहातात. जरासुद्धा पोटातले पाणी हालत नाही. रस्त्यात लोकाची गर्दी जमते. ते तर शेठजीची आणि गिऱ्हाईकांची गंमत बघतात. शेठजीला शांत, धीर आणि गंभीर स्थितीत बघतात आणि गिऱ्हाईकास रागावलेला आणि आरडा ओरड करीत असताना बघतात. त्या गर्दीमध्ये लोकसुद्धा बोलतात की ह्या माणसाचाच मेंदू बिघडलेला आहे! ते त्यालाच दोष देत जातात की, गुचचुप घरी जा, असा मोठा शेठजी असे करेल का? आणि शेठ गालात हसत असतात ते कशामूळे? कारण त्यांचा लोभ मनामध्ये त्याना सांगतो असतो की, हा वेडा आरडा ओरडा करत चालू लागेल त्यामध्ये माझे काय जाणार आहे? माझ्या खिशामध्ये तर आठ आणे आले? तो लोभी खरोखर ज्ञानी सारखाच दिसणार!

परंतु मानी माणुस कोणी रागावले तर तो हसत नाही. ताबडतोब त्याचा रागाचा भडका होतो. परंतु लोभी माणसाला राग येणार नाही.

भगवानांनी सांगितले आहे की, क्रोध आणि मान ह्यामूळे लोकाना दु:ख होते. मानामूळे तिरस्कार उत्पन्न होतो. मान तिरस्कार प्रगट करतो. क्रोध जळतो आणि जाळतो. त्याचा उपाय परमेश्वराची वाक्ये ऐकून लोक करावयास गेले. क्रोध करु नये, मान करु नये. ते त्रियोगी साधना करु लागले. त्रियोग साधने मूळे क्रोध, मान थोडासा कमी होतो आणि बुद्धिचा प्रकाश वाढतो. त्यामूळे लोभ वाढतो. बुद्धिचा प्रकाश वाढल्यामूळे लोभाचे रक्षण करण्याकरिता कपट वाढते. क्रोध आणि मान भोळे असतात. कोणीसुद्धा दाखविणारा मिळेल, परंतु हे लोभ आणि कपट तर असे आहेत की, मालिकास सुद्धा माहीती होवु देणार नाहीत. हा तर आत बसला तर मग निघण्याचे नाव घेत नाही.

लोभी केव्हा रागावतो? थेट शेवटच्या घटकेस जेव्हा मोठ्यातला मोठा लोभ हातातून गेला असेल आणि कपटानी सुद्धा काम करता येत नाही तेव्हा तो क्रोधाचा आश्रय घेतो.

जन्मास आला तेव्हापासून लोभी माणसाच्या लोभाचा दोरा तुटतच नाही. एक क्षणसुद्धा त्याचा लोभ जात नाही. सतत त्याची जागृती लोभात आणि लोभातच रहाते. मानी मनुष्य तर बाहेर निघतो तेव्हापासूनच मानात रहातो. रस्त्यात सुद्धा जेथे जातो तेथे मानातच असतो आणि परत येतो तरी सुद्धा मानातच असतो. परंतु जर कोणी अपमान केला तर तो रागावतो.

मोक्षास जाण्याकरिता कोण रखडवितो? क्रोध, मान, माया, लोभ. लोभाचे संरक्षण करण्याकरिता कपट आहे. ह्या चोघांचे आधार घेऊन लोक जगत असतात.

क्रोध, मान, माया, लोभ दोन जातीचे आहेत. एक शांत होऊ शकतो असा, दुसरा शांत होऊ शकत नाही असा. उदाहरणार्थ– कोणावर रागावला असेल तर तो आतल्या आत फिरवू शकतो आणि त्यास शांत करू शकता येते. ह्या स्थितिला पोहोचला तर व्यवहार खूपच सुंदर होऊ शकेल.

दुसऱ्या प्रकारचा क्रोध, जो शांत करु शकता येत नाही तो लाख प्रयत्न केला तरी राग बाहेर येणारच असा. अनिवार्य क्रोध स्वत:चे अहित करतो आणि दुसऱ्याचे सुद्धा अहित करतो. क्रोध, मान ह्यापेक्षा कपट आणि लोभाची ग्रंथी भयंकर असते ती लवकर सुटत नाहीं. लोभाला गुन्हेगार कशामूळे म्हटला आहे? लोभ केला म्हणजे दुसऱ्याचे लुटुन घेण्याचा विचार केला तो. अजवातलावाचे पाण्याचे सर्वच नळ एकानी उघडले तर दुसऱ्यास पाणी मिळेल काय?

## ( १२८ )
## कपट

कपट म्हणजे जसे आहे तसे न बोलणे. ते मन, वचन आणि काया ह्या तिघाना स्पर्श करते. स्त्री जातिमध्ये कपट आणि मोहाचे परमाणु विशेष असतात. पुरुष जातित क्रोध आणि मान ह्यांचे परमाणु विशेष असतात. जर कपट आणि मोह ह्यांचे परमाणु जास्त खेचले गेले तर पुढील जन्मात स्त्री रूपानी येतो. आणि क्रोध आणि मान ह्यांचे परमाणु विशेष खेचले गेले तर पुढील जन्मात पुरुष रूपाने येतो.

स्त्रीजाति भयाच्या कारणाने कपट करते. त्यामूळे पुष्कळ मोह येतो. मोहामूळे मूर्छा वाढते. पुरुषाना मान जास्त आसतो. मानामूळे जागृति वाढते. जसे जसे कपट वाढते तस तसा मोह वाढत जातो.

## ( १२९ )
## क्रोध, मान, माया ह्यांचे खाद्य

क्रोध, मान, माया, लोभ नेहमी स्वतःचे चोरून खातात. परंतु लोकांना कळत नाहीं. ह्या चारी गुणाना जर तीन वर्षे उपाशी ठेवले तर ते पळून जातील. परंतु ते ज्या वस्तुवर जगतात ती वस्तु म्हणजे काय? जर तुम्हास माहित नसेल तर ते कसे उपाशी मरणार? त्याची माहिती नसल्यामूळे त्याना अन्न मिळत जाते. ते कशा तऱ्हेने जगतात? आणि परत अनादि कालापासून जगत आहेत. म्हणून त्यांचे खाणे बंद करा. असा विचार तर कोणाच्या ध्यानात सुद्धा येत नाही आणि सर्व लोक मारून. ठोकून त्याना काढण्याचा प्रयत्न करतात. हे चारी तर आपोआप जातील असे नाहीत. हे तर आत्मा बाहेर निघेल म्हणजे आत सर्वच झाडून, झटकून साफ करून नंतर निघतील. त्याना हिंसक मार नको त्याना तर अहिंसकमार पाहिजे.

गुरु शिष्यास केव्हा रागावतो? जेव्हा क्रोध होतो तेव्हा त्यावेळी एक जण प्रश्न करतो महाराज ह्याला कोणत्या कारणास्तव टोचून बोलतात? तेव्हा महाराज उत्तर देतात की, ह्याला तर बोललेच पाहिजे. बस खलास. हे जे बोलले ते क्रोधाचे अन्न. केलेल्या क्रोधाचे रक्षण करणे तेच त्याचे अन्न.

एखाद्या कंजूस माणसाने तुम्हास चहाची पुडी विकत आणावयास सांगितली आणि ती तुम्ही तीस पैशाची पुडी आणली तर तो विचारेल की, एवढी महाग तू का आणलीस? असे बोलल्यामूळे त्याचा लोभ पोसला जातो आणि एखाद्याने ८० पैशाची चहाची पुडी आणली तर तो चैनी मनुष्य म्हणतो की ही फार उत्तम आहे. त्यामूळे

पण उडाउ माणसाचा लोभ पोसला जातो. हे झाले लोभाचे खाणे. आपण normal-समतोल शांत राहिले पाहिजे.

आता कपट काय खाते? रोज काळाबाजार करीत असते. परंतु कपटाची गोष्ट निघाली तेव्हा तो बोलतो की, असा काळाबाजार करु नये अशा तऱ्हेनी नो फार हुशारी दाखवितो. ते कपटाचे खाद्य.

आणि मानाचे खाद्य काय?

चंदुलाल भेटला आणि आपण म्हणालो, "या चंदुलाल". तेव्हा चंदुलालची छाती फुगली जाते. तो मानाने खूष होतो. हे मानाचे खाद्य.

आत्म्या शिवाय सर्वच, खाद्य खाऊन जगतात.

आपण तर क्रोध, मान, माया, लोभ हे चारी कशापासून उत्पन्न झाले आहेत? स्वतःच्याच प्रतिष्ठेपासून. ज्ञानीपुरुष ह्या प्रतिष्ठेमधून उठवून त्याची जगाची निष्ठा उडवून ब्रह्म स्वरूपात बसवितो आणि ब्रह्मनिष्ठ बनवितो. तेव्हा ह्या चारीपासून सुटका होते!

ज्ञानीपुरुष वाटेल ते करेल. क्रोध, मान, माया, लोभ हे तर आत्मा-अनात्मा, ज्ञान, अज्ञानचे बंधरूपी आहेत. साखळी आहे नाही तर अनासक्त परमेश्वरास आसक्ती कोठली?

## ( १३० )
## गृहखाते - परराष्ट्र खाते
(Home Department - Foreign Department)

परदेशामध्ये किंवा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी वावाझोळा आले किंवा ज्वालामुखीचा स्फोट झाला तर राष्ट्राचा पंतप्रधान मीटिंग बोलवितो. त्यांच्या परराष्ट्र मंत्र्याकडून, पेरू देशाच्या मुख्य प्रधानकडे सांत्वना पत्र लिहितो की, तुमच्या देशामध्ये तूफान आले आणि हजारो लोक मरून गेले आणि लाखो बेघर झाले आहेत. ते जाणल्या मूळे आम्हास अतिशय दु:ख झाले आहे. आमच्या देशाची प्रजासुद्धा पुष्कळ दु:ख करीत आहे. आमच्या देशाचा झंडा सुद्धा आम्ही अर्धा उतरविला आहे वगैरे-वगैरे. एका बाजूने सांत्वनाचे पत्र लिहितात आणि दुसऱ्या बाजूने नास्ता-पाणी, खाणे पिणे सर्वच चाललेले असते. हे तर असे आहे कीं परराष्ट्र कारभारात (foreign affairs) सर्वच गोष्टी दिखावा (super fluous) असतात, आणि (home affairs) गृह कारभारांत दक्ष

असतात. परराष्ट्रची गोष्ट आली म्हणजे वरून (दिखाऊ) शोक आणि दिलगिरी दाखवितात. आतून (मनापासून) काहीच नसते. आतल्या आत तर चहा, नास्ताच चालू असतो. तेथे तर complete super fluous- पूर्ण दिखावा असते.

त्याप्रमाणे आपल्या शरीरात सुद्धा दोन department आहेत एक home department आणि दुसरे foreign- परराष्ट्रीय खाते असते. Foreign department (super fluous) अनावश्यक आहे, आणि home department- गृहखाते निश्चित रहावयाचे आहे. बाकी मन, वचन, काया, यांचा संसाराच्या व्यवहारामध्ये foreign- परराष्ट्र प्रमाणे superfluous- म्हणजे दिखावा सारखे आहे.

''संयोग तर एकसारखे बदलतच रहाणार. परंतु त्यांच्यातील शुद्ध हेतू अनुकूल परिस्थितीत एकत्र मिळण्यासारखे आहेत बाकी सर्व परिस्थितीत superfluous राहण्या सारखी आहे''.

## ( १३१ )
## संयोग

ह्या जगामध्ये संयोग आणि आत्मा दोनच आहेत. संयोगाबरोबर ऐक्य एकत्र झाले तर संसार आणि संयोग जाणणारा झाला तर भगवान होतो.

ह्या जगामध्ये एकसारखा फेरफार होतच असतो. कारण ते सहज आहेत. संयोग हा वियोगी स्वभावाचा आहे. संयोग तर एकत्र होतच रहाणार.

संपूर्ण जग संयोग व वियोगामूळेच चालले आहे. ह्या जगाचा उत्पन्न करणारा कोण? कोणाचा बापसुद्धा उत्पन्न करणारा नाही. सांयोगिक पुराव्यानेच सर्व चालले आहे. Scientific Circumstantial Evidences वैज्ञानिक परिस्थितीच्या पुराव्यानेच चालत आहे.

वस्तुचे मिश्रण जसे होते तसे दिसते. त्यामध्ये कोणास काहीच करावयास लागत नाही. हे इंद्रधनुष्य दिसत आहे. त्यामध्ये रंग कोण भरावयास गेला? हा तर सांयोगिक पुरावा एकत्र झाला. वस्तुचे संमेलन झाले तेव्हां इंद्रधनुष्य दिसले. सांयोगिक पुराव्यात सूर्य असतो, वादळ असतो, बघणारा असतो, वगैरे-वगैरे किती तरी पुरावे एकत्र होतात तेव्हा इंद्रधनुष दिसते.

त्याचा जर सर्वानी गर्व केला की मी जर असतो तर ते झाले नसते. तर हा गर्व खोटा आहे कारण ढग नसते तरी सुद्धा ते तयार झाले नसते आणि जर वादळानी

अहंकार केला असता की, जर आम्ही नसतो तर इंद्रधनुष झालेच नसते तर ते सुद्धा चुकीचे आहे. हे तर वस्तुचे संमेलन झाले तेव्हाच स्वरूपात येते. संमेलन जर झाले नाही तर विसर्जन होते. संयोगाचा वियोग होतो. त्यानंतर इंद्रधनुष दिसत नाही.

संयोग मात्र वियोगी स्वभावाचा आहे आणि परत व्यवस्थितच्या हातात आहे. संयोग केव्हा व कशा तऱ्हेने एकत्र होतील ते व्यवस्थितच्या ताब्यात आहे. म्हणून मनातील कटकट सोडून दे. हे जग कसे तयार झाले आहे? Scientific circumstantial evidences वैज्ञानिक परिस्थितीजन्य पुराव्यानेच! परंतु नैसर्गिक- but-natural आहे! मुख्य वस्तु 'व्यवस्थित' आहे. संयोग-वियोगाच्या ताब्यात राहून 'व्यवस्थित' चालवते. कित्येक संयोग एकत्र झाले की, evidences- पुरावा तयार होतो. कित्येक संयोग एकत्र झाले की, झोप येते आणि कित्येक संयोग एकत्र झाले की जाग येते. 'व्यवस्थित' असे उत्तम आहे की, संयोगांना एकत्र करतेच.

हा प्रवाह पडतो आहे. तेथे बुडबुडे दिसतात. ते कसे निरनिराळ्या तऱ्हेचे असतात. काही अर्ध गोल असतात, लहान असतात, मोठे असतात, ते कोणी तयार केले, कोणी खेचले? हे तर आपोआप झाले. वारा जोरात पडणारे पाणी, लाटा वगैरे तऱ्हेचा संयोग एकत्र झाला की बुडबुडे तयार होतात. ज्यामध्ये जास्त हवा भरली जाते तो मोठा बुडबुडा आणि ज्यामध्ये कमी हवा भरली जाते तो बुडबुडा लहान तयार होतो. तसे ही माणसे बुडबुडेच आहे ना ! ती संयोगामूळेच उत्पन्न होतात.

कित्येक संयोग एकास आवडतात आणि दुसऱ्यास आवडत नाहीत. प्रत्येक संयोगाचे असे आहे. एकास आवडते आणि दुसऱ्यास आवडत नाही. जे आवडते ते साठवून ठेवले तर त्याचा वियोग केव्हा होईल त्याचे काय सांगता येईल का? परत असे आहे की एक संयोग येतो, दुसरा येतो आणि तिसरा येतो परंतु एक आला त्याचा वियोग झाल्याशिवाय दुसरा संयोग येणार नाही.

आवडणारे आणि न आवडणारे असे दोन प्रकारचे संयोग. न आवडणारे संयोग हे अधर्माचे फळ, पापाचे फळ आहे आणि आवडणारे संयोग हे धर्माचे, पुण्याचे फळ आहे. आणि स्वधर्माचे फळ मोक्ष आहे.

संयोगमात्र दुःखदायी असतो. मग तो आवडणारा असो किंवा न आवडणारा असो. आवडणाऱ्याचा वियोग झाला तर दुःख आणि न आवडणाऱ्यांचा संयोग झाला तरी सुद्धा दुःख आणि नियमाप्रमाणे तर दोघांचा संयोग-वियोग, वियोग-संयोग आहेच.

भगवानांनी सांगितले आहे की, चांगले संयोग आहेत आणि वाईट संयोग आहेत. परंतु वाईट संयोगास लोक असे म्हणतात की ह्याची बुद्धि बिगडली आहे.

फौजदार येऊन पकडतो तो वाईट संयोग आणि सत्संगा मध्ये जाण्यास मिळते तो चांगला संयोग. ह्या जगात संयोग म्हणजे charge आणि वियोग म्हणजे discharge. त्याशिवाय बाकी काहीच नाही.

जितके वियोग करावयाचे कठिण तितके संयोग करावयाचे अवघड आहे. एखादी आवडती व्यक्ती आपणाकडून परत जावयास निघते तेव्हां आपणास वाईट वाटते. तसेच एखादा माणूस आपणाकडे येऊ नये असे वाटते व जर तो आला तरीसुद्धा आपणास बरे वाटत नाही.

नेहमी संयोग येण्यापूर्वी स्वाद येतो. जोपर्यंत शिल्लक असते तो पर्यंत स्वाद येतो. जेव्हा पासून शिल्लक वापरावयास घेतली जाते तेव्हा स्वाद कमी होत जातो.

यात्रेस रविवारी जावयाचे असते, आता सर्वांना वेगळाच स्वाद येतो. तेव्हा कुतुहल उत्पन्न होते. परंतु रविवारी साडेसात वाजता गाडी निघणार तेव्हा शिल्लक वापरली जाईल व नंतर सर्व स्वाद (कुतुहलपण) खलास होईल.

संयोग जेव्हापासून एकत्र होतो तेव्हापांसून वियोगाकडे जाण्यास सुरवात करतो. आणि वियोग एकत्र झाले तेव्हापासून संयोग एकत्र होण्यास लागतात. एकाचा पुरावा (evidence) एकत्र झाला म्हणजे दुसऱ्याचा पुरावा (evidence) मिळु शकतो.

जगामध्ये संयोग अनुभव (experience) घेण्याकरिता आहेत परंतु लोक कोपऱ्यात बसले आहेत. लग्न करुन सुख कशात आहे ते शोध. बायकोत आहे, मुलात आहे. सासऱ्या मध्ये किंवा सासु मध्ये आहे, कशात सुख आहे? ह्याचा सारांश काढ! लोकांना द्वेष, तिरस्कार वाटतो परंतु ते सारांश शोधून काढत नाहीत. ह्या जगातील नाते हे relative (सापेक्ष) आहे. सत्य (real) नाही परंतु तात्पर्य काढण्याकरिता नाते आहे. तात्पर्य काढणाऱ्या माणसांच्या राग, द्वेष कमी होतो आणि मोक्षाच्या मार्गाचे शोधक होतात.

मनुष्य देहाशिवाय दुसरा कोणता असा देह नाही कीं जो मोक्षाचा अधिकारी आहे. मनुष्य देह मिळाला आणि मोक्षप्राप्तिचा संयोग मिळाला, साधने मिळाली तर काम होऊन जाईल.

शुद्धसंयोग एकत्र होतो तेव्हाच मोक्ष प्राप्त होतो. ज्ञानी पुरुषाना सत्संग हा शुद्धसंयोग आहे. कारण ज्ञानीपुरुषा बद्दल काय लिहिले आहे?

ज्ञानीपुरुषाचा असा एकच संयोग आहे, मूळ निमित्त आहे की जो 'शुद्धात्मा' ग्रहण करतो आणि अहंकार व ममता यांचा त्याग करतो. म्हणून त्यांना मूळ निमित्त आणि एकमात्र मोक्ष प्राप्तिचा शुद्धसंयोगी म्हटले आहे.

परंतु आत्म्याचा तर सर्वांचा संयोगी संबंध आहे. 'शुद्धात्मा' स्वत: संयोगा शिवाय आहे आणि त्याशिवाय दुसरे सर्वच संयोगी संबंध आहेत. संयोग-वियोग हे तर ज्ञेय आहेत तू स्वत: ज्ञाता आहेस. परंतु ज्ञाता ज्ञेयाकार होतो. म्हणून तो अनंत जन्म रखडला आहे. पांच इंद्रियापासून जे दिसत आहे, अनुभविले जाते ते स्थूल संयोग, अंत:करणाचा सूक्ष्मसंयोग आणि वाणीचा संयोग हे सर्व संयोग मिळुन आत्म्याशी संयोगी संबंध मात्र आहेत. नात्याचे संबंध नाहीत. जर ज्ञाता-ज्ञेय संयोग संबंध असला, तर तो अबंधच असतो.

परंतु लोक तर संयोगाबरोबर लग्नाच्या संबंधाच्या कल्पना करुन बसले आहेत. त्यापासून फसवणूक उत्पन्न झाली की त्यातुन बाहेर निघताच येत नाही ना!

आत्मा एकदम निराळा आहे. संयोगाला सर्व तऱ्हेनी पाहू शकतो, समजु शकतो असा आहे. परंतु संयोगाला चिकटून राहीला आणि त्याच्याशी लग्न लावले तर काय होईल? सर्वच संयोग पौद्गलिक आहे, अनात्म्याचे आहेत. गाढव भेटला तर अपशकुन म्हणता येणार नाही. कारण आतमध्ये अनात्मा आणि आत्मा ह्या दोघांचा संयोग एकत्र झाला आहे. खरे म्हटले तर त्यामध्ये आत्मा एकाकार झालेला नाही. परंतु भ्रांतिमूळे तुम्हास एक दिसतो तर ती भयंकर चूक आहे.

सर्वच संयोग automatic- स्वयंचलित एकत्र आले आहेत आणि ज्ञान पण त्यामूळे automatic- स्वयंचलित विभाविक झाले आहे. बाकी द्रव्य बदलले नाही, गुण बदलले नाहीत मात्र पर्याय बदलला आहे. दर्शन-ज्ञान-पर्याय विभाविक झाले आहेत.

एका प्रयोगशाळेमध्ये बसलेला वैज्ञानिक प्रयोगाची सर्वच साधने घेऊन प्रयोग करण्यास बसला असताना एका भांड्यातून अचानक वायु (गैस) सुटून बाहेर आला, तो मनुष्य एकदम बेशुद्ध झाला. तेव्हा तो सर्वच विसरुन गेला. संपूर्ण शुद्धि गेली, परंतु थोड्या वेळाने तो जसा-जसा शुद्धिवर येत गेला तसतसा त्याचा प्रकाश वाढत गेला. आठवण वाढत गेली, आणि त्याला जास्त समजावयास लागले. सुरुवातीस असे वाटले की हे सर्व माझ्याच हातात आहे. माझ्याच सत्तेत आहे. नंतर जसजशी आठवण वाढत गेली तसतसे समजले की हे तर कोणत्याही भगवानाच्या सत्तेत आहे. माझ्या हातात काही सुद्धा नाही. ह्यानंतर तो जेव्हा जास्त शुद्धिवर येत गेला तेव्हा त्यास असे वाटले की हे सर्व भ्रांतिस्वरूप आहे. भगवानच्या सुद्धा सत्तेत नाही. आणि शेवटी जेव्हा संपूर्ण शुद्धिवर आला तेव्हा संयोगच कर्ता आहे असे त्याच्या लक्षात आले आणि तेव्हाच त्याला संयोगातून मुक्तिसुख मिळाले. शुद्धिवर येतानाच हा फरक असा होत असतो. प्रयोग करणारा जर संयोगात एकाकार झाला तर ते भयंकर बेभानपण समजले जाते.

आणि जेव्हा शरीर निराळे आणि मी निराळा असे जर समजण्यात आले तर मुक्तिसुख चाखण्यास मिळते.

अनेक तऱ्हेचे संयोग निर्माण होतात. त्यामध्ये परत तन्मयाकार होतो. तेव्हां नवे बी पडते तर ते कसे समजण्यात येईल? त्याचा जर ज्ञाता-द्रष्टा राहिला तर बी पडत नाही. अनंत तऱ्हेचे संयोग आहेत परंतु ते सर्व उगवण्याच्या लायकीचे राहीले नाहीत म्हणून मोक्ष मिळेल.

मनुष्यमात्र संयोगाने बांधलेला आहे. आमचे महात्मे संयोगाने घेरलेले आहेत. आणि ते सर्वसाधारण संयोगाचे ज्ञाता-द्रष्टा आहेत. संयोगात फसला गेला, बांधला गेला तर शक्ति बंद होते. परंतु ज्ञानी माणसाला संयोग येतात आणि जातात. त्यांचे तन्मयाकार होत नाहीत. त्यांना तर दुरुनच बघणार म्हणजे संयोगाचा वियोग होतो. आत्मा स्वपर प्रकाशित असल्यामूळे त्याच्यामध्ये संयोग चकासतोच.

संयोग निर्माण होतो ते चेतन नाही. संयोग नसतो तेच आपले द्रव्य आहे. कोणाबद्दल भांगली समजूत किंवा खराब समजूत करुन घेणे, ते संयोगाच्या आधीन असते, ते आपले नसतात. संयोग कायम रहात नाहीत. जे येते आणि जाते ते स्वरूप नसते. आपले स्वरूप नसते त्यास आपले कसे म्हणावयाचे. ते तर स्वत:स विचार येतो, ते जर चांगले विचार आले की कोणाचे चांगले करावे, तर त्यास आत्मा असे म्हणतात. परंतु तो आत्मा नसतो. तुम्हाला कोणताही विचार आला परंतु तो 'माझा नाही' इतकेच समजण्याची जरुर आहे. स्वामीपणाचा भाव कोणत्याही संयोगाकरीता नसतो. मग तो चांगला विचार असो किंवा वाईट विचार असो, आम्ही जगास नक्की खात्रीने जसे आहे तसे सांगतो, की ''स्थूल संयोग, सूक्ष्म संयोग आणि वाचेचे संयोग दुसऱ्याचे आहेत आणि पराधीन आहेत''.

आत्मा आणि संयोग दोनच आहेत. कार्य अकार्य संयोगाच्या आधीन आहेत, पराधीन आहेत. स्वाधीन नाहीत. स्वाधीन असते तर न आवडणाऱ्या संयोगास कोणीही एकत्रच होऊ दिले नसते. आणि आवडणाऱ्या संयोगाचा कोणी वियोग होऊ दिला नसता आणि जर मग कोणीही मोक्षास जाऊ शकणार नाही!

जे जे काहीपण तात्पुरते (temporary)आहे, संयोग वियोग आहे, 'माझे' नाहीत असे जर समजले तर ते ''ज्ञान'' सर्वच पर्यायशुद्ध असले की त्यास अनंत ज्ञान म्हणावयाचे. सूक्ष्म तर जेव्हा ज्ञानाचे अनंत पर्याय उत्पन्न होतात तेव्हाच चमकतात, आणि सर्वच पर्याय शुद्ध झाले की तो अनंतज्ञानी परमात्मास्वरूप होतो.

संयोग कर्ता आहे असे ज्ञान नसले तरी अहंकारामूळे जरी कबुल केले तरी फार मोठे पुण्य मिळते. महान देव होतो. ह्याने काही केले आणि उलट झाले तर म्हणतो की संयोगाला का बीज करावे लागले. आणि जर हेच उलटे केलेले आपल्या बाजूचे झाले तर सांगतो की हे असे करावयाचे होते. बस इतके बोलला की त्याच्याकडून सही केली गेली आणि जवाबदारी अंगावर आली. आमच्या महात्म्यांची तर खोटी मान्यता (wrong beliefs) निघून गेली आहे त्यांचे सर्वच संयोग ते आणि तेच, सासरा, जावई, बायको. मुले वगैरे सर्व तेच ते. तरी सुद्धा त्याना अजब तऱ्हेने सुख मिळते.

ज्या संयोगाचा वियोग होणार आहे त्याची भीती का करता? आपणास तर म्हातारपणा नाही, मरण नाही, परंतु संयोग संबंध येतात आणि जातात ज्ञानीपुरुषास मरण आणि जेवण हे दोन्ही संयोग सारखेच असतात. संयोगच असतो.

प्राप्त संयोगाशिवाय जगामध्ये कोणतीही वस्तु नाही. *''प्राप्त संयोगास सारखे ठेऊन समतोलपणाने निकाल करा''.*

हे अजब तऱ्हेने वाक्य निघून गेले. ह्या एकाच वाक्यात जगातील तमाम शास्त्रांचे ज्ञान साररूपाने आले आहे. *प्राप्त संयोगाचे आपण ज्ञाता-द्रष्टा आहे, अप्राप्त चे नाही.*

अकरा बाजता कोर्टात जावयाचे असेल आणि अकरा बाजता जेवणाचे ताट झाले तर त्यावेळेस तो संयोग प्राप्त झाला असे म्हणता येईल. ह्याची आधी व्यवस्था करुन निर्णय करावा लागतो की स्वस्थपणे जेवून घेणे. दोन हातानी काय जेवता येईल का? स्वस्थपणे जेवावयाचे म्हणजे, त्या वेळेस लक्ष कोर्टामध्ये जाता कामा नये. तर शरीर येथे जेवत असेल आणि तुम्ही कोर्टा मध्ये असणार. प्रथम शांत तऱ्हेने जेवा आणि नंतर कोर्टात सावकाश जा. लोक काय करतात की प्राप्त संयोग भोगवू शकत नाहीत आणि जे अप्राप्त आहेत त्याच्यामार्गे वेड्यासारखे लागतात शेवटी ते दोन्ही गोष्टीस दुरावतात. अरे जेवण प्राप्त झाले आहे ते मुख्य समज. त्याचा उपभोग घे. तरच त्याचा निकाल होईल. कोर्ट तर अद्याप दूर आहे. तो संयोग अप्राप्त आहे तर त्याच्यामार्गे कोठे जातोस? संयोगाप्रमाणे आपले कार्य साधुन घ्यावयाचे. संयोग प्राप्त झाला तेव्हा जर आपले कार्य साधले नाही तर मग झालेच. अशी खरी आणि सरळ समजूत कोण करुन देतो. हे तर अनुभवी माणसाचेच काम आहे.

सर्व जगातील सगळ्या प्राण्यासाठी ज्ञानीपुरुष हा उत्तम संयोग आहे.

जवळच्या काळात मोक्षास जाणाऱ्यास सहजरीतीने उत्तम कारण मिळते. मोक्ष

अतिशय सोपा आहे परंतु मोक्ष देणारा संयोग एकत्र होणे अतिशय कठिण आहे. ह्याची दुर्लभता अवर्णनीय आहे.

सर्व तऱ्हेच्या अवतारामध्ये भटकून आलेला आहे. कोठेही खरे सुख मिळाले नाही. तेथे अहंकाराची गर्जना आणि विलापच केला. सुटावयाची इच्छा तर आहे परंतु मार्ग मिळत नाही. मार्ग मिळणे अतिशय कठिण आहे. ह्या ''ज्ञानीपुरुषाचा'' संयोग एकत्र येणे अतिशय कठिण आहे. सर्वच संयोग एकत्र होऊन निराळे होणार परंतु ज्ञानी पुरुषाच्या संयोगाने 'कायमची शांतता' प्राप्त होते. आता तर आपला कार्यभाग साध्य करुन घ्यावयाचा आहे. ज्ञानी पुरुषा बरोबर कायमचे रहावयाचे आहे. अशा भावनेने पराक्रम निर्माण होतो. मग कोणत्याही तऱ्हेचा संयोग आला तरी पराक्रमाने आपण त्यास तोड देऊ शकतो.

## ( १३२ )
## प्राकृत संयोग

हे जे जे काही तुम्हास मिळते ते तुमच्या प्रकृतिस मानवेल असे मिळते. प्रकृति प्रमाणेच प्रत्येक वस्तु मिळते. मिरी पाहिजे असल्यास मिरी मिळते. एलची पाहिजे असल्यास एलची मिळते. वांगी पाहिजे असल्यास वांगी मिळतात. चहा पिणाऱ्यास चहा मिळतो. ज्यास मसाला घालुन चहा पाहिजे. असेल तशा तऱ्हेचा चहा मिळतो. परंतु आतमध्ये जे क्रोध, मान-माया, लोभ आहेत ते ढवळाढवळ करतात. लोभ एकत्र करावयास शिकवितो. परत त्याच्याकरिता कपट करतात आणि भयंकर ढवळाढवळ करतात. अरे काहिच फेरफार करावयाची जरूर नाही. प्रकृति प्रमाणे आतील मागणी प्रमाणे सर्वच तुला आपोआप मिळले. ह्या लोकाना जर विचार आला की उद्या सूर्यनारायण उगवला नाही तर काय होणार? अरे हे सर्वच तुझ्याकरिता आहे. तुला भोगविता आले पाहिजे. हा सूर्य, चंद्र, तारा, हवा पाणी सर्वच तुझ्याकरिता आहे.

प्रकृति प्रमाणे दहा दिवसाकरिता हिल स्टेशन जावयाचे जमले तर दहा दिवस जास्त रहावयास मिळाले असते तर बरे झाले असते असा विचार करतो. आणि जर त्यास दोन दिवस अधिक रहावयास सांगितले तर त्यास ते आवडणार नाही. आपण जे खातो, पितो ते सर्व आपणास प्रकृति प्रमाणे मिळते. परंतु त्याचा लोभ केला तर तेवढे मिळणार नाही. हा त्याग करतो, उपवास करतो ते सुद्धा प्रकृति प्रमाणे होते आणि गर्व करतो कीं, मी केले व त्याग केला तो सुद्धा प्रकृति प्रमाणे होतो.

वडोदऱ्यामध्ये एक शेठजी होते. त्यांची बायको पुष्कळ कच कचणारी होती.

घरी पाच सहा मुले खाऊन पिऊन सुखी होते. परंतु बायको फार जबरी होती. जेव्हा शेठजी कंटाळले, त्यांनी विचार केला ''ह्यापेक्षा जर आपण साधु झालो तर लोक आपणास शेवटपर्वत बाबा-बाबा तर म्हणतील! म्हणून शेठजी हळुच पळून गेले आणि साधु झाले. परंतु बायको फार हुशार होती. तिने शेठजीला शोधून काढले. ती थेट दिल्लीला जैनांच्या देवळात अचानक गेली. तेथे महाराजाचे व्याख्यान चालु होते. आणि शेठ मुंडन करून साधुवेशात बसले होते. तेव्हा शेठाणीने तर तिथल्या तिथेच शेठजीना दम भरण्यास सुरुवात केली. अहो तुम्ही माझ्या बरोबरसुद्धा काय व्यापार मांडला आहे? त्याना शिकविणार कोण? व त्यांचे लग्न कोण करणार? तिने तर शेठजीचा हात पकडला आणि त्याचा हात धरून खेचावयास सुरवात केली. शेठजी समजून गेले, जर जास्त आढे वेढे केले तर आपली आबरु जाईल! त्यानी सांगितले की, अग थोडा वेळ थांब. मला कपडे तरी बदलु दे'' तेव्हा शेठाणी सांगु लागली, ''नाही. असे तुम्हाला आता मी पळून जाऊ देणार नाही. असेच्या असे चला घरातून पळुन जाताना तुम्हाला शरम वाटली नाही?'' आचार्य महाराजसुद्धा ते भाषण समजून गेले आणि त्यानी शेठजीना खुणेनी निघून जाण्याचा इशारा केला आणि शेठाणी तर शेठजीना त्याच वेषात घेऊन घरी परत आल्या. प्रकृतिमध्ये त्याग नव्हता. म्हणून त्याना परत जावे लागले!

एक महाराज पुष्कळ म्हातारे झाले. त्यांचे हलन-चलन बंद झाले. त्यांची सेवा करण्याकरिता कोणी मनुष्य मिळाले नाही म्हणून महाराजाना घरची आठवण आली. बिचारे दुसऱ्याच्या मदतीने घरी पोहोचले. शेवटच्या वेळी मुलगा आणि सून सेवा करतील अशी त्याना आशा वाटली. परंतु घरी मुलाने व सूनेनी ठासून त्याना घरी ठेवण्याचे नाकारले. फक्त प्रकृतिमध्ये त्याग होतो म्हणून तो त्याग समोर आला.

असे प्रकृतिचे विचित्र आहे! ही प्रकृतिकाय असेल? ही जर कोणी वस्तु असती तर तिचे नाव आपण गंगाबाई असे ठेवले असते. परंतु तसे नाही. प्रकृति म्हणजे circumstantial evidences- परिस्थितिजन्य पुरावा. ही प्रकृति तर जशी नाचवेल तसे नाचतो आणि सांगतो की 'मी नाचलो, मी त्याग केला'. प्रकृतिमध्ये त्याग असेल तर होईल नाहीतर ती शेवटी बायकोसुद्धा उचलुन नेते.

प्रकृतिचा शेवट येईल असे नाही. जर स्वतः पुरुष होऊन बसला तर प्रकृतिप्रकृतिचे काम करते आणि पुरुष पुरुषाच्या भागत रहातो. पुरुष म्हणजे परमात्मा. जो पर्यंत परमात्मा झाला नाही तो पर्यंत प्रकृति नाचवेल त्या प्रमाणे नाचत असतो.

सर्वच पुस्तकामध्ये पुरुषाचे म्हणजे आत्म्याचे ज्ञान समजावून घ्यावे असे सांगितले आहे. परंतु प्रकृतिची माहिती करून घेण्यास कोणीही सांगितले नाही. अरे

दुसऱ्याची कृति जाण म्हणजे आत्म्यास ओळखशील. जर तेल आणि पाणी एकत्र झाले असेल तर पाण्यास ओळख आणि निराळे कर. म्हणजे तू तेलास ओळखशील. आम्ही सांगतो की, प्रकृतिज्ञानाची माहिती करून घ्या. जो जो भाग चंचल आहे तो सर्वच प्रकृतिचा भाग आहे. त्यास तू समजुन घे. चंचल भागात काय काय आले? पांच इंद्रिये, डोळे जरी बघु नये तरी बघतील. बांद्र्याची खाडी आली आणि वास घेऊ नये तरी नाक वास घेईल. शरीर चलविचल करणारे आहे ते कसे? जर समोरून मोटार जोरात आली तर तो मनुष्य ताबडतोब बाजुला सरकुन जाईल आणि मग मन वगैरे कोणीही काहिच करणार नाही. मन व चित्त चंचल आहे. स्वत: इथे बसला असाल पण चित्त स्टेशनाकडे जाईल. बुद्धि सुद्धा चंचल आहे. जर स्त्री आंघोळ करित असेल तेव्हा बघु नकोस असे सांगितले तरी ती बुद्धि पटकन दाखविते. जर कोणी बोलले की ये कीर्तिभाई तर ते एकदम छाती पुढे काढतात. ही अहंकाराची चंचलता आहे. हा सर्व अहंकाराचा चंचल भाग आहे त्या चंचल भागास संपूर्ण समजावून घेतले तर बाकी जो शिल्लक राहिलेला अचल भाग तोच आत्मा. दया, मान, अहंकार, शोक, हर्ष, सुख, दु:ख हे सर्वच गुण आहेत. हे सर्व प्रकृतिचे गुण आहेत. प्रकृतिम्हणजे चंचल विभाग. चपळ (active) विभाग आणि आत्मा पुरुष हा अचंचल आहे. जर पुरुषास ओळखले तर आत्मज्ञान होईल, आणि मग परमात्मा होता येईल.

## ( १३३ )
## योग-एकाग्रता

एक इंजिनिअर गृहस्थ माझ्याकडे आले. ते मला म्हणाले, "दादा मला मोक्ष साधन पाहिजे". मी त्याना विचारले, "तुम्ही आतापर्यंत कोणती साधना केली?" त्यानी सांगितले, 'मी एकाग्रता करतो'.

मी त्याना सांगितले जो व्यग्रतेचा रोगी आहे तो एकाग्रतेचे औषध घेतो. एकाग्रता कोण करतो? ज्याला व्यग्रतेचा रोग आहे तो. ह्या मजुरांना एकाग्रता का करावी लागत नाही? कारण त्यांना व्यग्रता नाही म्हणून. आम्ही ज्ञानीपुरुष सुद्धा एकाग्रता करित नाही. आम्हास व्यग्रता नावाला सुद्धा नाही. ज्यांच्या अंगाची लाही लाही होते तेव्हा ते थंड वाटण्या करिता त्याच्यावर औषध लावतात. ह्यात आत्म्यावर तू काय उपकार केलास? तुझी एक तरी चिन्ता कमी झाली का?

गृहस्थ खूप हुशार होते. त्यानी सांगितले, "दादा, माझी बुद्धि fracture झाली. तुम्ही सांगितले ते मला एकदम पटले. म्हणून हा माझा रोगच निघून गेला".

परंतु थोडेसे सांगावयाचे राहून गेले आणि मला परत सांगितले ''दादा मी तर रोज चार तास योग करतो ना?''

मी विचारले कशाची योग साधना करता? समजलेल्याची का न समजलेल्याची? तुम्ही आत्म्यास तर जाणले (ओळखले) नाहीत. तुम्ही तर शरीरासच जाणले. म्हणून शरीरास ओळखून शरीराची साधना केली. अनोळखी माणसाच्या चेहऱ्याचे ध्यान कोणाला करता येईल का? करता येणार नाही. जो आत्म्याला जाणत नाही, त्याला आत्म्याचे ध्यान कशा रितीने करता येईल? हे केले ती देह साधना झाली. त्यामध्ये आत्म्यावर काय उपाय केला. आत्मयोग उत्पन्न झाला तरच मोक्ष होतो. देह योगाने तर संसाराचे फळ मिळते. हे आमचे महात्मे सर्वच आत्मयोगी आहेत. आणि आम्ही आत्मयोगेश्वर आहोत.

योग म्हणजे to join- जोडणे. युज धातुपासून योग शब्द तयार झाला आहे. ज्याला आपण ओळखतो त्याचाच योग होतो. शरीराचाच योग, तर कोणी मनाचा सुद्धा योग करतात. अशा योगामूळे भौतिकशक्ति वाढते. परंतु मोक्ष मिळत नाही. आत्मयोगानेच मोक्ष मिळतो.

ह्या जगामध्ये मनोयोगी आहेत. बुद्धियोगी, उलट सुलट बुद्धिवाले कित्येक सरळ आणि कित्येक विपरीत बुद्धिवाले आहेत. देहयोगी, तपस्वी आणि वचनयोगी वकील वगैरे जातजातीचे आणि निरनिराळ्या तऱ्हेचे योगी आहेत. आत्मयोग हा एकच खरा योग आहे. दुसरे सर्वच अयोग. आत्मयोगात बसला असताना मन 'फाईल' दर्शवते. तेव्हा त्यांला म्हणावे की तुम्ही येथून निघून जा. नाहीतर मी तुमचा अपमान करीन. आता येऊ नका. मग आत्मयोगांच्या ध्यानात रहाल तेव्हा अनुभव येईल आणि ती अनुभूती जात नाही. स्वरूपाच्या भानाशिवाय जे जे जाणता तेच जाणले आहे असे म्हणता येईल. आत्मयोगी झाला म्हणजे स्वरूपाचे भान होते. ज्ञानयोग हाच सिद्धांत आहे. त्रियोग- मन वचन काया ह्यांचा योग हे असिद्धांत आहे.

## ( १३४ )
## सहज समाधि

योग मार्गाच्या समाधि मध्ये मन, वचन, काया यांचा जळफळाट होतो तेव्हा योगापासून देहास शांती मिळते खरी. परंतु मुक्तिसुख अनुभविता येत नाही. हे सुख तर आत्मयोगीच अनुभवू शकतात.

समाधि कशास म्हणतात? ह्या देहयोगाने कष्ट करून प्राप्त केलेली म्हणजे

जितके वेळा हँडल फिरवू तितका वेळ शांती वाटते. कायमचा शांतपणा तर निर्विकल्पसमाधि उत्पन्न होते तेव्हाच मिळतो. निर्विकल्पसमाधि म्हणजे सहजसमाधि, उठता-बसता, खाताना, पीताना, फिरताना, भांडणे होताना समाधि जात नाही. अशी समाधि उत्पन्न होते तेव्हाच मोक्ष प्राप्त होतो.

विकल्पी केव्हाही निर्विकल्पी होऊ शकत नाही. हे तर जो स्वतः निर्विकल्पी natural- सहजरित्या झाला आहे तोच दुसऱ्याला निर्विकल्पीपद देऊ शकतो. देह आणि आत्मा एकदम सुटा आणि सुटाच रहातो. कधीही तन्मयाकार होत नाही मग कोणतीही अवस्था असो. त्याचेच नाव निर्विकल्प समाधि .

संकल्प-विकल्प बंद झाले तेव्हाच आत्मा निर्विकल्पी होतो. निर्विकल्पाचे ज्ञान घेतल्याशिवाय निर्विकल्पी होऊ शकत नाही. असे कित्येक योगी आहेत की जे संकल्प विकल्प काढून टाकतात आणि एकच संकल्प करतात आणि तो ''मी च आहे'' असा असतो. प्रकाश (light) नसतो. ती स्थिती उच्च असते. तेज येते. परंतु ज्ञान होत नाही. वस्तुला (आत्म्याला) स्वतःचा स्वगुण असतो, स्वधर्म असतो, स्वअवस्था असते. भगवान अल्लख निरंजन आहे. ते ज्ञानीपुरुषाच्या लक्षात येते. जो पर्यंत ध्येय जाणत नाही तो पर्यंत ध्येयस्वरुप होत नाही. हजारो तारे आकाशातून पडले तरी सुद्धा सहजसमाधि जात नाही. धारणा तर कल्पित असते. 'इन-डायरेक्ट प्रकाश' हा 'रिलेटिव आत्मा' आहे. 'रीयल आत्मा endles म्हणजे अनंत' रहातो. त्यात फक्त ज्ञाता-द्रष्टापणा रहातो. सर्व तऱ्हेने मनाचे समाधान रहाते- त्याचे नाव ज्ञान. पांच ही इन्द्रिये जागृत असतील आणि समाधि राहील तीज खरी समाधि .

प्रत्येक अवस्थेत अनासक्त योग हीच संपूर्ण समाधि. नाक दाबून तर काय समाधि मिळते का? ह्या लहान मुलाचे नाक दाबले तर तो ताबडतोब चावेल. कारण तो गुंगळाउन जाईल. आधि, व्याधि आणि उपाधि नसली तर त्यास समाधि म्हणावयाची. मरते समयी शेवटी जेव्हा जावयाचे असते तेव्हा स्वतःचा भाग संपूर्ण समेटुन घेतो आणि त्याच्याच समाधि मध्ये रहातो. आमचे सम्यकदृष्टीच्या महात्म्यांना समाधि मरण येते. शुद्धात्म्याच्या लक्षाबरोबरच देह सुटतो.

प्रश्नः- वृत्ति स्थिर न रहाण्याचे कारण काय?

दादाः- तुम्ही स्वतः स्वस्थ बसू शकता काय? तर मग वृत्ति स्थिर कशा तऱ्हेने राहू शकेल? वृत्ति स्थिर करण्या करिता खूपच साधने आहेत परंतु अडचणी सुद्धा अपार आहेत. विविध तापात सुद्धा समाधि राहू शकते.

## ( १३५ )
## ध्याता-ध्येय-ध्यान

प्रश्नः- दादा, ध्यान बरोबर होत नसेल तर काय करावे?

दादाः- ध्यानात तर मी तुम्हास आताच बसवितो. परंतु जर पुष्कळ पायऱ्या राहिल्या तर त्या ध्यानाचे काय करावयाचे? मी तुम्हास सरळ मोक्षामध्येच बसवीन. आपल्याला तर real- सत्, तेच सर्व मागून घ्यावयाचे आहे. सापेक्ष relative ध्यान कशाला मागावयाचे? हे तर अपूर्ण आहे.

प्रश्नः- हे तर फार कठिण आहे ना?

दादाः- मी देणारा आहे ना. मग अडचण कसली? एका प्रधानाच्या ओळखीने सर्व कामे होतात तर ज्ञानीपुरुषाच्या ओळखीमूळे काय होणार नाही? आमच्याकडे भेदभाव नसतो. वीतरागता असते. खरा असतो तो भेटतो आणि त्याला आम्ही ज्ञान देतो.

हे तुम्ही ध्यान करता परंतु ते कशाचे ध्यान करता? त्याचे ध्येय काय? ध्याता कोण? ध्येयास ओळखल्या शिवाय, नक्की केल्याशिवाय ध्यान कशाचे करावयाचे? ध्यान हे साधन आहे. ध्येय स्वरूपाचे, आणि ध्याता ''शुद्धात्मा'' तर ते ध्यान यशस्वी होईल. बाकी, मी चंदुभाई आणि तो ध्याता मानुन स्वतःची कल्पना करून ध्येय नक्की करतो आणि स्वतःच्याच कल्पनेने जसे येईल तसे ध्यान करतो. त्याचा काय फायदा होईल? असे केव्हा बरे होईल आम्ही तुम्हाला ज्ञान देतो तेव्हा तुम्हास real- सत् ध्याता बनवून तुमच्या स्वरूपातच बसवितो, ध्येय, ध्यान आणि ध्याता एकच स्वरुप होतात. स्वरूपातच रहातो. तेव्हाच मोक्ष मिळतो. बाकी हे तर तुम्ही ध्यान करण्यास बसला असाल आणि नक्की केले असेल की, आज ध्यान करताना अमुक इन्कम टेक्स किंवा अमुक विषयांचा विचार येऊ नये. जेव्हा तो बसतो तेव्हा पहिल्या न आवडणाऱ्या विषयाचे विचार येतात. त्यास ध्यान कसे म्हणता येईल? एक शेठ ध्यान करित होते तेव्हा कोणी विचारले, शेठजी कोठे गेले आहेत? शेठाणीने उत्तर दिले की, शेठजी हरिजन वस्तीत गेले आहेत. शेठजीने पत्नीला मनापासून नमस्कार केला. खरोखर शेठजी ध्यानास बसले असताना त्या वेळेस ध्यानात तोच विषय होता.

जर हे ध्यान यथार्थ तऱ्हेने केले तर त्याच्यात अजब तऱ्हेची शक्ति असते! ध्यानाची व्याख्या समजून घ्या. ध्येय नक्की होते म्हणून ध्याता होतो. ध्याता आणि ह्यास जे जोडते ते ध्यान असते. जर एक तास हुक्याकडे बघितले व मग ध्येय नक्की केले

की हा हुक्का मला पाहिजे. मग जरी तो दुकानात असला आणि ध्येय हुक्याचा साक्षात्कार करावयाचा आहे असे नक्की केल्यानंतर मग पन्नास मिनिटे एकसारखे त्याचे ध्यान करा. एक सेकंडसुद्धा वाया जाऊन देऊ नका. तर पन्नास मिनिटात हा हुक्का तुमच्या हातात येईल. कोठून येईल ते विचारू नका. ध्यानाची एवढी मोठी अजब शक्ति आहे! जर पद्धतशीर ध्यान केले तर ध्येयाचा साक्षात्कार अवश्य झालाच पाहिजे. परंतु ही जर रीतच खोटी असली तर जबाब कसा मिळेल? फळ कसे मिळेल? ध्यान करण्यामूळे भगवान सुद्धा प्राप्त होईल असे आहे. ध्यानामध्ये अजब शक्ति आहे. परंतु ध्यान जर समजले तर काम होईल. हे ''दादा'' कधीही जे घडले नाही असे भगवानपद तुम्हास पन्नास मिनिटात देतात. तर दुसरे काय मिळणार नाही?

जर आठ मिनिटांपर्यंत ध्यान केले तर ते जमा होता होता पन्नास मिनिटे होते. आठ मिनिटांचे ध्यान जमा होते. सात मिनिटांचे जमा होत नाही.

प्रश्न :- स्वतःच्या ''शुद्धात्म्या''चे गुणधर्म- अनंतज्ञान आणि अनंतदर्शनचे ध्यान केले तर ज्ञान प्राप्त होते का?

दादा:- होते. अवश्य होते. आत्म्याचे जितके गुण जाणाल आणि त्यांचे ध्यान कराल तितके गुणधर्म प्राप्त होतील.

दादा:- भगवान हे नाम आहे की, विशेषण आहे?

लल्लुभाई:- नाम.

दादा:- जर नाव असेल तर आपण त्याना भगवानदास म्हटल पाहिजे! भगवान हे तर विशेषण आहे. जसे भाग्य ह्यावरून भाग्यवान झाले आहे तसे भगवत् वरून भगवान झाले आहे. जो कोणी भगवानचे गुण प्राप्त करील त्यास ते विशेषण लागू पडेल. आम्हास सर्व भगवान म्हणतात. परंतु 'आमचे पद' निर्विशेष अनुपमेय आहे. त्याला विशेषण काय देणार? ह्या देहास देणार? ह्या देहाचा तर नाश होणार आहे. आतमध्ये जो प्रगट झाला आहे तोच भगवान आहे. अजब तऱ्हेचा प्रकाश पडला आहे.

शुद्धज्ञान हाच भगवान आहे. आत्मा हा पण शब्द देण्यात आला आहे. आत्मा हा संज्ञासूचक शब्द आहे. ज्ञान हेच भगवान आहे. ज्ञान सर्वच चालवते परंतु शुद्ध ज्ञानाचे दर्शन झाले पाहिजे. शुद्ध ज्ञानमूळे मोक्ष मिळतो. सद् ज्ञान वापरले तर सुख मिळेल. अज्ञानीपणा राहिला तर दुःख प्राप्त होईल. कोणाचा बाप सुद्धा वरिष्ठ नाही. भगवान कोणास म्हणतात? जो ह्या जगात 'स्वतंत्र' झाला आहे तो आणि ज्यांच्यांपेक्षा कोणी श्रेष्ठ नाही तो भगवान. श्रेष्ठ नाही आणि जूनियर- कनिष्ठपण नाही. परंतु ज्याला

स्वत:चे परावलंबनच समजत नाही तेथे 'स्वतंत्रपणा' कसा समजणार? संसार हा तर परावलंबनच समजत नाही तेथे 'स्वतंत्रपणा' कसा समजणार? संसार हा तर परवशपणाचे संग्रहस्थान आहे, आणि परवशता हेच दु:ख आहे. लोक तर स्वत:, स्वत:पासूनच गुप्त राहिले आहेत! जितके विचार येतात तितके जगात मार्ग आहेत. तुला जो मार्ग योग्य वाटेल त्या मार्गानी भटकत रहा. आणि जेव्हा थकून जाशील तेव्हा ह्या मोक्षाच्या रस्त्यावर ये. जेव्हा तुला स्वतंत्र व्हावयाचे असेल तेव्हा ये. तुला घाबरल्या सारखे होईल आणि सहन झाले नाही तेव्हा ये. अरे संसार खोटा नाही, जगामध्ये काहीच खोटे नाही परंतु तुझी समजूत खोटी आहे. जगामध्ये क्षणाक्षणास भय आहे. क्षणाक्षणास परवशताच आहे. त्याच्यामूळेच तु घाबरा होतोस.

कित्येकानी तर यमराज, यमराज म्हणून लोकाना घाबरुन सोडले आहे. यमराज बिमराज असतो. तेव्हा लोकांनी निरनिराळ्या तऱ्हेच्या यमराजाची चित्रे रेखाटली आणि मोठमोठ्या दातवाल्या राक्षसांची रूपे रेखाटली आणि लोकाना घाबरविले. अरे, यमराज नावाचे कोणी जनावर नाही. हा तर नियमराज (नियमानी चालविणारा) आहे. नियमराज सर्वच चालवितो. नियमराज जिवंत ठेवतो आणि नियमराजच मारतो. जर अशी खरी समजूत झाली तर मग काही भय किंवा भटकणे राहिले आहे का?

कोणी सांगितले की, ह्या जंगलाच्या रस्त्यातून तुला जावयाचे आहे तेथे वाघ सिंह नाहीत. परंतु त्याच्याबरोबर तो एक गोष्ट सांगण्यास विसरला की, एका बाजूस वाघ सिंह आहेत परंतु ते पिंजऱ्यात आहेत. बस. एवढेच सांगवयाचे राहून गेले आणि तो जंगलाच्या रस्त्याने गेला. तेथे वाघाने एकच अवाज काढली तेव्हा तो भीतीने थरथर कापू लागला आणि परत पळून आला. जर त्याला त्याने आधिच सांगितले असते की वाघ सिंह आहेत परंतु ते पिंजऱ्यात आहेत तर त्यास भीति वाटली नसती. त्याच्या अपूर्ण ज्ञानामूळे तो भिऊन पळून आला.

## ( १३६ )
## गुरुकिल्ली

भगवानांनी सांगितले होते की, गुरु होऊ नका. आणि झालात तर गुरुकिल्ली स्वत:कडे ठेवा नाहीतर धुंदी चढेल आणि तुम्ही त्यामूळे बुडून जाल. भगवान कोणाचेही गुरू नव्हते आणि हे सर्व लोक ठिकठिकाणी गुरु होऊन बसले आहेत. घरी दोन मुले आणि बायको अशा गळ्यातल्या तीन घंटा सोडून दोनशे पन्नास (२५०) शिष्यरूपी घंटा गळ्यात अडकवून बसला आहे. अरे बुडून जाशील. गुरु म्हणजे वजनदार, खूपच वजनदार. स्वत: बुडतो तर बुडतो परंतु दुसऱ्यास सुद्धा बुडवितो. आम्ही लहानात लहान

आहोत. आम्ही तर स्वत: बुडणार नाही आणि कोणाला सुद्धा बुडवणार नाही. आम्ही फुलासारखे हलके आहोत. आम्ही स्वत: तरतो आणि सर्वांना तारतो. कारण आम्ही तरण तारण आहोत. स्वत: तरलो म्हणून दुसऱ्या अनेकाना तारण्याचे सामर्थ्य आमच्यात आहे.

भगवानांनी सुद्धा सांगितले की, गुरुपद हे जोखमदारीचे पद आहे इतके लक्षात ठेव, नाही तर मेलाच असे समज. जर गुरु व्हावयाची इच्छा असेल तर ज्ञानी पुरुषाकडून गुरुकिल्ली घेऊन जा. तरच काम होईल नाही तर भयंकर धुंदी चढेल असे हे पद आहे. गुरुपद हे तर जवाबदारीचे स्थान आहे. लोकांचे गुरु झालेले पांच सहा गुरू एकदा माझ्याकडे आले ते मला विचारू लागले ''काय लोकांना गुरु नको आहे''?

दादा:- खरे तेच कामाचे बाकी सर्व गुरु म्हणजे वजनदार आणि वजनदार ते बुडणार व दुसऱ्या बुडवणार. मी तर लघुत्तम पुरुष आहे आणि गुरुत्तम पुरुष आहे. मी काही कच्चा नाही की गुरु होऊन बसेन. तू गुरु होऊन बसला आहेस तर लक्षात ठेव की तू लहान आहेस, नाही तर लघुग्रंथीच्या आठवणी झाल्यांशिवाय, गुरु झाल्यामूळे तु बुडशील आणि दुसऱ्यांला बुडवणार.

आगम ज्ञान तर सर्वांच्या नजरेच्या बाहेरच गेले आहे. कधीही माहित पडणार नाही ते आगम. आम्ही तुम्हास आगमांचे ज्ञान दिले आहे. निगमांचे ज्ञान लोकांना असते, परंतु अगमचे ज्ञान नसते. गुरूगम हा शब्द आहे. परंतु गुरु स्वत:च उत्तर दिशेस दक्षिण समजतो. तर त्याचे काय होणार?

शुष्क ज्ञान म्हणजे ज्याचा परिणाम होत नाही ते. झाडावर फूल येते परंतु पपई येत नाही. तर आज ठिकठिकाणी शुष्क ज्ञान पसरले आहे. काळाची विचित्रता आहे.

## ( १३७ )
## अक्रम ज्ञान – क्रमिक ज्ञान

क्रमिक मार्गामध्ये सापेक्ष (Relative) धर्म भाषेमध्ये जो व्यवहारनिश्चयाचा भाग पाडण्यात आला आहे तो बुद्धिप्रमाणे बरोबर आहे. परंतु अक्रम मार्गाच्या सत् धर्माच्या (Real) ज्ञानभाषेमध्ये तो निश्चय व्यवहार आहे. अर्थात निश्चय यथार्थ प्रगट होतो. त्यानंतरच यथार्थ व्यवहाराची सुरुवात होते. अशा निश्चय व्यवहार संबंधामध्ये यथार्थ निश्चयाने यथार्थ व्यवहार असतो. आणि म्हणून कोणतीही जात असो, वेश असो, वर्ग असो किंवा मग कोणत्याही प्रकारची अवस्था असो परंतु तिथे दरेक परिस्थितीत संपूर्ण समाधानकारी ज्ञानजागृती रहाते. अर्थात् असमाधान मात्र थांबले जाते! तात्पर्य हे की

यथार्थ व्यवहार तेव्हाच म्हणावयाचा की जेव्हा व्यवहाराविषयी यथार्थ निश्चय प्रगट होते. सर्व अवस्थेमध्ये सर्व समाधानी रहाते असे हे ज्ञान आहे!

## ( १३८ )
## चार गति भटकंती कशामूळे?

आत्मा स्वत: पुद्गलाने उर्ध्वगतित खेचतो. जेव्हा पुद्गलांचा बोजा वाढतो तेव्हा पुद्गल अधोगतिला नेतो. ह्या कलियुगात तर धर्म अशा तऱ्हेने समजून सांगावा की अरे बाबा, हिंसा, चोरी वगैरेची इच्छा तुला जर झाली तर ती ताबडतोब काढून टाक म्हणजे त्यामूळे तुझी अधोगति होणार नाही! पाशवी आणि राक्षसी विचार काढून टाक. तसे करशील तर स्वभावच आहे की उर्ध्वगतिला जातो.

ह्या मूळे गति छान राहील. संपूर्ण दिवस पशुवृत्ति चे आणि राक्षसी विचार करीतच राहतो त्यामूळे आत्म्यावर आवरणाचे लेप चढले जातात. स्वत:च्या स्वार्थबुद्धितच रहात असतो. तीच पाशविकता आहे. ही टेप पुसता येते. त्याप्रमाणे आपल्या आत असलेले पण पुसू शकतो.

''ज्ञान हाच आत्मा आहे'' ज्याला जसे ज्ञान असेल तसा त्याचा आत्मा होतो. विपरीत ज्ञान म्हणजे विपरीत आत्मा होतो. जशी ज्ञानावर श्रद्धा तसा तो होतो. श्रद्धा बसली म्हणजे श्रद्धेला मदत करणारे ज्ञान मिळते. ज्ञान आणि चारित्र्य एक झाले म्हणजे चारित्र्य तसेच होते! आत्मा तसाच होतो! एखादी बाई तिच्या सुनेला वेडी म्हणते. परंतु जोपर्यंत तिची श्रद्धा बसली नाही तोपर्यंत तिच्यावर काहीही परिणाम– effect होणार नाही. जरी सर्व जगाने सांगितले तरी सुद्धा तिच्यावर मानसिक परिणाम होणार नाही परंतु तिची श्रद्धा बदलली तर ती खरोखरच वेडी होईल. म्हणून कोणाचेही वजन ह्या जगामध्ये पडु द्यावयाचे नाही. तु ज्याची जशी प्रतिष्ठा केलीस तसाच तुझा प्रतिष्ठित आत्मा तयार होईल.

प्रश्न:– 'श्रद्धा' आणि ज्ञान ह्यात फरक काय?

दादा:– श्रद्धा हे अनिर्णित ज्ञान आहे. ज्ञान हे निर्णित 'ज्ञान' म्हणजे अनुभवाचे 'ज्ञान' आहे. तुम्ही बागे मध्ये बसला असाल आणि काही आवाज झाला तर मी म्हणेन की काही तरी आहे, तुम्ही सुद्धा म्हणाल की काही तरी आहे. ह्याचे नाव कोणते ज्ञान? ह्याचे नाव 'श्रद्धा' अथवा 'दर्शन'. नंतर सर्व तपास करण्याकरिता उठून गेलात. हात फिरवून सर्वानी नक्की केले की ही गाय आहे. त्यास ''ज्ञान'' म्हणतात. परंतु विश्वास (belief) ठेवला तर पहाताना एखादे वेळेस चुकीचे निघेल सामान्य रीतीने जाणणे म्हणजे

दर्शन म्हणावयाचे. आणि विशेष रीतीने जाणणे त्यास ज्ञान म्हणावयाचे.

खिसा कापणाऱ्याला खिसा कसा कापता येणार? पहिली श्रद्धा उत्पन्न होते, त्यानंतर ज्ञान मिळते आणि चारित्र्य तर आपोआपच येते.

ज्ञान दर्शनाचे फळ क्रिया व दर्शनाचे क्रियमाण फळ. लोक त्याला चारित्र्य म्हणतात. सम्यक् म्हणजे यथार्थ सत् (real) सम्यक् ज्ञान सम्यक् दर्शनाने सम्यक् चारित्र्य निर्माण होते. ज्याचे मध्ये सत् (real) चारित्र्य असेल तो संपूर्ण भगवान. सत् (real) चारित्र्याने कोणालाही दुःख होत नाही.

वर्तन, belief, दर्शन आणि ज्ञान एकमेकावर अवलंबून आहेत. जसा belief-विश्वास तसे च ज्ञान आणि तसेच वर्तन. वर्तन काही करावयाचे नसते.

क्रिया ही आत्मा नाही. आत्म्याचा गुणधर्म तर स्वतःचा आहे, परंतु आत्म्याचे सक्रियपण नाही. जशी जशी कल्पना करतो तसतसा अनुभव येतो. सुख-दुःख ही वस्तु नाही कल्पना आहे. आत्म्याची एवढी भयंकर शक्ति आहे परंतु तो स्वतः निर्लेप आहे. आत्म्याच्या हजेरीमूळे दुसऱ्या सर्वाची सक्रियता दिसते.

भगवान काय म्हणतात की जी कार्ये केली त्याचे फळ मिळणारच. ज्या क्रियेमूळे फळ मिळणार नाही त्या क्रियेपासून मोक्ष. परम विनयाने मोक्ष मिळतो. ह्याशिवाय सर्वच जंजाळ आहे. ह्याचा शेवट येणार नाही. गुहेमध्ये बसला तर गुहेची जंजाळ होईल आणि संसारात असला तर संसाराची होईल. अशा रीतीने जेथे असेल तेथे जंजाळ असणारच.

लोक म्हणतात की  क्रिया करा. परंतु ज्ञानाशिवाय क्रिया कसली? क्रिया तर ज्ञानाची दासी आहे. भगवानने सांगितले की ज्ञानक्रिया करा. ''ज्ञान क्रियाभ्यां मोक्षः''.

'ज्ञानक्रिया' म्हणजे काय? स्वतःच्या स्वरूपातच रहाणे आणि जाणणे दर्शनक्रियेमध्ये बघावयाचे. बघणे आणि जाणणे हीच आत्म्याची क्रिया आहे. परंतु आत्म्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही तत्त्वामध्ये ज्ञान दर्शन क्रिया नसते.

दादाः- आत्मा देहापासून निराळाच असेल ना ?

नवनीत भाईः- वेगळाच आहे.

दादाः- तर हा देह तू चालवतोस की कोणाच्या मदतीने चालतो? हा तर 'व्यवस्थित' शक्तिच्या मदतीने सर्व चालतो. हे सर्व करते ती 'व्यवस्थित शक्ति' करते. ह्यामध्ये आत्मा काहीच करीत नाही. तो तर फक्त बघतो आणि जाणतो.

जो जाणतो तो करीत नाही आणि जो करतो तो जाणत नाही. करणारा असेल तेथे जाणणारा नसतो आणि जाणणारा असतो तेथे करणारा नसतो. ह्या एंजिनला विचारले तर ते सांगते की नाही बाबा मला, काहीच माहीत नाही. हा इलेकट्रिक बल्ब (light) प्रकाश देतो. परंतु तो समजत नाही. ह्या समुद्रातून जहाजने तुम्हाला किनाऱ्याला आणले का जहाज किनाऱ्याला आणले? जहाजाने आणले. प्रवास करणार ते परंतु जाणत नाही.

ह्या प्रमाणे जाणणार आणि करणार ह्या दोन्ही बाजू वेगळ्या असतात परंतु जो करतो तो जाणत असेल तर असे म्हटले की प्रवाह सुटे वाहत होते ते एकत्र होतात म्हणूनच ते तर स्वादिष्ट वस्तु सुद्धा बेचव कढीसारखी लागते ना? कर्ता प्रवाह आणि ज्ञाता प्रवाह दोन्ही निराळेच आहेत.

जो करतो तो जाणत नाही आणि जो जाणतो तो करीत नाही. कारण की कर्तेपणामध्ये पुरावा (evidence) पाहिजे. परंतु ज्ञातेपणास पुराव्याची (evidence) जरुर लागत नाही. कारण काहीपण करावयास लागले की त्यास संयोगीपुरावा पाहिजे. आपोआप होत नाही.

## ( १३९ )
## प्रज्ञा

प्रज्ञा हा आत्म्याचा सरळ (direct) प्रकाश आहे. परंतु बुद्धि ही अप्रत्यक्ष (indirect) प्रकाश आहे, दुसऱ्या माध्यमातून येणारा प्रकाश आहे.

केवळज्ञानाच्या अंश स्वरूपाच्या भागास आम्ही प्रज्ञा म्हणतो. प्रज्ञा हा ज्ञानपर्याय आहे. जसजशी आवरणे तुटत जातात तसतसा प्रकाश वाढतो. आणि तितके केवळ ज्ञान अंशांनी वाढत जाते. संपूर्ण केवळ ज्ञान तर ३६० डिग्री पुरे झाल्यानंतर होते.

ज्याप्रमाणे एका माठामध्ये हजार व्होल्टेजचा दिवा बसविला आणि जर माठाचे तोंड बंद केलेले असेल तर प्रकाश मिळेल काय? मिळणार नाही. तसे हे मूढ आत्म्याचे आहे. आंत तर खूप ज्ञानाचा प्रकाश आहे परंतु आवरण असल्याकारणाने घोर अंधार असतो. ज्ञानीपुरुषांच्या कृपेमूळे, त्याच्या सिद्धिच्या बळाने ज्याप्रमाणे माठामध्ये जर बारीक भोक पाडले तरी सर्व खोलीभर प्रकाश पसरेल त्याप्रमाणे आवरण तुटुन त्याचा (direct) सरळ प्रकाश आत्म्यावर पडेल. जसजशी आवरणे दूर होतात तसतशी जास्त भोके पडतात व तसतसा प्रकाश वाढत जातो आणि जेव्हां सर्व माठ फुटून जातो आणि बल्बपासून निराळा होतो तेव्हां संपूर्ण प्रकाश सर्व खोलीभर पडतो!

Direct सरळ ज्ञानाचे किरण पडते त्यालाच प्रज्ञा म्हणतात. जेव्हा सर्व आवरणांतून आत्मा मुक्त होतो तेव्हा त्याला सर्व ब्रह्मांडावर प्रकाश पाडण्याची शक्ति प्राप्त होते, सर्व ब्रह्मांडाला प्रकाशित करतो. दुसऱ्या शब्दात् सबंध ब्रह्मांडाच्या ज्ञेयाने पाहण्याची आणि जाणण्याची शक्ति प्राप्त होते तेच केवळज्ञान.

स्वत: सर्व ब्रह्मांडास प्रकाशित करण्याची स्वत:ची शक्ति आहे त्यास केवळज्ञान म्हणतात. ह्या प्रज्ञेचे कार्य काय?

प्रज्ञा ही तर पति हाच परमेश्वर मानणारी, इमानी पत्नीचे काम करते. आत्म्याच्या संपूर्ण हिताचेच दाखविते आणि अहित सोडावयास लावते. जितके जितके बाह्य संयोग येतात तितक्यांचा समभावाने निकाल लावते आणि परत स्वरूपाच्या ध्यानात बसते. म्हणजे आतील कार्य करते आणि बाहेरचे सुद्धा कार्य करते. मध्यंतर सरकार सारखे आणि ते सुद्धा जो पर्यंत पूर्णत: स्वतंत्र सरकारची स्थापना होत नाही तोपर्यंत!

प्रज्ञा म्हणजे काय? आत्म्यापासून जे निराळे आहे, त्याला स्वत:चे कधीही होऊ देणार नाही आणि स्वत:चे आहे त्यास दुसऱ्याचे मानु देणार नाही, ती प्रज्ञा. प्रज्ञा ही तर आत्म्याचेच अंग आहे आणि ती निरंतर आत्म्यास मुक्ति देण्याचेच कार्य करते. जसजशी प्रज्ञा वाढत जाते तसतसे वर्तन बदलत जाते. वर्तन बदलले जाते तसा भार कमी वाटतो. दुसऱ्याचे आणि स्वत:चे अशी गृहखाते आणि परराष्ट्र खाते ह्या दोघांना निराळी ठेवते ती प्रज्ञा आहे. तोच आत्मा आहे, हेच चारित्र्य आहे. वर्तन हेच चारित्र्य. वर्तन म्हणजे स्व आणि पर ह्यांना एकाकार होऊ देत नाही ते.

आम्ही ज्ञान देतो त्याची सरळच अनुभूती होते त्यास परमार्थसमकित म्हणतात. म्हणून प्रज्ञाभाव त्याच वेळेस तुमच्यात निर्माण होतो. सर्व जग जे चालले आहे तो सर्वच चंचल भाग. परंतु प्रज्ञाभाव हा स्थिर राहू शकेल अशी भावना आहे. प्रज्ञा उत्पन्न झाली म्हणजे शिडी किंवा पायऱ्या चढावयास लागत नाहीत. सरळच वरती पोहोचता येते. प्रज्ञेशिवाय सर्वच भावना त्या भावाभाव मध्येच समावेश केल्या जातात आणि त्या सर्वच चंचल भागामध्ये समावतात. प्रज्ञाभाव ह्यास आत्मभाव असे म्हणता येत नाही. प्रज्ञाभाव अचंचल भागात येतो. प्रज्ञेचे कार्य केवळ ज्ञान झाल्या बरोबरच पूर्ण होते. म्हणून त्यास आत्मभाव म्हणू शकता येत नाही. कारण तसे जर म्हणता आले तर तो त्याचा अन्वयगुण समजण्यात येतो आणि अन्वयगुण म्हटला तर सिद्धक्षेत्रात विराजमान झालेल सिद्ध भगवंताला सुद्धा प्रज्ञा असते. परंतु तसे नसते कारण त्याचे तेथे काहीच कार्य नसते. पूर्ण स्वतंत्र सरकार स्थापन झाल्यानंतर मध्यंतरीचे सरकार आपोआप संपुष्टात येते.

तसेच प्रज्ञेचे सुद्धा आहे. आम्ही स्वरूपज्ञान देतो म्हणजे प्रज्ञा बुद्धि निर्माण करतो. नंतर ही प्रज्ञा बुद्धि तुम्हास क्षणाक्षणास जागे करते. भरत राजास तर चोविस तास जागे करण्याकरता नोकर ठेवावे लागत होते! कितीही भयंकर प्रसंग आला असताना आमचे ज्ञान ताबडतोब हजर होते, आमची वाणी हजर होते, आम्ही हजर होतो आणि तुम्ही जागृति मध्ये येता! क्षणाक्षणास तुम्हास जागे ठेवतो असे हे आमचे 'अक्रमज्ञान' आहे. हे ज्ञान तर तुमचे कल्याण करण्याकरिता आहे, मोक्ष मिळण्याकरिता आहे. एक वेळ जर सांधा जोडून घेतलात तर कायमचा प्रश्न सुटेल!

ह्या शरीराचे दोन भाग आहेत. एक चंचल विभाग आणि दुसरा अचंचल, तो आत्मा आहे. जितकी तुम्हाला तुमच्या व्यापारात बारीक माहिती असते तितकी जर आत्म्या संबंधी मिळाली तर ती जास्त उपयोगी पडेल! सर्व विषयात खोलवर जातो परंतु ह्यामध्ये कसे जायचे? हे तर निर्विषय ज्ञान म्हणावयाचे, परत निर्लेप आणि निर्विकारी आहे.

आपण जर पूर्णत: अशुद्ध सोने घेऊन गेलो तरी सोनार रागवत नाही. तो तर फक्त सोनेच पहातो. लोकांचा तर खराब करण्याचाच स्वभाव असतो. तरी सुद्धा सोनार सोन्यासच बघतो. हे डॉक्टरलोक तर रागावतात की अरे शरीर खराब का केलेस? सोनार ओरडत नाही. ज्ञानीपुरुष सुद्धा सोनारासारखा आत्म्यास बघतो. बाहेरचा माल (आवरण) बघत नाही. सोन्याची अवस्था बदलते. अशुद्ध होईल, वितळेल, पावडर होईल आणि त्यामधून परत शुद्ध सोने होईल. अशा अवस्था बदलतच जातात. तरीसुद्धा सोने ते सोनेच रहाते.

सोनाराचे जसे सोन्याकडे लक्ष असते त्याप्रमाणे तुमचे जर आत्म्यामध्ये लक्ष असेल तर तुमचे कल्याण होईल. सोनार सोन्यातच लक्ष ठेवतो. बाहेरुन कसेही अशुद्ध दिसले तरी त्याचे लक्ष शंभर टच च्या सोन्यामध्येच असते. त्याप्रमाणे ज्ञानीपुरुष, चेतनमध्येच लक्ष ठेवतो.

कोणी मनुष्य शास्त्र वाचतो, धारणा करतो परंतु समज तर त्याची स्वत:ची असती ना! लोकानी त्यांच्या स्वत:च्या भाषेतून- समजण प्रमाणे अर्थ केला. गोष्ट खरी जीव-अजीव तत्वाची परंतु स्वत:च्या भाषे-समजल्या प्रमाणे समजले. अजीव तर कोणत्या गोष्टीला समजतात? आणि अजीव हेच जर समजले नाही तर मग जीवाची माहिती कशी समजणार? भगवान होते तरी सुद्धा आत्म्याचे लक्ष बसले नाही, वीतरागात लक्ष असते परंतु आत्म्याचे नसते. लक्ष लागले परंतु ते शब्दब्रह्मात लक्ष लागले आणि पाहिलेल्या ब्रह्माच्या गोष्टीत एकंदर फरक आहे. वाचलेल्या शेताच्या वर्णनाप्रमाणे शेताचे

लक्ष रहाते किंवा रहात नाही, परंतु बघितलेल्या शेताचे लक्ष जात नाही. हा तर शुद्धब्रह्म पाहिला त्याचा आमच्या महात्म्यांना आनंद होतो.

संयोग जर मिळाला नसता तर समसरण मार्गच नसता. हे तर संयोगामूळे belief- मान्यता बदलली आणि म्हणूनच संसार अवस्था जंतू उत्पन्न झाली! आणि त्याच्यामूळे तर अनंत शक्ति आटोक्यात आली. ही खोटी मान्यता जशी उत्पन्न झाली त्याचप्रमाणे जर अस्त पावली तरच आत्मा सुटा (निराळा) होईल. ज्ञानीपुरुष हा तर समसरण मार्गाचा अंत आहे. हे तर शेवटचे मुक्तिचे आणि धर्म प्राप्तिचे निमित्त आहे.

: Note :

•

एगो मे सासओ अप्पा,
नाणदंसणसंजुओ।
सेसा मे बाहिरा भावा,
सव्व संजोगलक्खणा ॥

•

On one side is my Real Self,
pure and blissful,
eternal and aware.

On the other side is everything else,
circumstantial,
conditional and time bound.

HOLISTIC SCIENCE
RESEARCH CENTER

VITRAG VIGNAN CHARITABLE
RESEARCH FOUNDATION, SURAT